# साहित्य

## दिवाळी अंक २०२५



किंमत रू.२००/-

मुंबई मराठी साहित्य संघ

# साहित्य


**मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक**

स्थापना : जानेवारी १९४७

## दिवाळी २०२५

**संपादक**

डॉ. नरेंद्र पाठक

**संपादक मंडळ**

प्रा. डॉ. नरेंद्र पाठक, एकनाथ आव्हाड

पद्माकर शिरवाडकर, रेखा नार्वेकर

**प्रकाशक**

अशोक बेंडखळे

मुखपृष्ठ : सतीश खानविलकर

अक्षरजुळणी : अनिरुद्ध गद्रे

मुद्रितशोधन : अनिल दाभाडे

आतील मांडणी, सजावट चित्रे : सतीश खानविलकर

छपाई : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई ४०००३१

- **मूल्य रु. २००/–**
  वार्षिक वर्गणी (दिवाळी अंकासह) रु. २००/– द्विवार्षिक रु. ४००/–
- धनादेश 'मुंबई मराठी साहित्य संघ' या नावाने असावा.
- NEFT S/B A/C No. 002200100046717
  IFSC : SRCB0000002
  Bank Name - The Saraswat Co-op. Bank, Girgaum

**व्यवस्थापकीय पत्ता :** मुंबई मराठी साहित्य संघ, साहित्य संघ मंदिर, डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई ४००००४. भ्रमणध्वनी : ७३०४३६९३१६
इ–मेल : sahityasangha@gmail.com @ sahityasangh@mtnl.net.in
वेबसाईट : www.mumbaimarathisahityasangh.com

**संपादकीय पत्ता :** बी–५०१, प्रेस्टिज पार्क, गणेश वाडी, नितीन कंपनीच्या मागे,
ठाणे (प.) ४००६०१. भ्रमणध्वनी : ९८६९६८४०८६
इ–मेल : chaitreya@yahoo.com

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.



या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

# ।। संपादकीय ।।

प्रिय वाचकहो,

दिवाळी–२०२५, प्रकाशोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

'साहित्य' हे 'मुंबई मराठी संघा'चे मुखपत्र. 'साहित्य' त्रैमासिकाचा ऑक्टोबर महिन्यात प्रकाशित होणारा अंक हा दिवाळी विशेषांक म्हणून प्रकाशित केला जातो. यंदाचा साहित्य दिवाळी विशेषांक वाचकांच्या हाती सोपवताना आम्हाला आनंद होत आहे. २०२४–२५ या वर्षात आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा म्हणून मान्यता मिळाली. या आनंदपर्वाला एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे... 'अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, पुढे काय?' हा प्रश्न उभा राहतोच. म्हणून या अंकात याच विषयाच्या अनुषंगाने भाषा तज्ज्ञांची चर्चा घडवून आणली आहे. त्याशिवाय दर्जेदार वाचनीय कथा, लेख, ललित लेख, अनुवादित कथा, वैचारिक लेख या अंकात आहेतच. अंक संपादनाचे काम पूर्णत्वास आलं असताना, राष्ट्रीय कादंबरीकार डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या दुःखद निधनाचे वृत्त आले. साहित्य क्षेत्रातील भैरप्पांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उमा कुलकर्णी यांच्यामुळे एस. एल. भैरप्पा मराठी वाचकांपर्यंत पोहोचले. स्वाभाविकपणे भैरप्पांच्या साहित्य साधनेला मानवंदना देण्याच्या उद्देशाने त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल आणि कार्यकर्तृत्वाबद्दल अभ्यासपूर्ण लेख या अंकात आपल्याला वाचायला मिळणार आहे. त्याचप्रमाणे अवघ्या महाराष्ट्राचे आणि सर्वार्थाने ज्येष्ठ, श्रेष्ठ कवी द. भा. धामणस्कर यांची श्री. नारायण लाळे आणि श्री. राजीव जोशी यांनी घेतलेली अभ्यासपूर्ण मुलाखत या अंकाचं वैशिष्ट्य आहे. नेहमीप्रमाणे काव्य विभाग हा मान्यवर कवींच्या कवितांनी सजवलेला आहे. एकूणच विविधांगी साहित्यविधांनी हा अंक वाचनीय करण्यात आलेला आहे. 'साहित्य दिवाळी विशेषांक–२०२५' वाचकांना नक्कीच आवडेल, असा विश्वास व्यक्त करतो.

या अंकासाठी सुंदर आणि सूचक मुखपृष्ठ साकारणारे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. संतोष घोंगडे यांचे आणि अंकातील रेखाटन करणारे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सतीश खानविलकर यांचेही मनःपूर्वक आभार. अंकाच्या निर्मिती प्रक्रियेतील 'ग्रंथाली'चे श्री. सुदेश हिंगलासपूरकर, अनिरुद्ध गद्रे आणि मुद्रितशोधन करणारे श्री. अनिल दाभाडे यांच्या सहकार्याशिवाय अंक पूर्णत्वास येऊ शकत नाही. त्यांचेही मनःपूर्वक आभार. मुंबई मराठी साहित्य संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या अंकाच्या संपादनासाठी माझ्यावर विश्वास टाकला, याबद्दल त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा आपण साहित्य दिवाळी विशेषांकाचे आनंदाने, उत्साहाने स्वागत कराल याची खात्री आहे. दीपोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

**– नरेंद्र पाठक**
संपादक
साहित्य दिवाळी विशेषांक, २०२५

मुंबई मराठी साहित्य संघाचे त्रैमासिक

# साहित्य : दिवाळी अंक २०२५ (ऑक्टोबर-डिसेंबर)

■ संपादक : प्रा. डॉ. नरेंद्र पाठक ■ प्रकाशक : अशोक बेंडखळे

## अनुक्रम

■ **संपादकीय** / १

**कथा**

■ **दादूची दारूण दास्तान** / ३
सागर कुलकर्णी

■ **असमंजस (अनुवादित)** / १२
अशोक बेंडखळे

■ **मानसी** / १८
मेघना साने

■ **एक बंद पाकीट** / २२
विजयराज बोधनकर

■ **गोष्ट एका बागेची** / ३१
निलिमा भावे

■ **अपघात की घात** / ३६
प्रतिभा सराफ

**मुलाखत**

■ **द.भा. धामणस्कर :**
**एका ऋषितुल्य कवीशी संवाद** / ४२
नारायण लाळे / राजीव जोशी

**लेख**

■ **डॉ. एस. एल. भैरप्पा**
**व्यक्ती आणि वाङ्मय** / ५१
रागिणी चंद्रात्रे

■ **हायकूच्या वाटा** / ५६
विजय पाडळकर

■ **मला भेटलेलं एक ज्ञानपीठ** / ६०
अनुपमा उजगरे

■ **मानवी जगण्यातील प्रश्नांचे आयाम** / ६६
देविदास फुलारी

■ **बालकवितेतून बालमन फुलविणारे...** / ७०
एकनाथ आव्हाड

■ **नारायण सुर्वे यांच्या कवितेतील स्त्री** / ७६
किरण डोंगरदिवे

■ **गुलबक्षी** / ७८
सुजाता राऊत

**परिसंवाद**

■ **''...अभिजात दर्जा मिळाला, पुढे काय?''** / ८३
डॉ. आनंद काटीकर

■ **तैसी भाषांमध्ये मराठी सर्वोत्तम** / ८७
श्याम जोशी

**कविता** / ९० ते ९६

■ ज्योती कपिले, संदीप जगताप, मुबारक शेख, शशिकांत हिंगोणेकर, गणेश भाकरे, अशोक कोतवाल, डॉ. विनय बापट, अशोक लोटणकर, रामदास खरे, मोहन काळे, गीतेश शिंदे, नीलकृष्ण देशपांडे

शुभ दीपावली

# दादूची दारूण दास्तान

## सागर कुलकर्णी

**दशमक्रियेसाठी** वापरल्या जाणाऱ्या एका निर्जन दगडी घाटावर सप्रे गुरुजी आणि माधव बसले होते. घाटाच्या पाच उतरत्या पायऱ्या दिसत होत्या. सहाव्या पायरीपासून पाणी वाहताना दिसत होतं. मृताचा कोणीही नातलग उपस्थित नसल्यामुळे दूरचाही नातलग नसलेला माधवच गुरुजींच्या समोर बसून विधी करत होता. कारण घरच्यांची इच्छा नसली तरी हे विधी व्हावेत आणि मृतात्म्याला शांती लाभावी ही माधवचीच इच्छा होती. तो मृताचं पूर्ण नाव सांगू शकला होता, पण गोत्र त्याला माहीत नव्हतं. यावर सप्रे गुरुजींनी शास्त्रातील विकल्पानुसार मार्ग शोधला होता. हा विधी सफल संपूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले कावळे आधीपासूनच तिथे जमून काव् काव् करत होते. ते त्यांच्या हक्काच्या घासाची वाट बघत होते का?

गुरुजींनी भाताचा पिंड घाटाच्या पाण्याजवळच्या एका दगडी फरशीवर ठेवला. भटजींनी पिंड ठेवताच सारे कावळे बंड किंवा निषेध केल्याप्रमाणे दूर उडून गेले. एकच कावळा आडोशाला लपून राहिला होता. एखाद्या तरी कावळ्यानं येऊन भाताच्या पिंडाला चोच लावावी यासाठी माधव वाट बघत राहिला. राजनही अजून आलेला नव्हता. आडोशाला लपलेला कावळा माधवला दिसला.



माधव जाण्याची वाट बघत होता की राजन येण्याची? की काही वेगळच कारण होतं?

बराच वेळ झाल्याने गुरुजी चुळबूळ करू लागले. तेवढ्यात राजन घाईघाईत आला. भाताचा अस्पर्श पिंड बघितल्यावर त्यानं माधवकडे पाहिलं. राजनची नजर आणि देहबोली सांगत होती, 'कावळा पिंडाला असातसा शिवणारच नाही हे मला माहीत होतं.' त्यानं पँटच्या खिशातून एक चपटी बाटली काढली. बाटलीतला रंगहीन, पण उग्र वासाचा द्रव त्यानं खाली पडलेल्या एका करवंटीत ओतला आणि ती करवंटी भाताच्या पिंडाशेजारी ठेवली. आडोशाला असलेला कावळा समोर आला. तो उडत नाही, चालत आला. चोच जमिनीकडे झुकवून किंचित लंगडत पिंडाकडे जाणाऱ्या त्या कावळ्याला पाहून माधव चमकला. त्याची आणि राजनची पुन्हा नजरानजर झाली.

तो कावळा पिंड अणि करवंटी यांच्या मधे येऊन भाताचा पिंड आणि त्या करवंटीतला द्रव यांच्याकडे चोच वेळावत बघत राहिला... वाट बघण्याचे क्षण लांबच लांब ताणले जात होते आणि माधवच्या मनःचक्षूंसमोर दादूची दास्तान उलगडत जात होती.

पंधरा वर्षांपूर्वी प्रमोशन मिळून सुपरव्हायजर माधवची ठाण्याच्या छोट्या फॅक्टरीतून नाशिकमधील सातपुरच्या मोठ्या फॅक्टरीत पर्सोनेल ऑफिसर म्हणून बदली झाली आणि त्याची दादूशी गाठ पडली. नाशिकला जॉइन होण्याआधी अनेकांनी त्याला दादूबद्दल सावध केलं होतं. तो खूप त्रासदायक आणि धोकादायक आहे. त्याला शिस्तीचा बडगा दाखवला तर तो नडतो अणि नाही दाखवला तर मॅनेजमेंट हॅरॅस करते. पर्सोनेल ऑफिसरची डबल ढोलकी होते, अशी सातपुरच्या फॅक्टरीतली ख्याती होती. पण माधव तिथे गेला. कारण हे पोस्टिंग नाकारलं असतं तर कदाचित आणखी दूर जावं लागलं असतं किंवा प्रमोशनची संधी अनिश्चित काळासाठी हुकली असती. ठाण्याच्या फॅक्टरीतल्या सहकाऱ्यांच्या शुभेच्छा आणि आपला बाडबिस्तरा घेऊन माधव सातपुरला दाखल झाला.

फॅक्टरी तशी गावाबाहेर होती. त्याला कंपनीतर्फे फॅक्टरीजवळच्या अधिकारी आणि व्यवस्थापक-वसाहतीत तीन खोल्यांची जागा मिळाली होती. कामगारांसाठी जरा दूर चाळीसारखी वसाहत होती. जॉइन झाल्यावर माधवची नजर दादूला शोधत होती. चार दिवस तो कुठे दिसला नाही. त्याच्याविषयी कोणतेही पूर्वग्रह मनात ठेवायचे नाहीत आणि त्याच्याविषयी विचारून उगाच त्याला महत्त्व द्यायचे नाही असे माधवने ठरवले होते. पण कुतूहलामुळे त्याने एक दिवस अटेंडन्स रजिस्टर चाळले. त्यात दादूचे नाव नव्हते. म्हणजे माधव इथे जॉइन होण्याआधीच दादूला कामावरून काढून टाकलं होतं का? चाहूल लागल्याने त्याने वर पाहिले. एक चाळिशीतला काटकोळा माणूस मान खाली घालून, चोचीसारखे वाटणारे लांबडे टोकदार नाक झुकवून, तिरक्या अस्थिर नजरेने वर बघत चोरट्या-सारखा चुळबुळत उभा होता.

माधवने सहज विचारले, ''इथे दादू कोण आहे?''

''मीच... दादू...'' तो इसम म्हणाला.

''मग तुझं या रजिस्टरमधे नाव कसं नाही?''

''आहे की. चंदर आणि एकनाथच्या मधे... दामोदर दूरशेतकर.'' तो म्हणाला. ''राजाभौनी दामोदरमधला दा आणि दूरशेतकर मधला दू घेऊन इथं माझं बारसं केलं.''

''राजाभौ?'' माधवनं विचारलं, ''हे तू कोणाचं बारसं केलंयस?''

''आपले सुपरवायजर साहेब...'' तो म्हणाला, ''राजन पत्की साहेब.''

मस्टरवर दादूच्या म्हणजे दामोदर दूरशेतकरच्या नावापुढच्या अनेक लाल फुल्या सांगत होत्या की दादू दांडीबहाद्दर होता. आता दादू म्हणून अभ्यास करण्यासाठी माधवनं त्याच्याकडे पाहिलं.

सडपातळ असल्याने उंच वाटणारी शरीरयष्टी, खप्पड गाल, रापलेला उभा चेहरा, किंचित खाली वळलेलं टोकदार नाक, अस्थिर नजर... एकंदर देहबोलीच अस्वस्थ आणि वळवळ करणारी.

माधव म्हणाला, ''मी आल्यापासून म्हणजे चार दिवस कामाला आलेला नाहीस तू.''

''आजारी होतो. कंपनीच्या डाक्टरचं सर्टिफिकेट आणलंय.'' दादू सर्टिफिकेट देत म्हणाला.

''हे राजाभौ... राजन साहेबांना दे. ''माधव म्हणाला, ''त्यांच्याकडून माझ्याकडे येऊ दे.''

''आज ते दुपारी येणार आहेत.'' असं म्हणत दादूनं सर्टिफिकेट दिलं. ते वरवर पाहून माधवनं त्याला कामावर जायला सांगितलं. तो सलाम करून गेला. तो गेल्यावर बऱ्याच वेळानं माधवच्या लक्षात आलं.. मेडिकल सर्टिफिकेट दोनच दिवसांचं होतं. लंच टाइममधे त्यानं दादूला

कॅंटीनमधे गाठलं.

''दादू, तू चार दिवस गैरहजर होतास. सर्टिफिकेट दोन दिवसांचच आहे.''

''दोन दिवस कॅज्युअल घ्या साहेब.'' दादू कोडगेपणाने म्हणाला.

नुकताच आलेला राजाभौ, म्हणजे राजन हे बघत होता.

''मेडिकल लीव्ह अशी दोन प्रकारात एकाच वेळी घेता येत नाही.'' माधव म्हणाला.

''सर्टिफिकेट पाहून मग मला कामावर जॉइन व्हायला तुम्हीच सांगितलंय. आता काय तो मार्ग तुम्हीच काढा साहेब.'' असं म्हणून दादू शांतपणे निघून गेला. कामगार अणि इतर कर्मचारी स्टाफ बघत होते. माधवला दादूचा खूप राग आला होता. पण तो काही करू शकत नव्हता. कारण चूक माधवचीही होती. त्यानं सर्टिफिकेट आधी नीट पाहून त्यातली डिस्क्रेपन्सी दादूच्या आधीच लक्षात आणून द्यायला हवी होती. पहिली लढत तर दादूनं जिंकली होती... तेही स्टाफ मेंबर्सच्या समोर. स्वतःवरच चरफडत माधव काही न खाताच त्याच्या केबिनमधे परत आला. थोड्या वेळातच दोन व्हेज थाळ्या घेऊन राजन आला.

''सॉरी, मी लेट आल्यामुळे हे घडलं.'' राजन म्हणाला. ''दादूवरच्या रागापायी उपास केलात तर कुपोषित व्हाल साहेब.'' तो म्हणाला. ''चला खाऊन घेऊ. आधीच्या पर्सोनेल ऑफिसरनी दादूपायीच नोकरी सोडली. दादूला सहा वर्षं बघतोय मी. त्या अनुभवानं सांगतोय. दादूच्या वागण्याचा खाण्यापिण्यावर परिणाम होऊ देऊ नका. कारण तुम्हाला तर इथे अनेक वर्षं काढायचीत.''

दोघे जेवू लागले.

''दादू पराकोटीचा निष्ठावंत आहे, साहेब.'' राजन म्हणाला. ''हीच निष्ठा त्यानं अध्यात्मात दाखवली असती तर मोठा संत बनला असता. कंपनीत दाखवली असती तर माझ्याच काय, कदाचित तुमच्याही पुढे गेला असता, पण त्याची निष्ठा फक्त तिच्यावर आहे.''

''तिच्यावर?''

''दारूवर. दारू ही दादूच्या पत्नीची सवत आहे. दारू लाडकी आहे, पत्नी दोडकी आहे.'' राजन म्हणाला. ''दारूमुळेच त्याच्या रजा सात-आठ महिन्यांतच संपतात आणि बिनपगारी रजा सुरू होतात. कितीतरी वेळा वॉर्निंग, मेमो देऊनसुद्धा तो दांड्या मारतो. अनेकदा दारू ढोसूनच कामाला येतो. एक वेळ नोकरी सोडेल, स्वतःच्या बायकोला सोडेल, पण दारू नाही सोडणार. दारू न मिळाल्याने दारूण अवस्था होणारा, कधीही सुधारणा न होणारा सुधाकर आहे तो.'' आणि राजन माधवला दादूच्या दारूबाजपणाचे किस्से सांगू लागला.

राजन गेल्यावर माधवच्या लक्षात आलं की आज दादू पिऊन आला नव्हता. तो खरंच आजारी होता की राजन अतिशयोक्ती करत होता? या प्रश्नाचं उत्तर त्याला संध्याकाळीच मिळालं.

संध्याकाळी सगळे कामगार घरी गेल्यावर माधव एकेकाची फाइल चाळत होता. त्याच्या पावलांना कसला तरी स्पर्श झाला. त्यानं दचकून पाहिलं. खाली बसलेला दादू त्याचे पाय धरून त्याच्याकडे बघत होता.

''मी चुकीचं वागलो अणि वर तुमच्याशी आगाऊगिरी करून बोललो. सॉरी साहेब.'' तो म्हणाला ''पायजेल तर दोन थोबाडात मारा, पण राग मनात ठेवू नका.''

माधवनं त्याला उठून समोर खुर्चीत बसायला सांगितलं. म्हणाला, ''चुकीचं वागतोयस हे समजतं तर तसा वागतोस कशाला? सुधारण्याचा प्रयत्न का करत नाहीस?''

'सुधारण्याचा प्रयत्न केला म्हणूनच दोन जादा रजा झाल्या साहेब.'' दादू अतिशय प्रामाणिक चेहरा करून, पण नजरेला नजर न देता सांगू लागला, ''तुमचं नाव आधीच ऐकून होतो. तुमच्यासमोर येताना पिऊन यायचं नाही असा निच्चय केला होता. पण बरं वाटल्यावर चुकून प्यालो. दुसऱ्या दिवशी माती खाऊन पुन्ना प्यायलो.. आजून एक दिवस न पिता राहिलो आणि आज कामावर आलो.''

''म्हणजे माझ्यासमोर न पिता यायचं म्हणून तू दोन दिवस जादा दांड्या मारल्यास.'' माधव टोमणा मारत म्हणाला, ''याचा अर्थ त्या रजा माझ्या रजांमधून घ्यायला हव्यात, नाही का?''

''असं कुठं म्हणलो मी साहेब...'' दादू नाकासह नजरही खाली करत म्हणाला. पण त्याला ही कल्पना आवडली होती.

''ठीक आहे. जा आता.'' माधव म्हणाला, ''पुन्हा कामावर पिऊन यायचं नाही आणि दांडीही मारायची नाही.''

''चुकून कामावर यायच्या आधी पिलोबिलो तर काय करू?'' दादूनं विचारलं.

''कामावर येऊ का नको?''

तो पुन्हा माधवला अडकवण्याचा प्रयत्न करत होता हे लक्षात येऊन माधव म्हणाला, ''पिणंच कायमचं सोड म्हणजे हा प्रश्नच येणार नाही.''

यावर दादू आधी ओशाळवाणं हसला आणि मान खाली घालून नकारार्थी हलवत निघून गेला. तो चालताना समोर नाही, खाली बघून चालतो आणि डाव्या पायाने किंचित लंगडतो हे माधवच्या लक्षात आलं. त्यानं याबद्दल राजनला विचारलं तेव्हा तो म्हणाला...

''नशेत टुन असताना कुठेतरी धडपडला आणि पाय मोडला होता. तेव्हापासून लंगडतो. खाली मुंडी पाताळ धुंडी तर आहेच तो.''

यानंतरही दादूने दांड्या मारणे बंद केले नाही. पिऊन कामावर येणेही तो पूर्णपणे बंद करू शकला नाही. पण पिऊन आलोय हे माधवला कळू नये म्हणून केसांना वासाचं तेल लावून, अंगावर हलक्या दर्जाचं उग्र सेंट मारून आणि ठंडकवाला मसालापान खाऊन यायचा. पण या तीन भिन्न गंधांमधूनही त्याने प्राशन केलेल्या स्वदेशी पेयाचा कस्तुरीगंध प्रकर्षाने जाणवायचा. दादूला चिडवण्यासाठी राजन एका प्रसिद्ध चित्रपटगीताची नक्कल करत म्हणायचा –

*दादूऽऽ तेरी नजर खूशबूऽऽ तेरा बदन*

यावर दादू निषेध, लाज, ओशाळेपण असे अनेक भाव असलेला चेहरा करून 'नाही हो, नाही. खरंच नाही.' अशी मान हलवायचा. त्यावर राजनची पुढची ओळ अगदी टाइमिंग साधून यायची...

*तू हां कर या ना कर... तू हां कर या ना कर* –

आणि सगळे हसायचे. पण अनेकदा शपथा घेऊनही त्याचं पिणं, कधी कधी पिऊन कामावर येणं आणि अतोनात दांड्या मारणं थांबलं नाही. याच्यावर आजवर स्ट्रिक्ट ॲक्शन का घेतली नाही? या प्रश्नाचं उत्तरही माधवला काही दिवसांतच मिळालं.

पूर्ण सर्विसकाळात बिनपगारी रजा घेण्याची मर्यादा त्यानं केव्हाच ओलांडली होती. आता वर्ष संपेपर्यंत एकही दांडी मारायची नाही असं बजावूनही दादू दोन दिवस कामावर आला नाही. त्यानं फोनवर बायको हॉस्पिटलमधे आहे हे कारण सांगितलं. कंपनीतून सुटल्यावर माधव याचा छडा लावायला बाहेर पडला. दादूच्या घराच्या आसपास चौकशी केल्यावर एका माणसानं त्याला एक किराणा दुकान दाखवलं. त्या दुकानात त्यानं दादूची सडपातळ बायको दुकानदाराशी हात जोडत काही बोलत असलेली दाखवली. दादूचा पत्ता सांगताना त्या माणसानं एका देशी बारकडे बोट दाखवलं. माधवनं त्या बारबाहेर पाळत ठेवली. रात्री दादू त्या देशी बारमधून डुलत बाहेर पडला. माधवने दम दिला तेव्हा दादू विमानात होता. उलट उत्तर देत म्हणाला, ''साहेब मी माझ्या पैशानं पितो नां. आणि दांडी मारल्यावर तुम्ही पैसे कापता ना? मग लोकांसमोर माझा इन..इनसलट का करता? आपली गावात इज्जत आहे साहेब.''

त्याच्यावर ॲक्शन घ्यायचीच असं माधवनं ठरवलं. दादूला एक कडक भाषेतला मेमो दिला. त्याची प्रत, दादूचं लीव्ह रेकॉर्ड आणि लॉस ऑफ पे स्टेटमेंटसह हेड ऑफिसला ताबडतोब जाउदे असं राजनला सांगितलं. पुन्हा पुन्हा बजावलं. हेड ऑफिसकडून यावर कारवाई सुरू झाल्यावर डिसिप्लिनरी ॲक्शन, सस्पेन्शन या पायऱ्या अटळ होत्या. मेमो दिल्याच्या दुसऱ्या दिवशीही दादू कामावर आला नाही. हेड ऑफिसला मेमो आणि कव्हरिंग लेटर फॅक्स करून, फॅक्सने परवानगी मागून त्याला सस्पेन्शनची ऑर्डर आजच देउया असा विचार कँटीनमधे बसलेल्या माधवच्या मनात आला. तो धुसफुसत होता. त्याच्या पावलांना हस्तस्पर्श झाला.

''हे बघ दादू, आता पाया पडायची नाटकं नकोत. मी तुझं प्रकरण हेड ऑफिसला कळवलंय.'' माधव खाली न बघताच म्हणाला. एका स्त्रीच्या हुंदक्याचा आवाज ऐकून त्यानं दचकून पाहिलं.

त्याचे पाय दादूनं नाही, त्याच्या बायकोनं धरले होते. आज पहिल्यांदाच तो तिला इतकं जवळून बघत होता. ती सडपातळ नाही, अशक्त आणि कुपोषित होती. काटकोळ्या, भुंड्या अस्थिपंजरवत हातांवर फक्त फिकट कातडं होतं आणि टचटचून फुगलेल्या शीरा होत्या. डोळ्यांखाली खूप मोठी काळी वर्तुळं होती. गळ्यात फक्त एक काळी पोत होती. तिच्या डोळ्यांत पाणी होतं... ओठ थरथरत होते. दचकून पाय मागे घेत, ओशाळून उभा राहत माधव म्हणाला, ''अहो अहो हे काय करताय वैनी?'' यावर उत्तर न देता दादूची बायको गदगदून रडायला लागली. ''आई'' असं म्हणत दादूची सतरा-अठरा वर्षांची मुलगी पुढे झाली. आईच्या मायेमुळे आणि तरुण वयामुळे ती तब्बेतीनं बरी दिसत होती. ऑकवर्ड झालेला माधव दोघींना केबिनमधे घेऊन गेला.

दादूची बायको म्हणाली, ''माझा नवरा दोषी आहे, नालायक आहे... कबूल करते... त्याच्या पिण्यापायी आणि रजांपायी देणेकरी वाढलेत. दुकानदार, दुधवाला सगळे वखवख करतायत. नवऱ्याची नोकरी गेली तर मी भीक मागीन नाहीतर जीव देईन. पण या पोरीचं काय करू? ती कम्प्यूटरचं शिक्षण पुरं करून नोकरी करून मला आधार द्यायची स्वप्नं बघत होती. पण... आता ती... कसं सांगू?''

दादूची मुलगी भावनाहीन नजरेनं बघत म्हणाली, ''आई, हा आपल्या घरचा मामला आहे. साहेबांना का सांगतेस? माझ्या बापाला आपल्यापेक्षा दारू प्यारी वाटते तर त्याला साहेब काय करणार? पण त्याच्या पापांची सजा मी तुला भोगू देणार नाही. मला करायचं तेच करणार. तू येतेयस का मी जाऊ?''

मुलगी केबिनबाहेर जायला लागली. बायको कळवळून म्हणाली, ''साहेब तुम्ही तरी हिला समजावा. फी भरली नाही तर क्लास बंद होणार म्हणून... घर चालवण्यासाठी अब्रू विकून धंदा करायचा म्हणतेय ही!''

माधवच्या अंगावर शहारा आला! ही मुलगी घरासाठी, आईसाठी आपलं शरीर विकायला निघाली होती. तिला हाताला धरून माधवनं खुर्चीत बसवलं. कसं तरी समजावलं. तुझं कंप्यूटर ट्रेनिंग थांबणार नाही, असं प्रॉमिस दिलं. तिच्या क्लासमधे फोन करून बोलला. जाताना मुलगीसुद्धा पाया पडून गेली.

आजचं संकट उद्यावर ढकललं गेलं होतं. पण बाण तर ऑलरेडी सुटला होता. माधव राजनकडे गेला. ''राजन दादूचा मेमो आणि पत्र...''

''कालच डिसपॅच केलं...'' तो म्हणाला, ''तुम्हीच तसं बजावलं होतं ना. आज संध्याकाळी किंवा उद्या नक्की पोचेल.''

पत्र हेड ऑफिसला पोचल्यावर माघार घेता येणार नव्हती. माधव अस्वस्थ झाला होता. काही करून ते पत्र हेड ऑफिसला जाण्यापासून. निदान डिसिप्लिनरी डिपार्ट-मेंटकडे पोचण्यापासून थांबवायला हवं होतं. माधव तिथल्या ओळखीच्या लोकांना फोन करू लागला. पण तिथे कसली तरी मीटिंग चालू होती. शिवाय माधव ते पत्र परत मागवण्याचं कारण काय सांगणार होता? राजन मंद हसत उभा होता.

''माझी इथे वाट लागलीय आणि तू हसतोयस?'' माधव चिडून म्हणाला.

राजन म्हणाला, ''दादूविरुद्ध ॲक्शन घेता का येत नाही, ते तुम्हाला आज समजलं असेल. ती बाई कधी कधी इथे येऊन फॅक्टरीतच जीव देणार म्हणते. आणि ती तसं करू शकते.'' हे ऐकून माधव सुन्न झाला होता.

एक एनव्हलप पुढे करत राजन म्हणाला, ''मेमो आणि पत्र. मी डिसपॅच नाही केलं.'' माधवनं कृतज्ञतेनं राजनचे हात धरले. संध्याकाळी इतर स्टाफ गेल्यानंतर ते दोघे दादूच्या बाबतीत काय करायचं, याचाच विचार करत होते.

''साहेब, तुम्ही दादूच्या मुलीची क्लासची फी भराल. त्यांची आत्ताची देणी फेडाल. पण नंतर काय? सहा महिन्यांत पुन्हा हीच स्थिती येणार आहे. दादूत सुधारणा झाल्याशिवाय परिस्थिती सुधारणार नाही आणि दादू सुधारणं शक्य नाही.'' राजन म्हणाला, ''दादूच्या कुटुंबाला आयुष्य-भर पोसू शकणार आहात तुम्ही?''

या प्रश्नाचं उत्तर नकारार्थी होतं हे दोघांनाही माहीत होतं. त्यामुळे दादूमधे काही सकारात्मक बदल व्हावा यासाठी विचारमंथन करून दोघांनी एक इमोशनल कम डिव्होशनल उपाय शोधला. आठ दिवसांनी येणाऱ्या, कंपनीच्या वर्धापन दिनाच्या वेळी दरवर्षी सत्यनारायणाची पूजा व्हायची. पूजेला कोणीतरी अधिकारी सपत्निक बसायचा. नवीन लग्न झालेल्या जोडप्याला प्राधान्य दिलं जायचं. यावर्षी सगळ्या परंपरा बाजूला ठेवून लग्नाला वीस वर्षे झालेल्या, कामगारवर्गातल्या दादू आणि त्याच्या बायकोकरवी ही पूजा करायचं ठरलं. दादूला हे कळलं तेव्हा त्याला थोडा आनंद झाला, थोडं दडपणही आलं. दादूपेक्षा जास्त दडपण त्याच्या बायकोला आलं होतं. पूजेच्या वेळी दादू कसा वागेल याचा तिला भरोसा नव्हता, आणि पूजेला बसण्याची तिला लाज वाटत होती. पूजेच्या वेळी सफाई, सजावट, स्वैंपाक अशी सगळी कामं करायची तिची तयारी होती. पण माधवनं हट्टानं तिला पूजेला बसायला तयार केलं. म्हणाला, ''सत्यनारायण तरी दादूला सुबुद्धी देईल असं वाटतंय. पूजेच्या वेळी त्याच्याकडून संकल्पच सोडू तसा.''

''पण पूजेच्या वेळी ते पिऊन आले तर?'' बायकोच्या या प्रश्नानं माधव चमकला. पूजा व्यवस्थित पार पडू दे अशी त्यानं सत्यनारायणाकडे मनोमन प्रार्थना केली. दादू पूजेला बसणार म्हटल्यावर दुसरे गुरुजी बघा

असं सांगणारे नेहमीचे सप्रे गुरुजीसुद्धा माधव आणि राजनच्या शब्दाखातर तयार झाले होते.

यानंतर पूजेचा दिवस येईपर्यंत माधवचे विश्वासातले सहकारी दादूवर जणू पाळतच ठेवून होते. दादू पुढचे सात दिवस सूतासारखा सरळ होता. पूजेच्या आधीची रात्र धोकादायक होती. आणि त्याच रात्री दादू बायकोच्या नकळत घरातून गायब झाला. माधव आणि राजन त्याला शोधू लागले. तो त्याच्या संभाव्य अड्ड्यांवर नव्हता. नॉर्मल बारमधेही नव्हता. त्याची बायको धास्तावून रडत होती. उपाय फसला होता. समारंभाचा विचका होण्याची चिन्हे होती. आयत्या वेळी पूजेला कोण बसणार, हा प्रश्न होता. वैतागलेले माधव आणि राजन फॅक्टरीच्या रिक्रिएशन हॉलमधे आले. दादू तिथे होता! तो पूजेसाठी सजावट करत होता. प्यायला जायचा मोह होऊ नये म्हणून तो रात्रभर हॉलमधेच, कामात गर्क राहिला. पूजेच्या वेळी लेंगा-झब्बा घातलेला दादू आणि नऊवारी साडी नेसलेली त्याची बायको हा जोडा शोभून दिसत होता. दादूला न पिण्याची शपथ घ्यायला लावणं, अति झालं असतं. पण एक सुरुवात म्हणून पूजेच्या वेळी राजनच्या सांगण्याप्रमाणे सप्रे गुरुजींनी दादूला झेपेल असा संकल्प बोलायला लावला. ''यापुढे नोकरी आणि घरसंसार सांभाळूनच शौक आणि मौजमजा करीन.'' पूजा यथासांग पार पडली. हे आठ दिवस दादू दृष्ट लागण्यासारखा वागला होता पण...

देवापुढे जमलेले पैसे दादूच्या बायकोला मदत म्हणून द्या असं सांगण्याचा उदारपणा सप्रे गुरुजींनी दाखवला होता. पण ते दादूच्या नकळत द्यायचे म्हणून तो गेल्यावरच पैसे मोजायला सुरुवात झाली. आधी शंभर, पन्नास, दहा, वीसच्या नोटा वेगळ्या केल्या गेल्या. माधव, राजन अणि एक कामगार पैसे मोजू लागले.

अचानक माधव दचकून म्हणाला, ''दादूने देवापुढचे पैसे उचललेत!''

''अजून सगळे पैसे मोजून कुठे झालेत? आणि देवापुढे किती पैसे होते, आपल्याला कुठे माहीत आहे?'' राजन म्हणाला.

''देवापुढे एक पाचशेची नोट होती हे मला नक्की माहीत आहे.'' माधव म्हणाला, ''कारण मीच ती ठेवली होती. या नोटांमधे पाचशेची नोटच नाही.''

पूजेतली देवासमोरची पाचशेची नोट पळवून दादूनं पूजेनंतरच्या रात्रीचं उपासाचं पारणं फेडलं. नंतर पूर्ण आठवडा कामाला आला नाही. घरातूनही गायब होता. माधवचे इमोशनल, डिव्होशनल सगळे उपाय हरले होते. दादू जिंकला होता... नाही... दादूची दारू जिंकली होती.

माधव आता दादूला माफही करू शकत नव्हता. शिक्षाही करू शकत नव्हता, कारण ती शिक्षा त्याच्या बायकोला आणि मुलीलाच झाली असती. पगाराच्या दिवशी दादू कपाळाला गंधबिंध लावून, सोबत बायकोला घेऊन हातापाया पडत आला. पुन्हा अशा दांड्या मारणार नाही, असं बायको आणि मुलीच्या शपथा घेऊन सांगू लागला.

माधव रागानं म्हणाला, ''तुला बायको-मुलीच्या जीवाची पर्वा आहे, दादू? अरे सत्यनारायणासमोर खोटं बोललास तू? देवापुढचे पैसे चोरून दारू प्यालास?''

''ते पैसे तुमी मलाच... माझ्या बायकोलाच देणार होतात ना.'' दादू कोडगेपणानं म्हणाला- ''त्यातली फक्त एक नोट मी घेतली तर एवढं काय?''

संताप असह्य होऊन माधवनं त्याच्यावर हात उगारला. पण दादूच्या मुस्काटात न देता तो हात खुर्चीवर आपटला. खुर्ची मोडून पडली. माधवच्या हाताला जखम झाली.

''माझ्या नादान नवऱ्यापायी स्वतःला का शिक्षा करून घेताय साहेब?'' दादूची बायको कळवळून म्हणाली.

या घटनेनंतर माधवनं दादूबाबतची वागणूक पूर्ण बदलली. तो कधीच सुधारणार नाही, हे मान्य करून उपाय केले. शिस्तभंगाची कारवाई न करण्याच्या बदल्यात दादूकडून एक ना हरकत प्रमाणपत्र सही करून घेतलं. आता दादूच्या हाती पगाराचे पैसे पडणार नव्हते. तो बायकोवर जबरदस्ती करू शकत होता, त्यामुळे पैसे त्याच्या मुलीकडे देण्यात येणार होते. दादूकडे पैसेच नसतील तर तो दारू कशी पिऊ शकत होता? शिवाय माधव आणि राजननं दादूच्या बायकोला सोबत घेऊन गावातल्या सर्व दारूच्या अड्ड्यांना आणि बार्सना भेटी दिल्या होत्या. दादूला दारू न देण्याबद्दल बजावलं होतं. दादूच्या दारूची सर्व बाजूंनी नाकाबंदी झाली होती. पण...

दादू रोज संध्याकाळी इवनिंग वॉकच्या नावाखाली बाहेर पडायचा, ते रात्री उशिरा घरी यायचा. मुलीनं ताटात झाकून ठेवलेलं सांडलवंड करत खायचा आणि झोपायचा. त्याच्या देहबोली आणि वर्तणूकीत अचानक दारू बंद केल्यावर दिसतात तसे विथड्रॉअल सिंप्टम्स अजिबात दिसत नव्हते. त्याच्या मुलीला खात्री होती की तो पिऊनच येत

होता. खिशात पैसे नसताना त्याला कोण दारू देत होतं? एका संध्याकाळी राजननं त्याच्यावर पाळत ठेवली.

जे पहिलं ते सत्य, पण कल्पिताहूनही अद्भुत या प्रकारातलं होतं. दादू रोज रस्त्याच्या कडेकडेनं, गल्ली-बोळांतून चालत चालत सात-आठ किलोमीटरवरच्या गावात गेला. जाताना तो वाटेतल्या रिकाम्या बाटल्या, लोकांनी टाकून दिलेले डबे, पत्र्याचे तुकडे, कागद, कचऱ्यामधे मिळतील त्या वस्तू गोळा करून एका पोत्यात भरून घेऊन गेला... त्या वस्तू एका भंगारवाल्याला विकून आलेल्या पैशातून तिथल्या परक्या गुत्त्यावर जाऊन स्वस्त आणि स्ट्राँग देशी दारू प्यायला. थोडी दारू खिशात छोट्या चपटी लपवून घरी परत आला. त्याचा हा संध्याक्रम पाहून आणि ऐकून राजन आणि माधव अवाक् झाले. अपार निष्ठेने दादू सारे नियम पाळून नियमभंग करत होता.

रोज नवे रस्ते, नव्या गल्ल्या फिरून तो भंगार गोळा करत होता. आता पैसे नसले तरी त्याची दारूची गरज भागत होती. घरी खायला मिळत होतं आणि नव्या गुत्त्यावर नवे आगलावे मित्रही मिळाले होते. काही दिवसांनी त्यानं कामाला येणं बंदच केलं. ''मला तुम्ही पगार देत नाही तर मी का काम करू?'' असं तो म्हणू लागला. एव्हाना त्याच्या मुलीचं कंप्युटर ट्रेनिंग पूर्ण झालं होतं. माधवनं दादूच्या व्यसनाच्या वर्मावर घाव घालणारी एक ड्रॅस्टिक स्टेप घेतली. दादूवर शिस्तभंगाची कारवाई केली आणि त्याच्या मुलीला अकाउंटस विभागात नोकरी दिली. मुलगी घर सांभाळू लागली. दादू आता पिऊन राजरोस घरी जाऊन गोंधळ घालू लागला. आजारी बायकोला त्रास देऊ लागला. मुलीनं दादूला बजावलं, ''दारू पिऊन तमाशा करायचा असेल तर घरी येऊ नका. नीट राहणार असाल तरच मी तुम्हाला खायला घालीन.''

दादूवर कठोर बंधनं आली की दारूच्या बाबतीत 'केला जरी पोत बळेचि खाली ज्वाला तरी ते वरती उफाळे' या काव्यपंक्तींसारखी गत व्हायची. मुलीनं बजावल्यावर नव्या गुत्त्यावरच्या मित्रांच्या सांगण्यावरून दादू त्यांच्यासह नव्या ओव्हर ब्रीजच्या खाली राहायला गेला. तिथेच खाऊ-पिऊ राहू लागला. इथे केवळ भंगारावर अवलंबून राहावं लागत नव्हतं. चोरट्या दारूची, नशिल्या पदार्थांची ने-आण, मटका, जुगार असे अनेक पर्याय उपलब्ध होते. दोन-तीन वेळा त्यानं कधी गुंडांकडून, कधी पोलिसांकडून मारही खाल्ला. हे सहन न झाल्यामुळे पत्नी तापानं फणफणलेल्या अवस्थेत तिथे त्याला बोलवायला गेली. पण तो म्हणाला, ''मला तुझी, पोरीची, कोणाचीच गरज नाही. ही इथे राहतात ती माझी माणसं आहेत. त्यांनी मला दारूसकट स्वीकारलंय. मी घरी येणार नाही. तुला हवं तर इथे राहायला ये.'' माधव आणि राजनचंही त्याने काही ऐकलं नाही. यानंतर त्याची बायको खचतच गेली. तिच्या आजाराबद्दल निरोप मिळाले तरी तो घरी गेला नाही. एक दिवस नगरपालिकेनं ब्रिजखालची ही अनाधिकृत वस्ती उठवली आणि दादू निर्वासित झाला.

आता तो कंपनीच्या कामगारवस्तीच्या आवारातच, कधी पारावर, कधी पाण्याच्या टाकीच्या शेडमधे, कधी चाळीच्या जिन्याखाली तर कधी चाळीच्या गच्चीत राहू लागला. बायको-मुलीला लाज वाटेल असं भणंग आयुष्य जगू लागला. सर्वपितरी अमावस्येला एक विलक्षण घटना घडली!

या दिवशी वस्तीतले कामगार त्यांच्या पितरांसाठी चाळीच्या गच्चीत मच्छी-मटन सुद्धा ठेवत. गेलेला माणूस पिणारा असेल तर सोबत थोडी दारू सुद्धा ठेवली जायची. तेव्हा कावळ्यांना सगळीकडेच खायला मिळत असलं तरी इथे त्यांचं आवडतं खाणं असल्यामुळे अनेक कावळे जमले होते. अचानक त्यांची कर्कश्श काव्काव् आणि कलकलाट ऐकू आल्याने काही जण गच्चीत गेले. जीर्ण कपडे घातलेला दादू माकडासारखा चार पायांवर चालत, उड्या मारत कावळ्यांना हाकलत होता आणि पितरांसाठी, म्हणजे त्या कावळ्यांसाठीच ठेवलेलं अन्न बुभुक्षित अधाशीपणे खात होता. बाटल्या, वाडगे, करवंट्या यांत ठेवलेली दारू पित होता. या ओंगळवाण्या कृत्यामुळे भावना दुखावले गेलेले कामगार खवळले. दादूला गच्चीतून खेचत खाली घेऊन आले. या ओढाताणीत दादूच्या अंगावरच्या कपड्यांची लक्तरं झाली. शिव्या आणि फटके देत त्याला वस्तीबाहेर हाकलण्यात आलं. नवऱ्याचे हे अधःपतन आणि धिंडवडे पाहून त्याची बायको खाली कोसळली ती कायमचीच!

ज्या कामगारांनी दादूला वस्तीतून बाहेर हाकललं होतं, त्यांच्यातलेच दोघे-तिघे आता त्याला शोधायला लागले. दादूच्या ओव्हरब्रिजखालच्या दोस्तांनी आता एका पडक्या इमारतीत आसरा घेतला होता. कामगारांना दादू तिथे सापडला. तो अर्धवट शुद्धीत काहीतरी बरळत होता. निराश कामगार परत आले.

दादूची बायको गेली आणि दादू बेपत्ता आहे, हे माधव आणि राजनला समजलं. दादूचा गच्चीतला पराक्रमही समजला. ते दादूच्या घरी गेले. सांत्वनासाठी बापाला मारायची मिठी त्याच्या मुलीनं माधवला मारली. अंत्य-संस्काराची तयारी झाली. तिरडीसमोर मडकं घेऊन दादूची मुलगीच चालत होती. स्मशानात दादू लडखडत रडत आला, पण त्याच्या मुलीनं त्याला आईजवळ जाऊ दिलं नाही.

''आता रडण्याचं नाटक काय करताय?'' ती कडाडली. ''तुमच्यामुळे गेली ती. तुम्हीच मारलंय तिला! आता तुमचा-माझा काही संबंध नाही. माझा बाप दारूच्या आहारी गेला तेव्हाच मेला. आई आता गेली. चालते व्हा इथून!''

दादू खूप रडला. पुन्हा दारू पिणार नाही, अशी शपथ घेऊ लागला. पण आता त्याच्या मुलीनं त्याचंच काय, कोणाचंच ऐकलं नाही. प्रेताला अग्नी तिनंच दिला. दादू आता कोणाचाच राहिला नव्हता. तो आता फक्त त्याच्या लाडक्या दारूचा होता. तो पुन्हा त्या पडक्या इमारतीत राहायला गेला. माधव आता थोडा अलिप्त झाला होता. दादूचा त्रास संपला होता, पण दादू मनातून जात नव्हता. एवढं अधःपतन झाल्यावर पुढे काय होणार? हे त्याला कळत नव्हतं. राजन तसा प्रॅक्टिकल माणूस. दादू हा विषय संपवून जगायला शिकला. पण माधवच्या नशिबात ते नव्हतं. एका रात्री त्याला अन्नोन नंबरवरून दादूचा फोन आला, ''मी दारू सोडायचा प्रयत्न करतोय साहेब. चार दिवस अजिबात प्यालेलो नाही. पण त्याचा मला खूप त्रास होतोय. मला जरा सपोर्ट करा. एकदा तरी मला येऊन भेटा.'' अखेरचा प्रयत्न म्हणून माधव दादूला भेटायला गेला...

व्यसनासाठी जगणाऱ्या माणसांची ती वस्ती होती. तिथली अस्वच्छता, गलिच्छता सहन होत नव्हती. माधव दादूला शोधत होता. एका तुटक्या जिन्यात दादू बसला होता. समोर दारूची बाटली होती. माधवच्या डोक्यात संतापाची तिडीक गेली. तो परत जायला निघाला तेव्हा दादूचं त्याच्याकडे लक्ष गेलं.

''साहेब जाऊ नका. थांबा! प्लीज थांबा.. माझं ऐका.'' असं म्हणत दादू त्याला बोलावत होता, पण माधव थांबला नाही. थरथरत्या पावलांनी जिना उतरण्याचा प्रयत्न करणारा दादू धडपडला, पण त्याला सावरण्यासाठीही माधव थांबला नाही. ती त्याची आणि दादूची शेवटची भेट ठरली.

माधवची पुन्हा ठाण्याला बदली होण्याची प्रोसेस चालू होती. त्यासाठी तो ठाण्याला गेल्यावर दोन दिवसांनी त्याला राजननं फोन करून सांगितलं, ''दादू गेला. येण्याची घाई केली नाहीत तरी चालेल. बॉडी ठेवणं शक्य नव्हतं.''

पण दादूबद्दल कळल्यावर माधव लगेच दादूच्या मुलीला भेटायला गेला. मुलगी म्हणाली, ''तो गेल्याचं मला अजिबात वाईट वाटलेलं नाही. माझ्यासाठी तो जिवंतच कुठे होता?''

''हो, पण एक शापित अतृप्त आयुष्य जगलाय तो. त्याचे दिवसवार तरी...''

माधवचं हे वाक्य पुरं न होऊ देता दादूची मुलगी म्हणाली, ''शापित आणि अतृप्त आयुष्य त्याच्यामुळे आम्ही जगलो साहेब. त्याचे अंतिम संस्कार सुद्धा मी केले नाहीत तर दिवसवारांचा प्रश्नच कुठे येतो?''

माधवला धक्का बसला. त्याची मनःस्थिती ओळखून मुलगी म्हणाली, ''तुमचे माझ्यावर खूप उपकार आहेत साहेब. तुम्ही नसतात तर मी... माझं मन मेलं असतं अणि फक्त विटाळलेलं शरीर शिल्लक राहिलं असतं. ते टळलं. तुमच्यासाठी काहीही करीन मी, फक्त माझ्या बापाच्या बाबतीत काही सांगू नका.''

तिच्या दृष्टीनं तिचंही बरोबर होतं. तिचा निरोप घेऊन माधव निघाला. पण ठरवल्याप्रमाणे लगेच ठाण्याला जाऊ शकला नाही. दादूसोबत राहणारा एक माणूस एक कागद घेऊन आला. हा कागद माधवला द्यावा अशी दादूची (शेवटची?) इच्छा होती, पण माधव तेव्हा ठाण्याला गेला होता. तो परत आल्याचे समजल्यावर हा माणूस तो कागद घेऊन आला होता. माधवने काहीशा अनिच्छेनेच तो कागद घेतला. वेडंवाकडं तिरकं हस्ताक्षर दादूचंच होतं. तो माणूस गेल्यावर माधवने तो मजकूर वाचला.

'साहेब... तुम्हाला या नालायक दादूचा अखेरचा सलाम...

आयुष्यात दारूपायी मी खूप खूप चुका केल्या...

ज्यानला माफी नाही असे गुन्हे केले... त्यांची शिक्षा मला मिळायलाच हवी... पण साहेब शपथेवर सांगतो...

मी दारू सोडायचा प्रयत्न मनापासनं करत होतो. मी सपोर्टसाठीच तुमाला बोलावलं होतं. माझ्यासमोर दारूची बाटली पाहून तुमाला वाटलं, मी प्यायला बसलोय. नाही साहेब. मी समोर बाटली ठेवून सुद्धा न पिता राहून सोताची

परीक्षा घेत होतो. तुमी रागात निघून चाल्लात तेव्हा मी हाका मारून तुमाला हेच सांगायची कोशिश करत होतो. पण तुमी थांबला नाही. तेवा जिना उतरताना मी पडलो. माझा दुखरा पाय पुन्ना मोडला. पण मी दारू प्यालो नाही साहेब. अखेर स्तोवर नाही प्यालो. तुमी एकदा भेटला अस्तात तर? पण माझी ती लायकीच नव्हती. माज्या पोरीवर लक्ष असू दे.. मी बायकोची माफी मागायला चाललो आता...'

दादूचं हे अखेरचं मनोगत वाचून माधव काही काळ सुन्न झाला. पण दादूनं आजवर अनेकदा शपथा घेऊन मोडल्या होत्या. हे पत्र लिहिल्यावर सुद्धा तो प्यायला नसेल याची माधवला अजिबात खात्री नव्हती. हे पत्रच नशेत लिहिलं असण्याचीही शक्यता होती. पण आता माधव काही न करता ठाण्याला जाऊ शकत नव्हता. दादूच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून त्याचं दहावं वगैरे तरी करावं, असं त्याला वाटत होतं.

हा विचार पक्का झाल्यावर त्यानं राजनला फोन केला. दादूसाठी नाही, पण माधवसाठी राजन तयार झाला. दोघांनी सप्रे गुरुजींनाही तयार केलं. दादूची मुलगी मात्र तिच्या बहिष्काराच्या निर्णयावर ठाम राहिली. तिला त्रास न देता, माधवनं स्वतःच हे विधी करायचं ठरवलं.

माधव आणि सप्रे गुरुजी सकाळीच घाटावर गेले. राजन आला नव्हता. माधवनं त्याला मोबाइल कॉल लावला. राजन म्हणाला, ''मला जरा उशीर होईल, पण मी येतोय. मी आल्याशिवाय विधी पूर्ण होणार नाही, कारण एक अत्यावश्यक गोष्ट तुम्ही विसरलाय. मी ती घेऊन येतो.''

पिंड ठेवल्यावर कावळे न शिवता उडून गेले होते तेव्हा राजन दादूची आवडती पहिल्या धारेची घेऊन आला होता. बाटलीतली दारू एका करवंटीत ओतून त्यानं पिंडाशेजारी ठेवली होती. दादूसारखाच मान खाली घालून लंगडत चालणारा कावळा आळीपळीने पिंड आणि करवंटीतल्या दारूकडे बघत होता.

दादूची दारूण दास्तान अखेरच्या टप्प्यावर होती...

घाटावर सप्रे गुरुजी, माधव आणि राजन उत्सुकतेनं बघत होते. तो कावळा पिंड अणि करवंटी यांच्या मधे येऊन भात आणि त्या करवंटीतला द्रव यांच्याकडे चोच वेळावत बघत होता. ''दारू प्यायल्याशिवाय भाताला शिवणार नाही तो.'' राजन म्हणाला. अचानक निर्णय घेतल्याप्रमाणे तो कावळा करवंटीजवळ आला. राजननं माधवकडे 'मी म्हटलं नव्हतं?' अशा नजरेनं पाहिलं. कावळ्यानं चोचीनं करवंटी ढकलली. करवंटी लवंडून सगळी दारू खाली सांडली. मग तो कावळा पिंडाजवळ गेला. भात खाऊ लागला.

''याचा अर्थ दादूनं मरताना तरी शपथ पाळली होती.'' डोळ्यांत पाणी आलेला माधव म्हणाला. भात खाऊन कावळा उडून गेला. सांडलेली दारू तशीच होती.

सगळे विधी झाल्यावर माधव राजनशी बोलत होता, ''मी त्या दिवशी दादूसमोर बाटली पाहून डोक्यात राख घालून निघून गेलो. तो हाका मारत होता तरी थांबलो नाही. मी थांबलो असतो तर कदाचित आज दादू जिवंत असता. मी त्याच्यावर विश्वास ठेवायला हवा होता...''

''असं म्हणून स्वतःला दोषी मानू नका साहेब.'' राजन समजावत म्हणाला. ''त्याच्यासाठी जे शक्य होतं, ते सगळं केलं तुम्ही.''

''मनाला कितीही समजावलं तरी निर्वाणीच्या वेळी मी चुकलो ही खंत आता आयुष्यभर राहणार राजन...'' माधव म्हणाला. त्याचा मोबाइल वाजला.

दादूची मुलगी बोलत होती, ''माझ्या किचनच्या खिडकीत एक कावळा येऊन ओरडत होता. मी त्याला खायला दिल्यावर उडून गेला. आणि लगेच मला फोन आला. मला लग्नासाठी होकार आलाय. मुलगा बँकेत आहे. निर्व्यसनी आहे.''

''अरे वा! अभिनंदन.'' माधव म्हणाला.

''नुसतं अभिनंदन करून भागणार नाही.'' मुलगी म्हणाली, ''तुमचे आशीर्वाद हवेत. लग्नात कन्यादान तुम्हीच करायचंय.''

''करीन बाळे, करीन.'' माधव म्हणाला, ''पण तो कावळा कधी आला तर त्याला हाकलू नकोस. खायला दे.''

आयुष्यभर डाचणाऱ्या खंतेसोबत आयुष्यभराचं समाधानही त्याला मिळालं होतं. दादूच्या दारुण दास्तानीला सार्थकतेची एक रुपेरी कड लाभली होती.

**– सागर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९७६९३८३४२१


''**आपण** इतक्या दिवसांत आलात का नाही, केशवजी?'' सभामंडपामधून बाहेर पडता पडता कुसुमने विचारले.

''मी माझा मित्र बसन्तच्या बरोबर बाहेर गावी गेलो होतो''. बसन्तकडे निर्देश करीत केशवने उत्तर दिले.

कुसुमने बसन्तकडे पाहिले आणि थोडं थांबत म्हणाली, ''काय हेच आपले मित्र बसन्त आहेत का? मी यांना अगोदर कुठेतरी पाहिल्यासारखे वाटते. कन्व्होकेशन डिबेटमध्ये पहिले बक्षीस आपल्याला मिळाले होते नां?''

कन्व्होकेशन डिबेटमध्ये पहिले बक्षीस जिंकलेला बसन्त एका मुलीसमोर घाबरून गेला होता. त्याचा चेहरा लाल झाला होता. त्याने काहीच उत्तर दिले नाही.

केशवने म्हटले, ''हो, पहिले बक्षीस यालाच मिळाले होते.''




त्यानंतर कुसुमने बसन्त आणि केशव या दोघांनाही चहासाठी आमंत्रण देऊन ती आपल्या वडिलांच्या कारमध्ये बसून गेली.

कुसुमकुमारी आपल्या आईवडिलांची एकुलती एक कन्या आहे. अलाहाबादच्या जॉर्जटाउन भागात, जिथे शहरातील धनिक व्यक्तींचे बंगले आहेत, तिथे कुसुमच्या वडिलांचे आलिशान घर आहे. शहरातील प्रमुख धनिक व्यक्तींमध्ये त्यांची गणना होते. त्यांच्याकडे अनेक कार आहेत. आणखी काय काय आहे. दहा-बारा नोकर त्यांच्या घरी नेहमी कामाला असतात. घरी बसून केलेल्या लेन-देन व्यवहारातून त्यांना काही हजारांचे मासिक उत्पन्न होते. कुसुम त्यांची एकुलती एक मुलगी आहे; जी क्रास्थवेट गर्ल्स स्कूलमध्ये मॅट्रिकमध्ये शिकत आहे.

केशव कुसुमचा शेजारी आहे, जो विद्यापीठात बी.ए.चा विद्यार्थी आहे. बसन्त केशवच्या वर्गात असून तो आपल्या मामाकडे आहियापूरमध्ये राहतो. बसन्तचे आई-वडील त्याच्या लहानपणीच वारले आणि तेव्हापासून बसन्त आपल्या मामाच्या आश्रयाला आहे. बसन्त अभ्यासामध्ये कुशाग्र बुद्धीचा, सदाचारी, सरळ स्वभावाचा आणि सर्वांशी मिळूनमिसळून राहणारा आहे, त्यामुळे वर्गमित्र त्याचा आदर करतात.

संध्याकाळी केशवच्या आग्रहामुळे बसन्त कुसुमच्या घरी आला तर होता; परंतु त्याला बोलण्यात संकोच वाटत होता. जेव्हा कुसुम त्यांना घेऊन मखमली जशा शिड्यांवरून वर आपल्या ड्रॉइंगरूममध्ये नेऊ लागली, तेव्हा बसन्तने आपल्या पायांकडे पाहिले- जिथे कुसुमचे

कमळासारखे मुलायम पाय पडत होते, तिथे आपले धुळीने भरलेले पाय ठेवताना त्याला फार संकोच वाटत होता. खोलीमध्ये गेल्यावर तेथील दिग्गजांच्या प्रतिमा पाहून बसन्त स्तंभित झाला. त्या ऐश्वर्यासमोर त्याला आपली स्थिती खूप दयनीय वाटू लागली. त्या वातावरणात आपण योग्य नाही, हे समजून त्याला त्रास होऊ लागला होता. तो परत एकदा विचारात पडला की आपण उगीचच या ठिकाणी आलो.

कुसुम अद्वितीय सुंदर होती. तिचे शिक्षण आणि व्यावहारिक ज्ञान यांनी तिच्यामधील सौंदर्याला आणखी झळाळी आली होती. तिच्या शरीरावर खूप काही दागिने नव्हते. ती एक लाल किनार असलेली साडी नेसली होती, जी तिच्या गोऱ्या रंगात मिसळून आणखी उज्ज्वल झाली होती. कुसुमचे वागणे आदबशीर होते, बोलण्यात संगीताची मिठास होती. ती एकाद्या चतुर चित्रकाराच्या चित्राप्रमाणे सुंदर, कुशल शिल्प-काराच्या शिल्पकृतीप्रमाणे वैगुण्यहीन आणि उत्तम कवीच्या कल्पनेप्रमाणे मधुर होती.

बसन्तच्या आयुष्यामध्ये एखाद्या तरुण मुलीशी बोलण्याचा हा पहिला प्रसंग होता. त्याने कुसुमकडे फक्त एकदाच पाहिले आणि त्यानंतर त्याचे डोळे वर पाहू शकले नाहीत. कुसुमने चांदीच्या कपामध्ये चहा आणून टेबलवर ठेवला. त्याबरोबर जलपानासाठी फळे आणि मिठाई


# असमंजस

मूळकथा :

**सुभद्राकुमारी चौहान**

अनुवाद :

**अशोक बेंडखळे**



ठेवली होती. बसन्त स्वभावाने  साधा होता. परंतु आज तो साधारण शिष्टाचाराच्या गोष्टी करणेही विसरून गेला आणि त्याने शांतपणे चहा पिणे सुरू केले. कुसुम कधी एखादा प्रश्न विचारायची तर बसन्तचा चेहरा कारण नसताना लाल होऊन जायचा आणि त्याच्या हृदयाचे ठोके एवढे जलद पडू लागायचे, जणू काही तो कठीण परीक्षेसाठी बसला आहे. चहा पिताना सुद्धा त्याच्या घशाला कोरड पडत होती. आणि हो वा नाही याव्यतिरिक्त तो काही बोलत नव्हता.

आंतर विद्यापीठ डिबेटमध्ये बनारसला जाऊन आपल्या कॉलेजसाठी शील्ड घेऊन येणं त्याच्यासाठी एवढं कठीण नव्हते, जेवढे आज त्याला साधारण गप्पागोष्टी करताना वाटत होते. त्याला स्वतःला आपल्या या स्थितीने चकित झाल्यासारखे वाटत होते आणि आपल्याला अचानक आलेल्या मौनाचे सुद्धा आश्चर्य वाटत होते.

केशवने आग्रह केल्यानंतर कुसुमने जेव्हा सितारवर यमन कल्याण वाजवून दाखवला.. त्यावर बसन्त म्हणाला, ''आपण संगीतात सुद्धा प्रवीण महान!''

हे ऐकून कुसुम हसून म्हणाली, ''आपण मला उगीचच चढवत आहात. अजून तर मला चांगल्या प्रकारे वाजवताही येत नाही.''

बसन्त खूप वेळानंतर बोलला होता आणि बोलल्यानंतर त्याला ते बोल मूर्खपणाचे वाटू लागले.

■

बसन्त जेव्हा परत आला, तेव्हा त्याला अंधुकसे आठवले की कुसुमने त्याला निघत असताना, घरी कधी कधी येण्याचा आग्रह केला होता. परंतु तो कुसुमच्या घरी कधी जाऊ शकला नाही आणि एक दिवस परत एकदा तो केशवबरोबर गेला. अशाप्रकारे बसन्तसुद्धा बोलणे करू लागला होता. त्याची बुद्धिमत्ता आणि योग्यता यावर कुसुम अगोदरच मुग्ध होती. आता मर्यादित सीमेपर्यंत त्याचे बोलणे आणि व्यावहारिक ज्ञान पाहून कुसुमची त्याच्यावरील श्रद्धा अधिक वाढली होती.

इतर कॉलेज तरुणांप्रमाणे बसन्तमध्ये उच्श्रृंखलपणा आणि उद्दामपणा नव्हता. त्याचे बोलणे, थट्टामस्करी एका मर्यादेच्या बाहेर जात नव्हती. कुसुमने बसन्तला इंग्रजी शिकवण्याचा आग्रह केला, ज्याचा बसन्तने स्वीकार केला. अशाप्रकारे हळूहळू कुसुम आणि बसन्त यांच्यामधील संबंध घनिष्ट होऊ लागले. कुसुम भेटण्यापूर्वी बसन्तची तिच्याबाबतची अशी धारणा बनली होती की, श्रीमंत बापाची एकमेव मुलगी नक्की उद्धट स्वभावाची असेल, ती पूर्ण नष्ट झाली. आता त्याला कुसुमला भेटण्याची सतत इच्छा होऊ लागली होती. सकाळीच तो संध्याकाळ होण्याची वाट पाहू लागला. आपल्या या स्थितीचे त्याला स्वतःला आश्चर्य वाटू लागले होते.

कुसुम मॅट्रिक पास झाली. आणि बसन्त बी.ए. झाला. दोघांनीही शिक्षण पुढे चालू ठेवण्याचे ठरवले. बसन्त अजूनही कुसुमच्या घरी अधूनमधून येत होता.

एक दिवस बसन्तच्या कानावर आले की, कुसुमचा विवाह मे महिन्यात होणार आहे. बसन्तला हे समजत नव्हते की हे ऐकून त्याचे मन अस्वस्थ का झाले होते? बसन्तने स्वप्नातही असा विचार केला नव्हता की, कुसुमच्या जवळ त्याचे असे काही संबंध निर्माण होतील म्हणून. आपल्या आणि कुसुमच्या आर्थिक स्थितीमधले जमीन-आसमान इतके अंतर त्याला माहीत होते. कधी अशी अशक्य कोटीतली कल्पना समोर यावी, यावर त्याचा विश्वास बसत नव्हता.

कुसुम त्याच्यासाठी आकाशातली तारका होती. तिला स्पर्श करावा ही कल्पना साधा बसन्त कसा करू शकत होता? आल्याच्या व्यापाऱ्याला जहाजाच्या बातमीशी काय संबंध आणि जर जहाजाची बातमी ऐकून त्याला सुखदुःख झाले तर ती आश्चर्याची गोष्ट आहे. बसन्त याचाच विचार करीत होता. बसन्त कुसुमपासून दूरदूर राहू पाहत होता, परंतु जशी संध्याकाळ होई, तो आपल्याला रोखू शकत नव्हता. खरं म्हणजे तो फिरण्यासाठी बाहेर पडला, परंतु त्या नादात तो कुसुमच्या घरी जाऊन पोचला.

जेव्हा तो कुसुमच्या घरी पोचला, कुसुम घरी नव्हती. तो ड्रॉइंगरूममध्ये बसून एका आल्बमची पाने उलटून पाहत बसला. एकाएकी त्याची नजर एका चित्रावर जाऊन तो थांबला. तो त्या चित्राकडे खूप वेळ निरखून पाहत राहिला. त्याचे डोके चित्रावर झुकले आणि त्याबरोबर अश्रूचे दोन थेंब खाली पडले. बसन्त जणू काही झोपेतून जागा झाला होता. त्याने झटकन खिशातून रुमाल काढला आणि चित्रावर पडलेले अश्रूंचे दोन थेंब पुसले. त्याचवेळी त्याची नजर समोर असलेल्या मोठ्या आरशावर पडली. कुसुम तिथे शांतपणे उभी होती. तिच्या डोळ्यामध्ये सुद्धा अश्रू होते.

बसन्त काहीसा घाबरून गेला. कुसुम जवळच्या

एका खुर्चीवर बसली. काही वेळ दोघेही काही न बोलता बसून राहिले. काही वेळा नंतर कुसुमने शांततेचा भंग करीत म्हटले, ''बसन्तबाबू आता खूप उशीर झाला आहे.''

बसन्त उत्तरला, ''जे काही झाले, ठीकच झाले.''

त्यानंतर मिल्टन कवीच्या एका कवितेतील काही ओळी ज्या कुसुमला कळल्या नव्हत्या, बसन्तने तिला समजावल्या. बसन्त आपल्या घरी गेला आणि कुसुम आपला वडिलांबरोबर फिरण्यासाठी गेली.

■

उन्हाळ्याच्या सुटीमध्ये बसन्तला एका लाल लिफाफ्यामध्ये कुसुमच्या विवाहाची आमंत्रणपत्रिका मिळाली. काही दिवसांनंतर त्याच्या कानावर आले की, कुसुमचा विवाह एका धनवान जमीनदाराच्या घरी व्यवस्थितरीत्या पार पडला. कुसुमचे वाचणे-लिहिणे बंद झाले आणि त्याचबरोबर बसन्तचे त्यांच्या घरी येणे-जाणेही संपले. बसन्तच्या आता लक्षात आले की, त्याचं मन इच्छा चोरून-चोरून कुसुमवर किती प्रेम करू लागली होती! कुसुमला आपली करणे ही लालसा अंतःकरणात दबा धरून बसली होती. आपल्या अंतःकरणातील या लालसेचे बसन्तला आश्चर्य वाटले. या इच्छांनी त्याच्या अंतःकरणात कधी प्रवेश केला, ते बसन्त नक्की करू शकला नव्हता. ही भावना त्याच्या अंतःकरणात कधी प्रकटली, याचेही स्मरण त्याला स्पष्टसे झाले नाही. त्याचा आपल्यावर आणि आपल्या बुद्धीवर विश्वास होता. परंतु अंतःकरण बुद्धी आणि तर्क यांना धोका देऊन कशाप्रकारे माणसाला अशक्य कल्पनेकडे प्रेरित करू शकते, ते बसन्तला आता कळले. त्याला वाटले, मी जर कुसुमवर खरंच प्रेम करीत होतो, तर हे मी कुसुमला वेळीच सांगितले का नाही? तिला आपली करण्याची इच्छा माझ्या अंतःकरणात होती, तर तिच्यासमोर मी प्रकट का केले नाही? तो आपल्या प्रश्नांवर निरुत्तर होत होता.

नंतर त्याने परत परत विचार केला की, त्याने कुसुमवर नेहमीच प्रेम केले आहे. आणि अंतःकरणापासून प्रेम केले आहे. मग कुसुम सुद्धा त्याच्यावर प्रेम करीत होती का? कदाचित हो वा नाही. बसन्त काही निर्णय घेऊ शकला नाही. परंतु तर्काच्या शुष्क विवेचनामध्ये त्या दिवशी कुसुमचे भरलेले डोळे काडीच्या आधारासारखे बसन्तला वाटले.

बसन्तने एम.ए. पास केले आणि लाहोरच्या कॉलेजमध्ये प्राध्यापक झाला. सर्वसाधारण परिस्थितीत आपले दिवस व्यतीत करू लागला. त्याची प्राध्यापकी करीत चार वर्षे सरली, तरी त्याच्या आयुष्यात वेगळे काही घडले नाही. त्याच्या मामाने त्याला लग्नासाठी दोन-चार वेळा विचारले; परंतु बसन्तने त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. त्याला आईवडील तर कुणी नव्हते, जे त्याला विवाहासाठी आग्रह करतील. मित्रांनी सुद्धा त्याबाबत कधी चर्चा केली तरी बसन्त नेहमी हसून ती उडवित असे.

आपल्या या सुस्तपणाचे कारण तो स्वतः समजू शकला नव्हता. विवाह न करण्याची त्याने प्रतिज्ञा तर केली नव्हती. तरी काही कळत नव्हते. त्याचे मन अस्थिर होते. विवाहाच्या बाजूने त्याचे मन झुकत नव्हते.

त्या चार वर्षांत बसन्त एकदाही अलाहाबादला गेला नाही. परत परत इच्छा होऊनही तो जाऊ शकला नाही. त्याच्या मामाची बदली आता लखनऊला झाली होती. अलाहाबादला गेलाच तर कुणाच्या घरी तो जाणार होता?

■

आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना टाटानगर येथील कारखाना दाखवल्यानंतर बसन्त जेव्हा परत येत होता, त्याला अलाहाबाद स्टेशनवरून जावे लागले. तिथे एक दिवस राहावे या इच्छेला तो टाळू शकला नाही. बरोबरचे सामान स्टेशनवर सोडून पहिल्यांदा तो आपल्या जुन्या मित्रांना भेटण्यासाठी गेला. परंतु एक-दोन मित्र सोडून त्याला कुणीच भेटले नाही. नंतर तो जॉर्ज टाउनकडे वळला आणि त्याची पावले त्याच्याही नकळत कुसुमच्या घरी थांबली. दरवाज्यावर तोच जुना चौकीदार बसला होता, जो तंबाखू मळत होता. बसन्तला पाहताच तो उठून उभा राहिला, म्हणाला, ''खूप दिवसांनी आलात बाबू?'' आणि बसन्तला न विचारता आज जाऊन बसन्त आल्याचे सांगितले.

बसन्त आत जाऊन ड्रॉइंगरूममध्ये त्याच जागी बसला, जिथे तो अनेक वेळा कुसुमला शिकवण्यासाठी शिक्षक म्हणून आला होता. या चार वर्षांमध्ये कुसुम आणि बसन्त यांच्यामध्ये कुठल्याच प्रकारचा पत्रव्यवहार झाला नव्हता वा एकमेकांबद्दल त्यांना काही माहीत होते.

बसन्त विचार करीत होता, इतक्या दिवसांनतर कुसुम कुठल्या स्थितीत भेटेल, कशा प्रकारचे स्वागत करील? तिला त्याचे येणे चांगले वाटेल की नाही, हेही त्याला माहीत नव्हते.

इतक्यात एक पांढरीशुभ्र, किनार असलेली खादीची साधी साडी परिधान केलेल्या कुसुमने ड्रॉइंगरूममध्ये प्रवेश केला. बसन्तने उठून अतिशय नम्रपणे तिचं स्वागत केलं.

''काय कुसुमला तुम्ही एवढ्या लवकर विसरलात, जे एखाद्या अनोळखी माणसासारखे स्वागत करता?'' कुसुमने स्मितहास्य करीत शब्द उच्चारले. बसन्तचे लक्ष तिच्याकडे नव्हते, तर तिने ज्या प्रकारे कपडे घातले होते, त्याकडे होते. विवाहित असण्याचे कुठले चिन्ह त्यात नव्हते. हातात सौभाग्यवतीच्या बांगड्या नव्हत्या नि कपाळावर सिन्दूरची बिंदी नव्हती तर काय कुसुम विधवा तर झाली नाही? बसन्तचे अंतःकरण ही गोष्ट मानायला तयार नव्हते.

''काय विचार करीत आहात बसन्त बाबू?'' कुसुमने परत विचारले. बसन्त विस्मित झाला. आणि म्हणाला, ''काहीच तर नाही. तसं मी पाहत होतो की...'' कुसुम त्याचे बोलणे तोडत म्हणाली, ''तुम्ही माझ्याकडे पाहत आहात; परंतु त्याचे आपण काय करू शकतो? विधिलिखित कोण टाळू शकतो का?''

बसन्तला कळले, तिचा विवाह झाल्यानंतर दोन वर्षांनंतर कुसुम विधवा झाली होती. तिचे वडील पाठीमागे त्यांच्या अगणित संपत्तीचा तिला वारसदार बनवून सहा महिन्यांपूर्वी परलोकवासी झाले होते. बसन्तने पाहिले, आलेल्या संकटांनी कुसुमला त्याच्यापेक्षा अधिक प्रौढ बनवले होते. वयामध्ये कुसुम बसन्तपेक्षा काही वर्षांनी लहान होती; परंतु बसन्त संसाराच्या सागरामध्ये एका तटावर होता, तर कुसुम! कुसुम लाटांच्या वादळात सापडून दुसऱ्या काठावर बसन्तपासून खूप दूर गेली होती. बसन्तला जीवनात आशा होती आणि कुसुमचे आयुष्य निराशेने पूर्ण व्यापले होते. निराशेचे शेवटचे टोक शांती असते. कुसुम त्याच शांतीचा अनुभव घेत होती...

त्या दिवशी बसन्त निघून तिथून घरी जाऊ शकला नाही. कुसुमने आग्रह केल्यामुळे तो दोन दिवस तिचा पाहुणा म्हणून तिथं राहिला. दोघांनी एकमेकांच्या बोलण्या-मधून इतक्या दिवसांची माहिती करून घेतली. पत्र न लिहिण्याबद्दल तक्रार ना कुसुमने केली, ना बसन्तने केली. निघताना कुसुमने बसन्तला आग्रह केला की, पुढे कधी त्याचे काही कामासाठी या बाजूला येणं झालं तर तो अलाहाबादला जरूर येईल. कुसुम बसन्ताचे मन त्याच्या डोळ्यात पाहत होती. तिला विश्वास होता बसन्त नक्की येईल.

■

बसन्तची तब्बेत दिवसेदिवस बिघडत गेली. काही खास असा आजार नव्हता. फक्त आठ-दहा दिवसांच्या मलेरियाच्या तापाने तो कमकुवत होत गेला. सुट्टीमध्ये बसन्त हवाबदलासाठी म्हणून मसुरीला गेला. तिथल्या निसर्गाची सुंदर दृश्ये, प्रवाशांचे इकडेतिकडे भटकणे, दिव्यांची रोषणाई अशा कुठल्याही गोष्टीनी बसन्तच्या मनाला शांतता लाभली नाही. तो नेहमी गंभीर आणि उदास स्थितीत राहिला. कुसुमवर त्याचे जीवापाड प्रेम होते. बसन्तचा स्वभाव आणि चरित्र अतिशय उज्ज्वल आणि कलंकहीन होते. तरी सुद्धा जेव्हा त्याच्या मनात हा विचार यायचा की कुसुमच्या विवाहाच्या वेळी, तिचे सुख डोळ्यात आले होते आणि कुसुम विधवा झाल्यावर त्याच्या आतल्या आत आशेची लहर उठली आहे, तेव्हा अशा विचाराने तो स्वतः लज्जित झाला आणि स्वतःला नीच समजून झिडकारू लागला.

बसन्त खूप दिवस काही मसुरीला राहू शकला नाही. देहराडून एक्स्प्रेस पकडून तो एक दिवस अलाहाबादला जाऊन पोचला. कुसुमच्या उत्तम वागण्याने त्याला थोडी मनःशांती लाभली. काही दिवसांपासून बसन्त कुसुमला काही सांगू इच्छित होता. परंतु सांगण्याची वेळ येताच त्याची जीभ कुणी पकडली आहे असे जाणवायचे. तो काही बोलू शकला नव्हता.

एक दिवस बागेमध्ये कुसुम बसन्तच्या बरोबर फिरत होती. दोघेही काही न बोलता चालत होते. बसन्तने या निःस्तब्धतेचा भंग केला आणि तिला म्हणाला, ''कुसुम! तू काय तुझे सगळे आयुष्य अशाप्रकारे एकाद्या योगिनीसारखे घालवणार आहेस का?''

''काय करू, परमेश्वराची हीच इच्छा असावी.'' कुसुमने शांतपणे उत्तर दिले.

''परंतु अशा तपश्चर्येचा सुखामध्ये परावर्तित करण्याचा मार्ग नाही आहे का?''

''काय मार्ग होऊ शकतो बसन्त? तूच सांग ना! माझ्या डोक्यात तर काही येत नाही.''

बसन्तच्या हृदयाचे ठोके वाढले, त्या स्थितीत त्याने म्हटले, ''पुनर्विवाह जसा तुझी मैत्रीण मालतीने केला आहे!''

कुसुमला हे ऐकून धक्का बसला. तिचा चेहरा गोरापान झाला. तिने निश्चयपूर्वक म्हटले, ''परंतु बसन्तबाबू हे तर माझ्याकडून कधी होणार नाही.''

कुसुमचे हे बोलणे ऐकून बसन्त गप्प झाला. तो राहून राहून आपला चुकीच्या बोलण्यावर पश्चात्ताप करीत राहिला. बसन्तने साहस करून या नाजूक विषयाला वाट करून दिली होती. परंतु त्याला भीती या गोष्टीची वाटत होती की, कुसुमच्या नजरेतून तो उतरला तर नाही ना! दोघेही काही न बोलता शांत होते. दोघांच्या डोक्यामध्ये एक प्रकारचे वादळ निर्माण झाले होते.

फिरता फिरता कुसुम थकून एका संगमरवरी बेंचवर बसली. तिने बसन्तला सुद्धा बसण्याची खूण केली. ती त्याला म्हणाली, ''बसन्त, तू मला किती आवडतोस हे कदाचित तुला अजूनपर्यंत चांगल्याप्रकारे समजून आलेले नाही!''

बसन्तच्या कोमेजलेल्या मनात परत आशा चमकून गेली, तो लक्षपूर्वक उत्सुकतेने कुसुमचे म्हणणे ऐकू लागला होता.

कुसुम म्हणाली, ''तुला सुद्धा मी आवडू लागली आहे, ही गोष्ट मला समजून आली होती, जी त्यादिवशी ड्रॉईंगरूममधील प्रसंगाने आपोआप प्रकट झाली होती. परंतु त्या बाहेर येण्याला बसन्त बाबू खूप उशीर झाला होता, आणि ज्यासाठी त्यावेळी काही उपाय बाकी नव्हता. त्यानंतरच्या चार वर्षांत दीर्घ काळात मी तुला विसरू शकले नव्हते, तसे तू पाहत आहेस.''

बसन्तच्या हृदयाचे ठोके वाढू लागले होते.

कुसुमने परत म्हटले, ''एवढे सर्व होऊनही बसन्त मी निश्चय केला आहे की, कधी पुनर्विवाह करणार नाही. माझे आई-वडील आणि माझ्या स्वामींच्या स्मृतीला कधी कलंक लावणार नाही. तुझे आणि माझे शुद्ध प्रेम आहे. त्यात कुठली वासना आणि स्वार्थ याला स्थान नाही.''

बसन्तचा आता निरुपाय झाला.

कुसुमने परत म्हटले, ''कथा-कहाणीमध्ये होतो तसा प्रेमाचा शेवट काय विवाहामध्येच व्हायला हवा का बसन्त?''

बसन्त काही उत्तर देऊ शकला नाही. त्याने पाहिले, प्रेमाच्या धावदौडमध्ये सुद्धा ती त्याच्या खूप पुढे गेली आहे. बसन्त स्वतःला स्वार्थी आणि क्षुद्र मनाचा समजू लागला. त्याला असे वाटले, कुसुम खूप उंचावरून, कुठल्या दुसऱ्या विश्वामधून बोलत आहे; ज्याला बसन्त समजू शकत होता आणि नाही सुद्धा.

त्यानंतर बसन्त आणि कुसुम यांच्यामध्ये या विषया-बाबत कधी कुठली चर्चा झाली नाही. परंतु बसन्तला अजूनही वाटत होते की, कुसुमचा तर्क खरा नाही आहे. एखाद्या सुंदर कविकल्पनेप्रमाणे ती सुंदर नक्की आहे; परंतु त्यात खरेपणा नाही आहे.

परंतु अशा प्रकारचे विचार मनात आल्यानंतर तो स्वतःला आपल्या नजरेतून छोटा समजू लागला होता. त्याच्या कानात परत परत कुसुमचे हे शब्द गुंजी घालत होते – 'काय प्रेमाचा शेवट कथा-कहाणीप्रमाणे विवाहा-मध्ये होणं आवश्यक आहे?'

(ज्येष्ठ हिंदी लेखिका सुभद्रा कुमारी चौहान लिखित असमंजस या हिंदी कथेचा स्वैर मराठी अनुवाद)

**– अशोक बेंडखळे**
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५

# सूचना

'साहित्य' अंकाची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.
त्यासाठी साहित्य संघाचा बँक अकाउंट नंबर,
तसेच IFSC Code कव्हर २वर दिलेला आहे.
ऑनलाईन वर्गणी भरल्यास, तुमचा पोस्टल ॲड्रेस, पिनकोडसहीत
७३०४३६९३९६ या मोबाइल नंबरवर पाठवावा.





# मानसी

**मेघना साने**

**मानसीने** लेख पूर्ण केला आणि ते लिहिलेले कागद दुमडून पाकिटात घातले. आज शाळेच्या मासिकाची डेड लाइन होती. त्यामुळे न विसरता तो संपादन विभागात द्यायला हवा होता. यंदा हेडबाईंनीच तिच्याकडे लेख मागितला म्हणून बरं झालं. नाहीतर मागील वर्षी संपादक मंडळातील गिरिजाबाईंनी मानसीचा लेख हरवला म्हणून छापला नाही असं सरळ सांगितले होते. आता हेडबाईंनी सुचवलेला लेख त्यांना हरवता येणार नाही. या विचारसरशी मानसी खुद्‌कन हसली आणि तिने ते पाकीट पर्समधे ठेवून दिले. मुलं उठायची वेळ झाली होती. त्यांचे डबे तयार करायला तासभरच हाताशी होता. तिने दोन कप बोर्नव्हिटा तयार करून मुलांना उठवले. एक तर आधीच उठला होता. आणि गादीवर उभा राहून खिडकीबाहेर पाहत होता.

‘‘काय पाहतोस रे सोन्या?’’ तिने त्याला कडेवर घेत विचारले.

‘‘झाडावर एक पोपट येतो. खिडकीतून मी त्याच्याशी बोलतो. मिठू मिठू...’’ मानसी हसली. ‘बरं बरं’ म्हणाली आणि त्याला तोंड धुवायला घेऊन गेली. ती मनात



म्हणाली, किती निरागस जग आहे यांचे. पण मोठेपणी टक्केटोणपे, असूया, राग, द्वेष या सगळ्याला तोंड द्यावं लागणार. गेल्या तीन वर्षांत शाळेत काय कमी राजकारण झालं? आपण एम.ए. करत होतो, ही गोष्टसुद्धा डोळ्यात येत होती कुणाकुणाच्या!

मुलांना तयार करून ती जवळच असलेल्या बस स्टॉपवर त्यांना सोडायला गेली. मुलं रोजच शाळेत जातात तरी त्यांना आईला टाटा करताना इतकं गलबलून का येतं? बसमधे चढल्यावर मात्र ती इतर मुलांमधे सामावून जातात. काळजी नसते. मानसी भराभर चालत घरी आली. नवरोबा अजून उठले नव्हते. पण स्वयंपाकघरात ती काम करू लागली तेव्हा नळाच्या आवाजाने उठले.

''अगं, किती आवाज करतेस! मी झोपलो होतो ना.'' अशी कुरकुर करत तो उठला. मानसीने लगेच दोघांचा चहा ठेवला. तिला एकदा वाटले की आपण लिहिलेला लेख नवऱ्याला वाचायला द्यावा. पण तो तल्लीन होऊन पेपर वाचत होता. मग तिने आंघोळ वगैरे उरकून घेतली. तेवढ्यात कुकरच्या शिट्ट्या झाल्या. नवरा गॅस बंद करेल असे तिला वाटले. पण तो उठला नाही. शेवटी तीच साडी नेसत बाहेर आली आणि तिने गॅस बंद केला. नवऱ्याच्या जेवणाचा प्रश्न नव्हता. तो ऑफिसच्या कँटीनमध्ये जेवणार होता. तिला स्वतःलाच दिवसभरासाठी काहीतरी न्यायचे होते. तिने पट्कन बटाट्याचे चार पराठे केले. नवऱ्याला ब्रेकफास्ट दिला आणि स्वतःला डब्यात दोन पराठे घेतले. आता साडेनऊची ट्रेन मिळाली तर अकरा वाजता ती शाळेत पोचणार होती. मुलांना सांभाळायला दुपारी बाई येणार होती.

ट्रेनमधे बसल्याबरोबर तिच्या मैत्रिणीचा, नीलमचा फोन आला.

''मानसी, अगं एक स्पेशल गोष्ट सांगायला फोन केला.''

''काय गं? मला त्या आषाढीच्या वारीमधे घेऊन जाणार असशील ना? नऊवारी वगैरे नेसून?''

''नाही गं. ते आम्ही जाणार आहोत. पण तुला इंटरेस्ट नाही तर तू नको येऊ. पण हे बघ आपल्या घराजवळ सरस्वती हॉलमधे जी व्याख्यानमाला सुरू आहे ना, तिथे उद्या 'नवे शहर'चे संपादक निशांत बडगुजर येणार आहेत. मला वाटतं, तू छान लिखाण करतेस तर त्यांच्याशी तुझी ओळख व्हावी. एखादा कॉलम वगैरे बघ!''

मानसी मनातून या कल्पनेने खूप सुखावली. पण स्वतःला सांभाळत म्हणाली, ''पण एवढ्या गर्दीत आपली ओळख कोण करून देईल त्यांच्याशी?''

''मीच करून देईन. तू फक्त यायचं बघ.'' असं म्हणून नीलमने फोन ठेवला.

उद्या व्याख्यानाला जायचं म्हणजे सातवीचे पेपर्स आजच तपासून व्हायला हवे होते. ते संध्याकाळी आल्यावर तिने पूर्ण केले. मुलांना शेजारच्यांबरोबर पार्कमध्ये पाठवले. संध्याकाळचा स्वयंपाक बाई करणार होतीच. पेपरमधल्या मार्कांच्या आकड्याच्या बेरजा करत करत तिने मुलांचाही अभ्यास घेतला. आता बडगुजर यांना भेटायला जायचे तर लेखांची एक फाइल करायला हवी होती. तिने आपले सारे लेख कपाटातून काढले. सुवाच्य अक्षरातील ते सारे लेख गेले वर्षभर शाळेच्या नोटीस बोर्डवर झळकले होते. मात्र अजून कोणत्याही वर्तमानपत्रात त्यांना स्थान मिळाले नव्हते. मानसीने सर्व लेखांची एक फाइल तयार केली. सर्व करायला रात्रीचे बारा वाजले. दुसऱ्या दिवशी शनिवार होता म्हणून लवकर उठावे लागणार होते.

मानसी आणि नीलम, दोघी व्याख्यानाला गेल्या. व्याख्यान ठीक ठीक झाले. बडगुजर यांची प्रसिद्धी भरपूर झाली होती. त्यामुळे गर्दीही चांगली होती. व्याख्यान संपल्यावर नीलम मानसीला म्हणाली, ''मानसी, मुलांना मिस्टरांजवळ ठेवून आलीस ना?''

मानसी म्हणाली, ''नाही ग. ते शनिवार-रविवार दौऱ्यावर जाणार होते, त्यांच्या क्लबची पिकनिक आहे. माझ्या आईकडे ठेवले आहे दोन दिवस मुलांना. पेपरपण तपासायचे आहेत ग. रविवारी आईबाबा नेतील मुलांना बालनाट्याला वगैरे.''

व्याख्यानानंतर गर्दी पांगली असे बघून नीलम आणि मानसी हळूच पुढे गेल्या.

''नमस्कार साहेब.'' नीलम अदबीने म्हणाली. ''मी 'देशवासी'ची पत्रकार म्हणून आले होते. व्याख्यान खूप छान झालं. मी त्यावर लिहीनच. पण मला आमच्या मॅडमची ओळख करून द्यायची होती. या मानसी देशपांडे. खूप चांगले लिहितात. त्या तुम्हाला भेटायला आल्या आहेत.''

बडगुजर साहेबांनी मानसीकडे कटाक्ष टाकला. मध्यमवयात अजून प्रवेशही झाला नाही अशी देखणी स्त्री पाहून त्यांच्या चेहेऱ्यावर गोड हसू पसरले.

''काय लिहिता तुम्ही?''

''सध्या तरी शिक्षणक्षेत्रासंबंधी लेख लिहितेय. पण तुम्ही दुसरा विषय दिलात तरी लिहू शकेन. तुमच्या पेपरमधे एखादा कॉलम लिहायला मिळावा अशी इच्छा आहे.'' मानसी धडाधड बोलून गेली खरी.

बडगुजर साहेब क्षणभर गंभीर झाले.

''काही आणलंय का दाखवायला?''

''हो.'' असं म्हणून मानसीने भीत भीतच फाइल पुढे केली. फाइल ऐवजी त्यांनी तिच्या चेहऱ्याकडेच पाहिले.

''आत्ता इथे फाइल पाहायला वेळ मिळणार नाही. तुम्ही उद्या मला भेटायला याला का? उद्या मी इथे नाशिकमधेच आहे. परवा मुंबईला जाणार आहे.''

''बरं, कुठे उतरला आहात तुम्ही?'' मानसीने विचारले.

''संस्थेच्या अध्यक्षांकडे. मी पत्ता पाठवतो. तुमचा नंबर द्या. किंवा उद्या सकाळी नऊ वाजता मला फोन करा.'' असे म्हणून त्यांनी तिला कार्ड दिले.

मानसीला रात्रभर झोप लागली नाही! एवढे मोठे संपादक, पण त्यांनी आपल्याला भेटायला बोलावले. पण पत्ता का पाठवला नाही? सकाळी ९ पर्यंत पत्ता पाठवला नव्हताच. शेवटी तिने फोन केला. तेव्हा ते म्हणाले, ''अरे हो, विसरलोच तुम्ही भेटायला येणार होतात, नाही का? ते अध्यक्ष थोडे बिझी आहेत. त्यामुळे बारा वाजता या म्हणाले. तर तुम्ही असं करता का? अंबर हॉटेलवर मी १२ वाजता चेक आउट करणार आहे. तर तुम्ही अकरा वाजता या. अंबर हॉटेल, नागले रोड माहीतच असेल ना तुम्हाला?''

मानसी 'हो' म्हणाली. दरम्यान तिने नीलमला फोन करून येतेस का विचारलं तर नीलम वारीला जाण्याची तयारी करत होती. तिने तेवढ्यात मानसीला पट्टी पढवली.

''हे बघ. हॉटेलवर भेटायचं म्हणजे रिसेप्शनला भेटायचं असतं. रूममधे जायचं नाही. त्यांनी वर बोलावलं तर सांगायचं, मिस्टर पण आलेत बरोबर, पार्किंग नाही वगैरे असं काही किंवा ते इथे सोडून क्लबमध्ये गेलेत. घ्यायला येतील वगैरे बोलायचं. आणि आपला विषय सोडून इतर विषयांवर बोलायला उत्तेजन द्यायचं नाही. कळलं नं?''

मानसीला कळलं होतं, ती काय म्हणतेय ते. ती रिक्षा करून अंबर हॉटेलवर गेली. रिक्षा थोडी अलीकडेच सोडली. रिसेप्शनमधे जाऊन तिने रूम नं. ४०५ मध्ये फोन करायला सांगितलं. ते रूममध्ये नव्हतेच. आता काय करावे? ती सोफ्यावर बसून राहिली. दहा मिनिटातच ते बाहेरून येताना दिसले.

''अरे वा! मानसी देशपांडे नाही का? मी जरा नागराध्यक्षांना भेटायला गेलो होतो. तुम्ही येणार म्हणून लवकर आलो. या ना. रूममध्ये जाऊ. फाइल आणली ना?''

मानसी म्हणाली, ''हो. पण मिस्टर येथे सोडून क्लबमधे गेले आहेत. ते आले तर त्यांना कळणार नाही मी कुठे आहे. मी रेस्टॉरंटमधे बसले असेन असं सांगितलं होतं.''

''असं काय? ते गेटकडे पाहत म्हणाले. बरं, बरं. इथे रेस्टॉरंटमधे बसू.''

त्यांनी कॉफी मागवली. एवढ्या मोठ्या माणसाबरोबर आपण कॉफीपान करणार या कल्पनेनेच मानसी उत्तेजित झाली होती. तिने हळूच फाइल पुढे केली.

''हो, ती ठेवा माझ्याकडे. मी आठ दिवसांत परत करतो आणि मग त्यावर बोलू.''

त्यानंतर बडगुजरसाहेब आपला पेपर, त्यांची नेमणूक, इतर मॅगझीनमधील लेखन, त्यांची भाषणे इत्यादींवर बोलू लागले.

मग मानसीने हळूच विषय काढला. ''मला माहीत आहे सर, तुमचा पेपर खूप लोकप्रिय आहे. म्हणून तर मला त्यात लिहायची इच्छा आहे. तुम्हाला योग्य वाटलं तर...''

''हो. मी ती फाइल सावकाश वाचतो. मी रात्रीच्या वेळी शांतपणे वाचेन. मग बोलू.''

मानसीच्या मनात आलं की मग कालच देऊन ठेवली असती. इतक्यात तिचा फोन वाजला. फोन घ्यावा की न घ्यावा तिला संभ्रम वाटला. पण तेच म्हणाले, ''आला बहुतेक मिस्टरांचा फोन.''

पण खरंच मानसीच्या नवऱ्याचा फोन आला होता.

''हॅलो.''

''अगं मानसी, मी घरी आलोय. तू कुठे आहेस?''

''आलेच थांबा!'' असं म्हणून तिने फोन बंद केला.

''आले का घ्यायला?'' बडगुजरसाहेबांनी विचारलं.

''हो, म्हणजे तशी घाई नाही... पण आलेत.'' ती कशीबशी म्हणाली.

बडगुजरसाहेब निरोप द्यायला उठले.

''बरं, तुम्हाला एक विचारून ठेवतो. तुम्हाला अयोध्येत जाण्यात इंटरेस्ट आहे का? मी पुढच्या

आठवड्यात जातोय.''

''अं? नाही. म्हणजे मी जाऊन आले आहे. जा तुम्ही. खूप सुंदर दर्शन होईल. मी निघू?'' तिने विचारले.

''हो. हो.''

''फाइल घ्यायला केव्हा येऊ?''

''पुढच्या आठवड्यात. मी फोन करेन.''

मानसी तेथून निसटली. या मीटिंगमधून काहीच निष्पन्न होणार नाही, हे तिच्या लक्षात आलेच होते. यांच्याकडे नाववाले लेखक लिहितात. कदाचित आपली फाइल वाचणारही नाहीत. असा विचार करत मानसी रिक्षाने घरी पोचली. नवऱ्याने विचारले, ''कुठे गेली होतीस?''

ती म्हणाली, ''वारीला जाणार होते. पण तुम्ही आलात म्हणून परत आले.''

''चल गं. तू कसली जातेस वारीला! पण माझी मात्र ट्रिप कॅन्सल झाली. एका मित्राला हार्ट ॲटॅक आला. मग सगळी बस मागे फिरली.''

मानसीची ती दुपार आणि संध्याकाळ पेपर तपासण्यातच गेली.

मानसीने पंधरा दिवस वाट पाहिली. बडगुजरांचा काहीच फोन नव्हता. मग तिनेच एक दिवस फोन केला. तर ते म्हणाले, ''फाइल वाचायला वेळ नाही मिळाला. अयोध्येच्या दौऱ्यावर होतो ना!'' मग तिने तो विचारच सोडून दिला. एकदा दिवाळीपूर्वी पेरेंट्स मीटिंग होती. मानसीने सर्वांचे सहामाही रिपोर्टकार्डस दिले. मीटिंग संपल्यावर एक पालक मानसीला भेटायला थांबले.

''मॅडम, तुम्ही मानसी देशपांडे ना? तुमचे लेख मी वाचत असतो.''

''कसे काय? मी तर फक्त आमच्या नोटीस बोर्डवरच लावते. कुठे छापूनही नाही आले.''

''हो. आमचा मोठा मुलगा पण याच शाळेत आहे. तो त्या लेखांचे फोटो काढून आणतो. मग तो मला वाचून दाखवतो. आमच्याकडे त्यावर चर्चा वगैरे होते.''

मानसीला आनंद झाला.

''मी काय म्हणतो मॅडम, तुम्ही पेपरमधे कॉलम लिहायला पाहिजे. मी तुमचं नाव सोनावणे सरांना सुचवतो. तुम्ही लिहाल का?''

मानसी पाहतच राहिली. सोनावणे सरांचा पेपर तर खूपच मोठा होता, 'सांजवेळ'. त्यात कसे येईल माझे लिखाण!

पण ते पालक म्हणाले तसे त्यांनी केले होते. सोनावणे यांचा एक मेसेज आला. तिने उत्तर दिले. त्यांनी तिची फाइल ऑफिसमध्येच चाळली. मग विषयाबद्दल चर्चा झाली. त्यांनी दिलेल्या विषयावर मानसीने दोन-तीन लेख लिहून आणले. त्यांनी लगेच काही सुधारणा सुचवल्या. मग अप्रूव्ह केले. आता मानसी दर आठवड्याला 'सांजवेळ' मध्ये लिहू लागली. बडगुजर यांच्या 'नवे शहर' वर्तमानपत्राला या अंकाची स्पर्धा असायची. त्यामुळे त्यांच्या वाचनात हे आलेच.

वर्षभरानंतर एका कार्यक्रमात बडगुजर साहेब आणि मानसीची भेट झाली. एका शिक्षणसंस्थेचा वर्धापन दिन होता. त्यात बडगुजर साहेबांना अध्यक्ष तर मानसी देशपांडे यांना वक्ता म्हणून बोलावले होते. कार्यक्रमाआधी व्हीआयपी रूममध्ये सर्व आमंत्रित पाहुणे जमले होते. मानसी आल्याबरोबर संस्थेच्या प्रमुखांनी तिची बडगुजर साहेबांशी ओळख करून दिली.

''या मानसी देशपांडे. 'सांजवेळ' मध्ये स्तंभलेखन करतात. शिक्षणक्षेत्राबद्दलची त्यांची परखड मते आजच्या त्यांच्या व्याख्यानात ऐकायला मिळतीलच.''

बडगुजर साहेब अडखळत बोलले, ''अं, अं. हो. मी ओळखतो यांना.'' मानसीने त्यांना हसून नमस्कार केला. कसनुसं हसत त्यांनी तिच्या नमस्काराचा स्वीकार केला!

**– मेघना साने**


भ्रमणध्वनी : ९८९२१५१३४४


## वाचक, वर्गणीदार यांना नम्र विनंती

'साहित्य' त्रैमासिक दर्जेदार लेखनाला प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करत आले आहे. यातील सातत्य टिकवण्यासाठी लेखनाची जशी गरज असते तशी वाचकाचीही गरज असते- विचार व साहित्यकला यांच्या सृजन-संवर्धनासाठी आपल्यासारख्या वाचकांची, वर्गणीदारांची 'साहित्य'ला गरज आहे - वर्गणी कुठल्याही अंकापासून भरता येते.

# एक बंद पाकीट

विजयराज बोधनकर



**दत्तोजीराव** सरदेसाई हे प्रभानपूर गावचे भूषण होते. त्यांच्या पूर्वजांनी बांधून ठेवलेला टोलेजंग वाडा आता त्यांच्या मालकीचा होता. चार बहिणींच्या पाठीवर त्यांचा जन्म झाला होता. एकुलता एक मुलगा म्हणून लाड जरी झाले तरी त्यांच्या वडिलांनी अत्यंत शिस्तीने त्यांना वाढवले होते. वडील हे जग सोडून गेल्यानंतर सर्व अधिकार त्यांनाच मिळाले. शेकडो एकर जमीन आता त्यांच्याच मालकीची झाली होती. जिल्ह्यातले एक श्रीमंत आणि मोठे कलासक्त म्हणून त्यांची ओळख सर्वत्र पसरली होती.

साहित्य, संगीत, नाटक व चित्र-शिल्पकला आणि वाचन याची त्यांना आवड असल्यामुळे गावातल्या बहुतेक लोकांना त्यांच्या संगतीत राहून कलेची संगत आणि ज्ञान मिळत होते. त्यांची एक बहीण पश्चिमी देशात म्हणजेच टोरंटोमध्ये राहत असल्यामुळे बऱ्याचदा ते परदेश दौरा करून परत येताना तिथली पेंटिंग, काही छोटी छोटी शिल्पे भारतात विकत आणायचे. त्यामुळे घरात एक कला-संग्रहालय आपोआप तयार झाले होते. गावातील या वाड्यात एखाद्या आर्ट गॅलरीला लाजवेल अशी त्यांनी मांडणी केली होती. तसे ते स्वभावाने कडक आणि थेट बोलणारे होते. वाकडंतिकडं वागणाऱ्यांना त्यांचा दणका मिळालाच म्हणून समजा, अशी गावात त्यांची एक धास्ती होती. त्याउलट त्यांच्या काहीशा दिलदार स्वभावामुळे तसा त्यांचा गावात रुबाबही होता.

त्यांच्या गावात दोन मूर्तिकार होते. ओबडधोबड मूर्त्या करून विकण्यात त्यांचा हातखंडा होता. दत्तोजीरावांनी या दोन्ही मूर्तिकारांना खूपदा खडे बोल सुनावले होते. वयाने ज्येष्ठ असल्यामुळे ते कुणालाही चार तिखट शब्द सुनवत असायचे. एक दिवस त्या दोन मूर्तिकारांना त्यांनी वाड्यावर बोलावले आणि म्हणाले,

''अरे गाढवांनो, तुमच्या हाती कला आहे. तुमच्या ओबडधोबड कलेमुळे ना तुमचा उत्कर्ष होतोय, ना गावाला तुमचा अभिमान वाटतो! आता मी सांगतो ते ऐका, मोठ्या शहरातल्या एखाद्या मूर्तिकाराकडे जाऊन तुम्ही त्यांच्यासोबत दोन-चार वर्षं काम करा, त्या पगारावर तुमचं घर चालेल व तुम्ही तिथे सुबक मूर्ती कशा बनवतात, ते शिकून घ्या आणि नंतर कुठेतरी मूर्तींच्या कारखान्याला सुरुवात करा. तुमचा आणि कुटुंबाचा उत्कर्ष नक्की होईल!''

त्या दोघांनी अगदी नम्रपणे 'होय मालक, होय मालक' करून ऐकून घेतले आणि घरी निघून गेले. मुळातच त्यांची प्रवृत्ती जन्मताच आळशी होती. त्यात दिगंबर नावाचा जो मूर्तिकार होता, त्याच्या मुलाच्या अंगी मात्र मूर्तिकलेचे विशेष गुण होते. ते दिगंबरच्या लक्षात आले आणि एक दिवस दिगंबर आपल्या त्या मुलाला घेऊन दत्तोजीराव यांच्याकडे घेऊन आला नि म्हणाला, ''मालक हा माझा मुलगा भरत. आताच दहावी पास झाला; पण पुढे शिकायचं म्हणतो. पण आम्हाला काही कळत नाही. त्याने काय शिकावं? मूर्ती तो उत्तम घडवतो. तुम्ही सांगताय तसं याच्यात कलेचे गुण जन्मतःच आहे. याला जर कुठे केलेचे शिक्षण देता आलं तर याचं भविष्य घडेल. आता मी तरी कुठे माझा भरला संसार सोडून कुठे शहरात वगैरे जाऊ मूर्तिकला शिकायला? पण याला मात्र कुठे पाठवायचं याचं आम्हाला अज्ञान असल्यामुळे आम्ही त्याला कुठे पाठवू शकत नाही!'' दत्तोबारावांच्या त्या ओरडण्याचा दिगंबरवर कुठेतरी खोल परिणाम झाला होता आणि म्हणूनच दिगंबर आपल्या मुलाला त्यांच्याकडे घेऊन आला होता.

भरतने केलेले मूर्त्यांचे दोन-चार नमुने आवर्जून दत्तोजीरावांना दिगंबरने दाखवायला आणले होते'' दत्तोजीराव त्या मुलाने केलेल्या मूर्त्या बघून खूश झाले आणि म्हणाले,

''अरे याला आपण मुंबईच्या एका विख्यात शिल्पकाराकडे पाठवू या. तिथे जर याने अंगमेहनत करून आणि बुद्धीचा वापर करून काही काम केले तर याचं भविष्य उज्ज्वल होऊ शकतं. बघ! तू निर्णय घेऊन मला दोन-चार दिवसात सांग, आपण तुझ्या मुलाला पाठवायची काहीतरी व्यवस्था करू!''

दिगंबरला हे मनोमन पटले. मनातून त्याला आनंद झाला आणि भरतसोबत तो घरी परतला.

दिगंबर हा फारच समाधानी माणूस होता. छोट्याशा घरात आपल्या दोन मुलांसोबत संसार करीत होता. त्याला एक मुलगी होती. ती सातव्या वर्गात शिकत होती. तिच्याही अंगात चित्रकलेचे गुण होते. ती दरवाजात उत्तम रांगोळी काढायची आणि दिवाळीला भिंतीवर गेरूच्या फटकाऱ्याने सुंदर सुंदर चित्र काढायची. मालकाच्या सूचनेवर खूप विचार करून आठ दिवसांनंतर पुन्हा दत्तोजीरावांच्या वाड्यावर दिगंबर मुलाला घेऊन गेला आणि म्हणाला,

''मालक तुम्ही म्हणताय ते मला पटलं. याला मुंबईला पाठवायला मी तयार आहे.''

त्यावर दत्तोजीराव म्हणाले की, ''मुंबईला कुठला उत्तम शिल्पकार आहे का, याची मी चौकशी करतो आणि मग तुला कळवतो.''

दिगंबरने व त्याच्या मुलाने दत्तोजीरावांना नमस्कार

केला आणि तो म्हणाला,

''मालक त्याच्या नशिबात आता तुम्हीच काय ते रंग भरा!''

दत्तोजीराव हसले नि म्हणाले, त्याच्या नशिबात ईश्वराने जे रंग भरून ठेवले आहे, त्याला फक्त आपण बाहेर काढायचं काम करायचं. त्याच्या नशिबाने त्याच्या कर्मातून जे मिळेल, ते मात्र नक्कीच चांगलं असेल.

भरत चांगला आता पंधरा-सोळा वर्षांचा झाला होता. कोवळं मिसरूड त्याच्या ओठावर झुलू लागलं होतं. दत्तोजीरावांना एका सामान्य विचारसरणी असलेल्या घरातल्या कलावंत मुलाला मोठं करण्याची संधी मिळणार होती. त्यांनी मात्र आता भरतची बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक परीक्षा घ्यायचे ठरवले. याची कष्ट घेण्याची, सहनशक्तीची, संयमाची आणि प्रामाणिकपणाची किती तयारी आहे, यात जर तो पास झाला तरच आपण मुंबईला त्याला पाठवू! अन्यथा, झटपट यश मिळावे ही भावना घेऊन अनेक जण शहरात जातात आणि कष्टाचा डोंगर उपसणे सहन झाले नाही की पळत पुन्हा गावी येतात. अशी बरीच उदाहरणे त्यांनी बघितली होती, ऐकली होती. कष्टाशिवाय काहीही ईश्वर पदरात टाकत नाही यावर त्यांचा विश्वास होता. दत्तोजीराव मनातल्या मनात स्वतःशी संवाद साधत होते. यानंतर काही दिवस निघून गेले.

एक दिवस दत्तोजीरावांनी आपल्या नोकराला सांगितले की दिगंबरला बोलावलं आहे म्हणून माझा निरोप सांग. निरोप मिळताच दिगंबर तातडीने वाड्यावर आला, मालकाला नमस्कार केला. मालक म्हणाले,

''अरे दिगंबर! हे एक बंद पाकीट तू तुझ्याजवळ ठेव, ते अजिबात उघडू नकोस आणि मी तुला मागेन तेव्हा तू हे पाकीट मला परत कर!'' आश्चर्याने दिगंबरने ते पाकीट हातात घेतलं व 'होय जी' म्हणून कुतूहलाने पाकीट न्याहाळले, होकाराने मान हलविली. पाकीट घेऊन घरी निघून गेला. आणि ते सुरक्षित घरी ठेवून दिले. यानंतर काही दिवस निघून गेले. एक दिवस अचानक भरतला वाड्यावर दत्तोजीरावांनी बोलून घेतलं आणि त्याला सांगितलं की,

''ही गाडीभर लाकडं आहेत, त्या लाकडांना फोडून मला इंधन करून दे! पण मी तुला या कामाचा एकही पैसा देणार नाही, तू तुझ्या बापाला जाऊन विचार आणि त्याने होकार दिला तरच उद्या कुऱ्हाड घेऊन वाड्यावर ये आणि इंधन फोडून दे!''

भरतच्याही मनात मुंबईला जायचं होतंच. त्याने न डगमगता लगेच ती लाकडं फोडून देण्याचं मान्य केलं आणि म्हणाला, ''त्यासाठी बाबांना विचारायची काय गरज आहे? गाडीतील लाकडं दोन दिवसात फोडून देतो. त्याचं इंधन करून देतो आणि बरोबर रचून सुद्धा देतो.''

यावर दत्तोजीराव मनातून खूश झाले आणि स्वतःशी बोलू लागले की, हा पोरगा स्वयंप्रेरित आहे. याला एक गोष्ट सांगितली आणि तो त्याबरोबर दोन-तीन गोष्टी करून द्यायला लगेच तयार झाला.

त्याला माहिती आहे की, आपल्याला या कामाचे पैसे मिळणार नाही. तरीही हे काम करून देतो आहे म्हणजे हा आयुष्यात काहीतरी नक्की करेल. दत्तोजीराव मनातून सुखावले.

आपल्याला मालक मुंबईला पाठवणार आहे या भावनेने त्याने ते इंधन फोडून आणि घराच्या कोपऱ्यात रचूनही दिले होते. या गुपचूप परीक्षेच्या पहिल्या सत्रात भरत मात्र पास झाला होता. हा पोरगा कष्टाला डगमगणारा नाही हे त्यांच्या लक्षात आलं.

आता दत्तोजीराव त्याची दुसरी परीक्षा घेणार होते. हा मुलगा खरंच कलासक्त आहे की नाही, हेही आपण तपासले पाहिजे. याच्या कलेची परीक्षा घेतली पाहिजे. म्हणून त्यांनी त्यांच्या गावात असलेल्या गणपती मंदिरात भरतला एक दिवस बोलवून घेतले आणि मंदिराच्या मोकळ्या भिंतीकडे बोट दाखवित म्हणाले, ''या भिंतींवर गणपतीच्या अर्धपुतळ्याचे म्युरल करून दे!'' मालकाने भरतला म्युरल कसे असते याचे सर्व ज्ञान करून दिले... ''गणपतीची सुबकरूपात मूर्ती तू मला करून दे; परंतु याही कामाचे तुला मी पैसे देणार नाही आणि या कामात तू तुझ्या वडिलांची अजिबात मदत घ्यायची नाही. तुला एकट्याला जसं जमेल तसं काम करायचं आहे. मी तुला कच्चा माल म्हणजे माती वगैरे सगळं देईल! तुला जर हे काम करायची इच्छा असेल तरच तू कर, अन्यथा नाही म्हणून सांग!''

तसेही दत्तोजीरावांना याची कल्पना होती की हा पोरगा आपण सांगितलेलं काम त्या क्षमतेने करू शकणार नाही; परंतु याच्या मनात किती इच्छाबळ आहे आणि हे काम करायला किती वेळ लावतो, हे त्याच्या कामावरून किंवा होकारावरून किंवा नकारावरून आपल्या लक्षात येईल.

सोळा वर्षांचा भरत हे ऐकून किंचित तणावाखाली आला. मोठ्या आकाराची पुतळा स्वरूप मूर्ती भरतला करायची होती. घरी जाऊन त्यांने वडिलांशी हितगुज केले. भरत त्याच्या बाबाला म्हणाला, ''मला एवढं मोठं काम जमेल का? मी तर कधीच इतकं मोठं काम केलं नाही!'' तर दिगंबर त्याला म्हणाला, ''सुरुवात करून तर बघ, जमलं तर जमलं! नाही जमलं तर आपण मालकाला तसं सांगू या!''

भरतची रात्रीची झोप आता गेली होती. आपल्याला हे काम जमेल की नाही. याचेच चिंतन तो रात्रंदिवस करीत होता. या दिवसांत तो मित्रासोबत खेळायला सुद्धा गेला नव्हता. आपण जर हे काम केलं तर आपल्याला मुंबईला मोठ्या शिल्पकारासोबत काम करायची संधी मिळेल या तीव्र इच्छाशक्तीने त्याने होकार दिला आणि मूर्ती कशी साकारायची, अभ्यास करायला सुरुवात केली. गणपती कसा असेल, आपल्याला काय काय करावे लागेल, याची उजळणी तो मनातल्या मनात करू लागला. बरेचदा तो वडिलांना मूर्ती कामात मदत करीत असल्यामुळे त्याला या कामाची सवय होती. आता पुन्हापुन्हा देवळात जाऊन त्या भिंतीकडे बघू लागला. आता त्याचा गावातील मुक्त संचार संपला होता. नव्या कल्पनेने त्याला अस्वस्थ करून सोडले होते. खरंतर पंधरा-सोळा हे वय एवढ्या मोठ्या कामासाठी योग्य नव्हतं. पण दत्तोजीरावांनी सांगितल्यामुळे कोवळ्या वयातला भरत आता एखाद्या मोठ्या पोक्त माणसासारखा विचार करायला लागला होता. दतोजीरावांनी त्याने घडवलेल्या छोट्या-छोट्या मूर्ती बघून भरभरून कौतुक केल्यामुळे त्याला आपण हे काम करू शकू, असा आत्मविश्वास मनात निर्माण झाला होता.

दिगंबरच्या मनात मात्र शंकेची पाल चुकचुकत होती की, मालक एकही पैसा न देता माझ्या या लहान मुलाकडून इतके मोठे काम का करून घेत आहे? त्याला आता मालकाची शंका यायला लागली. मालक आपल्या पोराला मुंबईचे आमिष दाखवून वापरून तर घेत नाही ना? असा शंकेचा विचार दिगंबर करीत होता. अचानक एक दिवस भरत खूप विचार करून वाड्यावर गेला. दत्तोजीराव खुर्चीत पेपर वाचत बसले होते. भरतला बघून त्यांनी पेपर बाजूला ठेवला आणि म्हणाले, ''काय भरत काय विशेष?''

भरत मालकाला म्हणाला, ''मालक, मी असे काम कधी केले नाही. पण मला विश्वास वाटतो की मी हे काम करू शकेन. हे ऐकून दत्ताजीराव त्याला म्हणाले, ''ठीक आहे. आता मला सांग, तुला काय काय साहित्य लागणार आहे? मी तुला पैसे देतो. तू बाजारातून विकत आण आणि कामाला सुरुवात कर!''

त्याप्रमाणे भरतने स्वतःच लागणाऱ्या साहित्याची एक यादी केली आणि त्याप्रमाणे मालकाकडून पैसे घेऊन त्याने बाजारात जाऊन तो माल विकत आणला आणि थेट देवळात येऊन भिंतीवर कामाला सुरुवात केली. त्याने पहिले गणपतीचे साधे चित्र एका कागदावर काढून आणले, स्वतःच्या मनाने मोजमाप करून त्याचा आराखडा भिंतीवर आखून नंतर वाळले गवत, शाडूची माती, चुना, गूळ, असे मिश्रण करून त्याने माती बनवली. भिंतीवर शिल्पाच्या आकारात त्याने बरेचशे खिळे मारले, त्या खिळ्याला त्याने वेगवेगळ्या तारांनी गुंफून घेतले म्हणजे ते शिल्प भिंतीवरून उलटून पडणार नाही, त्या शिल्पाची पकड मजबूत राहील असा त्याने स्वतःनेच विचार केला आणि सर्व घटक मिसळलेल्या मातीतून त्याने भिंतीवर गणपतीच्या आकाराचा ओबडधोबड पहिला ढाच्या तयार केला.

ते बघायला आता गावातल्या लोकांची गर्दी जमू लागली तसे भरतला अधिक स्फुरण चढू लागले. भरतच्या कामाविषयी आता गावात चर्चा सुरू झाल्यामुळे त्याचा गावात मान वाढला. या शाळकरी पोराने स्वीकारलेले आव्हान बघून त्याचे कौतुक होऊ लागले. त्या कौतुकामुळे त्याचा उत्साह द्विगुणित झाला होता. कसेही करून आपली मूर्ती सुबकच व्हायला हवी याची काळजी तो घेऊ लागला आणि हळूहळू त्याच्या बोटातून ओबडधोबड मातीला आकार येऊ लागला होता. जीव ओतून मूर्तीचे प्रमाण साधू लागला. तो आपले नाव आणि मालकाचे नाव कुठेही खराब होऊ नये म्हणून काळजी वाहू लागला. त्यामुळे एकाग्रतेने एकलव्य बनून स्वतःशी बोलत काम करू लागला. त्यामुळे त्याचा प्रामाणिक प्रयत्न मातीतून दिसू लागला. तसा तसा गाववाल्यांना गणपती आकाराला येतोय असे दिसू लागले होते. ही बातमी आता गावभर पसरली आणि दत्तोजीरावांच्या कानावर गेली, ते मनातून सुखावले.

एक दिवस भरत दुपारच्या जेवणासाठी घरी गेल्यानंतर दत्तोजीराव गुपचूप मंदिरात येऊन त्यांनी भरतचे काम बघितले आणि मनातल्या मनात म्हणाले, या मुलांमध्ये दैवी शक्ती लपली आहे, याला आपण मदत केली पाहिजे. त्याचे काम एखाद्या व्यवसायिक शिल्पकारासारखे जरी नसले तरी त्याच्या वयाला शोभेल असेच आहे, त्याने

त्याच्या क्षमेतुनसार मूर्तीत जीव ओतला आहे. वय लहान असूनही तो मागे हटला नाही. हेच त्याच्यातलं वैशिष्ट्य, त्याच्यातली जिद्द दत्तोजीरावांना आवडली.

काही दिवसांतच जीव ओतत भरतने काम पूर्ण केले... आता शिल्प वाळू लागले होते. वाळल्यावर भरतने पांढरा रंग मारून काम पूर्ण केले. मंदिरात आता गर्दी वाढू लागली होती. जो तो भरतचं कौतुक करत होता की इतक्या कमी वयात या मुलाने इतकी सुंदर मूर्ती घडवली. पण त्या मागचे गुपित वेगळेच होते.

दत्तोजीरावांनी मुद्दाम त्याला गणपतीची मूर्ती अशासाठी करायला लावली होती की, गणपती हा कसाही घडवला तरी तो सुंदरच दिसतो. त्याचं प्रमाण आपल्या कल्पनेनुसार प्रत्येक शिल्पकार ठरवतो. त्यामुळे प्रमाणबद्धता इकडे तिकडे झाली तरी कुणाच्या चुका फार लक्षात येत नाही, हाच मुख्य उद्देश घेऊन त्यांनी भरतला गणपती बनवायला लावला होता आणि आता भरतने ते सिद्धही करून दाखवलं होतं. आता मंदिरातले काम वीस-पंचवीस दिवसांनंतर पूर्ण झाले होते.. आनंदाने भरत हे सांगायला वाड्यावर गेला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दाटला होता.

दत्ताजीरावांनी त्याचे कौतुक केले... त्याची पाठ थोपटली... आणि म्हणाले, ''तू काम छान केले आहेस, तुझे मी अभिनंदन करतो. पण त्यात अधिक सुधारणा कशी करता येईल याचाही तू विचार कर!'' भरतनेही आनंदाने मान हलवली आणि तो आनंदाने घरी निघून गेला. त्यानंतर आजूबाजूच्या गावातली मंडळी भरतने केलेले गणपतीचे काम बघायला मंदिरात येऊन त्याचं कौतुक करू लागले. भरतला गावातला कुठलाही माणूस भेटायचा तर भरतचे कौतुक व्हायचे आणि त्यातून भरत सुखावून जायचा. त्याला आता कामाची चटक लागली होती. तो प्रेरित झाला होता. त्यानंतर त्याने घरात माती भिजवून आठ दिवसांत एक शंकराची सुंदर मूर्ती स्वतःहूनच तयार केली आणि ती मूर्ती घेऊन पुन्हा दत्तोजीराव यांच्याकडे तो आला. आता शंकराच्या मूर्तीत पहिल्या कामापेक्षा अधिक सौंदर्य दिसत होते, हे दत्तोजीराव यांच्या लक्षात आले आणि ते भरतला म्हणाले की, बघ कामातून काम सुधारत जाते, तुम्ही आळशी लोक काहीच करत नव्हता आणि त्यामुळे तुमची प्रगती होत नव्हती. आता तुला स्वतःहून ही मूर्ती करावीशी वाटली.. हेच मोठे काम तू केले. आपल्या कामातूनच प्रगती करायची असते. आपला गुरू आपण स्वतः व्हायचे असते म्हणजे आपले काम बदलत जाते आणि चांगले होते. दत्तोजींनी महत्त्वाचे ज्ञान भरतच्या लक्षात आणून दिले होते आणि हीच गोष्ट त्याने आपल्या बाबांना घरी गेल्यावर सांगितली.

बाबांचे डोळे आता हळूहळू उघडू लागले होते. दिगंबरही आपल्या ओबडधोबड मूर्तींना भरतच्या हाती देऊन त्याला उत्तम कर असे सांगू लागला. या एका गोष्टीमुळे भरत आणि दिगंबरच्या मनामध्ये आता सकारात्मक विचार येऊन आपण बदललो पाहिजे, याचा ते विचार करू लागले. यानंतर पंधरा-वीस दिवस उलटून गेले.

एक दिवस अचानक भरतला पुन्हा दत्तोजीरावांनी वाड्यावर बोलावून घेतले आणि म्हणाले, ''तू बनवलेली शंकराची मूर्ती मी शेजारच्या शहरातल्या एका आमिर मारवाड्याला भेट दिली, त्याला तुझी शंकराची मूर्ती खूप आवडली. त्याला आता तुझ्याकडून एक दुर्गा देवीची मूर्ती बनवून हवी आहे, तर तू मूर्ती बनवून देशील का?'' भरतला हे ऐकून खूप आनंद झाला आणि म्हणाला, ''मालक, खरोखरच मला करायला आवडेल, मला त्यांचा पत्ता द्या, मी त्यांना भेटून घेतो आणि त्यांना कशी मूर्ती हवी आहे हे त्यांच्याकडून मी समजून घेतो!''

लगेच दत्तोजीरावांनी भरतला एका कागदावर शेठजींचा पत्ता लिहून दिला आणि त्याला शेजारच्या शहरात जाऊन त्या शेठजींना भेटायला सांगितले. भरत लगेच दुसऱ्या दिवशी शेजारच्या शहरात गेला. त्या मारवाड्याला भेटला, मारवाड्याला कशी मूर्ती करून हवी हे समजावून घेतले.

पण मारवाडी त्याला म्हणाला, ''मला जर तुझी मूर्ती आवडली तरच मी पैसे देईन, आवडली नाही तर तुला एकही रुपया मी देणार नाही. मान्य असेल तर तू हे काम स्वीकार आणि पैसे मी माझ्या मताने देईन, ते तुला स्वीकारावे लागेल.'' भरत आता खरोखरच अडचणीत सापडला होता. तो मनात म्हणाला, 'जर मी केलेली मूर्ती यांना आवडली नाही तर इथूनही मी रिकाम्या खिशाने घरी जाईन,' असे होऊ नये म्हणून त्याने शेठजींना थोडा कालावधी मागितला. शेठजी म्हणाले, ''ठीक आहे. तुला वेळ मिळेल तसा तू ये. मी तुला मटेरियलचे पैसे देतो.''

भरत शहरातून घरी निघून गेला. त्यांनी वडिलांना ही गोष्ट सांगितली. वडील म्हणाले, ''अरे, हे पण मालकासारखेच पैसे द्यायला तयार नाहीत तर कसं होणार?''

भरत म्हणाला, ''बाबा मी त्यांना आवडेल अशीच मूर्ती करून देतो. म्हणून तर मी त्यांना वेळ मागितला. आता मी घरी दुर्गादेवीची मूर्ती कशी उत्तम होईल याचा अभ्यास करतो. पहिले घरी मूर्ती करून बघतो.'' आणि खरोखरच भरत दुसऱ्या दिवशीपासून दुर्गादेवी बनविण्याच्या कामाला लागला. पूर्ण अभ्यास करून छोटसं मॉडेल त्याने तयार केलं, पंधरा दिवस त्यात घालवले, त्यात त्याचा आत्मविश्वास वाढला. स्त्रीचा देह कसा असतो, वाघ कसा असतो, तिच्या हातात त्रिशूल कसा द्यायचा, तिला किती हात असतात, असा सगळा तो रात्रंदिवस विचार करता करता त्याला त्याचे सूत्र सापडत गेले आणि सुंदर मूर्ती त्याच्या हातून घडत गेली. ती मूर्ती बघितल्यानंतर भरतच्या एक लक्षात आलं की, कुठलीही गोष्ट विचारपूर्वक आणि चांगला रियाज करून केली तर ती गोष्ट नक्कीच चांगली होते, याची जाणीव त्याला झाली आणि तो एक दिवस शहरातल्या शेठजीकडे जाऊन म्हणाला की, मी आपल्याला उत्तम दुर्गादेवी बनवून देतो. हे ऐकून शेठजी तयार झाले. ते भरतला म्हणाले की, तुला जे साहित्य लागतं, ते तू बाजारातून विकत आण. मी तुला त्याचे लगेच पैसे देतो!

भरतला या गोष्टीचा आनंद झाला आणि शेठजींना म्हणाला,

''तुम्ही जिथे जागा द्याल, तिथे मी मूर्ती करून देतो!'' शेठजी तयार झाले. त्यांनी एक जागा निवडून दिली, साहित्याला लागणारे पैसे दिले आणि त्याची खाण्या-पिण्याची व्यवस्था केली. आता ही मूर्ती साधारण चार फुटाची त्याला करायची होती. वडिलांचा अजिबात त्याच्यात सहभाग नव्हता. हे काम आपल्या एकट्याला करायचे आहे म्हणून तो अतिशय जागृत झाला होता. त्या कामाला त्याने सुरुवात केली. त्याने पुन्हा शेठजींना सांगितलं होतं की किमान या मूर्ती घडवायला एक दीड महिना तरी लागेल. शेटजींनी मान हलवली आणि म्हणाले की, ''मला काही गडबड नाही. तुला जितका वेळ लागेल तितका तू घे. काम मात्र उत्तम झाले तर मला आनंद होईल!''

भरतने मान हलवली. शेठजीकडून पैसे घेऊन, त्याने बाजारात जाऊन सगळे सामान विकत आणलं. शेठजीच्या घरापासून थोड्या अंतरावर एक जागा भरतला देण्यात आली, तिथे पाण्याची, खाण्याची व्यवस्था शेठजींनी केली. भरत कामाला लागला होता.

भरतने घरी मूर्तीचा सराव केल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढला होता. त्याने मूर्ती करायला सुरुवात केली. पहिले त्याने गवत, माती, चुना, गुळ अशा मातीचा देवीचा सांगाडा तयार करून घेतला. वरून शाडूच्या मातीने त्या सांगाड्याला तो हळूहळू दुर्गादेवीचे रूप देऊ लागला. शेटजी मात्र रोज त्याला जेवणखावन काळजीने आणि आपुलकीने देऊ लागले. त्याचे नित्याचे काम पूर्णत्वाला जाऊ लागले. तो त्यात रमला, काम आकाराला येऊ लागले. एक-दीड महिन्यात भरतने ती मूर्ती तयार केली. आता त्याचं वय १६ पूर्ण झालं होतं. त्याला कामाची समज आली होती. त्याच्या हातून गणपतीचे, शंकराचे, घरी देवीचे मॉडेल करून बघितल्यामुळे त्याचा आत्मविश्वास द्विगुणित झाला होता. अशा अवस्थेत त्यांनी ती मूर्ती निवांतपणे पूर्ण केली आणि एक दिवस ते काम पूर्ण झाल्यावर शेठजींना मूर्ती बघायला बोलावून घेतलं. फक्त मूर्तीला पांढरा रंग मारून ठेवला होता. शेठजी उत्सुकतेने आले आणि भरतनी केलेली दुर्गादेवीची मूर्ती बघून थोडेसे खूश झाले आणि त्याची पाठ थोपटली.

ते म्हणाले ''अरे वा! इतक्या कमी वयात तू इतकी छान मूर्ती बनवली. त्याचा मला आनंद आहे. पण ही मूर्ती मला रंगवून हवी आहे. ती रंगवल्यावर मला आवडले, तर आपण पुढे व्यवहाराचे ठरवून घेऊ. रंगाचे पैसे सुद्धा मी तुला देईन! भरत खूश झाला. तो म्हणाला ''शेठजी मी जरा गावी जाऊन येतो आणि वडिलांना ही आनंदाची बातमी सांगतो.'' शेठ म्हणाले, ''आरामात जाऊन ये! तिकडून आल्यावर वाटल्यास या देवीला रंगवायला सुरुवात कर!''

भरत गावी आला. वडिलांना ही आनंदाची बातमी सांगितली आणि तो थेट वाड्यावर जाऊन दत्तोजीरावांना सुद्धा याची बातमी दिली. दत्तोजीराव खूश झाले, त्याची पाठ थोपटली आणि म्हणाले, ''आता मी तुला मुंबईला पाठवण्याची तयारी करतो, पण त्याला एक दीड महिना लागेल. तोपर्यंत मी उत्तम शिल्पकाराचा शोध घेतो आणि तुला कळवतो!''

भरत यावर खूप खूश झाला आणि तो पुन्हा शेठजींच्या शहरात येऊन ती मूर्ती रंगवून पूर्ण करायच्या कामाला लागला. आठवड्यातच मूर्ती रंगवून पूर्ण केली. ती मूर्ती बघायला पुन्हा शेठजींना त्यानं बोलावलं. शेठजी आले, शेटजींनी मूर्ती बघितली, थोडे हसले आणि इतकंच म्हणाले की,मी दत्तोजीराव यांच्याशी बोलून घेतो, तू तुझे सामान घेऊन गावी गेला तरी चालेल!

शेटजी पैशाबद्दल एकही शब्द बोलले नाहीत.

त्यामुळे निराश होऊन भरत आपल्या गावी आला. भरतच्या चेहऱ्यावर कुठलाही आनंद नव्हता.

तो वडिलांना म्हणाला की, ''शेटजीला मूर्ती खूप आवडली, त्यांनी कौतुक केले; पण त्यांनी मला एकही पैसा दिला नाही. आता मी काय करू?''

दिगंबर मात्र या गोष्टीवर खूप वैतागला, घरात मोठ्याने बडबड करू लागला. त्याने गावात गोष्टीचा मोठा गवगवा केला की, आपल्या मालकाने भरतला शेठजीकडे पाठवले, पण त्या शेठजीने माझ्या या पोराकडून काम करून घेऊन एकही दाम दिला नाही आणि मालकाने सुद्धा गणपतीच्या मूर्तीचे पैसे दिले नाही, त्याच्याकडून गाडीभर इंधन फोडून घेतलं, त्याचेही पैसे दिले नाही आणि आता शेटजीनेही खाली हाताने पोराला परत पाठवले. मला खूप वाईट वाटले, आपले मालक असे का वागतात. या शाळकरी मुलाचा त्यांनी असा का फायदा घेतला? मुंबईला पाठवतो म्हणून मालकाने इतके काम त्याच्याकडून मोफत करून घेतले. दिगंबरच्या अशा नकारात्मक बोलण्यामुळे गावात मात्र या गोष्टीची नको तितकी चर्चा सर्वत्र पसरत गेली. दत्तोजीराव इतक्या वाईट थरापर्यंत जातील असे कोणालाही वाटले नव्हते. पण त्यांनी असे का केले हे मोठे प्रश्नचिन्ह राहिले गावात उभे राहिले.

दुसऱ्या दिवशी ही गोष्ट दत्तोजीरावांच्या कानावर गेली. दत्तोजीराव मनातल्या मनात हसले आणि थोडेसे चिंतातूर होऊन आपल्या एका नोकराला त्यांनी सांगितले की, दिगंबर आणि भरतला वाड्यावर आज संध्याकाळी यायचा निरोप दे.. नोकराने लगेच तो निरोप दिगंबरच्या घरी जाऊन दिला. दिगंबरच्या मनात शंकेची पाल चुकचुकली, आपण कालपासून मालका विषयी आणि शेटजी विषयी रागारागाने बोललो हे त्यांच्यापर्यंत तर गेलं नाही ना? ही शंका घेऊनच सायंकाळी दिगंबर आणि भरत वाड्यावर पोहोचले तेव्हा बघतो तर काय, वाड्यात बरीच प्रतिष्ठित मंडळी येऊन बसली होती. हे दृश्य बघून ते बापलेक अवाक् झाले, खजील झाले. ही मंडळी इथे काय करत आहेत असे प्रश्नचिन्ह दोघांच्या चेहऱ्यावर उमटले. या गावातल्या सर्व प्रतिष्ठित माणसांसमोर दोघांचे धाबे दणाणले, आता त्याच्या छातीत जरा धस्स झालं. आपण जे बोललो, ते चुकीचं होतं की बरोबर होतं, याचा त्याला अंदाज येईना.

दिगंबर आणि भरत कावऱ्याबावऱ्या मनाने थरथरत त्या मंडळींच्या मध्ये येऊन बसले. दिगंबर ने हात जोडून मालकांना नमस्कार केला.

दत्तोजीराव दिगंबरला म्हणाले, ''काय रे दिगंबर, गावात जी माझ्या विरोधात चर्चा ऐकतोय, ते खरं आहे का? तू असं बोलला का?'' हे ऐकून दिगंबर फारच संकोचला, गर्भगळित झाला आणि हळूच म्हणाला, ''मालक एवढ्याशा कोवळ्या पोराकडून त्या शेटजींनी ढोरासारखं काम करून घेतलं. त्याला एकही पैसा दिला नाही. त्याचे वाईट वाटले. तुम्ही गणपतीची मूर्ती करून घेतली तेव्हा तुम्ही सांगितलं होतं की, मी याचे पैसे देणार नाही. इंधन फोडून घेतलं तेव्हाही सांगितलं होतं. त्याचे पैसे देणार नाही. आम्ही ते मान्य केलं. पण आता हे शेठजीचं काम याने जीव ओतून केलं. इतकी सुंदर मूर्ती करूनही शेठजीनी एकही पैसा दिला नाही म्हणून मी गावात नाइलाजाने तोंड उघडलं. मला याचं फार वाईट वाटलं!''

दत्तोजीरावांनी दीर्घ श्वास घेतला सर्व ऐकून घेतलं आणि शांतपणे म्हणाले, ''तुला दोन महिन्यांपूर्वी मी एक बंद पाकीट दिलं होतं. आठवतं ना? आत्ता लगेच घरी जा आणि ते पाकीट घेऊन ये, मग तुला कळेल खरे काय आणि खोटे काय!''

दिगंबर गोंधळला आणि म्हणाला, ''होय मालक मी लगेच जाऊन ते पाकीट घेऊन येतो. दिगंबर धावपळ करत घरी गेला, त्याने कपाटातलं ते पाकीट काढलं, हाती घेतलं आणि पुन्हा लगबगीने वाड्यावर आला आणि मालकाला म्हणाला, ''मालक हे घ्या पाकीट!''

दत्तोजीरावांनी ते पाकीट घेतलं आणि तिथे बसलेल्या एका प्रतिष्ठित माणसाच्या हाती देऊन ते म्हणाले,

''शंकरराव, हे पाकीट उघडा आणि त्यात मी काय लिहिलं आहे, ते या सर्व गावकऱ्यांसमोर दिगंबरला आणि त्या भरतला वाचून दाखवा!'' आता गावकऱ्यांना सुद्धा उत्सुकता वाटली, अरे हा काय प्रकार आहे? त्या पत्रात असं मालकाने काय लिहिलं.. लोकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. गर्दीत बसलेल्या शंकररावांनी ते पाकीट मोठ्या उत्सुकतेने उघडलं आणि तो कागद वाचून दाखवायला उभे राहिले.

मालक पुन्हा म्हणाले, ''दिगंबर! हे पत्र उघडण्याची वेळ आपल्यावर येऊ नये असं मला मनापासून वाटत होतं पण ती वेळ आली! या पत्रात मी काय लिहिलं आहे समजून घे!''

शंकररावांनी ते पत्र मोठ्या उत्सुकतेने वाचायला

सुरुवात केली,

'दिगंबर तू एक दिवस माझ्या घरी तुझ्या मुलाला घेऊन आला होता. तेव्हा तू त्याची मूर्ती मला दाखवायला घेऊन आला होता. ते बघून मला अंदाज आला की हा मुलगा काहीतरी आयुष्यात करू शकेल म्हणून मी त्याची परीक्षा घ्यायची ठरवली. त्याची शारीरिक क्षमता किती आहे हे जाणून घेण्यासाठी मी त्याच्याकडून इंधन फोडून घेतलं. पण त्याचे मी त्याला दोनशे रुपये देणार आहे.

त्यानंतर गणपतीची मूर्ती करताना त्याला अनुभव नसताना तो क्षमतेप्रमाणे महिनाभरात घडवून, देतो की नाही, हे बघणार आहे. जर मूर्ती मला आवडली तर त्याचे मी आठशे रुपये देणार आहे. त्यानंतरच या मुलाची रवानगी कुठल्याही शिल्पकाराच्या हाताखाली न करता त्याची ॲडमिशन मुंबईच्या जेजे स्कूल ऑफ आर्ट मध्ये करायचे ठरवले आहे. त्यातून पुढे त्याचं भविष्य शिखरावर जाईल. पैसे न देता कुणाकडून काम करून घेणे हे चुकीचेच आहे; पण मी त्याची परीक्षा घेत होतो त्यात तो जर सफल झाला, तर मी त्याला पैसे देणार आहे. तुला आणि गावकऱ्यांना पुढे गैरसमज व्हायला नको म्हणूनच हे बंद पाकिटातले पत्र मी अगोदरच तुझ्या हातात देत आहे.'

दत्तोजीराव सरदेसाई

१५ एप्रिल १९९०

हे पत्र वाचून पूर्ण करताच दत्तोजीराव उभे राहिले आणि म्हणाले, काल शहरातून शेठजीचा माणूस आला होता. त्याने ९०० रुपयाचे पाकीट माझ्या हाती दिले. शेठजीला मीच सांगितले होते की पैसे मुलाच्या हातात देऊ नका!

बैठकीत भयंकर शांतता पसरली होती. पण अचानक ग्रामस्थांनी टाळ्यांचा कडकडाट केला. उत्साही वातावरणात मालकाचा चेहरा उजळून निघाला. पण दिगंबरचे मन मात्र भरून आले. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. सर्वांच्या देखत दिगंबरने मालकाच्या पायावर डोकं ठेवलं. हे बघून भरतच्याही डोळ्यात अश्रू तरळलेले होते. आता त्याला पश्चात्ताप झाला होता. पंधरा-सोळा वर्षांचा भरत आपल्या वडिलांची ती अवस्था पाहून व्याकूळ झाला होता.

दिगंबर सगळ्यांच्या समोर म्हणाला, ''मालक मी चुकलो, मी चुकलो, मला क्षमा करा, पोराचं असं भवितव्य घडवणारा एवढा मोठा माणूस, त्यांच्याविषयी मी काय काय बोलून गेलो गावात! चुकीचं बोललो, मला क्षमा करा, मला क्षमा करा!''

आणि दत्तोजीरावांच्या पायावर त्याने डोकं ठेवलं. त्याला उठवत दत्तोजीराव म्हणाले की, तुला मी पहिलेच सांगितलं होतं की, तू ओबडधोबड मूर्त्या बनवतो आणि गावात विकतो, तसं न करता तुम्ही शिकून घ्या, पण तू ऐकलं नाहीस, फक्त एक चांगलं काम तू केलंस आणि ते म्हणजे मुलाला तू माझ्याकडे आणलं! त्याचं भविष्य आता उज्ज्वल आहे, पण एक लक्षात ठेव. कुठलीही गोष्ट मोठी व्हायला माणसाजवळ संयम हवा असतो, सोळा वर्षांचा तुझा मुलगा घरात बसून होता. तो काहीही करत नव्हता. पण या गणपतीच्या कामामुळे तो अचानक वेगळा कामाचा विचार करायला लागला. विचार करता करता त्याची क्षमता वाढली आणि त्याने त्या संधीच सोनं केलं. ही गणपतीची मूर्ती जर बनवण्याची संधी त्याला मिळाली नसती, तर तुझा मुलगा आजही घरात बसून राहिला असता. तू काहीही केलं नसतं. तो गावात टवाळक्या करीत बसला असता. अरे हेच महत्त्वाचं वय आहे, आपल्या मुलांच्या अंगात कुठला गुण आहे, त्याच्यासाठी आपण काय केलं पाहिजे, याची पालक काळजी घेत नाहीत. त्यामुळे अंगात कला असूनही अशी मुलं घरात पडून राहतात आणि आयुष्यात काहीही करू शकत नाहीत. आणि अशा मुलांचं हे वय महत्त्वाच्या टप्प्यावर कुजत जातं! अशा वयात अनेक बापमंडळी मुलांकडून कमाईची अपेक्षा करतात. काहीतरी करून दाखवण्याच्या काळात आपण मुलांचा मजूर करून टाकतो. त्याच्याकडून किती पैसे मिळतील ही अपेक्षा करतो, निरपेक्ष भावनेने केलेलं काम हे माणसाला खूप काही शिकवून जातं, ही गोष्ट अनेक पालकांच्या लक्षात येत नाही. मुलांना शिकवायचं सोडून त्याचा मजूर करून त्याचं आयुष्य ते छोटं करून टाकतात. हे माझ्या केव्हाच लक्षात आलं होतं. त्याच्या त्या गणपतीच्या कामामुळे त्याला चार फुटाच्या दुर्गादेवीचे काम मी मिळवून दिलं. चार फुटाची दुर्गादेवी तयार करण्याची क्षमता त्याच्यात नसतानाही त्याने तसा विचार केला. आत्मबळ त्याच्यात निर्माण झालं आणि म्हणून ते तो काम करू शकला! आणि शेठजींना मी सांगितलं होतं त्याप्रमाणे शेठजींनी त्या चार फुटाच्या देवीचे नऊशे रुपये दिले. आज ९०० रुपयाची किंमत किती आहे, हे तुला ठाऊक आहे का? हे पैसे त्याच्या शिक्षणासाठी कामी येईल म्हणून मी त्याला चार पैसे मिळावे म्हणून शेठजीकडे

विनंती केली आणि शेठजीने इतकी मोठी रक्कम त्याच्या कामाची त्याला दिली. आता हे त्याच्या मिळकतीचे पैसे तुम्हाला मिळणार नाही. आपण ते बँकेत टाकू आणि बँकेतून त्याला जसे-जसे पैसे शिक्षणासाठी लागतील, तसे-तसे त्याला वापरता येतील. मी मुंबईला जाऊन, जेजे स्कूल ऑफ आर्टला जाऊन त्याच्या प्रवेशाची तयारी करतो. तुझ्या मुलाला आता मुंबईला जाण्यासाठी तयार ठेव आणि गावात सगळ्यांना सांग की, पालकच मुलांचे तारणहार असतात. मुलांच्या भविष्यासाठी पालक जर जागृत नसेल, तर पालकच मुलांच्या आयुष्याची माती करतात.

दत्तोजीरावांचं हे संभाषण ऐकून प्रतिष्ठित लोकांनी पुन्हा टाळ्या वाजवल्या. गावकऱ्यांनी दत्तोजीरावांचं आणि भरतचं कौतुक केलं. दिगंबर मात्र खाली मान घालून तेवढ्या गर्दीत उभा होता. त्याची चूक त्याला कळली होती की, आपण आपल्या मुलांसाठी काहीही करू शकलो नाही. पण जे करायला उभे राहिले, त्यांच्याविषयी आपण गावात वाईटसाईट बोललो. अशी चूक पुन्हा आपल्या हातून होणार नाही.

ही बातमी जमलेल्या गावकरांच्या समोर घडल्यामुळे ही बातमी गावात पसरली आणि बरेच पालक जागृत झाले. पुढे भरतची जेजे स्कूल ऑफ आर्टमध्ये रवानगी झाली आणि तो फार प्रामाणिकपणे कॉलेजमध्ये शिकला, मेहनत करूनभविष्यात मोठा प्रतिभावंत शिल्पकार बनला. त्याने आपल्या जिल्ह्याचे नाव मोठे केले आणि दत्तोजीराव गावचे हीरो बनले.

**– विजयराज बोधनकर**

भ्रमणध्वनी : ९९२०४११८२८

(या कथेचे लेखक हे ज्येष्ठ चित्रकार असून शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात ते अनेक वर्षांपासून कार्यरत आहे.)

---

प्रति
सभासद, कुटुंबीय, मित्रपरिवार,
मुंबई मराठी साहित्य संघ,
सप्रेम नमस्कार.

आपल्या संस्थेतर्फे ‘साहित्य’ हा अंक दर तीन महिन्यांनी प्रसिद्ध केला जातो. तसेच दरवर्षी एक दिवाळी अंकही प्रसिद्ध केला जातो. या वर्षीचे अंक पुढीलप्रमाणे :-

१. साहित्य : जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५
२. साहित्य : एप्रिल-मे-जून २०२५
३. साहित्य : जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२५


तसेच दिवाळी, २०२५ हा ‘साहित्य’चा दिवाळी विशेषांक.
‘साहित्य संघाची पन्नास वर्षे’ हे पुस्तक.
वरील सर्व अंक आणि पुस्तक, मुंबई मराठी साहित्य संघाच्या पुढे दिलेल्या संकेतस्थळावर प्रकाशित केले आहे.
संकेतस्थळ : https://www.mumbaimarathisahityasangh.com
कृपया वरील संकेतस्थळाला भेट देऊन निर्देशित सर्व अंकांचा लाभ घ्यावा. आपले कुटुंबीय आणि मित्रपरिवारालाही हे अंक वाचण्याची विनंती करावी.
धन्यवाद!
तुमच्या प्रतिक्रियेच्या प्रतीक्षेत,

आपले,
डॉ. अश्विनी भालेराव (प्रमुख कार्यवाह)
श्री. अशोक बेंडखळे (कार्यवाह-साहित्य शाखा)
प्रा. डॉ. नरेंद्र पाठक (संपादक)

# गोष्ट एका बागेची

**नीलिमा भावे**

**सकाळी** ११ वाजण्याचा सुमार होता. आज पुष्कळ दिवसांनंतर ऊन पडलं होतं. मी इथे युरोपमध्ये मुलीकडे आले त्या दिवसापासून गेला आठवडाभर वातावरण सतत ढगाळलेलं होतं. आकाशात सतत काळे ढग भरलेले असायचे. मधून मधून पाऊस पडून जायचा. त्यामुळे आणि उत्तर समुद्रावरून येणाऱ्या मोकळ्या वाऱ्यामुळे हवेत शिरशिरी आणणारा गारवा असायचा. त्यामुळे आल्यापासून आठवडाभर मी घरातच रूम हीटर लावून बसले होते. मुलगी-जावई कामाला जायचे. नात शाळेत. आणि मी कधी बैठकीच्या खोलीत सोफ्यावर, तर कधी झोपायच्या खोलीत पलंगावर अंगाभोवती दुलई गुंडाळून अर्धवट जागी, अर्धवट झोपली. आज खिडकीबाहेर पाहिले तर एकदम ऊन पडलेलं दिसलं, आणि मी चट्कन उठून जाड स्वेटर घातला, वरून शाल गुंडाळली, स्कार्फ घेतला आणि घराचे दार उघडून बाहेर आले. बाहेर घरासमोर अंगणात छोटीशी बाग केलेली होती. या घरात माझी मुलगी येण्यापूर्वी घराचे मालकच राहायचे. त्यांनी हौसेने वाफे आखले होते. फुलझाडं लावली होती. पण सहा महिन्यांच्या थंडीत बागेची रया गेली होती. निगा राखणे सोडाच, पण पालापोचाळा सुद्धा झाडला गेला नव्हता.



मी बाहेर येऊन बागेत इकडे तिकडे हिंडत पाहायला लागले. दोन घरांच्या मध्ये असलेल्या झाडीच्या कुंपणा–पलीकडे मला थोडी हालचाल जाणवली. मी कुंपणावरून डोकावून पाहिलं. एक आजीबाई दिसल्या. पहिल्यांदा दिसले त्यांचे छोटे, भुरभुरते रुपेरी केस. मग जाणवली त्यांची पाच फूट दहा–अकरा इंचाची उंची. आणि त्या उंचीला शोभेल अशी शरीरयष्टी. चेहऱ्याचा गोरा, गुलाबी रंग आणि सोनेरी फ्रेमच्या चष्म्यांच्या स्वच्छ काचांच्या आडून लुकलुकणारे हसरे निळे डोळे. त्यादेखील माझ्याकडेच पाहत होत्या. माझं त्यांच्याकडे लक्ष गेल्यावर त्या हसल्या. एक–दोन सोनेरी दात चमकले. आणि औपचारिक ओळख न होताच आम्ही बोलायला सुरुवात केली. माझ्या मुलीनं बहुधा त्यांना मी इथे येणार असल्याचं सांगितलं असावं.

बागेतल्या या पहिल्या भेटीची नंतर बागेतच आवर्तनं होत गेली, आणि त्यातून हळूहळू उलगडत गेली एका बागेची गोष्ट–

या घरात सामान आणायच्या आदल्या दिवशी माझी मुलगी आणि जावई सामान ठेवण्याच्या दृष्टीनं घर बघायला आले होते. तेव्हा शेजारच्या घरी जाऊन त्यांनी स्वतःची ओळख करून दिली होती. शेजारच्या घरात घराच्या मालकीणबाई एकट्याच राहायच्या. माझ्या मुलीने घेतलेले घर जवळजवळ वर्षभर रिकामंच होतं. त्याचे मालक दुसरी नोकरी घेऊन दुसऱ्या देशात गेले होते. हे घर खरंतर त्यांना विकायचं होतं. पण किंमतीचं जुळत नव्हतं. वर्षभर वाट पाहून त्यांनी शेवटी ते भाड्यानं द्यायचं ठरवलं होतं. शेजारीणबाईंना खूप आनंद झाला होता रिकाम्या घरात कुणीतरी राहायला येणार म्हणून.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या सामानाची मांडामांड चालली होती, तेव्हा दारावरची घंटा वाजली. शेजारीणबाई एका ट्रेमध्ये कॉफीचा थर्मास, दोन मग आणि बशीमध्ये कुकीज घेऊन आल्या होत्या. म्हणाल्या होत्या,

''दमलात की मधे थोडा कॉफी ब्रेक घ्या.''

ही सलामी होती असं हळूहळू लक्षात येत गेलं. आठवड्यातून एकदा मुलीशी माझं बोलणं व्हायचं. त्यात तिच्या शेजारणी विषयीदेखील बारीकसारीक गोष्टी असायच्या. त्यामुळे मी तिला ओळखतच आहे असं मला हळूहळू वाटायला लागलं होतं. आपली आई इथे येणार आहे हे माझ्या मुलीनं तिला सांगितलं असावं. त्यामुळे आज बागेत आम्हाला एकमेकींची मुद्दामहून ओळख करून घ्यावी लागली नव्हती.

हवामान हळूहळू बदलत होतं. हवेतली ऊब वाढत चालली होती. त्यामुळे गरम कपडे घालून का होईना, पण माझं बागेत जाणं वाढत चाललं. शेजारीणबाईही बागेत असायची आणि हो, तिचं नाव होतं ख्रिस्तीना. अर्थात् एकमेकींना तत्त्वानं हाक मारायची कधी वेळ यायची नाही म्हणा! समोरासमोर आलो की सरळ बोलायलाच लागायचो. ख्रिस्तीना खूप बोलली होती. बोलायची आणि आपणच हसायची! इथल्या रस्त्यावर प्रेक्षकांची जास्त करून स्वतंत्र घरं होती. आणि प्रत्येक घरात राहणार एक–दोन, एक–दोन माणसं. तीही जास्त करून वयस्कर. तरी पण मी पाह्यलं की ती एकमेकांशी संबंध ठेवून असायची. जाता–येता फाटकाशी उभे राहून बोलायची. मुख्य म्हणजे आम्ही 'काळे' म्हणून आमच्याकडे कुणी तुच्छतेनं पाहत नसे. माझ्या मुलीनं मला हे आवर्जून सांगितलं होतं. पण आपण त्यांच्याशी बोलताना जास्त चौकशा करायच्या नसतात, खाजगी, कौटुंबिक चौकशा तर नाहीच करायच्या, हेदेखील बजावलं होतं!

आमच्या घरासमोरची बाग गेले वर्षभर दुर्लक्षित होती. त्यात बरंच काम करायला हवं होतं. एक दिवस सकाळी मी बागेत हिंडत होते. काय काय करावं लागेल, ते पाहत होते. ख्रिस्तीनाही तिच्या बागेत होती. मला पाहून तिच्या हातातलं काम बाजूला ठेवून ती कुंपणाजवळ आली. मला म्हणाली, खूप काम करायला लागणार आहे इथे. काय अवस्था झाल्येय बघ. वर्षभर पाणी दिलेलं नाही. देखभाल केलेली नाही. झाडलोट केलेली नाही. कोण करणार म्हणा! होतंच कोण इथे करायला. मला बघवायचं नाही, पण दुसऱ्याच्या प्रॉपर्टीत मी कशी शिरणार! आता तू आल्येस तर पहा सर्व. तुलादेखील आवड दिसते आहे बागकामाची.

ख्रिस्तीना तिच्या घरात एकटीच राहत होती. का एकटी राहत होती? विधवा होती? घटस्फोटित होती? अविवाहित होती? मुलीला मी एकदा विचारले, ''तुला माहीत आहे का ग, ही एकटी का राहते आहे?'' ती म्हणाली, ''समोरची ॲनी एकदा सांगत होती की तिचं लग्न होऊ शकलं नव्हतं. दुसऱ्या महायुद्धात कामी आलेल्या मुलांच्या अशा अविवाहित विधवा युरोपमध्ये बऱ्याच होत्या तिच्या पिढीत.'' माझ्या मनात आले, 'आमच्या समोरच्या बागेसारखं बिन निगराणीचं वैराण आयुष्य आलंय हिच्या

वाटेला, म्हणूनच ही बागकामात इतकी रमत असावी का? म्हणूनच आमच्या या दुर्लक्षित बागेमध्ये काय करू-काय नको, किती करू-किती नको, असं तिला झालं असावं.' ती जात्या हौशी, रसिक, उत्साही होती हे तिच्या राहणीवरून, कपड्यांवरून कळत असे. ती मला सांगायला लागली- पहिल्यांदा आवारातल्या फरशीच्या फटींमध्ये उगवलेले तण काढून टाकायला हवं. वेगवेगळ्या प्रकारचं तण आहे, पण सगळं नाही काढायचं. ती तुला दाखवते, कोणतं काढायचं ते- असं म्हणून ती तिच्या बागेतून बाहेर रस्त्यावर आली आणि आमच्या बागेत शिरली.

वर्षभरात माजलेलं तण जुन्या आठवणींप्रमाणे एकमेकात गुंतलेलं होतं. काही आठवणी आनंद देणाऱ्या, पण जास्त करून क्लेशदायकच. क्लेशांचा गुंता, त्याचे काटे, त्यातली कुसळं झाल्या-गेल्याचा विसर पडू न देणारी, वेदना पसरवतच जाणारी. ख्रिस्तीना एकेक काडी वेगळी करून दाखवत होती.

''हे काढून टाक, याची मुळं फार पसरतात, शिवाय खोलपर्यंत जातात,'' असं म्हणत तिनं स्वतःच पानासकटची एक काडी ओढून काढली. ''ते तिकडचं राहू दे बरं का- ते आहे तणच; पण त्याला उन्हाळ्यात छान टप्पोरी पिवळी धम्मक फुले येतात. अंगणात मधे मधे छान दिसतात. त्या तिकडे बघ नक्षीदार पानं कशी फरशीवर पसरलीयत- ते देखील आहे तणच, पण पसरत गेलं की ग्राउंड कव्हर म्हणून छान दिसतं. पण सगळ्यात आधी हे अंगण आणि वाफे झाडून स्वच्छ करायला हवेत. बघ ना, किती पाचोळा साठलाय सगळीकडे-''

तिचं बोलणं ऐकता ऐकता मला एकीकडे वाटत होतं- एखाद्या अनपेक्षित धक्क्याने विस्कटलेली आपल्या मनाची घडी पुन्हा नीट बसवताना तिला अशा बागकामाचा आधार वाटत असेल का? खरंतर महायुद्ध संपून कितीतरी वर्षे होऊन गेली होती. ख्रिस्तीनीच्या रोजच्या आयुष्याची घडी बसूनही काही वर्षे झाली असतील. पण आठवणींच्या घड्या बसवणं आयुष्याची घडी बसवण्याइतकं सोपं नसावं. त्या सारख्या मागे-पुढे, खाली-वर होतच राहतात. पुन्हा पुन्हा नव्याने त्यांना त्यांच्या जागेत बसवावं लागतं. कधी कधी काटछाट करून बसवावं लागतं.

ख्रिस्तीना मला विचारत होती- ''तुमच्या घरी बागकामाची औजारं आहेत का? फावडं, घमेलं, कुदळ, उभा झाडू, दोन-तीन प्रकारच्या छाटनीच्या कात्र्या, पंजा, खुरपं, झारी, पाइप, रबरी हातमोजे आणि पायातले रबरी बूट-गुडघ्यापर्यंत येणारे, गुलाबांची छाटणी करताना घालायचे कोपरापर्यंत येणारे जाडसर हातमोजे-गुलाबांचे काटे फार लागतात बरं का? रबरी हातमोजे केव्हाच फाटून जातात. बराच व्याप असतो बागकामाचा. यातलं काही नसेल तुमच्याकडे तर मी माझ्याकडचं देते. नाही तर मी सगळं स्वच्छच करून देते कशी-''

''अग त्याची काही गरज नाही,'' मी घाईघाईनं म्हटलं. ''काही काही वस्तू मागच्या जिन्याखालच्या खोलीत ठेवलेल्या मी पाहिल्यायत. त्या आधी काढून पाहते. नाहीतर मुलीला सांगेन आणायला. मला पण आवडतं बागेत काम करायला. छान रमतं मन.''

ख्रिस्तीनाच्या चेहेऱ्यावर हसू फुललं. मग म्हणाली, ''तुला आणखी एक सांगून ठेवते, रिकाम्या वाफ्यांमध्ये थोडं थोडं पाणी शिंपून ठेवत जा. आजूबाजूची मांजरं कोरड्या वाफ्यांमध्ये त्यांचे प्रातर्विधी करायला येतात. मग बागेत जायची सोयच राहत नाही-''

''हे सांगून ठेवलंस, हे बरं केलंस. मला नव्हतं माहीत''- मी म्हटलं.

त्यानंतर ज्या दिवशी ऊन पडायचं, त्या दिवशी माझं बागेचं काम सुरू व्हायचं. आणि तिचंही. फारसं बोलणं व्हायचं नाही. ऊन असेपर्यंत जास्तीत जास्त काम उरकून टाकायला हवी असायची.

बाग नीटनेटकी झाल्यानंतर पुढचा टप्पा त्यात रोपं लावण्याचा. थंड प्रदेशातलं बागकाम हा एक मोठाच प्रकार असतो, हे मी इथे आल्यावर पाहिलं. आपल्या दिवाळीच्या तयारी सारखी घरोघर त्याची तयारी चालते. थंडी संपता संपता वाफे स्वच्छ करायचे, आधीची वाळलेली रोपं काढून टाकायची, माती सैल करायची, खत घालायचं आणि मग रांगेनं रोपं लावायची. सगळी रोपं फुलझाडांची. उन्हाळा सुरू झाला की फुलणारी. रंगांची उधळण करणारी. त्यांचं आयुष्य फार फारतर सहा महिन्यांचं. पानगळ सुरू झाली की सगळी स्वतःला आत आवरून घेणार. वसंताची चाहूल लागली की बागकामाचं चक्र पुन्हा सुरू! दरवर्षी नवा सृजनोत्सव. ख्रिस्तीनाच्या एकाकी रूक्ष आयुष्यात या उत्सवाला एक वेगळं स्थान असावं. इतरांपेक्षा. भूमी तयार करणं, बी पेरणं, रोप उगवलं की रोज त्याच्याजवळ जाऊन त्याचं हवं-नको पाहणं. पहिला धुमारा, पहिली कळी, पहिलं फूल. दरवर्षी नवीन सृजन. जे तिला तिच्या

आयुष्यात कधी अनुभवायला मिळालं नव्हतं, ते ती या बागकामामध्ये अनुभवत असावी.

वाफे स्वच्छ झाले. आता त्यात खत घालायचं. या देशात पाह्यलं तर घरोघर बागकाम हे एक प्रस्थच असतं. खताची पोती येऊन पडतात. घरातली पुरुष मंडळी सुट्टीच्या दिवशी दुपारी गुडघ्यापर्यंत रबरी बूट आणि अर्ध्या चड्ड्या घालून वाफ्यात उतरतात. घराचं आवार लहान असो की मोठं, त्यात फुलांचे वाफे असतातच आणि त्या वाफ्यांमध्ये मानाचं स्थान ट्यूलिपच्या वाफ्यांना असतं. अगदी दहा फूट लांब आणि चार फूट रुंद पट्टीत सुद्धा ट्यूलिपा आणि आणखी चार-पाच प्रकारची फुलं लावलेली असतात. अगदी लहानशा बागेत सुद्धा बसायला दोन तरी नक्षीदार दोन लोखंडी खुर्च्या असतात. जागा असेल तिथे बाकही ठेवलेला असतो. कुंपणाजवळच्या एखाद्या मोठ्या झाडावर किंवा घराच्या प्रवेशद्वारावर पक्ष्यांची कृत्रिम घरटी, पिलं आणि अंड्यांसकट लावलेली असतात. बागकामाचं सामान आणायला लांब कुठे जावं लागत नाही. आपल्या नेहमीच्या भाज्या-फळांच्या किंवा वाणसामानाच्या दुकानात सर्व मिळतं. शिवाय फुलदाणीत ठेवायची फुलं, रोपं बनवलेल्या कुंड्याही मिळतात. बियांची पाकीटं तर असतातच आणि खतंसुद्धा. आमच्या बागेतले वाफे स्वच्छ झाले होते. आता खत घालायचं होतं.

मी ख्रिस्तीनाला विचारलं, ''किती आणू? कोणतं आणू?'' तर ती म्हणाली, ''तुझ्या मुलीनं हे घर विकत घेतलं आहे का?''

मी म्हटलं, ''नाही. भाड्यानं घेतलं आहे. तिच्या कंपनीनं तिला दोन वर्षांकरता इथे पाठवलं आहे. दोन वर्षांनी ती परत हिंदुस्थानात येईल.''

''तर मग तुला सांगते, बागेत उगीच पैसे घालू नका. खत वगैरे आणायची गरज नाही. या भागातली माती तशी उपजाऊ आहे. आणि वर्षभर मोकळीच राहिल्यामुळे तिचा कसही वाढला आहे. काही काही फुलझाडं थंडीमध्ये अंग आवरून मातीत गुरफटून बसलेली असतात. हवेत ऊब आली की वर येतात. तेवढ्यानं देखील वाफा भरलेला दिसतो. गुलाब छान आहेत या बागेतले. पिवळे, नारिंगी, टपोरे आणि जोमदार. त्यांची छाटणी कर. अधून मधून झारीनं थोडं थोडं पाणी घाल. की पुरे.''

ख्रिस्तीनाच्या बागेचं मात्र मोठंच प्रस्थ होतं. आणि ते ती अगदी निगुतीनं, प्रेमानं, पद्धतशीरपणे सांभाळताना दिसत होती. बागकामाचा सीझन सुरू झाल्यानंतर तिच्याकडे आठवड्यातले दोन-तीन दिवस दुपारी तीनेक तासांकरता एक मदतनीस यायचा, मी पाहिला. तो आल्यावर त्याला कॉफी देऊन ती आपली बागकामाची डायरी काढत असते. डायरीत बघून त्यांच्यात आपापसात बरीच चर्चा चालत असे. कधी कधी मदतनीस गेल्यानंतर अंधार पडेपर्यंत ती एकटीच बागेत काम करत असे. या दरम्यान तिनं एकदा मला तिची डायरी दाखवली होती. म्हणाली होती, ''हिवाळ्यात बाग इतकी सुकून जाते, बापुडवानी होते की कोणत्या वाफ्यात कोणती फुलझाडं होती तेही ओळखता येत नाही. म्हणून मी ही डायरी केली आहे. यात बागेचा नकाशा काढला आहे. त्यात वेगवेगळे वाफे दाखवले आहेत. कोणत्या वाफ्यात कोणती फुलं लावली आहेत त्यांची नावं लिहिली आहेत. त्यामुळे काम खूप सोपं होतं. कुंपणाच्या कडेला फळांची झाडं आहेत- चेरी, प्लम, पीच. माझ्या वडिलांनी लावलेली आहेत, हे घर बांधलं तेव्हा. वसंत ऋतू सुरू झाला की त्यांना आपोआप मोहोर येतो. त्यांच्यासाठी काही करावं लागत नाही.''

मदतनीसाबरोबर बागकाम करताना ती स्वतः मातीत गुडघे टेकून बसत असे. कपडे नेहमीचेच असायचे. मुद्दाम मळखाऊ वगैरे घालत नसे. स्वतःला बागेपासून वेगळं ठेवणं तिला आवडत नसावं.

आमची घरं ज्या रस्त्यावर होती, त्याच्या पलीकडे झाडांच्या रांगा होत्या. सध्या सगळी झाडं निष्पर्ण होती. ती झाडं कोणती, ते मी तिला एक दिवस विचारलं. तिा संधिप्रकाशात चष्मा लावून सुद्धा नीट दिसत नसावं. ऐकू देखील वयोमानानुसार कमी येत असे, असं माझ्या लक्षात आलं होतं. झाडं तिला ओळखता येत नव्हती. ती म्हणाली, ''थांब, मी तुला झाडांबद्दलचं एक पुस्तकच आणून देते.'' लागलीच घरात जाऊन ती ते पुस्तक घेऊन आली. हाताशीच ठेवलेलं असावं. पुस्तक कसलं, ग्रंथराजच होता तो. अडीच-तीन किलो वजनाचा. 'उत्तर युरोपची वृक्षसंपदा.' गुळगुळीत पानांवर फोटो, चित्रं, आकृती यांच्या साहाय्याने दिलेली 'झाडं आणि झाडांसंबंधी सर्व काही' अशी यच्चयावत माहिती त्यात होती- मातीतल्या मुळांपासून घरातल्या फर्निचरपर्यंत. पुस्तक विकत घेतल्याची तारीखही तिनं घातली होती. ती वर्षभरापूर्वीची होती. पुस्तक फारसं हाताळलेलं दिसत नव्हतं. आता या वयात हा ग्रंथराज ती केव्हा आणि कशासाठी वाचणार होती, कोण जाणे! पण

तिच्या झाडांबद्दलच्या प्रेमानं या सर्व 'व्यावहारिक' प्रश्नांना निरर्थक ठरवलेलं होतं.

आमच्या बागेत कुंपणाजवळच्या एका मोठ्या झाडाखाली बरीच मोठी, काळ्या दगडाची नितळ शिळा ठेवलेली होती. साधारण त्रिकोणी आकाराची. वरती झाडाच्या फांद्यांना बांबूच्या किंकिणी टांगल्या होत्या. ख्रिस्तीनाने सांगितलं की या घरात पूर्वी एक इंडोनेशियन भाडेकरू राहून गेले होते. त्यांनी ही शिळा तिथे ठेवली होती. त्यांच्यात म्हणे अशी त्रिकोणी काळी, नितळ शिळा शुभ मानतात. मला आपल्या अंगणातल्या तुळशीवृंदावनाची आठवण झाली. ख्रिस्तीनाला त्याबद्दल सांगितलं तेव्हा तिला ते फार 'इंटरेस्टिंग' वाटलं होतं.

बागेत आता रोज करण्यासारखं असं फारसं काही राहिलं नव्हतं. त्यामुळे माझी दुपार घरातच जायला लागली. एक दिवस संध्याकाळी मुलगी ऑफिसमधून येण्याची वाट पाहत मी खिडकीत उभी होते. तर रस्त्याच्या पलीकडच्या बाजूने ख्रिस्तीना जाताना दिसली. रस्त्याच्या कोपऱ्यावरचा रिकामा झालेला कचऱ्याचा ड्रम ओढत घेऊन चालली होती. इथे आठवड्यातून एकदा ठरावीक दिवशी टाउन कौन्सिलची कचरा गोळा करणारी गाडी यायची. प्रत्येक घराने आपापले कचऱ्याचे डबे रस्त्याच्या कोपऱ्यावर न्यायचे असायचे. संध्याकाळी रिकामे डबे घरी असायचे. ख्रिस्तीनानं खरंतर तिचा डबा दिवसा उजेडीच परत आणला होता. पण आताच्या संधिप्रकाशात रस्त्याच्या कोपऱ्यावर एकटीच मागे राहिलेला तो ड्रम तिच्याच्याने पाहवला नसावा. आयुष्याच्या संध्याकाळी आपल्या एकटेपणाची तीव्र जाणीव तिला तो डबा पाहताना आली असावी. तो डबा त्यांचा होता. त्यांच्या फाटकासमोर तिने तो नेऊन ठेवला आणि आपल्या घरी परत आली. कदाचित हे ती शेजारधर्म म्हणूनही करत असेल. पण पाहताना माझ्या पोटात गलबलून आलं.

असेच काही दिवस गेले. आणि एका शांत दुपारी अचानक 'कडाड्-कड्-कट्टऽऽ' असा मोठा, पण दबलेला आवाज ऐकू आला. आणि नंतर लगेच काहीतरी खूप जड वस्तू पडल्यासारखा 'धप्प' असा आवाज. काय झालं ते पाहायला, मी बाहेर आले. समोर सगळं ठीक होतं. पग बाजूला पाह्यलं, तर ख्रिस्तीनाच्या घरासमोर एक सामानानं भरलेला ट्रक उभा होता. किंचित वाकडा झाला होता. ड्रायव्हर खाली उतरला होता. मी पाह्यलं तर ट्रक ख्रिस्तीनाच्या कुंपणाला ढकलून तिथल्या फिक्या गुलाबी फुलांनी बहरलेल्या चेरीच्या झाडावर आदळला होता. चेरीचं झाड बुंध्यापासून तुटलं होतं आणि बागेच्या आतल्या बाजूला नव्यानं बांधलेल्या रोपांच्या वाफ्यावर पडलं होतं– त्या सगळ्या नाजूक रोपांना आपल्या वजनाखाली चिरडून टाकत. ख्रिस्तीना ते दृश्य पाहत हतबुद्ध झाल्यासारखी उभी होती. एवढं मोठं पन्नास वर्षांचं जुनं बहरलेलं जाड असं बुंध्यातच मोडलेलं पाहून मला धस्स् झालं. मी आमच्या आवाराबाहेर आले व ख्रिस्तीनाजवळ जाऊन उभी राहिले आणि तिच्या खांद्यावर हात ठेवला. ड्रायव्हर दहा–दहा वेळा माफी मागत होता. पण त्यामुळे ते झाड काही पुन्हा उभं राहणार नव्हतं. शेवटी तिनं त्याला जायला सांगितलं.

''आता काय करशील–'' मी तिला विचारलं.

''टाउन कौन्सिलला कळवते. ते उचलून नेण्याची व्यवस्था करतील.'' ती म्हणाली.

''आणि खालच्या ताफ्यांची नासधूस झालीय, त्याचं काय?''

''ते लावेन परत. आणखी काय करणार''– एवढं बोलून ती घरात जायला वळली. मी पण आमच्या घरी परत आले. पण नजरेसमोरून त्या जमिनीवर आडव्या पडलेल्या मोहरानं बहरलेल्या झाडाचं दृश्य काही जाईना. माझा उरलेला दिवस अस्वस्थतेतच गेला.

संध्याकाळी मला शेजारच्या आवारातून गाडी बाहेर काढल्याचा आवाज आला. मी खिडकीतून बाहेर पाह्यलं. ख्रिस्तीनानं तिची छोटी गाडी गॅरेजमधून बाहेर काढली होती. तयार होऊन कुठेतरी चालली होती. मला खिडकीत पाहून हात हलवून म्हणाली, ''आज आमची प्रॅक्टिस आहे शहरात. माझ्या मैत्रिणींना घेऊन चालले आहे. रात्री ११–११।। पर्यंत येईन परत–'' आणि ती गेलीसुद्धा!

मला क्षणभर काही समजेना. दुपारीच किती मोठं काही घडलं होतं आणि संध्याकाळी ही आपली नेहमीसारखी.

मग वाटलं, बरोबरच आहे. जे घडलं ते घडलं. त्याला कवटाळून बसून ते परत पहिल्यासारखं थोडंच होणार आहे? त्यासाठी आपला उरलेला दिवस का बिघडवायचा?

तिचं सगळं आयुष्य तिनं याच विचारानं तर काढलं होतं...

**– नीलिमा भावे**

भ्रमणध्वनी : ९८९२३९४१८६

"**वेदांत...** अरे, मधे मधे कशाला बोलतोस?"

शलाकाचा चिडका स्वर.

"मी कशाच्या मध्ये आलोय ग?"


"माझ्या रेकॉर्डिंगच्या..."

"हे कमॉन, तुझ्या रेकॉर्डिंगमधे माझा आवाज आलाय का?"

"अरे गप्प बस ना जरा..."

# अपघात की घात

**प्रतिभा सराफ**




"हे बघ, तुला नको तो आवाज काढून हवा तो आवाज घालून देऊ शकतो मी, तुझ्या व्हिडिओमध्ये... व्हिडिओ एडिटिंग हातखंडाच आहे. माझा, तू नको काळजी करूस...!"

"अरे पण ओरिजिनल ते ओरिजिनल ना..."

"ओके बाईसाहेब, बसतो मी गप्प कोपऱ्यात!"

असे म्हणून हाताची घडी घालून तोंडावर बोट ठेवून वेदांत खरोखरी खुर्चीवर डोळे मिटून बसतो. शलाका मागे वळून पाहते आणि तिला खूपच गंमत वाटते, त्याच्या लहान

मुलांसारख्या या कृतीची. ती त्याच्या जवळ येते आणि त्याच्यामागून त्याच्या खांद्यावर हात ठेवून पुढे वाकून त्याच्या कपाळाचा पापा घेते. त्याबरोबर वेदांत तिला हाताला धरून पुढे ओढतो आणि मांडीवरच बसवतो.

''ओ माय बेबी, आपण हनिमूनसाठी आलेलो आहोत, हे लक्षात आहे ना?''

''बेबी? अर्ध्या वयाची बाई मी... आणि हनिमून?''

''हे बघ प्रत्येक वेळेस आपल्या वयाची आठवण करून देणं जरुरी आहे का? आणि हो, आपण जेव्हापासून 'लिव्ह इन' सुरू केलंय, तेव्हापासूनचे हे पहिलेच औउटिंग आहे म्हणजे हनिमूनच ना?''

''बरं बाबा,'' त्याच्या गळ्याभोवती आपले हात नाजूकपणे टाकत शलाका म्हणते आणि डोळे बंद करून त्याच्या खांद्यावर आपली मान टेकवते. वेदांत तिच्या केसावरून हात फिरवत राहतो.

''काय ग, झोप लागली की काय?'' वेदांत विचारतो तेव्हा शलाका तत्परतेने उत्तरते,

''काल-परवापर्यंत झोप लागलेली होती. आत्ता कुठे जाग आलेली आहे.''

''वाह, कविता करतेस की काय?''

''नाही रे, कविता जगते.''

''तुझे जगणे मलाही अनुभवू दे!''

''हहहहहह... *मेरा कुछ सामान आपके पास पडा है सावन के कुछ भीगे भीगे पल रखे है...!*''

धुंद होऊन शलाका गाऊ लागते आणि त्या तालावर तो मंत्रमुग्ध होऊन डोलू लागतो. गाणे संपते आणि तो भानावर येतो.

''काय ती अनुराधा पटेलची अदा, काय ते शब्द, अगदी तो प्रसंग माझ्या डोळ्यासमोर जिवंत उभा राहिला!''

वेदांत असे म्हणत असतानाच, ''अरे अरे, समोर बघ...'' शलाका ओरडतच खिडकीकडे धावत जाते.

दोघेही खिडकीतून बाहेर बघू लागतात. नयनरम्य अशा माउंट फुजीचे त्यांना स्पष्ट दर्शन होते.

''नेहमी ढगांनी आच्छादलेल्या माउंट फुजीचे दर्शन होणे म्हणजे एखादे तीर्थस्थान अनुभवणे, असे जापनीज मानतात.''

असे म्हणत वेदांत आपला कॅमेरा घेऊन खिडकीकडे धावतो आणि कसलेल्या कलाकाराच्या नजरेने माउंट फुजीच्या शिखराला आपल्या कॅमेरात बंदिस्त करू लागतो.

शलाका त्याच्याकडे पाहत त्याच्या हालचाली टिपत राहते. त्याचे काम झाल्यावर तो शलाकाकडे पाहत म्हणतो, ''तुला माहितीये शलाका, यावेळेस माझे चॅनल व्ह्यूवर्सच्या कमेंट्सने ओसंडून वाहणार आहे.''

''का रे, इतर देशांपेक्षा वेगळे असे जपानमध्ये काही खास आहे का?''

''नाही, यावेळेस मी एक वेगळा प्रयोग करणार आहे. आत्तापर्यंत माझे व्ह्यूवर्स फक्त माझा आवाज ऐकत होते. यावेळेस तुझ्या आवाजातील काही गाणी मी मधे मधे टाकणार आहे.''

''क्या बात है! म्हणजे मी सुद्धा तुझ्या यूट्युबवर चमकणार तर?''

''तू स्वतःच एक स्वयंप्रकाशित चमचमणारा तारा आहेस ग, त्याचा थोडासा प्रकाश मी माझ्या चॅनलसाठी वापरणार आहे, इतकंच.''

''उगाच मला हरभऱ्याच्या झाडावर चढवू नकोस.''

''हरभऱ्याच्या नाही, तू तर नारळाच्या झाडावर आधीच चढून विसावलेली आहेस.''

तिच्या दोन्ही गालावर हात ठेवत तिच्या नजरेत नजर मिळवत वेदांत म्हणतो.

''नको रे बाबा, मला उंचीची भीती वाटते. हरभऱ्याचेच झाड बरे!'' असे म्हणते. दोघेही हसू लागतात.

''केवळ माउंट फुजी इथून स्पष्ट आणि छान दिसतो म्हणून या 'हॉटेल क्लाउड'मध्ये मी रूम बुक केली. माउंट फुजीच्या दर्शनाने आपले पूर्ण पैसे वसूल झाले.''

वेदांत म्हणतो आणि टी-पॉटमधली कॉफी कपांमध्ये गाळत शलाका त्याला 'थँक्यू' म्हणते.

दोघेही खिडकीत पाय टाकून माउंट फुजीकडे शांतपणे पाहत, 'होशीनो कॉफी'चा आस्वाद घेतात. त्या वेळेस जणू वर्तमानकाळ त्यांच्यासोबत बसून 'चिअर्स' म्हटल्याचा त्यांना भास होतो.

''आता आपल्याकडे साधारण तासाभराचा वेळ आहे तर मला असं वाटतं की आपण 'सौनाबाथ' घेण्यासाठी जायला हरकत नाही.''

''मला असं सगळं आवडत नाही. तू जाऊन ये.''

पडत्या फळाची आज्ञा घेत वेदांत बाहेर पडतो आणि शलाका आपल्या आवडीच्या यमन रागातील *'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना....'* हे गाणे गुणगुणत माउंट फुजीकडे पाहत राहते. तिथे बसल्यावर तिच्या डोळ्यासमोर, फ्लॅशबॅकप्रमाणे त्या दोघांचे पूर्वायुष्य सरकत राहते.

वेदांत इंजिनीयरिंग क्षेत्रातला आणि आता नोकरी सोडून भरपूर कमाई करणारा प्रोफेशनल यूट्युबवर झालेला तर शलाका सायन्स ग्रॅज्युएट, परंतु आता पूर्णवेळ प्रोफेशनल सिंगर! शलाकाला आपल्या हयातीत संपूर्ण जग पादाक्रांत करायचे आहे तर वेदांतला संपूर्ण जग आपल्या कॅमेरात बंदिस्त करून जगाला दाखवायचे वेड आहे. दोघांच्या आवडी एकमेकांना पूरक आहेत. एका मित्राच्या आग्रहास्तव वेदांत गाण्याच्या कार्यक्रमाला जातो. गाणाऱ्या शलाकाला पाहतो, तिचा मंजुळ आवाज ऐकतो आणि जणू वेडा होतो. गुगलवर तिचे नाव शोधून, तिचे सगळे गाण्याचे व्हिडिओ लाइक करतो, त्यावर आवर्जून भरभरून कमेंटही करतो. आपला नवीन सबस्क्राइबर कोण आहे, जो इतके आपुलकीने लिहितो, म्हणून ती जरा त्या वाटेवरचे खोदकाम करू लागते.

तिला सोशल मीडियावर तो सापडतो एक नावाजलेला युट्युबर म्हणून! ऐंशी लाखाच्यावर त्याचे सबस्क्राइब पाहून ती अवाक् होते. झपाट्याने त्याच्या सर्व लिंक्स उघडून त्याचा शोध घेते. परंतु त्याचा चेहरा काही तिला कुठेही पाहायला मिळत नाही. कुणालाही भावेल आणि पटेल अशा रसाळ मराठी भाषेतील निवेदनाने जगभरातील सर्व पर्यटनस्थळे तो त्याच्या चाहत्यांपर्यंत पोहोचवत असतो, ते तिला आवडून जाते. त्याचा चेहरा मात्र पाहण्याची उत्सुकता तिच्या मनात जागृत होते. योगायोग म्हणजे एकदा शलाकाच्या मैत्रिणीच्या पार्टीला ते भेटतात. तो स्वतःहून तिला आपली ओळख देतो आणि मग तिथूनच त्यांच्या मैत्रीला सुरुवात होते.

दोघेही साधारण चाळिशीचे. रस्त्यावरच्या अपघातात त्याची पत्नी दगावलेली असते तर शलाकाने गाण्याच्या असीम वेडामुळे आतापर्यंत लग्नच केलेले नसते. त्यांच्या भेटीगाठी वाढू लागतात. एकदा नरिमन पॉइंटच्या किनाऱ्यावरून संध्याकाळी गप्पा मारत चालता चालता भन्नाट वाऱ्याच्या झोतामुळे उडणारे शलाकाचे केस ती एका हाताने धरून ठेवते आणि दुसऱ्या हाताने उडणारा तिचा कुर्ता. हे दोन्ही सावरताना तिची होणारी तारांबळ पाहून वेदांत हसून तिला सहज विचारतो की मी यापैकी काहीतरी एक सावरायला मदत करू का? तर शलाका हसून म्हणते, 'खरंतर मलाच सावरायची गरज आहे.' वेदांत भर रस्त्यात कमरेतून वाकून आदबीने हसून विचारतो, 'खरंच? मी तयार आहे' आणि तिचा हात हातात धरतो. ती मुक्तपणे वाऱ्याबरोबर केसांना आणि कुर्त्याला उडू देते आणि आपले दोन्ही हात त्याच्या गळ्यात टाकून त्याला बिलगते. त्या दिवसापासून त्यांच्या 'लिव्ह इन' स्वरूपातील सहजीवनाला सुरुवात होते.

आज सहा महिन्यांनंतरचे त्या दोघांनी आपापले कार्यक्रम सांभाळून आखलेले हे पहिले आउटिंग म्हणजे जपान!

''हे, तू खूप छान काहीतरी मिस केलं हां...'' केस पुसत पुसत रूममध्ये शिरत वेदांत म्हणतो तशी ती विचारांच्या तंद्रीतून बाहेर पडत हसून म्हणते,

''आता तू काहीतरी छान मिस करणार आहेस ज्याचा लाभ मी घेणार आहे,'' म्हणत ती बाथटबमधील नवीनतम तंत्रज्ञानाने युक्त शॉवर्सचे 'स्पा बाथ' त्याला बाथरूममध्ये नेऊन दाखवते.

''काय टायमिंग आहे तुझे, मानले! चल ताबडतोब. मी तर हा पण लाभ घेऊ इच्छितो!''

म्हणत तिच्या अंगावर पाणी उडवायला सुरुवात करतो.

रात्री जेवण झाल्यावर, तो समोरचा टीव्ही सुरू करतो यूट्युब उघडतो आणि शलाकाला म्हणतो ''बघ... तुझ्यासाठी एक मस्त सरप्राइज गिफ्ट आहे.''

आदल्या दिवशी 'अराशियामा बांबू ग्रुह' या बांबूच्या वनात फिरतानाचा तो व्हिडिओ असतो.

शलाकाचे वेड्यासारखे गिरक्या मारणे, खट्याळ हसणे, बांबूंना स्पर्श करत जवळून निरखणे या सगळ्या तिच्या छोट्या छोट्या आनंदक्षणांना घेऊन त्याने काढलेल्या व्हिडिओ आणि फोटोचा एक सुंदर व्हिडिओ त्याने यूट्युबवर लोड केलेला असतो आणि आदल्या रात्री तिच्याकडून गावून घेतलेल्या

'*नंबर फिफ्टी फोर, दि हाऊस विथ दि बॅम्बू डोअर! बांबूचे घर बांबूचे दार बांबूची जमीन पिवळीशार!*' या गाण्याला असे काही त्यात बेमालूम मिसळले होते की तोड नाही.

इतक्या मोठ्या स्क्रीनवर असं स्वतःला मनसोक्त बागडताना पाहून शलाकाला खूप आनंद होतो म्हणजे शलाकाचे याआधीही खूप यूट्यूब व्हिडिओ होते; पण त्यात ती व्यवस्थित साडीमध्ये किंवा ओढणीच्या ड्रेसमध्ये गात असतानाचे ते व्हिडिओ होते. या व्हिडिओत मात्र ती एखाद्या सिनेनटीसारखी मनसोक्त बागडताना दिसत होती. तो व्हिडिओ पाहून ती आनंदाने वेदांतला मिठी मारते आणि म्हणते, ''थँक्यू सो मच डियर!'' आणि मग अचानक त्याच्याकडे पाहून विचारते,

''बाप रे, सारी दुनिया हा व्हिडिओ पाहणार?''

''नाही नाही, हा फक्त प्रायव्हेट व्हिडिओ आहे, तुझ्यामाझ्यासाठी!''

''किती सुज्ञ आणि समजूतदार आहेस तू...''

''हो जसा की हा माउंट फुजी. कोणे एकेकाळी ज्वालामुखीचा उद्रेक यातून होत होता, हे कोणाला सांगूनही पटणार नाही, इतका आता तो शांत झाला आहे. देवत्वच प्राप्त झाले आहे त्याला!''

असे सहज बोल वेदांतकडून निघतात तेव्हा वेदांतचा हात हातात धरून, शलाका डोळे बंद करून आपल्याच धुंदीत, *तुम ही मेरे मंदिर, तुम ही मेरी पूजा... तुम ही देवता हो, तुम ही देवता हो...!* गुणगुणत दुसऱ्याच जगात पोहोचलेली असते!

अशा तऱ्हेने जपानची राजधानी टोकियोतील स्काय ट्री, क्योटोतील ऐतिहासिक मंदिरे, तसेच अराशियामा बांबू गृह, मियाजिमा बेटावरील प्रसिद्ध शिंटो देवस्थान, हिरोशिमातील इत्सुकुशिमा तीर्थ अशी काही प्रेक्षणीय स्थळे पाहत शेवटचे ठिकाण पाहण्यासाठी दोघेही निघतात. पोकिगहारा, ज्याला 'युरेई घनदाट जंगल' असेही म्हटले जाते, या ठिकाणी पोहचतात. जपानमधील मोन्शु बेटावरील माउंट फुजीच्या खालच्या भागातील आणि माउंट फुजीच्या शेवटच्या मोठ्या उद्रेकाने साचलेल्या कडक लाव्हामुळे बनलेले ठिकाण असते. अशा पोकीगहाराच्या परिसरात हिवाळ्यातील गोठणाऱ्या थंडीत, बर्फाच्या विविध आकारांनी नैसर्गिकरीत्या सजलेल्या अनेक गुहा आहेत, ज्याचे आकर्षण वेदांतला होतेच! देशविदेशातील पर्यटकांसाठी असलेले हे एक लोकप्रिय ठिकाण आहे, यापलीकडे कोणतीही माहिती शलाकाकडे नव्हती.

पोकिगहाराच्या दाट झाडाच्या जंगलातून फिरताना त्यांच्या लक्षात येते की इथे फारसा सूर्यप्रकाश पोहोचत नव्हता. त्यामुळे वातावरणात सुखद गारवा जाणवत होता. अनेक रंगांच्या छटा आणि तेथील मोहक फुलांच्या सुगंधाने वातावरण रोमँटिक झाल्यासारखे दोघांना जाणवत होते. 'दुनिया अगर पेंटिंग होती, तो बिलकुल जपान जैसे दिखती!' असे काहीसे कुठे वाचल्याचे शलाका सांगतानाच, अचानक सुरेल सतार झंकारत असताना त्याची एखादी तार तुटावी आणि त्यातून तंद्री भंगणारा भयानक आवाज निघावा तसा, सिनेमांमध्ये भीती निर्माण करण्यासाठी वाजवतात तसा आवाज घुमू लागतो. डोळे मोठे करत ती वेदांतला बिलगते तेव्हा वेदांत तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो,

''अगं घाबरू नकोस. इथे लाव्हारस कडक झाल्यामुळे सच्छिद्र लाव्हा खडक तयार झाले आहेत. वाहणाऱ्या वाऱ्याचा ध्वनी ते शोषून घेतात, ज्यातून भीतिदायक असे आवाज निघतात.''

''असं का? तुला बऱ्याच गोष्टी माहिती आहेत.''

''होय, या जंगलाविषयी थोडासा अभ्यास करून आलोय मी. अनेक वर्षांपासून जपानच्या या जंगलाचा व्हिडिओ बनवायचे मनात होते, जे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे.''

वेदांत अत्यानंदाने शलाकाला सांगतो.

''खरंच?''

''बघ ना, किती वेगळं जंगल आहे हे...!''

''होय, आणि आत्तापर्यंत जपानमध्ये आपण जितकी प्रेक्षणीय स्थळं पाहिली, त्यापेक्षा खूपच कमी माणसं या परिसरात फिरताना दिसत आहेत.''

''होय, त्याचं कारणही तसंच आहे.''

''काय रे...?''

काहीतरी लक्षात येऊन वेदांत विषय बदलतो,

''म्हणजे शहरापासून थोडेसे दूर आहे ना म्हणून...''

''हं, मग ठीक आहे. मला वाटले की...''

''काय?'' प्रश्नांकित चेहऱ्याने तो तिच्याकडे पाहत विचारतो.

''नाही, म्हणजे जपानी माणसं खूप भुताखेतांवर विश्वास ठेवतात असं ऐकलं होतं, म्हणून मला वाटलं की...''

''असं काही नाही ग, असं काहीच नाही.''

आपली बाजू पटवण्यासाठी त्याच त्याच शब्दांवर जोर देत वेदांत हसून म्हणतो. तो तल्लीन होऊन झाडांचे, पक्ष्यांचे, त्या भागातल्या प्राण्यांचे व्हिडिओ काढण्यात दंग असतो. लाल कोल्हा, रानडुक्कर, जपानी बॅजर, तसेच वुडपेकर, बुश-वार्बलर, काळ्या चेहऱ्याचे बंटिंग, ओरिएंटल टर्टल डव्ह, काळ्या ठिपक्यांचा बेडूक, शंकूच्या आकाराची आणि रुंद पानांची झाडेझुडुपे यांचे चित्रीकरण करत असतानाच काहींची नावं आणि माहितीही तो शलाकाला पुरवत असतो. त्याच्या अभ्यासाचे तिला कौतुक वाटते. क्षणात इकडे तर क्षणात तिकडे फिरणाऱ्या वेदांतला पाहून शलाका हसून म्हणते,

''अरे, माझ्या नजरेच्या टप्प्याच्या आड होऊ नकोस. मला भीती वाटते हरवून जाण्याची!''

वेदांत तिच्याजवळ येत म्हणतो,

''आयुष्यात मी खूप काही हरवले आहे. आणखी तुला हरवायची हिंमत नाही ग. तू मात्र मला सोडून जाणार नाहीस ना...? वचन दे.... मी तुझ्याशिवाय नाही जगू शकणार ग!''

शलाका त्याला मिठीत घेते आणि कितीतरी वेळ ते त्याच अवस्थेत असतात. मग ते पुढे पोकीगहारा जंगल पार करून 'अरुसावा आइस केव्ह'मध्ये पोहोचतात. त्या गुहेमध्ये पंचवीस-तीस पायऱ्या उतरत खाली जातात. जाताना दोघांनीही डोक्यावर हेल्मेट चढवलेले असते. उंचीने कमी असलेल्या या गुहेतील तापमान जवळजवळ शून्य ते तीन डिग्री इतके कमी होते. इथे निसर्गतः बर्फाने विविध आकारमान धारण केलेले होते. जवळजवळ माणसाइतक्या जाडीचे बर्फाचे खांब, काही बर्फाच्या सळया जणू जमिनीतून उगवल्यासारख्या तर काही बर्फाच्या सळया छताकडून जमिनीकडे झेपावणाऱ्या! काही चांदण्या निखळल्यासारखे बर्फाचे क्रिस्टल्स तर काही बर्फाच्या क्रिस्टलच्या लोंबणाऱ्या माळा. या बर्फाच्या गुहेत काही ठिकाणी जांभळ्या रंगाचे प्रकाशझोत सोडलेले होते, ज्यामुळे या रचना पर्यटकांना मंत्रमुग्ध करत होत्या. वेदांत शांतपणे या सर्व बर्फाच्या क्रिस्टलचे जवळून, कधी दुरून फोटो आणि व्हिडिओ काढण्यात दंगून गेलेला होता. दोघेही खूप आनंदात होते. परंतु शलाकाला थंडी सहन होईना म्हणून ती त्याला हळूच बिलगून विचारते, ''वेदांत मी गुहेबाहेर पडू का? तू ये आरामात शूटिंग उरकून!''

वेदांत होकारार्थी मान हलवतो आणि शलाका आपल्या चालण्याचा वेग वाढवते तसा काळजीने वेदांत ओरडतो, ''अगं सगळं निसरडं झालं आहे. घसरून पडशील. हळूहळू चाल. काळजी घे.''

'हो रे' म्हणतच ती पायऱ्या चढून गुहेबाहेर येते. त्या गुहेबाहेर आल्यावर तिला बरे वाटते. बाहेरचे तापमान जवळपास दहा-बारा अंश सेल्सिअस असते. ती वेदांतची वाट पाहत त्या गुहेच्या गेटकडे एकटक पाहत असते. अचानक तिला वेदांत येताना दिसतो... आणि ती त्याच्या सोबतीने चालू लागते. तो काहीच न बोलता झपाझप चालतो तर तीही काहीच न बोलता त्याच्या मागोमाग चालते. दहा-बारा मिनिटे चालल्यावर ती त्याला म्हणते, ''अरे वेदांत, मी दमले आहे. जरा थांब ना...'' तर तो लक्षच देत नाही. तो चालतच राहतो म्हणून ती त्याच्या हाताला धरते आणि तीच गोष्ट परत सांगते. तसा तो माणूस तिच्याकडे रागारागाने वळून पाहतो, तशी ती थरथर कापू लागते. कारण तो वेदांत नसतोच! बर्फाच्या गुहेत शिरताना वेदांतने आपला स्कार्फ गळ्यापासून तोंडापर्यंत पूर्ण गुंडाळलेला असतो आणि मग त्यावर हेल्मेट चढवलेले असते. त्यामुळे अशाच प्रकारचा स्कार्फ गुंडाळलेला माणूस ती वेदांत समजते. ती त्याला 'सॉरी' म्हणते आणि झटक्यात मागे वळते. तो माणूस त्याच्या वाटेने चालत पुढे निघून जातो. ती झपाट्याने विरुद्ध दिशेला चालू लागते. एका क्षणी सूर्यास्त होतो. घनदाट जंगल, त्यात अंधार. मोबाइलची रेंजही नाही. तिच्या मनात भीती दाटून येते. तरीही ती पळत सुटते. तिला जाणवते की आपण दहा-बारा मिनिटांत इथपर्यंत आलो होतो. परंतु आता अर्धा-पाऊण तास झाला आपण चालत आहोत तरी त्या गुहेपर्यंत का पोहोचत नाही? मोबाइलचा टॉर्च रस्ता दाखवत होता की तिच्या डोळ्यासमोर काजवे चमकवत होता, तिलाच कळतच नव्हते. एकाक्षणी ती थकून, घाबरून ग्लानी येऊन खाली पडते.

इकडे वेदांतची अवस्था तिच्याहून वाईट होते. तो एखाद्या लहान मुलासारखा तिला हाका मारत इकडेतिकडे सैरावैरा धावतो. स्वतःलाच दोष देतो. केवळ आपण शूटिंगमध्ये रमल्यामुळे तिच्यापासून दुरावलो. तिला इतकी थंडी वाजत होती तर आपण हे शूटिंग आवरते घेत तिच्यासोबत बाहेर यायला हवे होते, असे त्याला वाटून जाते. अवतीभोवतीच्या माणसांची संख्या कमी होत जाते. शेवटी तर त्या भागात तो एकटाच उरतो! तिथलाच एका सिक्युरिटी गार्ड त्याच्याकडे येऊन विनवतो की तुम्हाला इथे रात्री थांबता येणार नाही. त्यामुळे इथून ताबडतोब निघावे लागेल! एका रस्त्याकडे बोट दाखवून त्याला जायला सांगतो. तो हरप्रकारे त्याला सांगायचा प्रयत्न करतो की त्याची बायको शलाका सापडत नाहीये; पण त्याला अजिबातच इंग्रजी समजत नव्हते आणि याला जापनीज बोलता येत नव्हते. गुगल ट्रान्सलेटर वापरून त्याला आपल्याला काय म्हणायचे आहे हे सांगुया, असा त्याच्या मनात विचार येतो. तो मोबाइल हातात घेऊन टाइपही करतो; परंतु त्या भागात मोबाइलची कोणतीच रेंज नसल्यामुळे त्याला ते जापनीजमध्ये ट्रान्सलेट करता येत नव्हते आणि शेवटी त्याला तिथून निघावेच लागते. इकडे सिक्युरिटी गार्ड एकटाच आणि पुढे अर्धा पाऊण तासाचा रस्ता.

हा रस्ता घाईत पार करून आपण जंगलाबाहेर पडल्यावर तिकडच्या सिक्युरिटी गार्ड किंवा जंगल-व्यवस्थापकाला, शलाका हरवल्याचे सांगू, या विचाराने तो चालण्याचा वेग वाढवतो आणि बाहेर पडतो. रस्त्यामध्ये त्याच्या मनात आशा जागृत होते की कदाचित आपल्याला

शोधत ती याच रस्त्याने बाहेर पडली असेल. आपली काळजी करत असेल. डोळ्यात प्राण आणून वाट बघत असेल! पण बाहेर आल्यावर त्याच्या लक्षात येते की ती इथेही नाही. तिकडच्या व्यवस्थापकांना जेव्हा तो जाऊन भेटतो, तेव्हा ते त्याला समजावून सांगतात की इथे रात्री कोणीही जंगलाच्या आत जाऊन तिचा शोध घेणार नाही. इकडच्या लोकांच्या मनात 'युरेई' नावाचे भूत वास करून आहे. या जंगलात असंख्य आत्महत्या झालेल्या आहेत. त्या सर्वांची भूतं रात्रीच्या वेळेस इथे फिरत असतात, अशी इथल्या माणसांची भावना आहे. त्यामुळे सकाळपर्यंत आपल्याला थांबावे लागेल! अत्यंत उद्विग्न अवस्थेत असलेल्या वेदांतला पाहून त्यांना त्याची दया येते. ते त्याला तिथेच एक रूम देतात. काही स्नॅक्ससुद्धा देतात. पाठीवरून हात फिरवत धीरही देतात. रात्रभर विश्रांती घेण्याची विनंती करतात तसेच सकाळी त्याच्यासोबत तिचा शोध घेण्याचे आश्वासनही देतात.

कोणत्याही ठिकाणी प्रवासाला निघण्याआधी वेदांतला त्या सर्व भागाची पूर्ण माहिती घेऊनच निघायची सवय असते. त्यामुळे त्याने या पोकीगहरा जंगलाची माहिती घेतलेली होती. त्याला हेही माहीत होते की या भागात मोठ्या प्रमाणात आत्महत्या होतात. त्याच्या मनात असेही आले होते की नेमकं आपण त्या जंगलात असतानाच एखाद्याने नुकतीच केलेली आत्महत्या आपल्याला दिसली तर आपण त्याचे रेकॉर्डिंग करून आपल्या यूट्युबवर टाकू शकतो. अशा दुर्मीळ शॉटमुळे, व्हिडिओ प्रचंड प्रमाणात व्हायरलही होऊ शकतो! परंतु या जंगलाविषयीची कोणतीही माहिती त्याने जाणीवपूर्वक शलाकाला दिलेली नसते, याचेही त्याला या क्षणी बरे वाटते! कधीही देवाला हात न जोडणारा वेदांत रात्रभर डोळे बंद करून हात जोडून देवाला प्रार्थना करत राहतो की शलाकाला काही होता कामा नये म्हणून!

उगवत्या सूर्याचा देश असे ज्याला म्हटले जाते, त्या देशाने मला आयुष्याचा सूर्यास्त दाखवू नये! अशी मनोमन प्रार्थना तो करतो. सकाळचा सूर्य उगवताक्षणी त्याला कॉफी आणि काही कुकीज देऊन तेथील व्यवस्थापक, सिक्युरिटी आणि शोध मोहिमेतील काही माणसे त्याला धीर देत, सोबत घेऊन जंगलाच्या आत शिरतात. दोन-चार तास ते फिरतात; परंतु त्यांना कुठेही शलाका आढळत नाही. इतक्यात एक माणूस धावत त्यांच्याकडे येतो आणि जापनीज भाषेत घाबराघुबरा होऊन त्यांना काहीतरी सांगतो. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून वेदांत हादरून जातो. ते सगळेच त्या माणसाने दर्शविलेल्या त्या दिशेकडे जायला निघतात. सूंऽसूंऽ आवाज करत घोंगावणारे वारे या सर्व माणसांना जणू विरुद्ध दिशेकडे ढकलायचा प्रयत्न करत असतात. तरी ते वाऱ्याला झुगारून भराभर चालत पुढे जातात. शलाका नेमक्या कोणत्या अवस्थेत पाहायला मिळणार, या विचारानेसुद्धा वेदांतचे पाय लटपटतात. अचानक 'कानोजो- ओ -मिरू ' (ती पाहा...) असे काहीसे उच्चारत सिक्युरिटी गार्ड एका झाडाच्या फांदीकडे बोट दाखवतो आणि त्याच क्षणी वेदांत मट्कन खाली बसतो. शलाका एका उंच फांदीवर लटकत असते. तिच्या पायावरचे नक्षीकार सँडल तो दुरूनच ओळखतो. तिच्या अंगावरचा स्कार्फचे एक टोक झाडाच्या फांदीला बांधलेले असते तर दुसरे टोक तिच्या नाजूक गळ्याभोवती आवळलेले असते. त्या अवस्थेतही त्याच्या मनात विचार येतो की इतक्या उंचावर ती कशी काय गेली असेल? कसा काय तिने त्या फांदीला स्कार्फ बांधला असेल...? तिला उंचीची खूप भीती वाटायची आणि आज ती इतक्या उंचावर होती. जवळजवळ माणूसभर उंचीच्या वर...? भरभरून आयुष्य जगणारी शलाका आत्महत्या कशी काय करू शकते? काय तर्कवितर्क करणार? माणूसच गेल्यावर कोणत्याही गोष्टीचा उपयोगच काय?

'कशासाठी या भयग्रस्त शापित जंगलात आलास?' असे त्याचे एक मन त्याला दरडावत असतानाच, 'बघ तुला आत्महत्या बघायची होती ना या जंगलात... बघ...!' त्याचे दुसरे मन हसून त्याला चिडवत होते.

'शलाका, माझी शलाका...' म्हणत तो धाय मोकलून रडू लागतो तेव्हा वेदांतची पहिली बायको रिया, शलाका लटकत असलेल्या फांदीवरून क्षणभरासाठी डोकावते की त्याला भास होतो? तो डोळे फाडफाडून तिकडे पाहतो, ती त्याला परत दिसल्यासारखी वाटते... खदखदून हसत त्याला विचारते,

''माझा मृत्यू अपघात होता की घात...?''

डोळ्यांच्या पापण्याही न हलवता, कोणीतरी 'स्टॅच्यू' केल्यासारखा ताठर होत वेदांत जागेवरच कोसळतो!

**- प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८९२५३२७९५

# द. भा. धामणस्कर : एका ऋषितुल्य कवीशी संवाद

नारायण लाळे ▪ राजीव जोशी



**तु**म्ही आता ९५व्या वर्षात पदार्पण केले आहे, त्याबद्दल सर्वप्रथम सादर प्रणाम करून तुमचे अभिनंदन करतो. तुमच्या पुढील आयुष्यासाठी आणि तुमच्या कवितेसाठी 'साहित्य'कडून शुभेच्छा.

धन्यवाद. माझा हा नव्वद वर्षांचा प्रवास आनंदात गेला. यापुढील प्रवासही आनंदात जाईल, अशी मी आशा बाळगतो. त्याचे एक कारण आहे. माझ्या कवितेने मला जगवले आहे आणि माझी कविताच मला जगवणार आहे.

- **कवी म्हणून तुम्ही तुमची ओळख कशी द्याल?**

कवितेवरून माझी ओळख द्यायची झाल्यास, मी माणसाच्या दुःखाचा कवी आहे. मी निसर्गाचा कवी आहे. मी लहान मुलांचा कवी आहे. वात्सल्याचा, करुणेचा, वंचितांबद्दलच्या कणवेचा, अस्तित्त्वावर हळुवार प्रेम करणारा मी कवी आहे. आध्यात्मिक मूल्य जपणारा, त्याची पायमल्ली होत असेल, तर व्यथित होणारा मी कवी आहे.

- **कवी म्हणून ही तुमची ओळख झाली. कवी म्हणून तुम्ही मराठी कवितेकडे कसं पाहता? तुमच्यावेळी कविता, त्यानंतरची कविता आणि आताची कविता यातील फरक/प्रगती/अधोगती याबद्दल तुमचे निरीक्षण काय आहे?**

हा प्रश्न खरंतर कवितेचा निरंतर अभ्यास करणाऱ्या, कवितेचा अभ्यास असणाऱ्या रसिक

समीक्षकांसाठी आहे. मी फक्त असलोच तर कविता लिहिणारा माणूस आहे. त्यामुळे काळाच्या संदर्भात आजचे, कालचे अशी वर्गवारी न करता, मनात रुजलेल्या व मला निरंतर साथ देणाऱ्या कवितांविषयी सांगण्याचे मी ठरवले आहे. हे बरेचसे चरित्रात्मक होईल याची मला कल्पना आहे.

कविता हा माझ्या वडिलांचा आवडीचा विषय होता. ते त्या वेळच्या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या कविता वाचत. कधी काव्यसंग्रह विकतही घेत, जे नेहमीच आमच्या घरातील एका टेबलावर पडून असत. वेळ व मूड असल्यावर वडील त्यातील कविता वाचत असत, त्यांना कविता लिहिण्याचीही आवड होती.

कविता समरसून शिकवण्याची त्यांना आवड होती. मी त्यांचा हक्काचा विद्यार्थी होतो. एकदा रे. ना. वा. टिळक यांची '*केवढे हे क्रौर्य*' ही कविता त्यांनी मला सहज म्हणून शिकवायला घेतली. कुणी दगड मारून गतप्राण केलेल्या एका पक्षिणीवरची ती कविता वाचताना मला फार दुःख झाले. वडिलांचे डोळेही पाण्याने भरले. त्या कवितेने माझी कवितेशी पहिली भेट घडवून आणली. आजही या कवितेच्या ओळी आठवल्या की मी माझ्या कवितेच्या उगमाशी पोहोचतो. केशवसुतांची '*सतारीचे बोल*' कविता वाचल्यावर निराशेतून आशेकडे सहज येता येईल, असे वाटते. बालकवींच्या हिरव्या गालिचांनी निसर्गाचे दालन प्रथम उघडून दिले. जे नंतर आपले सौंदर्य मिरवीत खूप दूरवर पसरले. दुःखाची तीव्रता काळजाला पोहोचवणाऱ्या माधव ज्युलियन (*बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी*), भा.रा. तांबे (*कळा ज्या लागल्या जीवा मला वा ईश्वरा ठाव्या*), राम गणेश गडकरी (*ते दुःख कसे आईचे कुणी कुणा सांगावे*) यांच्या कवितेतील आर्तता अजून त्यांच्याकडेच आहे. ती आर्तता अजून इकडे कशी आली नाही? हा मला पडलेला प्रश्न आहे. आपण याचा कसून शोध घेतला पाहिजे.

कवी यशवंत, गिरीश, माधव ज्युलियन इत्यादी कवींनी कवितेचे, कवितेसाठी व काव्यरसिकांसाठी रविकिरण मंडळ स्थापन केले. पण मराठी कवितेला खरा बहर आला तो कुसुमाग्रज, बोरकर या कवींच्या नंतर - हे खरे समकालीन कवी होते. कुसुमाग्रजांच्या 'विशाखा'मुळे ते नंबर एकचे कवी झाले. त्यांच्या *गर्जा जयजयकारने* स्वातंत्र्य चळवळीतील युवकांत नवीन आवेश संचारला - त्यांच्या '*पृथ्वीच्या प्रेमगीताने*' त्याना सूर्यग्रहमालेचा कायम सभासद केले. त्यांच्या 'दूर मनोऱ्यात' या कवितेकडून गरज पडली तेव्हा मी, स्वतः प्रचंड धीर घेतला आहे. (कवितेचे समाजमनावर परिणाम होतात का? या प्रश्नाचे उत्तर ज्येष्ठ कवी द.भा. धामणस्कर यांनी सांगितलेल्या स्वानुभवात सापडू शकते.) प्रेमकविता ही बोरकरांची ओळख. आपल्या सांस्कृतिक वारशावर त्यांची निष्ठा होती. त्यांच्या प्रेमकवितेइतकीच ईश्वराशी संवाद साधणारी नंतरची कविता हृद्य होती. कुसुमाग्रज, बोरकर यांच्यानंतर गणमात्रावृत्तांचे बंधन न मानणारी नवकविता उदयास आली. इथे योग्य, आवश्यक शब्दांना महत्त्व आले. कविता लिहिणे अवघड राहिले नाही. नुसतीच अक्षरओळख असलेल्या माणसालाही अशी कविता लिहिण्यात अडचण येत नसे. त्यामुळे कविता निर्भयपणे प्रचंड प्रमाणावर लिहिली जाऊ लागली. पु. शि. रेगे आणि अनिल हे या कवितेचे प्रवर्तक मानले जातात. नवोदित तरुण कवींनीच नव्हे, तर कुसुमाग्रजांसारख्या थोर कवींनीही मुक्तछंदात लिहून पाहायला सुरुवात केली. नंतर इतर जुने कवीही नवकवितेत आले. पण सरसकट सगळे कवी नवकवितेकडे वळले नाही. गदिमा व गझलकार कवी आपल्या ठायी स्थिर राहिले, तरी नवकविता वाढतच राहिली. जनमानसात स्थिर होत गेली. मंगेश पाडगावकर, वसंत बापट, विंदा करंदीकर यांनी एकत्र येऊन, कवितेचे जाहीर कार्यक्रम करून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कविता पोहोचवली. नंतरच्या पिढीतील अशोक बागवे, नलेश पाटील, अशोक नायगावकर यांनीही नवकविता खेडोपाडी पोहोचवण्याचे काम केले. याच पद्धतीने आजही कविता दूरवर पोहोचत आहे. वसंत आबाजी डहाके, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, ग्रेस या कवींनी आपला एकटेपणा जपत आशयघन कविता लिहिली.

- **कविता लिहिण्यामागचे तुमचे प्रयोजन काय होते?**

मी केवळ स्वतःच्या आनंदासाठी कविता लिहितो. आपल्याला आलेली सुखाची, दुःखाची, प्रेमाची, करुणेची, आशेची, निराशेची, विस्मयाची अनुभूती आपल्या शब्दातून जशीच्या तशी व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे, असे मी मानतो. कविता लिहिताना मीच माझा कठोर टीकाकार असतो, जो कवितेत एकही जास्तीचा शब्द येऊ देत नाही. कवी शंकर रामाणी म्हणायचे, फायनल झालेल्या कवितेतील एक शब्द जरी कमी करता आला, तर मला ब्रह्मानंद होतो! कविता लिहिताना रामाणींसारखी निष्ठा हवी.

- **प्रसिद्धी पराङ्मुखता कवितेला तारक असते की मारक?**

प्रसिद्धी मिळवणे, कविता गाजवणे किंवा स्वतःचीच कविता घेऊन प्रसिद्धीच्या झोतात राहणे या सर्व गोष्टी कवीच्या स्वभावधर्मात येतात. त्यात बाहेरचा कुणी बदल घडवून आणू शकत नाही. म्हणून मूलतः प्रसिद्धिविन्मुख असणाऱ्या कवीला प्रसिद्धिसन्मुख करता येत नाही. तसे कुणी करूही नये. स्वभावधर्मानुसार लिहिलेल्या निर्मितीत चांगली कविता निर्मित होऊ शकते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यातच खरा आनंद कवीला मिळू शकतो. केवळ प्रसिद्धी किंवा लोकप्रियता मिळवण्यासाठी कविता लिहू नयेत. त्याने काहीच साधत नाही. प्रसिद्धीची हौस नसताना केवळ स्वांतःसुखाय लिहिलेल्या सर्वच कविता परिपूर्ण असतात असे नाही, तरी त्या चांगल्या वाटतात. आपल्याला झालेला आनंद इतरांना मिळावा म्हणून कविता प्रसिद्ध करण्याचे मार्ग चोखाळत कविता पुढे जाण्यास साहाय्यभूत ठरते, हे नाकारता येत नाही.

- **वैयक्तिक नैतिकता आणि साहित्यातील नैतिकता यात तुम्ही फरक करता का?**

मी कलाकृतीला जास्त महत्त्व देतो. कवीचे वागणे नैतिक की अनैतिक, याचा फार विचार न करता कवीच्या निर्मितीकडे अधिक लक्ष द्यावे, असे मला वाटते. एखाद्या श्रेष्ठ कलाकृतीकडे पाहताना त्या कलाकृतीच्या निर्मात्याच्या अनैतिक वागण्याकडे (तसे असेल तर) दुर्लक्ष करावे. कलाकृतीचा आस्वाद घ्यावा. त्याच्या नैतिक-अनैतिकतेचा नाही. हे मी श्रेष्ठ कलाकृतींबद्दल बोलतो आहे. तद्दन सुमार कलाकृतींच्या निर्मात्याचे वागणे अनैतिक असेल, तर ते क्षम्य नाही.

- **कविता आणि पुरस्कार यांचे नाते कसे जोडावे?**

पुरस्कारासाठी कविता लिहू नये. कवीने चांगली कविता लिहिण्याचे काम करावे. पुरस्कार मिळो न मिळो, त्या चक्रात कवीने अडकू नये. कविता लिहिण्यापेक्षा पुरस्कार कसे मिळतील यासाठी कवीने आपली क्षमता वाया घालवू नये, असे मला वाटते.

- **बदलत्या भोवतालात तुमच्या कवितेत झालेला बदल सांगता येईल का?**

एका वाक्यात सांगायचे झाल्यास, कवितेचे बाह्यरूप बदलत गेले. पण अंतरंग मात्र खोल होत गेले. 'प्राक्तनाचे संदर्भ'मधील माझी कविता पुढील दोन कवितासंग्रहात म्हणजे, 'बरेच काही उगवून आलेले' किंवा 'भरून आलेले आकाश' अंतरंगात बदललेली दिसेल.

- **तुमच्यावर प्रभाव टाकणारे साहित्य?**

मला वाचनाची फार आवड आहे. आजही मी काहीना काही वाचत असतो. वयानुसार ते कमी झाले आहे, हे खरे. मी दुसरे काहीच करत नसतो त्यावेळी मी वाचत असतो. गीता वाचायला मला खूप आवडते. तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, ओशोंचे साहित्य, महात्मा गांधींचे आत्मचरित्र, कवितासंग्रह, 'विशाखा' कवितासंग्रह तर माझा पूर्ण पाठ होता. आजही त्यातील बऱ्याच कविता माझ्या लक्षात आहेत. ही सारी माझी ग्रंथसंपदा आहे. रोज कुणा ना कुणाची मी भेट घेतोच.

- **आजच्या पिढीतील आश्वासक कवी/कवयित्री/लेखक काही नावे?**

एखादी कविता अथवा गद्य लेखन पुन्हा वाचावेसे वाटते, त्या कवितेचे कवी अथवा कवयित्री मला आवडतात. अशांनाच मी आश्वासक कवी अथवा लेखक म्हणेन. अशोक बागवे, अशोक नायगावकर, हेमंत गोविंद जोगळेकर, नारायण कुळकर्णी, 'गंधाली' दिवाळीअंकातून लिहिणारी दमयंती भोईर, अनिल साबळे, संध्या लगड अशी काही नावे सांगता येतील.

- **साहित्य क्षेत्रात उदासीनता पसरली आहे, असे तुम्हाला वाटते का?**

कवितेच्या क्षेत्रात वाचनीय, चांगल्या, संस्मरणीय कवितांची वानवा आहे, इतकेच मी सांगू शकतो.

- **कवितेव्यतिरिक्त गद्य लेखनाकडे तुम्हाला जावेसे वाटले नाही का?**

माझा ओढा कवितेकडेच जास्त आहे. तरी 'महाराष्ट्र टाइम्स'मधील 'सगुण निर्गुण'मध्ये मी गद्य लेखनातून विचार मांडले आहेत. शिवाय काही मासिकांमधून मी ललित लेखन केले आहे.

- **दहावीच्या पाठ्यपुस्तकात (मराठी), तुमची 'वस्तू' ही कविता (कवितासंग्रह- भरून आलेले आकाश)**

**समाविष्ट झाली आहे. या कवितेबद्दल तुम्ही तुमचे विचार सांगावेत; जेणेकरून विद्यार्थ्यांना, तसेच कवींना काही मार्गदर्शन होईल.**

कुठलीही निर्मिती ही तुमच्या चिंतनातून जन्माला आलेली असते. 'वस्तू' ही माझी कविता अशीच चिंतनातून जन्माला आलेली आहे. त्यामुळे ती कशी सुचली, हे सांगणे कठीण आहे. आपल्या मनात बऱ्याच गोष्टी, घटना, आठवणी साठलेल्या असतात. आपण जे पाहतो, तेही मनात साठत असते. लोक चपला कशा बाहेर फेकतात, घरातली भांडी वाटेल तशी मांडलेली असतात. पुस्तक हाताळताना आपण नीट हाताळत नाही, त्याची पानं नीट उलटत नाही. एकूण आपल्यात बेशिस्तीचे प्रमाण भरपूर आहे. आणि त्याचे मूळ आपल्याला या वस्तूंबद्दल प्रेम नसते. स्नेह नसतो. वस्तूंबद्दल आदर नसतो. वस्तूंबद्दल आदर ठेवावा अशी भावनाही कधी आपल्या मनात उमटत नाही. ज्या पेल्याने आपण पाणी पितो, तो पेलाही आपण नीट ठेवत नाही. वस्तूंना जीव असेल असे गृहीत धरून जर आपण वागलो, तर जग अधिक सुंदर होईल, असे मला वाटते. या कवितेच्या पहिल्याच ओळीत मी म्हटले आहे, वस्तूंना जीव असो नसो, तुम्ही वस्तूंशी प्रेमाने वागा!

आपल्या वस्तू आपण नीट सांभाळल्या पाहिजेत, प्रत्येक वस्तूशी प्रेमाने वागायला पाहिजे. आपला जो अस्ताव्यस्तपणा असतो, त्याला आवर घालून दप्तरात पुस्तके नीट ठेवणे, घरी आल्यावर दफ्तर नीट ठेवणे म्हणजेच प्रत्येक वस्तू प्रेमाने हाताळणे. हे आपल्या अंगवळणी पडायला पाहिजे. तुम्ही एक पाहिले असेल, काही माणसांना आपल्या वस्तू पाहिजे तेव्हा, पाहिजे तशा हाती लागतात आणि काही माणसांना स्वतःच्याच वस्तू कधी वेळेवर सापडत नाहीत किंवा गहाळ झालेल्या असतात. वस्तूंवर प्रेम करणारे आणि वस्तूंबद्दल बेपर्वा असणारे, हाच फरक इथे स्पष्ट होतो.

'वस्तू' या कवितेतून, आपण वस्तूंकडे बघताना आपण माणसांबद्दलही विचार करणे मला महत्त्वाचे वाटते. काही माणसे कधी कुणाशी बोलत नाहीत, शांतपणे आपली कामे करीत असतात. अशा माणसांबद्दल समाजमनात बराच तिटकारा भरलेला असतो. त्यांच्याशी कुणी धड वागत नाही, त्यांना प्रतिसाद देत नाहीत, अशी एक वृत्ती फैलावलेली असते. माझे म्हणणे असे आहे, अशा माणसांवर तुम्ही प्रेम करा. त्यांच्याशी आदराने वागा. त्यांचाही तुम्ही सन्मान करा. ज्यावेळी तुम्ही वस्तूंना नीट सांभाळता, याचाच एक अर्थ तुम्ही माणसांनाही नीट सांभाळता; त्यांच्यावर प्रेम करता. माझी ही कविता संपूर्ण एकजीव आहे. या कवितेतून एखादी ओळ जरी काढली, तरी कविता विस्कळीत होईल, असे मला वाटते. हळुवार मनाला ही कविता जास्त समजेल. वस्तूंना मन नाही असे तुम्ही समजू नका. वस्तूंना मन आहे. त्यांच्याशी नीट न वागल्यास वस्तूंनाही दुःख होत असेल कदाचित! म्हणून या कवितेच्या शेवटी मी म्हटले आहे, वस्तूंना मन नसेल कदाचित, पण निदान माझे (कवीचे) म्हणणे तुम्ही ऐकून घ्या आणि वस्तूंशी प्रेमाने वागा. त्यांना मन असल्यासारखे वागा.

'वस्तू' या कवितेच्या शेवटच्या ओळीही मला महत्त्वाच्या वाटतात. आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या/हक्काच्या घरात राहून देत नाहीत, तेव्हा कृतज्ञतापूर्ण निरोपाचा हक्क शाबूत ठेवावा. एक उदाहरण देतो, आपण चपला वापरतो. त्या झिजल्या की बाहेर कुठेतरी फेकून देतो. वास्तविक त्या चपलांनी आपल्या पायांना बराच काळ संरक्षण दिलेले असते. पायांना ठेच लागू नये म्हणून चपलांनी आपली काळजी घेतलेली असते. त्याच चपलांचे काम झाले की, आपण काय करतो? त्यांना अडगळीत अथवा कुठेही टाकून देतो. कवीचे सांगणे असे आहे की, त्या चपलांनाही जीव आहे, असे समजून त्यांना प्रेमाने निरोप द्या. त्यांची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावा. हे जग सुंदर करायचे असेल, तर वस्तूंनाही जीव असतो असे समजा. आणि त्यांच्याशी प्रेमाने वागा. 'वस्तूंशी प्रेमाने वागा' म्हणजे काय याचा उलगडा झाला की माणसांशी प्रेमाने वागणे अवघड जाणार नाही, याची खात्री बाळगा.

- **नवोदित कवींना किंवा कविता लिहिणाऱ्यांना तुम्ही काय सांगाल?**

तुम्हाला कविता लिहावीशी वाटली तर तुम्ही कविता लिहा. पण इतर कवींच्या कविता वाचत रहा. केशवसुत वाचा. मर्ढेकर, विंदा, पाडगावकर, बापट, बोरकर यांच्या कविता वाचा. त्याचा फायदा असा होईल की, कविता वाचून आपोआप तुमच्या मनात कवितेचा एक फॉर्म तयार होईल. कवितेची एक इमेज तयार होईल. अनेक कविता वाचल्यानंतर कविता कशी लिहावी, याचे ज्ञान होऊ शकते. कवितेत आपल्याला जाणवलेला आशय व्यक्त करा.

लोकांना काय आवडेल, याच्यावर ध्यान ठेवून ते व्यक्त करू नका. कवितेलाही जर एखादी 'वस्तू' मानले, तर त्या वस्तूला जीव आहे असे समजा आणि कवितेशी प्रेमाने वागा.

- **कवितांबद्दलच्या तुमच्या काही आठवणी सांगता येतील का?**

तशा बऱ्याच आठवणी आहेत. माझी सर्वात आवडती कविता रे.ना.वा. टिळक यांची, '*केवढे हे क्रौर्य*' ही आहे. याचा उल्लेख मी आधीच केला आहे. या कवितेत नावांनी '*अतिरम्य पंख*' एवढे म्हणून त्या कवितेची उंची कायम ठेवली आहे. कवी दत्त यांची एक कविता आहे. '*नीज गडे, नीज गडे लडिवाळा*' ही कवितादेखील मला खूप आवडायची. पण आता मला विचार पडतो, या कवितेला अंगाई गीत का म्हणायचे? कारण असे अंगाई गीत मुलांना झोपवण्यासाठी असते. त्यात दारिद्र्याचे वर्णन ऐकून झोप कशी येणार – *रवी गेला रे सोडून आकाशाला/घन जैसे दुर्भाग्याला/क्षणभर हुन्नर ते करती/त्याना शोधाया ते फिरती/तरी अंती निराश होती.* अशा ओळी मुलांची झोप उडवणार नाहीत का? अंगाई गीतात गोड काही पाहिजे.

मला ग्रेस आवडतो. ग्रेसची कविता मनात रुणझुणते, पण हाती लागत नाही. ग्रेसची कुठलीही कविता घ्या. ती छळणारा प्रश्न देऊन जाते. *गाय जशी हंबरते/तशी म्हणावी गाणी/देहावरची त्वचा आंधळी/छिलून घ्यावी कोणी.* या ओळींमध्ये गाय जशी हंबरते तशी म्हणावी गाणी इथपर्यंत ग्रेस मला आवडतो. देहावरची त्वचा आंधळी इथून मात्र ग्रेस हातातून निसटतो. तरी ग्रेस मला आवडतो.

बंडखोर कवितेचा पसारा मोठा आहे. विषमता मांडणारा, त्रयस्तपणे दुःख मांडणारा मला भावलेला एकच कवी – नारायण सुर्वे.


कविता लिहिल्यानंतर मी कुणाला दाखवत नसे. पण जेव्हा माझा डोंबिवलीच्या 'काव्य रसिक मंडळाशी' संबंध आला तेव्हा माझी कविता लोकाभिमुख झाली, असे मी म्हणेन. तरी मी स्वतःहून कधी कविता कुणाकडे पाठवली नाही. 'मौज'ला देखील मी स्वतःहून कधी कविता पाठवली नाही. एकदा डोंबिवलीचा एक तरुण कविमित्र, परेन जांभळे माझ्याकडे आला आणि म्हणाला, तुम्ही 'मौज'ला कविता का पाठवत नाही? तुम्ही पाठवत नसाल तर तुमच्या कविता माझ्याकडे द्या, मी त्या 'मौज'कडे नेऊन देईन. असे म्हणून त्याने दहा–पंधरा कविता घेतल्या, नीट स्वच्छ कागदावर पुन्हा लिहिल्या आणि 'सत्यकथा'चे संपादक राम पटवर्धन यांच्याकडे दिल्या. कविता चांगल्या आहेत, असे राम पटवर्धनांचे मत पडले. १९७८ साल असावे. त्यावेळच्या 'सत्यकथा'मध्ये माझी पहिली कविता प्रसिद्ध झाली. आणि तेव्हापासून आजतागायत 'मौज'शी माझे नाते जुळलेले आहे. जवळजवळ ४० वर्षांचा हा 'मौज' बरोबरचा प्रवास आहे. एका वर्षाचा अपवाद सोडला तर माझ्या ४० कविता 'सत्यकथा', 'मौज'मधून सातत्याने प्रसिद्ध झाल्या आहेत.

- **एका वर्षाचा अपवाद कशा करता?**

त्याचे असे झाले, 'मौज'कडून कविता पाठविण्या–विषयी नेहमी पत्र येत असे आणि मी त्यानुसार कविता पाठवीत असे. एक वर्षी काय झाले, 'मौज'कडून पत्र आले नाही. त्यामुळे मी कविता पाठवली नाही. अंक प्रसिद्ध झाल्यावर संपादकांचा मला फोन आला आणि विचारणा झाली, अंकात तुमची कविता का नाही? मी उत्तर दिले, कविता मागणीसाठी या वर्षी तुमचे पत्र आले नाही. त्यामुळे मी कविता पाठविली नाही. त्यानंतर संपादकांनी हक्काने दम देत सांगितले, 'मौज'कडून पत्र येवो न येवो, तुम्ही कविता पाठवायची. यात बदल नाही! आता दरवर्षी पत्र येते.

'कविता दशकाची'साठी माझी आणि माझ्या कवितांची निवड झाली, ही घटनाही महत्त्वाची ठरली. 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या या प्रातिनिधिक कवितासंग्रहात समावेश होण्यासाठी परीक्षकांचे निकष होते. एकही कवितासंग्रह प्रसिद्ध नसावा आणि येत्या दहा वर्षांत कवितेचा प्रभाव पडेल अशी आश्वासकता कवितेत असावी. त्यासाठी दहा–पंधरा कविता पाठवणे आवश्यक होते. मी काही कविता पाठवल्या नाहीत. त्यावेळी निवड समितीला कुणीतरी जाऊन सांगितले की, धामणस्कर स्वतःहून कविता पाठवणार नाहीत. पण त्यांची कविता चांगली आहे. हे लक्षात घेऊन त्यांना तुम्ही, म्हणजे निवडसमितीने औपचारिक पत्र पाठवून कविता मागवून घ्याव्यात. तसे मान्य करून निवड समितीचे मला पत्र आले व कविता पाठवण्याबद्दल सूचित केले. मग मी २५ कविता पाठवल्या. काही दिवसांनी निवड समितीचे पत्र आले की, तुमची 'कविता दशकाची'साठी निवड झाली आहे. त्यासाठी तुमच्या दहा कविता आम्ही निवडल्या आहेत. उत्तरादाखल

निवड समितीला मी पत्र पाठवून कळवले होते की, मी आता ५०च्या घरात आहे. तेव्हा माझ्याऐवजी एखाद्या तरुण कवीला ही संधी दिल्यास माझी काहीच हरकत नाही! निवड समितीने ते मान्य केले नाही, हा भाग वेगळा.




'कविता दशकाची' या प्रातिनिधिक कवितासंग्रहाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळची गोष्ट आहे. कविता वाचनात माझ्या कवितेने चांगलीच दाद घेतली होती. कार्यक्रम संपल्यावर श्री. पु. भागवत स्वतः माझ्याजवळ आले आणि त्यांनी विचारले, 'तुम्हाला कवितासंग्रह काढायचा आहे का?' मी उत्तर दिले 'हो!' 'कुणाकडे दिला आहे का?' असे श्रीपुंनी विचारले. माझे उत्तर 'नाही' होते. 'मग असे करा, तुमच्या कवितांची वही माझ्याकडे द्या. आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदान योजनेत तुम्ही अर्ज करा.' श्रीपुंनी माझ्या कवितांची केलेली मागणी आणि सुचवलेला एक मार्ग, हे ऐकून मला आनंद झाला होता. मला संग्रहासाठी अनुदान मिळाले आणि १९८२ साली माझा पहिला कवितासंग्रह, 'प्राक्तनाचे संदर्भ' 'मौज' प्रकाशनाने प्रसारित केला.

'मौज'वाल्यांचे मला एक आवडायचे, ते त्यांच्या मतापेक्षा कवीला जास्त महत्त्व देत. माझ्या कवितेत त्यांना एखादा शब्द खटकला तर ते थेट बदल न करता, ते वेगळं काही सुचवीत असत. म्हणजे उदा. हे शीर्षक बदलता येईल का? अमुक ठिकाणी दुसरा एखादा शब्द सुचतो का? अशा 'मौज'च्या सुचना असत. 'मौज'मध्ये कवितेला आणि कवीला मान मोठा होता.

ज्या कवितेमुळे मला 'ओळख' मिळाली, त्या माझ्या 'हस्तांतर' या कवितेचीही एक गंमत आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण ही कविता 'मौज'ने नाकारलेली होती. या कवितेचे शीर्षक आधी मी 'ययाती' असे दिले होते. पटवर्धन म्हणाले, 'या कवितेला ययाती हे शीर्षक तितकेसे समर्पक नाही. आणखी काही वेगळे नाव सुचतेय का बघा.' मी लगेच नाव सुचवले, 'हस्तांतर', पण त्यानंतरही 'मौज'मध्ये ती कविता प्रसिद्ध झाली नाही. मग मी तीच कविता 'हस्तांतर' या नावाने कवी राजीव जोशी आणि रवी लाखे संपादित 'संवाद' या वाङ्मयीन नियकालिकाकडे दिली आणि तिथे ती प्रथम प्रसिद्ध झाली. संपूर्ण महाराष्ट्र मला ज्या कवितेच्या नावे ओळखतो, ती कविता 'मौज'मधली नाही, तर राजीव जोशी यांच्या 'संवाद' मधली आहे.

मी 'मौज'मध्ये गिरगावात बरेच वेळा जात असे. संपादक राम पटवर्धनांशी साहित्यावर गप्पा मारणे हा मोठा आनंद असे. एकदा मी त्यांना विचारले, 'मी इथे येतो, तुमचा वेळ घेत बसतो. तुम्हाला त्याची काही अडचण नाही ना!' राम पटवर्धनांनी म्हणजे एका श्रेष्ठ संपादकाने दिलेले उत्तर अनेक नवोदित लेखकांना उपयुक्त ठरेल असे आहे. ते म्हणाले, 'लेखक किंवा कवी आमच्याशी बोलतो तेव्हा त्याची कविता किंवा त्याचे लेखन समजून घेण्यास आम्हाला त्याचा उपयोग होतो.'

'मौज'मध्ये मी अनेक लेखक, कवींना पाहिले. श्री.दा. पानवलकर, ग्रेस; एकदा मी तिथे असतानाच ग्रेस येणार आहेत, असे समजले. संपूर्ण कार्यालयात एक वेगळेच

वातावरण पसरले. आधीच 'मौज'मधील शांतता. त्यात आणखी भर पडायची. 'मौज' कार्यालयात सिगरेट कुणीच ओढत नव्हते. पण ग्रेस येणार म्हणून स्वतः पटवर्धन कपाटावर ठेवलेला एक ॲशट्रे टेबलावर काढून ठेवत. हे मी पाहिले आहे. तो ॲश ट्रे कवी ग्रेस यांच्यासाठी असायचा.

आणखी बऱ्याच आठवणी आहेत. माझी ९४ वर्षं आठवणींनी भरलेली आहेत. प्रत्येक आठवणीतून मला आनंदच मिळाला. माझी स्मृती अजूनही जिवंत आहे. पाडगावकर, कुसुमाग्रज, बोरकर यांच्या कविता मी म्हणून दाखवतो. त्यातले काही संदर्भ मला देता येतात. कवी शंकर रामाणींचा आणि माझा पत्रव्यवहार होता. आजही त्यांची पत्रं मी जपून ठेवली आहेत. ओशो, जे कृष्णमूर्ती, गोंदवलेकर महाराज ही माझी श्रद्धास्थानं आहेत. त्यांचाही परिणाम माझ्या कवितांवर निश्चित झाला आहे. कवितेतील नम्रतेला मी जास्त महत्त्व देतो. कवितेतली प्रत्येक ओळ साक्षात्कारी असावी, असे मला वाटते. *परमेश्वराची करुणा भाकत त्याच्या इतकेच आपण/महान, क्षमाशील व्हायला हवे/उमलणाऱ्या नव्या फुलासाठी जुने सर्व/टाकून द्यायला हवे, ही माझी कविता आहे. वसंत येतो तेव्हा फुले येतात/ असे पुस्तकात वाचलेले/फुले येतात तेव्हा वसंत असतो/ हे स्वतः पाहिलेले*, हा माझा ९४ वर्षांचा स्वानुभव आहे.

- **दभा, आता माझे प्रश्न जवळजवळ संपत आल्येत. आता तुमच्या कवितेबद्दल, तुमच्याबद्दल काही व्यक्तींनी, त्यात कवी, लेखक, समीक्षक, वाचक, नात्यागोत्यातले सर्व आले, आपापली मतं व्यक्त केली आहेत. ती मी वाचून दाखवू का?**

हो, जरूर. मला आवडेल. त्यांच्याबद्दल मी कृतज्ञ राहीन.

***कवी वीरधवल परब म्हणतात :*** धामणस्करांच्या कवितेचा एकूण विचार करता, त्यांची कविता प्रामुख्याने निसर्ग जाणिवेची कविता असल्याचे दिसते. मुक्त जीवनदृष्टी आणि आनाग्रही वृत्ती हा त्यांच्या कवितेचा विशेष गुण आहे. जगण्यातील एखादा अगदी साधा, दुर्लक्षित ठरावा असा अनुभव धामणस्करांच्या कवितेत अगदी सहजपणे काव्यरूप धारण करताना दिसतो, तो त्यामुळेच. जे. कृष्णमूर्तींच्या विचारांची कोवळीक आणि वृत्तिगांभीर्य धामणस्करांच्या कवितेत आपले सत्त्व शोधत अधिक खोलवर गेलेली दिसते. या कवितांना स्वतःचा आतला प्रकाश आहे. तो पराकोटीच्या चिंतनशील भावसंचितातून उगवला आहे. दभांची कविता वास्तव जगताच्या साध्या सरळ, परंतु निर्भेळ व तटस्थ अवलोकनातून आकाराला येते. पंचमहातत्त्वांविषयीची विनम्र जाणीव धामणस्करांच्या कवितेत सतत जाणवते. अतीव कोवळीक असलेली ही भावोत्कट अभिव्यक्ती असल्यामुळेच समकालीन मराठी कवितेत तिचे वेगळे अधोरेखन आपल्याला करावे लागते.

***कवी, समीक्षक दा. गो. काळे म्हणतात :*** बऱ्याच दिवसांत कविता लिहिली नाही, म्हणजे बऱ्याच दिवसांत स्वतःला भेटलो नाही. द.भा. धामणस्करांची कवितेसंबंधीची स्वतःतली निष्ठा आणि आपल्या अभिव्यक्तिविषयीचे प्रेम दिसून येते. आपल्याला झालेल्या अनुभवाचा साक्षात्कार दभांच्या कवितेतून संवादी होतो. *फुले बारीक आणि निःसत्त्व दिसताहेत/दूर कुठेतरी शिशिराची/पानगळ सुरू झाली काय?* असा काळजीचा सूर दभांच्या कवितेतून मार्गस्थ होताना निसर्गाबद्दलची अपार भक्ती अनुभवास येते. दभांच्या कवितांना झाडांनी भरभरून देणाऱ्या फळाफुलांपेक्षा त्यांच्या पानांचे, त्यांच्या पानगळीचे, त्याशिवाय झाडांच्या पिवळ्या होत जाणाऱ्या आणि गळलेल्या पिवळ्या पानांचा, पाचोळ्याचा विलक्षण सोस आहे. झाडांच्या कोणत्याही कवितेत पिकल्या पानांचे अवशेष ते विसरत नाहीत. म्हणजे जन्मजाणिवेबरोबरच मृत्यूच्या असण्याचे सत्य या कवितेच्या आधारशीलेतून त्यांना कळले. त्याचबरोबर उत्पत्ती, स्थिती, लयचेही गणित ओघाओघाने दभांच्या कवितेतून प्रतलावर आलेले दिसतेय.

**रफीक सूरज म्हणतात** : धामणस्करांनी अनेक कवितांमधून सामाजिक दुरवस्थेचे चित्रण मांडले असले, तरी ते बऱ्याचदा निरीक्षणाच्या पातळीवर तटस्थ असे राहते. धामणस्करांची कविता काही प्रमाणात सौंदर्यवादी कवितेची चौकट सांभाळणारी, तर काही प्रमाणात या चौकटीला छेद देणारी अशी मिश्र प्रकृतीची कविता आहे. धामणस्करांची कविता वाचताना सर्वप्रथम एक गोष्ट जाणवते ती अशी की, एका वेगळ्या आणि अनोख्या निसर्गाचे दर्शन त्यांच्या कवितेतून प्रकट होते. त्यांच्या तीन प्रकाशित संग्रहात मिळून एकूण २५१ कविता समाविष्ट आहेत. त्यातील बहुसंख्य कवितेत निसर्गचित्रणाची व्याप्ती लक्षणीय अशी आहे. निसर्गाची उत्कट, तरल चित्रे आणि जीवनाचा निरंतराचा शोध असे एकमेकांत सरमिसळून गेलेले अनेक धागे या कवितेत आहेत.

**राजीव जोशी म्हणतात** : धामणस्करांच्या तीनही संग्रहातल्या कवितांवरून एक लक्षात येते की धामणस्करांची कविता मुळात अल्पाक्षरी आहे. दीर्घत्व हा तिचा स्वभाव नाही. सांगायचे ते मोजक्या शब्दांत, आखीव-रेखीव. त्यांच्या कवितेचा स्वर आत्मसंवादाचा व सुसंवादाचा आहे. त्यांची कविता दैनंदिन जीवनातील अनुभवातून, प्रसंगातून संवेदनशीलतेचा विलक्षण आत्मप्रत्यय देत वाचकाला अंतर्मुख करते, ते त्यातील आजच्या काळातल्या मानवी जीवनातल्या दैनंदिन संदर्भ खुणांनी. दभांसाठी कविता हे अभिव्यक्तीचे माध्यम आहे. त्यांच्या कवितांचे दोन महत्त्वाचे स्तर आहेत. एक म्हणजे आपल्या कवितेतून ते मानवी जीवनातील विविध रूपे पकडण्याचा, त्यांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यातल्या दृश्य-अदृश्य अर्थाची संगती लावण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक वास्तवात व्यक्तीचे स्थान, या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर मानवाची जीवनातली बलस्थाने, सामाजिक अंतर्विरोधातून आलेला कमकुवतपणा ते काही व्यक्तिचित्रातूनही प्रकट करतात. अवतीभोवतीच्या भीषण वास्तवाचे भान व्यथित होऊन अंतर्मनाच्या खोलवर उमटलेल्या भावभावनांची घालमेल संयम आणि सहिष्णुतेने ते कवितेते व्यक्त करतात. कळत-नकळत मानवी जीवनातला खुजेपणा पाहून व्यथित होतात. व त्यातूनच पडणारे अनेक प्रश्न ते कवितेतून व्यक्त करतात. भौतिक विश्व आणि कवितेचे अंतर्मन, सभोवताल आणि भव्य-दिव्य असा निसर्ग अशा दुहेरी पातळीवर त्यांची कविता वाचकांशी संवाद साधते.

**हेमकिरण पत्की म्हणतात** : 'फुलांच्या कविता'त धामणस्कर यांना सृष्टीतल्या समग्र चेतनेचा, तिच्यातील अविनाशी सुंदरतेचा साक्षात्कार झालेला आहे. या कवितेच्या पहिल्या भागात फुलांची नोंद घेताना ते म्हणतात, फुले येतात, तेव्हा वसंत असतो, हे स्वतः पाहिलेले. फुलांचं रंगीत-गंधीत असणे हाच वसंत ऋतूचा आशय असतो. झाडांचे बहरणे ही वसंतागमनाची रसिक वृत्तीला सूचना असते. मनाचे फूल झाल्याशिवाय या सूचनेचा बोध होईल का? हे अप्रूप दिसेल का? पण 'फुलांच्या कविता' वाचताना निसर्गाचा गाभाच मनाला भिडल्यामुळे अंतःकरण भरून येते.

**मनीष पाटील म्हणतात** : तुकारामाचा उल्लेख दभांच्या बोलण्यात येतोच येतो. आबांकडे कवींची अनेक पुस्तके येतात. त्यातील कवितांवरही ते विश्लेषणात्मक बोलतात. समकालीन नव्हे तर अलीकडच्या अनेक कवींच्या कविता त्यांना तोंडपाठ असतात. त्या कवीला काय म्हणायचे आहे, हे दभा आपल्यासमोर उलगडतात. त्याचा आनंद घेतात. कधी कधी स्वतःच्या प्रदीर्घ जीवनपटाचे काही रंग उलगडतात. 'दशकातील कविता'मध्ये प्रसिद्ध झालेल्या कवितेच्या निवडीपासून तर वाचकांच्या प्रतिक्रियेपर्यंतच्या आठवणीत ते रमून जातात. कधी भेटायला जायला नाही जमले की त्यांचा फोन हमखास येतो, 'आठवण येते आहे. वेळ मिळेल तेव्हा भेटून जा.'

**अजित दत्तात्रय म्हणतात** : आबांचा प्रत्येक घटनेकडे सकारात्मकतेने बघण्याचा दृष्टिकोन खूप काही शिकवून जातो. साहित्य व काव्य क्षेत्रातील त्यांची झेप आमा भावंडांना समजण्यापलीकडील होय. सुरुवातीला सत्यकथा, दर्जेदार दिवाळीअंकात त्यांच्या कविता येत. ते आम्हाला खूप ग्रेट वाटायचे. त्यांचे तीन काव्यसंग्रह मौज प्रकाशनाने काढले. त्यातील एकाला (प्राक्तनाचे संदर्भ) केशवसुत पारितोषिक मिळाले. मौज प्रकाशनवर आबांचा व प्रकाश-कांचा आबांवर खास लोभ आहे. ते एक जिव्हाळ्याचे नाते आहे.

**शुभदा धामणस्कर** : आबांची स्मरणशक्ती, विनोदबुद्धी कमालीची आहे. आम्ही मुले स्वबळावर शिकून स्वावलंबी व्हावे, स्वतःचे घर असावे, ही त्यांची इच्छा असे. साध्या साध्या प्रश्नांनाही आबांकडे अचूक उत्तर असते. 'तुमच्या हातांचे तळवे नेहमी गरम कसे असतात?' या प्रश्नावर आबांचे उत्तर असते, *'माझे हात हृदयाजवळ असतात!'* आई-वडिलांच्या लग्नाचे फोटो बघून मुले नेहमी विचारतात, बाबा मी कुठे होते? त्याचे उत्तर, 'त्यावेळी तुझा पत्ता हरवला होता' असे आबा गमतीने उत्तर देत. भाषेचे सौंदर्य कसे आणि कशात असते, ते आबांकडून शिकावे.

**अनीहा धामणस्कर** : १९८४ साली मी धामणस्कर यांच्या घरी आबांची सून म्हणून रुजू झाले. दुसऱ्याच दिवशी किचनची पूर्ण जबाबदारी सासुबाईंनी माझ्यावर सोपवली. मला जाणवलेला आबांचा पहिला गुण म्हणजे त्यांचा नीटनेटकेपणा, काटेकोरपणा. साधी रुमालाची घडीदेखील त्यांना व्यवस्थित टोक जुळवून लागते. अजूनही वयाच्या ९५व्या वर्षी बिछान्यावरची चादर ते नीटनेटकी सुरुकुतीविरहीत घालतात. त्यांना त्यांच्या वस्तू जागेवरून हलवलेल्या बिलकूल आवडत नाहीत. हल्ली शक्य होत नसले, तरी त्यांना फिरायला जायची खूप आवड होती. रोज चालायला जाणे, हा त्यांचा ठरलेला कार्यक्रम असे.

एकदा ना शंकर वैद्य यांनी मला सांगितले, 'सुनबाई तुझा सासरा खूप मोठा माणूस आहे. ते प्रसिद्धीपासून खूप लांब राहिलेले आहेत.' ती आबांच्या वाढदिवसाला सकाळी पहिला फोन मंगेश पाडगावकरांचा असायचा. आबांच्या स्वभावाबद्दल म्हणाल तर ते बरेचदा आत्ममग्न असतात. ते स्वभावाने मृदू आहेत. त्यांचे बोलणे मार्मिक आणि मिश्कील असते. वेळेचे भान ठेवून आबा जगतात. रूटीनमध्ये बदल झालेला त्यांना सहसा आवडत नाही. मी कायम त्यांना माझ्या वडिलांच्या जागी पाहते. त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद करते. त्यांचा आम्हा सर्वांना खूपच आधार वाटतो.

- *योगायोग असेल, प्रस्तुत मुलाखतीला लिखित स्वरूप देत असतानाच 'कविता-रती' दिवाळी अंक २०२४चा हाती आला आणि त्यात नेमका 'प्राक्तनाचे संदर्भ' या दभांच्या संग्रहावरील समीक्षक नीलिमा गुंडी यांचा लेख वाचनात आला. त्या लेखातून घेतलेला अंश :*

धामणस्कर यांची कविता समीक्षेच्या कोणत्याही समकालीन चौकटीत मावणारी नाही. आपल्या काव्यपिंडाशी प्रामाणिक राहण्याचे पथ्य त्यांनी सतत पाळले आहे. निसर्ग हा त्यांच्या काव्यप्रेरणेचा जणू सहजोद्गार बनला आहे. पूर्वपरंपरेतील वर्णनपर निसर्ग कवितांपेक्षा त्यांच्या कविता वेगळ्या आहेत. तसे बालकवींच्या निसर्ग संवेदनांशी त्यांचे वृत्तीने नाते दिसते. माळ, त्यांचा निसर्ग हा निरागसतेपेक्षा अस्तित्वचिंतन व्यक्त करण्यात अधिक प्रभावी ठरतो. आपल्यासमोरच उत्पत्ती, स्थिती आणि लय हे जणू समग्र जीवनचक्र अनुभवणारी झाडे त्यांच्या कवितेत अस्तित्वाच्या गाभ्याचेच साक्षात दर्शन घडवीत राहतात. त्यांच्या 'अरण्य', 'झाडे महान शहरातील', 'झाडांच्या कविता' आदी कविता वाचताना कवीचे संवेदनशील मन प्रकर्षाने जाणवते. 'झाडे सजीव आहेत' हे त्यांच्यासाठी केवळ वैज्ञानिक सत्य नाही, तर ते त्यांच्यासाठी आत्मप्रत्ययातून उमजलेले भावसत्य आहे, याचा प्रत्यय त्यांच्या कवितांमधून येतो. त्यामुळे त्यांना इमारती-इमारतींमधल्या मोकळ्या जागेत '*मातीचे मौनसामर्थ्य*' उभी करणारी झाडे '*तुम्ही मात्र शांत, सहज/ श्रद्धामय पुरुषांसारखी*' अशी वाटतात. झाडे ही कवीसाठी एक प्रकारे जगण्याचा भावार्थ सुचविणारी आहेत.

मुलाखत पूर्ण झाल्यावर आणि कवी, लेखक, समीक्षकांची आपल्या कवितेविषयीचं मतं ऐकून ज्येष्ठ कवी द.भा. धामणस्करांनी सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. 'साहित्य' दिवाळी अंकाचे संपादक डॉ. नरेंद्र पाठक यांचे आभार मानले. 'साहित्य'ला आणि साहित्याच्या वाचकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

समारोप : ज्येष्ठ कवी द.भा. धामणस्कर यांच्या आगामी आत्मवृत्तातून :

आपल्या स्वतःच्या अनुभवाशी प्रामाणिक राहणे हा माझ्या कवितेचा प्राण आहे. जे आणि जेवढे आपल्या अनुभवास आले, त्यात कल्पनेची भर न टाकता कवितारूप होऊन कागदावर उमटावे, एवढीच माझी पवित्र आस असते. कवितेत कमीत कमी शब्द असावेत, ही माझी शैली आहे. आलंकारिक नव्हेत तर साधे शब्द ही माझ्या कवितेची सजावट आहेत. कवितांची संख्या मला महत्त्वाची वाटत नाही, तिच्यातील गुणवत्तेची मला ओढ आहे. अशा मानसिक धारणेमुळे नव्वदीच्या पुढे सरकलेल्या आयुष्यभरात मी खूप कविता लिहिल्या असे म्हणता येणार नाही. सगळा तीनशेच्या आतला समाधानी कारभार. कविता लिहून झाल्यावर मला आनंद झाला की कविता माझ्यापुरती पूर्ण होते. तोच आनंद इतरांनाही झाला की कविता सफल संपूर्ण झाली, असं मी म्हणेन. त्या आनंदाचा प्रत्यय देणाऱ्या सुहृदांबद्दल मी अपार कृतज्ञता बाळगून आहे.

**– द. भा. धामणस्कर**


आभार : सदर मुलाखत घेताना, तसेच दभांच्या कवितेविषयी जाणून घेताना अनेक कवी मित्रांचे, लेखकांचे, समीक्षकांचे सहकार्य लाभले, त्यात नीलिमा गुंडी, वीरधवल परब, राजीव जोशी, दा. गो. काळे, राजीव काळे, मनीषा पाटील, हेमकिरण पत्की, रफीज सूरज, 'आशयघन'च्या संजीवनी तडेगावकर, दभांचे कुटुंबीय या सर्वांचा मी आभारी आहे. माझ्यावर सोपवलेल्या आनंददायी जबाबदारीसाठी मी संपादक डॉ. श्री. नरेंद्र पाठक यांचेही आभार मानतो.

**– नारायण लाळे**
भ्रमणध्नी : ९९८७९२४१९९
**– राजीव जोशी**
भ्रमणध्वनी : ९५९४०७४४५३



# डॉ. एस. एल. भैरप्पा
## व्यक्ती आणि वाङ्मय

**रागिणी चंद्रात्रे**



**महाविद्यालयीन** जीवनात आणि त्यानंतरही विद्यार्थी चळवळीत काम करत असताना सामाजिक समानता, जातिभेद निर्मूलन, विषमतेचा अंत आणि समानतेच्या पायावर उभा असलेला भक्कम समाज ह्या संकल्पना अतिशय आकर्षून घेत होत्या. दलित साहित्याचा अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि विचार यात रंगून गेलेले असताना, १९९० साल असावे, हातात एक जाडजूड कादंबरी गवसली, नाव होते, 'जा ओलांडून'. (दाटू) कन्नड लेखक डॉ. एस. एल. भैरप्पा आणि मराठी अनुवादक श्रीमती उमा कुलकर्णी! थोड्याशा कुतूहलाने वाचायला सुरुवात केली आणि झपाटल्यासारखे वाचतच गेले. भारतीय समाजातील जातीपातींच्या एका विस्तीर्ण पटाचे दर्शन झाले. ब्राह्मण नायिका सावित्री व बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारा नायक सत्यवान यांच्या जीवनाशी संबंधित कहाणी पुढे पुढे सरकत जाते तेव्हा समाजातील विविध प्रवाह त्यात मिसळत जातात व वाचक त्यात एखादी भूल पडल्याप्रमाणे ओढला जातो. हा लेखक काही वेगळाच आहे. स्वतः तटस्थ राहून लेखन करत वाचकाला भावनांच्या आंदोलनात न्हाऊ घालणारे एस.एल. ऊर्फ संतशिवेर लिंगण्णय्या भैरप्पा हे हदयाच्या आत घर करून बसले.


मग वाचतच राहिले वंशवृक्ष, तंतू, काठ, मंद्र पारखा, गृहभंग, धर्मश्री, उत्तरकांड, पर्व, सार्थ, आवरण... माझे नाव भैरप्पा...


एस हा भैरप्पाचे गावाचे नाव संतशिवेर दर्शवतो. एल हा वडिलांचे नाव लिंगण्णय्या दर्शवतो. भैरप्पांना काही वेळा आपले नाव बदलून घ्यावे असा मोह झाला होता, कालांतराने त्यांनी तो बेत रद्द केला. 'कर्नाटकातील हसन जिल्ह्यातील संतशिवरा गावी त्यांचा जन्म झाला. आई गौरम्मा, अतिशय सात्त्विक, धर्मपरायणतील सर्वांवर प्रेम करणारी, जातपात मानण्यातील वैयर्थता जाणून असलेली स्त्री होती. त्या काळात स्वतः शानभोगकीचे व्यवहार लिहून काढणारी स्त्री होती. तिच्याच सात्त्विक संस्कारावर भैरप्पांचे देह-मन पोसलेले जाणवते. गौरम्माना एकूण आठ अपत्ये झाली. कष्टमय संसाराचा गाडा ओढताना त्यातल्या अनेकांचे मृत्यू स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याचा दुष्कर प्रसंग त्यांच्यावर ओढावला. भैरप्पांचे बालपण अतिशय यातनामय गेले. डोळ्यांसमोर प्लेगचे मृत्युतांडव पाहिले. त्यात आपल्याच मोठ्या भावाचे व नवविवाहित बहिणीचे निधन पाहिले. दारिद्र्याची भरपूर झळ सोसली. भिक्षान्न मागणे, वारावर जेवणे, उदबत्तीपुडे विकून हमाली करणे, स्वतःच्या सख्ख्या मामाकडून रक्त ओकेपर्यंत मार खाणे, स्वतःचे वडील म्हणजे 'गृहभंग' कादंबरीतील पूर्ण नाकर्ते चेंनिंगराय! त्यांनी मुलांचे पालन-पोषण करण्याऐवजी त्यांना सतत त्रासात टाकले. अशा परिस्थितीत लहानपण गेलेली कोणीही व्यक्ती पुढील आयुष्यात किती कडवट बनेल, पण भैरप्पांसारखी तत्त्वज्ञानाचा नुसता अभ्यास न करता तत्त्वज्ञान जगलेली व्यक्ती आसपासच्या समाजावर मनापासून प्रेम करताना दिसते. बालपणीच्या या सर्व काळात वावरताना भैरप्पांच्या निरीक्षण शक्तीचा प्रत्यय येतो. वेगवेगळ्या जातींची माणसे, वेगळ्या जातीतल्या माणसांकडे खाण्याची बंदी, त्यामुळे घातल्या जाणाऱ्या बहिष्कारांची भीती याचा अनुभव भैरप्पांनी घेतलेला होता. त्यातही वक्कलिंग, धनगर, बेस्तर (परीट), कोष्टी इत्यादी वेगवेगळ्या जातींतील रूढी-परंपरांचा चांगलाच परिचय भैरप्पांना होता. 'जा ओलांडून' (दाटू) या कादंबरीत त्यामुळेच हा जातीपातीचा व्यामिश्र पट आपल्याला पाहायाला मिळतो. घरातून पलायन, हमाली, साधूंच्या जथ्यात वावरूनही पुन्हा हा अवलिया परत आला. आपले शिक्षण पूर्ण करून 'सत्य आणि सौंदर्य' या विषयावर पीएच.डी. पूर्ण करून फिलॉसॉफी हा विषय त्यांनी पूर्णपणे स्वतःचा मानला. तत्त्वज्ञान, तुला रोजची रोजी रोटी (breadbutter) कमाविण्याची संधी देणार नाही असे सांगणाऱ्या गुरूला त्यांनी मी माझी स्वतःची बेकरी उघडेन व ब्रेड तयार करून उपजीविका करेन असे आत्मविश्वासपूर्ण उत्तर दिले. मिळेल त्या नोकऱ्या करत प्राध्यापकीपर्यंत पोचणाऱ्या भैरप्पांना तत्त्वज्ञानपर विषयात संशोधन करत त्यांना मोठे मोठे चिंतनपर प्रबंधही लिहिता आले असते, पण सामान्य माणसाचे जीवननाट्य, त्यातून होणारी रसनिष्पत्ती यावर भैरप्पांचे अधिक प्रेम होते, त्यामुळे आपणा सर्वांचे नशीब थोर म्हणून त्यांनी तत्त्वज्ञानपर संशोधनात पुढे जाण्याऐवजी ललित कादंबरी लेखनाचा मार्ग स्वीकारला.


सन १९५८ मध्ये भैरप्पांनी 'भीमकाया' ही आपली पहिलीवहिली कादंबरी लिहिली आणि त्यानंतर १९६२ मध्ये 'वंशवृक्ष' ही कादंबरी लिहिली. त्यावेळी भैरप्पा अवघे तीस वर्षांचे होते. एवढ्या लहान वयात भैरप्पांनी तत्त्वज्ञानाची बैठक, त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा केलेला विचार, मूल्यव्यवस्थांचा धरलेला आग्रह या सर्वांचे दर्शन 'वंशवृक्ष'मध्ये होते.


श्रीनिवास क्षोत्रींच्या रूपात, आपला जीवनधर्म न सोडता, अगाध संकल्पशक्तीच्या जोरावर स्वतःला अन्यय-भावाने धर्माला अर्पण केलं तर तोच धर्म आपल्याला मार्ग दाखवतो असा मानणारा नायक त्यांनी रंगवला आहे. धर्मो रक्षति रक्षितः या उक्तीवर श्रीनिवास क्षोत्रींचा पूर्ण विश्वास आहे.

'एका वंशाच्या वृद्धीसाठी एका क्षेत्राचं दान केलं जातं, त्या वंशाचे बीज धारण करून त्याचा वृक्ष केला की त्या क्षेत्रांच्या जीवनचं सार्थक होतं' हे क्षोत्रींचं म्हणणे कात्यायनीला आयुष्याच्या शेवटी पटते. बीज क्षेत्र न्याय आणि वंशवृक्षाची संकल्पना यांचा ऊहापोह या कादंबरीत आला आहे. या कादंबरीतील इतिहासकार प्रो. सदाशिवराव, त्याची दुसरी सुविद्य पत्नी करुणारत्ने ही पात्रे भैरप्पांना वास्तव जीवनाच्या निरीक्षणातूनच सुचली आहेत. सदशिवरावांचा धाकटा भाऊ राज, त्याची वहिनी नागम्मा, सासू भागम्मा व घरातल्या सदस्याप्रमाणे राहणारी लक्ष्मी या सर्वांचे चित्रण मनोज्ञ आहे. जीवनाच्या मार्गावरून चालताना मोहाला थारा न देता धर्माला उच्च स्थान देणाऱ्या श्रीनिवासला आपण क्षोत्री घराण्याचे वंशजच नाही हे कळले तेव्हा तो कोलमडून पडतो. पण त्यांची बुद्धी, कर्तव्य निष्ठा, धर्म सोडत नाही. म्हणूनच तो आपली सगळी संपत्ती योग्य हाती पडावी यासाठी योग्य वारसाचा शोध घेत राहतो. कुठल्याच संकटाने त्याची धर्मपरायणता ढळत नाही. यांचे चित्रण भैरप्पांनी अतिशय तरलतेने केले आहे.




'इतरांच्या पाप-पुण्याचा विचार करायचा अधिकार आपल्याला नाही, त्यातही आईवडिलांच्या जीवनाचे मोजमाप करणे महापाप! मातृत्व, पितृत्व, भ्रातृत्व सगळ्यांच नात्यांना वंशवृक्षाच्या छायेतच अर्थ आहे.' हे श्रीनिवासचे चिंतन पथदर्शक वाटते. ही कादंबरी भैरप्पांनी केवळ ३१ दिवसांत लिहून काढली आहे. या कादंबरीसाठी भैरप्पांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे आणि अनुवादाला पुरस्कार द्यायला सुरुवात झाली तेव्हा पहिला पुरस्कार 'वंशवृक्ष'ला अनुवादासाठी उमा कुलकर्णींना दिला गेला हे विशेष वाटते.

'गृहभंग' ही एक भैरप्पांची हृदयाला हात घालणारी कादंबरी. बहुतांश त्यांच्या स्वतःच्या आत्मचरित्रावर बेतलेली. भांडखोर गंगम्मा, तिची दोन मुले अप्पण्णय्या व चेनिंगराय तीही आईवरच गेलेली. आईला शिव्या घालणारी व स्वतः काही न करणारी, त्यातल्या चेनिंगरायची कष्टाळू व संस्कारी पत्नी नंजम्मा हिच्या भीषण जीवनसंघर्षाची ही कथा! पती काहीही न करणारा, पदरात तीन मुले, परिस्थिती रेटण्यासाठी स्वतः शानभोगकी करून हिशोब लिहिणारी, नाचणीचे उकडलेले गोळे तरी दोन वेळा मुलांच्या पोटी पडावेत यासाठी प्रयत्न करणारी. प्लेगच्या भीषण साथीत पोटच्या दोन तरण्याबांड मुलांचा मृत्यू डोळ्यांसमोर बघणारी व तिसरा लहान मुलगा तरी वाचू दे म्हणून अथक प्रयत्न करणारी नंजम्मा व तिची जिजीविषा मनाला भिडते. स्वतःचीच ही कथा असल्याने भैरप्पांनी तटस्थपणे वाचकांच्या काळजाला हात घालत रेखाटली आहे.

आधुनिक शहरी जीवन, त्यातली हरवत चाललेली जीवनमूल्ये, याचे चित्रण भैरप्पांनी 'तंतू' या कादंबरीतून केले आहे. कादंबरीत कथानक, उपकथानक, विविध पात्रे यांचे असंख्य धागे गुंफत एक फार मोठा कॅनव्हास भैरप्पा वाचकांपुढे मांडतात. त्याचवेळी मनात एक खंत उतरत जाते ती म्हणजे मराठी कादंबरीत इतका व्यामिश्र आणि विस्तृत असा जीवनपट आपण पाहिलेला नाही.

यानंतरची मला अत्यंत भावलेली त्यांची कादंबरी म्हणजे 'तब्बलिनीनाद मगने'. ह्या कानडी नाव असलेल्या कादंबरीचा अनुवाद 'पारखा' किंवा हिंदीत 'गोधली'! गाईला देवतास्वरूप मानून तिची पूजा करणारा कालिंगज्जा आणि तिला केवळ दूध व मांस देणारा प्राणी मानणारा त्याचा अमेरिकेतून परतलेला नातू या दोघांच्या मूल्य-संवेदनावरील संघर्ष हा या कादंबरीचा विषय!

त्याचबरोबर ही कादंबरी भारतीय संस्कृतीच्या मुळाशी जाऊन काही मूल्यांचा शोध घेताना दिसते. या विषयावरची कादंबरी लिहिताना भैरप्पांनी विविध प्रांतांतील अनेक डेअरींना भेटी दिल्या. तिथल्या पशूंचे वाईट अवस्थेतील जीणे, हार्मोन्सची इंजेक्शने, सतत कृत्रिमरीत्या होणारे फलन, यंत्राद्वारे काढले जाणारे दूध हे पाहून ते हेलावून गेले. जे निसर्गतः आहे त्या प्रेरणा तरी पशूंना सुखाने जगू दे असे भैरप्पांना वाटते.

या कादंबरीतील कलिंगगौडा, दिलेला शब्द पाळण्यासाठी, वाघाच्या तोंडी जाऊनही शंकराच्या कृपेने माघारी गोठ्यात परतलेल्या पुण्यकोटी गाई, कलिंगगौडाच्या पदरी राहणारे नरसिंह जोइस, कलिंगगौडाची पत्नी लक्कम्मा, सून तायम्मा जी जन्मतःच मुकी आहे पण तिला ऐकायला येते, कलिंगगौडाचा मुलगा कृष्णा, नातू पुट्टकलिंग, त्याची गोमांस खाणारी विदेशी पत्नी हिल्डा या सर्वांच्या व्यक्तिरेखा भैरप्पांनी ताकदीने रेखाटल्या आहेत.

रामायण आणि महाभारत ही दोन्ही महाकाव्ये भारतीय माणसाच्या मनातली श्रद्धास्थाने! या दोन्ही महाकाव्यांवर भैरप्पा व्यक्त झाले आहेत, पण ते इतक्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने, की वाचक केवळ थक्क होऊन या कादंबऱ्यात बुडून जातात.

'पर्व' ही महाभारतावरील कादंबरी भैरप्पांनी त्यांच्या दिल्लीच्या वास्तव्यात लिहायला सुरुवात केली. त्याआधी जिथे जिथे महाभारत घडले त्या सर्व ठिकाणांना त्यांनी भेटी दिल्या. कुरुक्षेत्र, हिमालयातला पांडवाचा शेवटच्या मार्गक्रमणा केलेला मार्ग. कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हा त्यांनी रेखाटलेली कौरव, पांडव, कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, कर्ण यांची मानवीय रूपे पाहून वाचक थक्क होऊन जातात. त्यामुळे कादंबरीला असलेला पुराणकथेचा संदर्भ पुसट होऊन जातो व मानवी भावनांचे स्पर्श त्यात मुरत जातात. या सर्व व्यक्तिरेखा दैवी राहत नाहीत तर त्यांचे ही राग, लोभ, क्रोध, मत्सर या भावनांचे दर्शन घडून त्यांचे पाय मातीचे भासतात. या कांदबरीत १४ विभाग असून प्रत्येक भागात एकेक पात्र आपली भूमिका मांडते. यातील कुंती, द्रौपदी यांच्या मनातील कधीही न ऐकलेल्या भाव-भावना 'पर्व'मध्ये वाचायला मिळतात. 'पर्व' प्रसिद्ध झाल्यावर या कादंबरीवर अनेक उलट-सुलट चर्चा झाल्या. आरोप-प्रत्यारोप झाले. तरी 'पर्व'वर वाचकांच्या पसंतीची मोहोर उठली आहे.

सीतेच्या जीवनाचा वेध घेणारी 'उत्तरकांड' ही अशीच आगळी साहित्यकृती आहे. मुळात उत्तरकांडहा भागच सीतात्यागाचा, तिने लवकुशांना जन्म देण्याचा व संगोपनाचा असा आहे. त्यामुळे सीता एक महाराणी म्हणून नाही तर कष्टकरी स्त्री, आश्रमवासिनी जीवन जगणारी व आई म्हणून आपल्याला भेटते. ही अतिशय तेजस्वी व मानी आहे. मुलांचे उत्तम संगोपन करते पण अयोध्यावासींपुढे पुनःपुन्हा आपले चारित्र्य शुद्ध असल्याचे सिद्ध करणे नाकारून आपल्या वनजीवनात परतते. सीतेशिवाय जगू न शकणारा राम आधी देह त्याग करतो व मग मातीत चौकोनी पाळणा तयार करून त्यात झोपून देहत्याग करणारी सीता अधिकच मनस्विनी वाटते.

भैरप्पा हुबळीमध्ये प्राध्यापक असताना विदेशी आर्थिक मदत घेऊन अनेक ख्रिस्ती धर्मप्रसारक ख्रिस्ती धर्माचा प्रसार करत. येशूच्या कृपेने आजारातून बरे व्हाल असा अपप्रचार करत उत्तंगी चन्नमा यांनी ख्रिश्चन धर्म हिंदू धर्मापेक्षा कसा श्रेष्ठ आहे हे सांगणारी पुस्तिका लिहिली होती. त्याचा अभ्यास करून भैरप्पांनी त्यावर लेख लिहिला. त्यामुळे भैरप्पांना कॉलेजमधून बडतर्फ करावे अशी मागणी ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी केली. पण भैरप्पा आपल्या मतांवर ठाम राहिले. कॉलेज व्यवस्थापनाशी वाद घातला. प्राध्यापक होऊनही चुकीच्या गोष्टीविरुद्ध आवाज उठवायची धमक भैरप्पांमध्ये होती. त्यांनी ख्रिश्चन धर्मप्रसारकांच्या कारवाया, त्यांच्या प्रयत्नांना बळी पडणारी दुर्बळ माणसे यावर 'धर्मश्री' ही कादंबरी लिहिली. ती चांगलीच गाजली. धर्मांतराची समस्या, त्याची वेदना, सारा हिंदू समाज ज्यात तळमळत आहे तो जातिरोग यावर या कादंबरीत भाष्य केले आहे.

'आवरण' ही भैरप्पांची अत्यंत गाजलेली कादंबरी. जिच्या ३४ आवृत्त्या निघून वाचकांनी डोक्यावर घेतलेली कादंबरी आहे. विस्मरणाने सत्य झाकोळून टाकणाऱ्या मायेला आवरण म्हणतात. ही त्यांची दुसरी ऐतिहासिक कादंबरी! या शतकातील संधिकाळाचे अंतःसत्त्व 'सार्थ'मध्ये कादंबरीरूपाने मांडायचा प्रयत्न केला आहे, तर 'आवरण'-मध्ये 'सार्थ'नंतरच्या सत्याचा वेध घेण्यात आलेला आहे. इतिहास व इतिहासकार दोघांनाही 'आवरण' कवेत घेते. मूळची लक्ष्मी रजिया बनून आमिरशी लग्न करते व आपल्या धर्मापासून-विचारांपासून दूर होते. हंपीला जाऊन तिथे इतिहास संशोधन करताना तिला काही वेगळ्याच गोष्टी आढळतात. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गावात घरात राहून ती कागदपत्रांचा शोध घेते व तिच्या दृष्टिकोनात फरक पडत जातो. याच कादंबरीत उपकादंबरी आकार घेते व मोगल साम्राज्यात खोज्या बनलेल्या एका हिंदू राजकुमाराची कथा पुढे साकारते. या कादंबरीने अक्षरशः इतिहास रचला. आतापर्यंतचे मुस्लीम राज्यकर्त्यांविषयींचे सगळे Narratives खोटे ठरले. यावरून कन्नड साहित्यिक व डाव्या विचारांचे समर्थन करणारे साहित्य वर्तुळातील साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणात टीका केली. भैरप्पांनी आपले सर्व म्हणणे संदर्भग्रंथाची सूची देऊन स्पष्ट केले. त्यातला सर्वात जास्त चाललेला वाद म्हणजे टिपू सुलतानाचे अन्यायी, अत्याचारी राज्यकर्त्यांचे रूप लक्ष्मी आपल्या लेखनातून पुढे आणते तेव्हा टीकाकारांनी टिकेची धार आणखीच तीव्र केली. त्यावर भैरप्पांनी संदर्भग्रंथाची सूची देऊन इतिहास हा नेहमीच पुराव्यांनी लिहिला जातो. सर्व दिलेले पुरावे तुम्ही वाचा असे ठामपणे सांगितले व

टिपू सुलतानाच्या बाबत केलेल्या लेखनात बदल करायला ठाम नकार दिला.

भैरप्पांची लेखनसंपदा ही अशी अपार आहे. सर्वच साहित्याबाबत लिहिणे या एका लेखात शक्य नाही. पतररु या साऱ्या कादंबरीलेखनातून व 'माझं नाव भैरप्पा' या त्यांच्या आत्मकथनात्मक पुस्तकातून जे भैरप्पांचे व्यक्तिमत्त्व समोर उभे राहते ते फारच भारून टाकणारे आहे. मृदू स्वभाव, समोरच्या माणसाला जाणून घेण्याची वृत्ती, दुसऱ्याला मदत करण्याचा स्वभाव या गुणांमुळे भैरप्पांचे व्यक्तिमत्त्व वेगळेच उठून दिसते. ते म्हणतात मला भाषणाला बोलावण्यापेक्षा मला तुमच्या घरी बोलवा, तुमच्या गावी येईन, सर्वांशी गप्पा मारेन. भाषण देणे त्यांना संकट वाटे. असे माणसांवर इतके मनापासून प्रेम करणारे भैरप्पा आपल्या निरीक्षणशक्तीच्या जोरावर म्हणूनच माणसांचे इतके विविधरंगी दर्शन आपल्या साहित्यातून घडवू शकले आहेत.

वाचकांचे प्रचंड प्रेम लाभलेल्या भैरप्पांना टीका-कारांच्या टीकेला तेवढेच सामोरे जावे लागले. त्यांच्या 'जा ओलांडून' (दाटू) या कादंबरीवर ही कर्नाटकात खूप टिका केली गेली. दलित मोहनदास आणि ब्राह्मण सत्यभामा यांचा विवाह न होऊ देऊन भैरप्पांनी जातीय सोवळं दाखवल आहे. असा आरोपही त्यांच्यावर केला गेला. मात्र महाराष्ट्रातील वाचकांनी 'दाटू'चे मनापासून स्वागत केले.

अनंतमूर्ती व भैरप्पा हे कन्नड साहित्यातील समकालीन लेखक, पण अनंतमूर्तींना पुरोगामी व भैरप्पांना प्रतिगामी मानले जात होते. पण या साऱ्या टीकेचा परिणाम भैरप्पांच्या वाचकप्रियतेवर कधीच झाला नाही. वाचकांनी सदैव त्यांच्या कादंबऱ्यांचा आस्वाद घेतला. त्यांच्या कादंबऱ्यांत भारतीय जीवनाचे मूळ चिंतन, प्रखर जीवनमूल्ये जाणवतात. त्यांच्या कादंबरीतील तत्त्वज्ञानाची चर्चा वाचकाला आपलीशी वाटते. त्याच्या साहित्यांवर होणाऱ्या टीकेदरम्यान भैरप्पांच्या घरावर काही समाजकंटकांनी दगडफेक केली. परंतु भैरप्पांनी कधीही कोणाचे नाव घेतले नाही. भैरप्पांच्या सहवासात राहण्याचे भाग्य ज्यांना लाभले त्या सर्वांनी, तसेच त्यांचे विविध भाषांतल्या अनुवादकांनी भैरप्पांच्या मृदू, प्रेमळ, दुसऱ्याला मदत करणाऱ्या त्यांच्या स्वभावाचे वर्णन केले आहे. लहानपणीच्या खडतर जीवनानुभवाबद्दल कधीच कटुता बाळगली नाही. भारत देशाबद्दल, इथल्या तत्त्वज्ञानाबद्दल अत्यंत प्रेम भैरप्पांच्या मनात असल्यामुळे इथल्या समाजजीवनातील प्रत्येक पैलूचा अभ्यास त्यांनी केलेला आहे. त्यांचा व्यासंग खूपच दांडगा आहे. त्यांनी इंग्रजीबरोबरच फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इटालियन, रशियन भाषेतील साहित्याचा अभ्यास केलेला आहे. 'उपनिषदे, बुद्धाची व्याख्याने, नागार्जुनाची तत्त्वे मीमांसा, अद्वैतातील सत्य, मिथ्या कल्पना, रामकृष्ण संवाद आजही मला केवळ महान तत्त्वज्ञान नाही तर साहित्याची प्रेरणा देणाऱ्या कृती होऊन राहिल्या आहेत', असे भैरप्पा सांगतात. त्याचबरोबर पाश्चात्त्य जगातील सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, प्लेटो, डेकॉल्ट, स्पिनोजा, काण्ट, हेगेल, नीत्शे, शोपनहॉवर, मार्क्स यांच्याही तत्त्वज्ञानाचा परामर्श त्यांनी घेतला होता. या सर्वांचा अभ्यास करून भारतीय तत्त्वज्ञान व मूल्ये किती श्रेष्ठ आहेत याचे दर्शन त्यांनी वाचकाला घडवले. भारतीय जीवनमूल्यांवर त्यांची आंधळी भक्ती नव्हती, त्यांच्या सर्वच लेखनाला सत्याचा आधार होता. सत्य अनुसारण्यातूनच सौंदर्यनिर्मिती होते यावर त्यांचा विश्वास होता. याचेच संस्कार त्यांनी आपल्या वाचकांवर केले. कन्नड भाषेत लेखन करून ते फक्त प्रादेशिक लेखक राहिले नाहीत तर इंग्रजी बरोबरच भारतातील सर्व भाषांमध्ये त्यांचे साहित्य अनुवादित झाल्यामुळे ते भारताचे राष्ट्रीय कादंबरीकार आहेत. आपल्या साहित्यातून त्यांनी समाजाच्या सर्व स्तरांतील वाचकांवर भारतीयतत्त्वाचे संस्कार केले आहेत. त्यांनी मांडलेला आशय झालेल्या अनुवादात अतिशय प्रवाहीपणे उतरला आहे. अर्थातच उमा आणि विरुपाक्ष कुलकर्णी या दाम्पत्याचे आपल्या सर्वांवर डोंगराएवढे उपकार आहेत की त्यांनी भैरप्पांचे साहित्य आपल्यापर्यंत पोचवले.

तत्त्वज्ञानाचा गाढा व्यासंगी प्राध्यापक असून केवळ आपल्या संशोधनात मग्न न राहता भैरप्पा सामान्य वाचकांपर्यंत पोचतात व समाज्याच्या सर्व स्तरातील व्यक्तिरेखा तपशीलवारपणे रसदार कथेच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोचवतात यातच त्यांचे आभाळाएवढे मोठेपण दिसून येते.

अशा या ज्येष्ठ-श्रेष्ठ साहित्यिकाला भावपूर्ण श्रद्धांजली!

**– रागिणी चंद्रात्रे**
भ्रमणध्वनी : ९८६९६८५१०१

# हायकूच्या वाटा

## विजय पाडळकर

**सुमारे** चार वर्षांपूर्वी मी ज्यावेळी जपानी हायकूच्या संदर्भातील माझे 'घंटेवरले फुलपाखरू' हे पुस्तक लिहिले, त्यावेळी त्या पुस्तकाच्या प्रास्ताविकात मी लिहिले होते, 'हायकू ही एक पायवाट आहे. या वाटेला पुढे अनेक रानवाटा फुटतात. वाटेवरले गवत तुम्हाला एका दिशेने घेऊन जाते, त्यावर उडणारे फुलपाखरू दुसऱ्या दिशेकडे खुणावत असते. कोकिळेची साद तुम्हाला तिसऱ्याच वाटेकडे बोलावते.

'हायकूंच्या वाटेवरून चालल्यानंतर आपण पूर्वीचे राहत नाही.'

२०१६ साली अमेरिकेत सुमारे सहा महिने राहण्याचा योग आला. त्यावेळी प्रथम ही हायकूची पायवाट मला सापडली. नेटवर काही शोधात असताना अचानक 'The Spring of My Life' हे जपानचा महाकवी कोबायाशी इस्सा याचे जीवन आणि त्याचे हायकू यांचा अतिशय वेगळ्या पद्धतीने शोध घेणारे पुस्तक सापडले. मग हायकू शोधण्याचा आणि ते वाचण्याचा छंदच लागला. इस्सा प्रमाणेच मत्सुओ बाशो, योसा बूसां व शिकी हे जपानी हायकूच्या क्षेत्रातील श्रेष्ठ कवी. त्यांनी लिहिलेली पुस्तके वाचल्यानंतर या विषयात मी गुंतत गेलो. सुमारे तीन हजार हायकू वाचले, या कवींपैकी पहिल्या तिघांची चरित्रे अभ्यासली आणि त्यांच्या निवडक अशा पाचशे हायकूंचे भावानुवाद देखील केले.

मात्र या तीन कवींच्या संदर्भात हायकूविषयी माहिती मिळवितानाच हे ध्यानात आले होते की या तिघांचे कार्य तर प्रचंड आहेच, मात्र त्यांच्या शिवायदेखील जपानी साहित्यात हायकू लिहिणाऱ्या लक्षणीय कवींची फार मोठी परंपरा आहे व हे तिघे त्या परंपरेचा महत्त्वाचा, पण एक लहानसा भाग आहेत. जपानबाहेरच्या रसिकांना मुख्यत्वेकरून हे तिघे व त्यांच्यानंतरचा आधुनिक कवी शिकी हेच ठाऊक असतात. काही दिवसांपूर्वी पुन्हा अमेरिकेत आल्यावर मी अशा अलक्षित असलेल्या कवींचा शोध घेण्यास सुरुवात केली. पायवाटाकडून रानवाटांकडे वळलो आणि त्या वाटेवर असंख्य मोहक रानफुले उमललेली मला आढळली. प्रस्तुत लेखात त्यांच्यापैकी काही निवडक फुलांचा गुच्छ मी सादर करतो आहे. तत्पूर्वी जपानी कवितेविषयी थोडे–



बहुतेक साऱ्या संस्कृतीप्रमाणे सुरुवातीच्या काळात जपानमध्ये दीर्घकाव्यांची परंपरा होती. इसवी सनाच्या आठव्या शतकात कवींनी वेगळ्या प्रकारची, 'लघुकाव्ये' रचण्यास सुरुवात केली. ही एक नवी परंपरा निर्माण होते आहे हे ध्यानात आल्यावर अशा प्रकारच्या कवितांना 'तांका' हे नाव देण्यात आले. नंतरच्या दोन शतकातच या काव्यप्रकाराची लोकप्रियता इतकी वाढली की बहुसंख्य कवी दीर्घकाव्याला विसरूनच गेले. यापूर्वी जपानी कवितेसाठी 'वाका' हे नाव सरसकट वापरले जात होते. आता ते या 'लघुकाव्या'साठी वापरले जाऊ लागले. ही लघु कविता सर्वसाधारणपणे ५ units मध्ये विभागून लिहिली जात असे. या unit मध्ये एकंदर ३१ 'ओन' उच्चारांचे एकक असून त्यांची विभागणी ५/७/५/७/७च्या रचनेत केली जाई.

*'थरथरणाऱ्या फुलाचा चेहरा*
*सुकला आहे*
*मी शून्यपणे पाहत राहतो*
*जग वृद्ध होत जाते*
*पाऊस पडत राहतो'*

पंधराव्या शतकात जपानमध्ये 'रेंगा' हा काव्यप्रकार अतिशय लोकप्रिय बनला होता. रेंगा'चा अर्थ कवितांची कडी. अनेक कवी मिळून या रेन्गाची निर्मिती करीत. या रचनेसाठी फार कडक असे नियम असत व ते पाळावेच लागत. सुरुवातीला कवींचा प्रमुख एक होक्कू लिहित असे. तो सतरा 'ओन'चा असून ५-७-५ अशा ओनमध्ये विभागाला जाई. ओन हे जपानी भाषेतील उच्चाराचे एकक. यानंतर दुसरा कवी 'वाकीकू' लिहित असे. हा १४ ओनचा असून त्याची विभागणी ७-७ अशी केली जाई. या 'वाकिकू'मध्ये पहिलाच विषय कायम ठेवून त्याला काही कलाटणी देण्याचा प्रयत्न केला जाई. यानंतर तिसरा कवी ५-७-५ ओनची व चौथा ७-७ची रचना सादर करीत असे. अशी १०० कडवी देखील लिहिली जात. मात्र ३६ कडव्यांची रचना सर्वांत लोकप्रिय होती व तिला 'कासेन' म्हटले जाई.

या रेन्गातून पुढे 'हायकू'चा जन्म झाला. प्रत्येकाने एक स्वतंत्र 'होक्कू' लिहिण्याची कल्पना पुढे आली व लोकप्रिय बनली. मात्र आज प्रचलित असलेला 'हायकू' हा शब्द Hi म्हणजे वेगळा, आणि ku म्हणजे ओळी. विसाव्या शतकात प्रथम वापरला गेला. सुमारे १४व्या शतकापासून 'होक्कू' लिहिणाऱ्यांची एक स्वतंत्र परंपरा निर्माण झाली. या परंपरेतील लिओ सोगी १४२१-१५०२ हा एक महत्त्वाचा कवी मानला जातो. एका सामान्य कुटुंबात त्याचा जन्म झाला. १४५७ पर्यंतच्या त्याच्या आयुष्याविषयी काहीच माहिती उपलब्ध नाही. त्याच्या वयाच्या तिशीनंतर त्याला रेन्गाचा एक मान्यवर कवी म्हणून मान्यता मिळू लागली. पुढे त्याने स्वतंत्रपणे रचना करण्यास सुरुवात केली. तो सतत फिरत असायचा म्हणून त्याला 'प्रवासी कवी' असेही म्हटले जाई. आपले हे जीवन शब्दबद्ध करणारी त्याची एक प्रसिद्ध रचना आहे-

*'प्रवासात आहे*
*सध्याचा फक्त*
*पावसापासून तात्पुरता आडोसा'*

१७ ओनमध्ये निसर्गाचे एक नेमके शब्दचित्र रेखाटण्याची पद्धतही त्याने सुरू केली. त्याचा आणखी एक प्रसिद्ध हायकू असा-

*'अजून बर्फ उरला आहे*
*धुक्यात दडलेल्या पर्वतउतरणीवर*
*वसंतातील संध्याकाळ'*

आपल्या देशाला 'उगवत्या सूर्याचा देश' असे म्हणवून घेणे जपानी माणसाला आवडते. मात्र या संदर्भात सोगी लिहितो,

*'उगवत्या सूर्याच्या देशात देखील*
*जगणारा प्रत्येक जण*
*त्रास सहन करतोय'*

हायकूचा कवी केवळ स्वतःचाच विचार करीत नाही; निसर्गाबरोबर आपले नाते तर तो शोधतोच, तसेच तो आपल्यासोबत जगणाऱ्या माणसांच्या सुखदुःखांचाही विचार करतो.

आकीदा मोरीताके १४७२-१५४९ हा सुरुवातीच्या काळातील होक्कू लोकप्रिय करणारा एक मनस्वी कवी. मे महिन्यांत चेरीला बहर येतो व काही काळाने ती फुले जमिनीवर पडू लागतात. हे एक अतिशय रम्य असे दृश्य असते. हे पाहताना कवीच्या मनात निसर्गातीलच एक दुसरी सुंदर प्रतिमा जागी होते. तो लिहितो-

*'पडलेले फूल*
*फांदीकडे परततेय की काय?*
*छे! हे तर फुलपाखरू'*

फुलाचे जीवन जसे क्षणिक, तसेच फुलपाखराचे देखील. फूल झाडापासून तुटल्यावर पुन्हा नव्या रूपात झाडाकडे जाते आहे, ही कल्पनाच विलक्षण. पण असे हे क्षणिक वाटणे आणि लगेच तसे नाही हे जाणवणे, हे द्वैत हाच हायकूचा प्राण आहे. प्रत्येक उत्तम हायकू हा जीवनाचे द्वैती रूप दर्शविणारा असतो. जवळ आणि दूर; समोर आणि पार्श्वभूमीला; भूतकाळ आणि वर्तमानकाळ, ध्वनी आणि शांतता; क्षणभंगुरत्व आणि अमरता यांचे द्वैत हायकूतून व्यक्त होत राहते. मोरीताकेला ७५ वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले. आपला अंत जवळ आला आहे, हे जाणवल्यावर त्याने त्याचा शेवटचा होक्कू लिहिला-

*'माझ्या आयुष्याचा विस्तार*
*आज भासतोय*
*फुलाच्या आयुष्याएवढा'*

आपल्या आयुष्याचा शेवट जाणवू लागल्यावर 'निरोपाचा होक्कू' अनेक कवींनी लिहिला आहे. एक अनामिक कवी लिहितो,

*'तुझे उरलेले गाणे*
*मी ऐकेन त्या जगात*
*प्रिय कोकिळ'*

निसर्गाचे भव्य, सुंदर रूप पाहिल्यानंतर ते शब्दात पकडण्याच्या पलीकडले आहे असे कवींना जाणवते. याशुहारा तेईशित्सू १६०९-१६७३ असा प्रयत्न करताना लिहून जातो-

*'हे पहा, ते पहा...'*
*एवढेच मी म्हणू शकतो*
*पर्वतावरील बहर पाहून...'*

अर्थात त्याला येथे चेरीच्या बहराचे वर्णन करायचे नसून स्वतःच्या मनःस्थितीचे वर्णन करावयाचे आहे, हे रसिकांना जाणवते.

चेरीचा बहर हे जपानी जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे आणि हायकू कवितांचे देखील. असा एकही हायकू कवी नसेल, ज्याने या बहराच्या संदर्भात हायकू लिहिला नाही. मात्र काही कवींनी आपली वेगळी अशी आवडही नोंदली आहे.

निशियामा सोयेन १६०५-१६८२ हा कवी लिहितो-

*'चेरीचा बहर देखील*
*बरोबरी नाही करू शकत*
*आज रात्रीच्या चंद्राची'*

शिदा योबा १६६३-१७४० लिहितो-

*'झाडून लख्ख केल्यावरही*
*अंगणात टपटपलीत*
*आणखी काही फुले'*

हे निसर्गसौंदर्य फक्त कवीलाच मोहवते असे नाही, फकिरालाही त्याची भूल पडते. सेईगेत्सू इनोउ १८२२-१८८७ याचा एक प्रसिद्ध हायकू आहे-

*'फकीर सुद्धा*
*कटोरा फेकून देतो*
*पर्वतावर बहर पाहून'*

निसर्गाशी एकरूप होताना कवी एक तरल आध्यात्मिक अनुभव घेतो. जणू परमेश्वराचा साक्षात्कारच. सेईसेन्सुई ओगीवारा १८८४-१९७६ हा अलीकडल्या काळातील हायकूकार लिहितो-

*'बर्फ पाण्यावर पडतोय,*
*पडतोय*
*पाण्याच्या आत देखील'*

पाण्यावर पडणारा बर्फ पाण्याच्या आत प्रवेश करतो, कवीच्या मनात देखील. आणि हायकू वाचताना त्या बर्फाने आपल्या मनातही प्रवेश केला आहे, असे जाणवते.

बहुसंख्य जपानी हायकूकार हे बुद्धावर निरतिशय विश्वास असणारे आहेत. पण तितकाच विश्वास त्यांचा निसर्गाच्या रूपांवर आहे. किंबहुना या रूपांतच त्यांना अनेकदा परमेश्वराचे दर्शन घडते. ओगीवारा लिहितो,

*'माझा बुद्धावर विश्वास आहे*
*आणि सत्यावर,*
*आणि हिरव्या कुरणांवर'*

आणि कधीकधी कवी निसर्गाशी एकरूप होताना परमेश्वराकडे पाठही फिरवतो. मासायोका शिकी १८६७-१९०२ हा आधुनिक काळातील सर्वश्रेष्ठ हायकूकार म्हणून मानला जातो. त्याने लिहिले आहे-

*'मी पाठ वळविली बुद्धाकडे*
*आणि न्याहाळतो आहे*
*शीतल चंद्र'*

शिकीचा आणखी एक उत्कट हायकू आहे, शरद ऋतु संपत आलेला आहे. आता पानगळ सुरू होईल. साऱ्या पृथ्वीला थंडगार बर्फाचा विळखा पडू लागेल. निसर्ग माणसापासून दूर, स्वतःकडेच वळेल. अशावेळी माणसाने काय करावे?

*'शरदऋतु निरोप घेतोय*
*माझ्यासाठी*
*न देव, ना बुद्ध'*

शिकीचा आणखी एक प्रसिद्ध हायकू आहे-

*'झाड तोडले*
*सकाळ लवकर आली*
*माझ्या खिडकीत'*

नवा दिवस उगवणे, खिडकीत सकाळ येणे ही नवी आशा जागवणारी गोष्ट. पण या आनंदाच्या पार्श्वभूमीला झाड तोडल्याची उदास किनार आहे. आयुष्यातील अशा लहान-लहान विरोधाभासांवर हायकू मूक भाष्य करीत जातो.

अर्थात सारेच हायकू जीवनाचा गंभीर अर्थ शोधत नाहीत. हायकू कवी ही देखील माणसेच असतात. आयुष्याचे जसे ते गंभीरपणे निरीक्षण करतात, तसेच कधी कधी त्याच्याकडे मिस्कीलपणेही बघतात. ताकाराई किकाबू १६६१-१७०७ हा कवी लिहितो,

*'उन्हाळ्यातील सायंकाळ, या झुळुका*
*किती चांगले आहे*
*मी पुरुष आहे, स्त्री नाही'*

गरम वाटू लागले तर पुरुषांना अंगातले कपडे काढून टाकता येतात, हा मथितार्थ.

संतोका तानेडा १८८२-१९४१ या आधुनिक कवीला 'भटकणारा कवी' म्हटले जाते. एकोणीसाव्या शतकात हायकूला त्याच्या तंत्राच्या बंधनातून सोडविण्याची जी मोहीम काही कवींनी घेतली, त्यापैकी हा महत्त्वाचा हायकूकार. त्याने हायकूला सतरा ओनचे बंधन कशाला हवे, असा प्रश्न उपस्थित केला. पूर्वीच्या हायकूमध्ये एक 'ऋतुदर्शक' शब्द असणे बंधनकारक होते. याने तेही बंधन मानले नाही. त्याचे काही निवडक हायकू असे-

*'मी चालत राहिलो*
*झोंबणारा वारा मला*
*झोडपत राहिला'*

*'मद्य प्राशन करतो*
*अश्रू ढाळतो*
*वेडपट हिवाळा'*

*'झाडून काढतोय*
*वाळलेल्या पानांसोबत*
*दवबिंदूही'*

*'माझ्या भिक्षेच्या कटोऱ्यात*
*जमा झाल्यात*
*पावसाच्या गारा'*


*'जन्म आणि मृत्यू*
*दरम्यान*
*अखंड हिमवर्षाव'*

जे इतरांपर्यंत पोचवायचे आहे, ते स्पष्ट न सांगता त्याचे सूचन करणे हा हायकूचा एक महत्त्वाचा गुणधर्म. जसजसे आपण आपले विचार शब्दांतून स्पष्ट करीत जातो, तसतसे ते मर्यादित होत राहतात. अनेक अर्थ सूचित करण्याचे त्यांचे सामर्थ्य कमी होते. यामागुची सोदो १६४२-१७१६ याचा एक अतिशय भावोत्कट हायकू आहे. तो लिहितो-

*'वसंत आला माझ्या झोपडीत-*
*इथे काहीच नाही*
*इथे सारे काही आहे'*

हायकूचा अर्थ सांगण्याची, त्याचे गूढ उकलण्याची रसिकाने देखील खटपट करू नये. काहीच नसणे आणि सारे काही असणे या दोन्ही अवस्था एकाच वेळी मनोमन उपभोगण्याचा प्रयत्न करावा...

**- विजय पाडळकर**
भ्रमणध्वनी : ७८२२९५४७०६



# मला भेटलेलं एक ज्ञानपीठ

अनुपमा उजगरे

**शालेय**–महाविद्यालयीन अभ्यासक्रमातल्या मराठीच्या पुस्तकातून परिचित झालेले साहित्यिक कधी प्रत्यक्षात भेटतील, आपल्याशी बोलतील असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. पण काही अकल्पित गोष्टी सत्यात अवचित उतरतात आणि अविस्मरणीय होऊन बसतात, हे खरंय. आज विद्यार्थ्यांसाठी 'लेखक तुमच्या भेटीला' असे कार्यक्रम सहज आयोजित केले जातात. साहित्य संमेलनातून, दूरदर्शन आणि इतर वाहिन्यांवरून '*कवी तो होता असा आननी?*' हे सहज पाहायला मिळतं. पण आम्ही विद्यार्थिदशेत असताना अशी पर्वणी आम्हाला दुर्लभच होती म्हणून त्या गोष्टीचं अप्रूपही वाटत होतं. लग्नानंतर मुंबापुरीत आले तेव्हा पडद्यावरच्या माणसांपेक्षा पुस्तकातल्या माणसांना भेटण्याची मला प्रचंड उत्सुकता होती.

प्रा. रमेश तेंडुलकर सरांच्या नितीनचं रिसेप्शन होतं. मित्राच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये एकाच वेळी बरेच साहित्यिक भेटतील, पाहायला मिळतील, हे मला आधीच निरंजनने सांगून ठेवलेलं होतं. ते जसजसे एक–एक व्यक्ती दाखवत होते, त्यांची नावं सांगून मला चकित करत होते, तसतसा माझ्या मनात आनंद मावत नव्हता. माझ्यासाठी तर ती मेजवानीच होती. एक वृद्ध गृहस्थ समोर दिसले–

निरंजन मला म्हणाले, ''ते बघ, सोपानदेव चौधरी.''

त्यांच्या जवळ जाऊन आम्ही त्यांना नमस्कार केला. एका हाताने निरंजनना नातवाला जवळ घ्यावं तसं जवळ घेऊन आणि दुसरा हात माझ्या मस्तकावर ठेवून सोपानदेव मला म्हणाले,

''आमच्या मित्राचा–भास्कररावांचा नातू आहे हा. चांगला कवी आहे. त्याला जप बरं का?''

सोपानदेवांना भेटून पुढे गेलो. लग्नसमारंभासारख्या प्रसंगी साधा, नुसता धुतलेला सदरा–लेंगा घातलेल्या, अतिशय सामान्य व्यक्तिमत्त्व वाटावं अशा एका व्यक्तीला बरेच जण आदराने आणि आवर्जून भेटताना दिसले. निरंजन म्हणाले,

"ते बघ, ते विंदा तिथे आहेत. चल, भेटुया."

मला संकोच वाटला. एवढ्या मोठ्या कवींना दुरूनच पाहुया, अगदी समोरासमोर जायचं म्हणजे फारच धीटपणा होईल, असं मला वाटत होतं. माझा हात धरून निरंजन मला विंदांसमोर घेऊन गेले. नमस्कार करून मी विंदांना पाहू लागले.

विंदांना पाहताच खरंतर मला आठवायला हव्या होत्या त्यांच्या कविता. पण मला आठवलं ते नुकतंच एम.ए.च्या पहिल्या वर्षाला अभ्यासलेलं त्यांचं 'ॲरि-स्टॉटलचे काव्यशास्त्र.' मला काव्याची आवड होती, मी तेव्हाही कविता करत होते. पण एम.ए.चा अभ्यास बाहेरून करत होते. त्यामुळे 'काव्यशास्त्र' असा बोजड विषय कुणी समजावून सांगितला तरच समजण्यासारखा होता. स्वयं-अध्ययनाने तो कितपत समजेल, अशी शंका मला पुस्तकाचं शीर्षक बघून वाटली होती. मी ते पुस्तक वाचत गेले आणि आपल्या मनात उगाच धडकी भरली होती असं वाटलं. पुस्तकाचा विषय सहज समजेल अशा अतिशय सोप्या भाषेत होता. मला ते पुस्तक मनापासून आवडलं. म्हणूनच विंदांना समोर पाहताच मला त्यांच्या कविता आठवण्यापेक्षा त्यांचं 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र' आठवलं. पण ते पुस्तक आपल्याला समजलं नि त्यामुळे आवडलं वगैरे सांगण्याइतका मोकळेपणा माझ्या स्वभावात नव्हता. निरंजनना मी हे आधी सांगितलं असतं तर कदाचित त्यांनी तरी विंदांच्या कानावर ते घातलं असतं. पण तशी संधीच मिळाली नव्हती आणि आता विंदा अगदी समोर होते. मी आपली मूग गिळून उभी. नुकतंच लग्न झालेल्या आम्हांला विंदांनी आशीर्वाद दिला. मला म्हणाले,

"मुली, तुला कवी नवरा मिळालाय, त्याला जप बरं का?"

मी मनात म्हटलं, सगळे मलाच सांगताहेत त्याच्यातल्या कवीला जप म्हणून. 'कवी असलास तरी हिला जप' असं ह्या कवीला कुणीच सांगत नाही! मी त्या दोन्ही थोर कवींचं वाक्य मनात जपून ठेवलं. पण 'कवीला जपायचं म्हणजे काय,' हे नंतर कळत गेलं. हेमंत जोगळेकरांनी 'कविपत्नींसाठी एक वस्तुपाठ' ह्या शीर्षकाची स्वतःला वगळून आपल्या तीन कविमित्रांच्या संदर्भात मजेदार, पण वास्तवाला धरून एक कविता लिहिल्याचं मध्यंतरी वाचनात आलं होतं,

*'निरंजन नवपरिणीत वधूला घेऊन*
*स्कूटरवरून मुंबईत फिरवताना*
*वाटेतच कुठेतरी विसरून आला.*
*अशोक भाजीबाजारात*
*साधारण तिच्याच आकाराच्या बाईबरोबर*
*कितीतरी अंतर चालत राहिला.*
*नितीन हनिमूनला जाताना*
*तिथे वेळ जावा म्हणून*
*वाचायला पुस्तकं घेऊन गेला.*
*कविपत्नींनी लवकरच*
*आपापल्या नवऱ्याचं पाणी जोखलं.*
*पतीला पदराशी घट्ट बांधलं*
*कवीला आकाशात विहरण्यास सोडून दिलं...'*

मी संकोचामुळे तेव्हा विंदांशी काहीच बोलू शकले नव्हते; पण अधूनमधून झालेल्या घरगुती भेटीगाठींनी हळूहळू संकोच गळून पडला. घरातल्या वडीलधाऱ्यांशी बोलावं इतकं सहज बोलणं होऊ लागलं. निरंजनना 'दिनार' कवितासंग्रहासाठी राज्य पुरस्कार मिळाल्याचं कळल्यावर विंदांचा सकाळी सकाळीच फोन आला-

"निरंजन, तुझं कौतुक म्हणून जेवणाचं आमंत्रण देतोय. तू बायको-मुलांना तर घेऊन येच. शिवाय आई-बाबांनाही घेऊन ये."

पाडगावकरांचे मित्र आणि मेहुणे ह्या नात्याने बाबांशी त्यांचा चांगला परिचय होता. सुमाताईंनी पुरणपोळीचा बेत केलेला होता. कंजुष स्वभावाबद्दल ख्याती असलेल्या विंदांनी अख्ख्या कुटुंबाला जेवायला बोलावलं, ह्याचं ऐकणाऱ्यांना नवल वाटलं. आमच्या कुटुंबाच्या सुख-दुःखाच्या प्रसंगी विंदांचे आवर्जून फोन यायचे किंवा आत्मीयतेने लिहिलेलं पोस्टकार्ड यायचं.

विंदांना भेटायला आम्ही 'साहित्य सहवास'मध्ये अनेकदा जात असू. तेव्हा ह्या थोर कवीला अगदी घरच्या अवतारात कधी सुतारकाम करताना तर कधी छत्री-चपला दुरुस्त करताना पाहून नवल वाटायचं. त्यांच्याकडे जाताना स्वतः केलेले बटाट्यांचे वेफर्स मी नेत असे. त्यांनाही त्याचीच अपेक्षा असे. 'सत्यकथे'त माझी 'झीज' ही कथा आली तेव्हा विंदा गंभीर चेहऱ्याने मला म्हणाले होते,

"ते कथाबिथा लिहीत राहा तू, पण हे वेफर्स करणं थांबवू नकोस."

मी त्यांचं सांगणं खरोखर मनावर घेतलं. कारण राम

पटवर्धनांच्या तालमीत पंधरा-वीस पानांच्या कथांचं पुनर्लेखन करण्यापेक्षा पंधरा-वीस किलो बटाट्यांचे वेफर्स करणं, ते आवडीने खाणाऱ्या आपल्या आवडत्या कवींना-पाडगाव-करांना आणि विंदांना पाठवणं हा विषय माझ्यासाठी अधिक आनंददायी होता. त्यामुळे राम पटवर्धनांची निराशा झाली. मला मात्र आपण कथालेखन पुढे चालू ठेवलं नाही ह्याची अजिबात कधी खंत वाटली नाही.

नंतर 'साहित्य दरबार'मध्ये स्त्रियांच्या समलिंगी संबंधावरची माझी 'भूत' ही कथा वाचून त्यांनी ''अतिशय संयमित शब्दांत अवघड विषय हाताळला आहेस, मला कथा आवडली'' असं विंदांनी मला फोन करून सांगितलं आणि पुढे विचारलं,

''कधी येतेस घरी?''

मला त्यांच्या प्रश्नाचा रोख कळला. मी हसत म्हटलं, ''मी नाही आले तरी ह्यांच्या हाती वेफर्स पाठवते.''

मी मुलुंडला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीची शिक्षिका म्हणून रुजू झाले तेव्हा पहिल्याच दिवशी मी मुलांना प्रश्न केला होता-

''कुठला विषय आवडतो तुम्हांला?''

माझ्या प्रश्नाचं सरळ उत्तर देण्याऐवजी मुलांनी अगदी ठरवल्यासारखं एकासुरात उत्तर दिलं-

''आम्हाला मराठी मुळीच आवडत नाही!''

मला हा धक्काच होता! मराठीच तर शिकवायला मी आले होते. विद्यार्थ्यांच्या सुरातून मराठी आवडत नाही म्हणजे मीसुद्धा आवडणार नाही, असंच जणू सूचित होत होतं. तो दिवस मी कसाबसा घालवला.

तेव्हा आमच्याकडे स्वतःचा ग्रंथसंग्रह फार नव्हता. ग्रंथसंचयाला नुकतीच सुरुवात झाली होती. ही सुरुवात पाडगावकरांनी निरंजन कॉलेजमध्ये असताना त्यांच्या एका वाढदिवशी निवडक कवींच्या कवितासंग्रहांचा संच दिल्या-पासून झालेली होती. आपल्या वाढदिवशी आणि इतरही वेळा निरंजन आवर्जून ग्रंथखरेदी करीत असत. मराठी न आवडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात मराठीची गोडी कशी निर्माण करता येईल म्हणून मी आमच्या त्या छोटाशा ग्रंथसंचयात शोध घेऊ लागले. विंदांनी आमच्या प्राजक्ताला भेट दिलेला 'अजबखाना' आणि 'सर्कसवाला' ही बालकवितांची दोन पुस्तकं मला दिसली. सात बाल-कवितांचा संग्रह असलेला विंदांचा 'अजबखाना' मी दुसऱ्या दिवशी शाळेत जाताना घेऊन गेले. प्रत्येक वर्गात वेगवगळ्या कविता वाचून दाखवल्या. मुलांना त्या फारच आवडल्या. मधल्या सुट्टीत, शाळा सुटल्यानंतर वर्गावर्गातल्या मुलांमध्ये आपल्याला ह्या नवीन 'मराठी मिस'ने कोणत्या कविता वाचून दाखवल्या, कित्ती मजा आली हे सांगण्याची अहमहमिकाच लागली. मग वर्गात गेले की ती मुलं म्हणू लागली,

''त्या वर्गात अमकी कविता वाचलीत, ती आम्हांला नाही वाचून दाखवलीत. ती वाचा ना...''

असा आठवडा घालवला. मुलांना मराठी कविता ऐकायला आवडतात म्हटल्यावर विंदांच्या नंतर पाडगावकर, शांता शेळके आणि इतरही कवींच्या बालकविता, कथा वाचून दाखवण्यात पुढचे काही दिवस घालवले. मुलांचं मराठी भाषेबद्दल मत चांगलं झाल्याचा अंदाज आला. मग मी एके दिवशी विचारलं,

''आता आपल्या मराठीच्या पुस्तकात काय काय आहे, ते पाहुया का?''

आणि मुलं ''मराठी इतकं छानंय, माहीत नव्हतं,'' अशी मोकळ्या मनाने कबुली देत मराठी शिकायला एका पायावर तयार झाली!

त्याआधी इंदुबाला तलवार नावाच्या एका चुणचुणीत पंजाबी विद्यार्थिनीने मला विचारलं,

''मराठीच्या पुस्तकात अशा छान छान कविता का नाहीत? किती बोअर कविता आहेत. कोण सिलेक्शन करतं?''

मी म्हटलं, ''एक पाठ्यपुस्तक मंडळ असतं, ते निवड करतं.''

''तुम्ही का नाही करत सिलेक्शन आमच्यासाठी?''

पाठ्यक्रम निवडीसाठी मंडळ असतं हे मी त्यांना सांगितलं; पण त्या मंडळात कसं शिरतात हे मला आजता-गायत माहीत नाही. माझी 'प्रार्थना' ही कविता नववीच्या अभ्यासक्रमात लागल्याचं माझ्या विद्यार्थ्यांना कळलं तेव्हा त्यांना फार आनंद झाला. त्यातले काही पालकाच्या भूमिकेत होते. आपल्या पाल्यांना ते 'आमच्या टीचरची कविता आहे ही!' असं अभिमानाने सांगत होते. इंग्रजी माध्यमांच्या बहुतेक शाळांमध्ये शिक्षिकांना त्यांचं नाव घेऊन 'मिस' म्हटलं जातं. मला ते अजिबात आवडत नसे. मी त्यांना 'मिसेस उजगरे' किंवा 'उजगरे टीचर' म्हणा, त्यामुळे भविष्यात आपण कधी कुठे भेटलो किंवा




माझ्या आडनावाचं कुणी तुम्हांला भेटलं तर माझी आठवण येईल, असं सांगत असे. आज तीच ओळख त्यांच्या स्मरणात आहे.

कविता शिकवताना मी शक्यतो चालीवर शिकवण्याचा प्रयत्न करीत असे. नाट्यप्रवेश असेल तर प्रत्येकाला एक तरी संवाद वाचायला मिळेल, असं बघत असे. असे काही ना काही वेगवेगळे प्रयोग मी करून पाहत असल्यामुळे विद्यार्थी मराठीच्या तासाची आणि माझीही आतुरतेने वाट पाहू लागली. आजही शाळेच्या ग्रुपवर ते आठवण काढतात.

एकदा एक वेगळाच प्रयोग करायचं माझ्या मनात आलं. महिन्यातला शेवटचा मराठीचा एक तास मुलांनी काही लिहावं म्हणून मी शिकवत असलेल्या प्रत्येक वर्गासाठी घोषित केला. त्यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मातृभाषेत जमेल तसं नि तेवढं, काहीही लिहावं. त्याचा अनुवाद मराठीमध्ये मराठी मुलांनी करावा आणि त्यांना न जमल्यास मी इंग्रजी-हिंदीच्या मदतीने करायचा असं ठरवलं.

मुलांना ह्या प्रयोगात खूपच मजा वाटली. गंमत म्हणजे असं करता करता ही मुलं नंतर मूळ मजकूर मराठीतच लिहू लागली! त्यात एकदोघांनी तर कवितासुद्धा लिहिण्याचा प्रयत्न केला! हे विंदांना सांगताना 'तुमच्या अजबखानामुळे मला हे शक्य झालं' असं मी म्हटलं तर, विंदांनी माझ्या प्रयोगाचं कौतुक करून म्हटलं,

''अगं, मला कसलं श्रेय देतेस? मराठीचं काम करणाऱ्या शासनाच्या संस्थेपेक्षाही उत्तम काम करते आहेस तू मराठी भाषेचं!'' ही शाबासकीची थाप विंदांमधल्या शिक्षकाने माझ्यासारख्या नवोदित शिक्षिकेला दिलेली होती.

मुलांना आवडतील अशी शाळेसाठी म्हणून काही पुस्तकं मी आणि निरंजनने खरेदी केली. सगळ्यात जास्त 'अजबखाना'च्या प्रती विकत घेतल्या. आपल्या खाऊच्या पैशांतून मित्रमैत्रिणींना, भावंडांना त्यांच्या वाढदिवशी पुस्तक भेट देण्याची माझी कल्पना मुलांनी उचलून धरली आणि वेळोवेळी 'अजबखाना' माझ्याकडून विकत घेतला.

एक दिवस मी विंदांना म्हटलं, ''तुमच्या प्रकाशकांपेक्षा मीच तुमची पुष्कळ पुस्तकं खपवलीत, तेव्हा तुम्ही खरंतर मला कमिशन दिलं पाहिजे!''

विंदांनी माझ्याकडे चष्म्यातून रोखून पाहिलं! इतक्या वर्षांत माझी भीड बरीच चेपली होती. त्यामुळे आता ते काय म्हणताहेत, त्याची मी उत्सुकतेने वाट पाहत होते. विंदा म्हणाले,

''कमिशन हवंय तुला? मी कविता वाचतो त्याचे मोजून पैसे घेतो. पण तुझ्यासाठी – तुला कमिशन द्यायचं म्हणून एक छदामही तुझ्याकडून घेणार नाही. बस अशी समोर.''

विंदांनी दिलेलं हे कमिशन म्हणजे माझी मोठीच कमाई होती! आता इतकं भरघोस कमिशन एका कंजूष कवीकडून हक्काने कमावणारी मी, भाग्यवानच म्हणायला हवी!

एकदा निरंजनने मला म्हटलं, ''तुझी शाळा श्रीमंत आहे. मुलांना मराठीची गोडी लागण्यासाठी मुलुंडमधल्या एकजात साऱ्या शाळांसाठी तुझ्या शाळेतर्फे एक बाल–कवितांचा मोफत कार्यक्रम कर.''

मी मॅनेजमेंटपुढे प्रस्ताव मांडला. 'मराठी मिस'वर विद्यार्थी खूष असल्याचा रिपोर्ट मॅनेजमेंटपर्यंत गेलेला असल्याने माझ्या प्रत्येक उपक्रमाचं मॅनेजमेंट स्वागतच करायची. पुढचं सगळं आयोजन करण्यात अर्थातच निरंजनचा सिंहाचा वाटा होता. कार्यक्रम करता येईल असं मुलुंडला त्यावेळी एकच ठिकाण होतं– 'अपना बाजार'च्या वरचं 'सु.ल. गद्रे सभागृह'. तिथे विंदा, पाडगावकर आणि शांता शेळके ह्या मराठीतल्या तीन थोर कवींच्या बालकविता वाचनाचा कार्यक्रम त्यांनीच प्रयत्नपूर्वक जुळवून आणला. कार्यक्रम मुलुंडमधल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी खुला होता. त्यामुळे अख्खं सभागृह गच्च भरलं होतं.

'खऱ्या अर्थाने' ज्येष्ठ असलेल्या ह्या तिन्ही कवींचं कवितावाचन उत्तम झालं. पण त्यातल्या त्यात मुलांनी विंदांच्या कवितांना भरभरून अशी अविस्मरणीय दाद दिली की, विचारू नका. इतका हंशा पिकला की, त्याने सगळा हॉल दणाणून सोडला. 'परी ग परी,' 'एटूंच्या देशात', 'एकदा काय झाले', 'राणीची बाग', 'सशाचे कान', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ', 'सर्कसवाला' ह्यातल्या कविता विंदांनी हावभावासह ऐकवल्या. 'भीमाचे जेवण' वाचताना 'अलल् डुई...' ह्या बकासुराच्या डरकाळीने तर मुलं विंदांवर बेहद्द फिदा झाली! 'चिमण्ये, तुझें वजन किती?', 'सुटी मिळण्याचा मंत्र', (मारकुट्या मास्तरांची) 'छडी मोडण्याचा मंत्र', 'टोक न मोडण्याचा मंत्र', 'पतंग गुल करण्याचा मंत्र', 'माकडाचे दुकान', प्राण्यांचा 'दवाखाना', 'जुईचे गाणे', 'चाफ्याचे गाणे', 'काजव्यांचे गाणे' अशा कितीतरी कविता मुलांनी नंतर पाठच केल्या. त्यांच्या आग्रहाखातर महिनाअखेरचा मराठीचा एक तास मुक्तलेखनाऐवजी मी त्यांच्या सादरीकरणाचा ठेवला. अमराठी मुलांच्या उच्चारात काही ठिकाणी गडबड होत होती; पण बाकी पाठांतर एकदम चोख, आवेशपूर्ण आणि त्यांची पाठ थोपटून शाबासकी द्यावी असं होतं.

''आपण अॅन्युएल डेला 'परी आणि घर', 'परी आणि मधमाशी', 'पऱ्यांच्या गप्पा', 'परी आणि दगड', 'परी आणि कविता', 'चावट परी' ह्या विंदांच्या परीच्या कवितांवर नाच बसवुया का?'' असं माझ्यातल्या उत्साही शिक्षिकेने विचारताच वर्गातल्या एकजात सगळ्या पऱ्या एका पायावर नाचायला लागल्या.

मुलं तरी कशी मागे राहतील? ती दुप्पट उत्साहाने म्हणाली, ''मग आमचं माकडाचं दुकान बसवा!'' त्यावर ''तुम्ही माकडं दुसरं काय करणार?'' असं मुलांना चिडवत मुली पोट धरून हसत राहिल्या. कार्यक्रम उत्तम झाला. तेव्हा फोटोचं एवढं प्रस्थ नव्हतं. कार्यक्रमाविषयी विंदांना नंतर सांगितलं तेव्हा त्यांना फार कौतुक वाटलं–मुलांचं आणि माझंही.

विंदा करंदीकर हे नाव मराठी विद्यार्थ्यांच्या कायम लक्षात राहिलं आणि 'कविता वाचणारे आजोबा' म्हणून विंदा अमराठी विद्यार्थ्यांच्या चांगलेच लक्षात राहिले. विंदांच्या बालकवितेत आजही इतकं टवटवीतपण आहे की, आजची चिमुकली पिढीही तिच्यात रमून जाते. कविता वाचनाच्या त्या कार्यक्रमाचं मानधन पाडगावकर–शांताबाईंनी तर घेतलं नाहीच, पण विशेष म्हणजे हिशेबी विंदांनीही मानधन घ्यायला चक्क नकार दिला!

खूप आधी विंदांच्या हिशेबी स्वभावाच्या कथा आम्हांला दंतकथा वाटायच्या आणि आमचे अनुभव लोकांना अविश्वसनीय वाटायचे...

विंदा करंदीकर हे बालकवितांचे शिल्पकार आहेत, असं कुठेतरी वाचल्याचं आठवतंय. विंदांनी मुलांची मानसिकता अचूक हेरली. 'मधमाशी फुलाभोवती का फिरत असावी? कधीपासून फिरत असावी?', 'पऱ्या जमिनीवरून आपल्यासारख्या का चालत नाहीत?' 'नाक दोन डोळ्यांमध्येच का असतं?' अशा गहनगूढ प्रश्नांवर विंदांनी मुलांना विचार करायला लावतील, मजेदार वाटतील आणि पटतीलही अशी चपखल उत्तरं दिलेली आहेत. कवितेचं बोट धरून एका वेगळ्या कल्पनाविश्वात त्यांनी मुलांना फिरवून आणलं. त्यात त्यांचं प्रिय कोकणही अधूनमधून

आलं. कोकणातली 'राजापूरची गंगा' त्यांनी मुलांना दाखवली आणि 'कापे गरे' हेदेखील मुलांना खाऊ घातले.

मुलांना आवडतील, मोठमोठ्याने म्हणाव्याशा वाटतील अशा वेगवेगळ्या विषयांवरच्या कविता विंदांनी साध्या, सोप्या, गरज भासली तर कधी मजेदार शब्द तयार करून नेमक्या शब्दांत लिहिल्या. कवितांची मांडणीही मोजक्या शब्दांच्या ओळींमध्ये एकाखाली एक सुटसुटीत अशी केली. मुलांवर कुठलंही दडपण त्यामुळे येऊ नये, असा त्यांचा उद्देश असावा.

काळ बदलला. पिढी दर पिढी नात्यांमधलं अंतर वाढलं, कधी नातंच संपलं, मुलांच्या घरातलं आणि सभोवतालचं वातावरण बदललं, नवनवीन कार्टून्सनी त्यांना भलेही आकर्षित केलं असलं, तरीही विंदांच्या बाल-कवितांची जादूई प्रभाव आज तीन पिढ्या टिकून आहे. मराठी बालकवितेच्या जगतातलं विंदांचं योगदान वादातीत आहेच; परंतु प्रौढांसाठी लिहिलेल्या त्यांच्या कविता आजही प्रेरणादायी आहेत.

'अजबखाना' ह्या बालगीतांच्या पुस्तकामध्ये मुलांना समजायला आणि उच्चारायलाही कठीण वाटेल आणि संभ्रमात टाकील अशी 'वाङ्मय' ह्या शीर्षकाची कविता आहे. त्यात विंदा लिहितात-

'जर कोणी
कविता केली
प्रथम पुरतात
जमिनीखाली.

पण जुनीशी
झाल्यानंतर
शहाणे करतात
जंतर-मंतर!

मग कवितेतून
रुजतो एक वृक्ष
फुले येतात
नऊ लक्ष!'

ह्या कवितेचा समावेश चुकून बालकवितेच्या पुस्तकात झाला आहे की काय, अशी शंका माझ्या मनात येतेय. ही कविता बालकवितेपेक्षा प्रौढांसाठीच लिहिलेली असावी. विशेषतः त्या नवकवींसाठी लिहिलेली वाटते, जे खरडल्या चार ओळी की, लाव छापायचा धडाका, नाही तर टाक फेसबुकवरती आणि 'नक्की वाचा हं' म्हणत मिळव लाइकचे भारंभार अंगठे. पहिलाच संग्रह आला तरी मित्रमंडळी त्या कवीला 'ज्येष्ठ कवी' म्हणू लागतात!

इंग्रजी आणि मराठी ह्या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या विंदांनी मराठी साहित्यविश्वाला खूप काही देऊन श्रीमंत केलं आहे.

एका २३ ऑगस्टला विंदांच्या वाढदिवशी मित्र-मंडळींनी प्रेमाने आणलेल्या भेटी विंदांनी स्वीकारल्या खऱ्या; पण मंडळी चहापानानंतर जायला लागली तेव्हा त्यांना थांबवून विंदा म्हणाले,

''तुम्ही माझ्यासाठी आणलेल्या ह्या भेटवस्तू तुमच्या-वरच्या प्रेमाने मी स्वीकारल्यात. आता त्या माझ्या झाल्यात. आता ह्यांचं काय करायचं, ते मी ठरवणार! मान्य?''

विंदांसारख्या ज्येष्ठ कवींपुढे कोण काय बोलणार? सर्वांनी अर्थातच होकारार्थी माना डोलावल्या. त्याशिवाय त्यांना पर्याय होता कुठे? त्या भेटवस्तू ज्याच्या त्याला साभार देऊन विंदा मोकळे झाले!

त्यावेळी प्रत्येकाच्या मनात विंदांच्याच कवितेचे शब्द उमटत होते-

'देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे...!'

कंजूष आणि कर्ण असे टोकाचे दोन पैलू असणाऱ्या विंदांनी 'देणाऱ्याने देत राहावे' म्हणत जे जे देता येईल, ते ते दिलं. शब्दधन तर दिलंच; पण लौकिक धनही दिलं. त्यामुळेच त्यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' दिला गेला तेव्हा तो आपल्यालाच मिळालाय असं समस्त मराठी लोकांना आणि त्यांच्या विविध भाषेतल्या चाहत्यांनाही वाटलं, तर त्यात नवल ते काय!

**- डॉ. अनुपमा निरंजन उजगरे**
भ्रमणध्वनी : ९९२०१०२०८९




# मानवी जगण्यातील प्रश्नांचे आयाम

देविदास पुजारी

**प्रश्नशृंखला** ही एक मानवी मनाचा तळ ढवळून काढणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया असते.

या प्रक्रियेतूनच अध्यात्म, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञानादी शास्त्रांचा जन्म झाला असावा. ज्ञान-संस्कृतीला प्रश्नप्रक्रियेचे अधिष्ठान असते अन् मानवी आयुष्याच्या क्षणाक्षणात प्रश्नांचे मोहोळ घोंगावत राहते. प्रश्नांनी माणसाचे अवघे जगणेच व्यापून टाकले आहे, अगदी आयुष्यभर.. जिवाच्या उत्पत्ती रहस्यापासून ते सृष्टीच्या निर्मितीच्या रहस्यापर्यंत.... एकूणच शोध घेणाऱ्या शोधयात्रींनाच खऱ्या अर्थाने प्रश्नांचे महत्त्व कळले आहे. या शोधयात्रेत खगोल विज्ञानातील घडामोडी आहेत, जन्म-मृत्यूचे चक्र आहे, पाप-पुण्याची संकल्पना आहे, मानवी जीवन सुसह्य करणारे तंत्रज्ञान, यम-नियम, अष्टांग योग,अन् अंतिमतः समाधीयोगाचा प्रत्यय देणारी भावावस्था इत्यादींचा समावेश यात करावा लागेल.

एकूणच प्रश्नांचे आयाम अन् मानवी जगणे यात एक आंतरिक आणि अपरिहार्य नाते निर्माण झाले असावे.

मुक्तीचा शोध घेणाऱ्या वेदकालीन ऋषीमुनींपासून

जगणं सुसह्य करणाऱ्या आधुनिक शास्त्रज्ञांपर्यंतचा प्रश्नांचा प्रवास देदीप्यमान आहे. प्रश्नांच्या मदतीने जगण्याचे अवकाश समृद्ध करणारे ते महानुभाव होत. प्रश्नच पडले नाहीत तर उत्तरे कुठून शोधणार? असे प्रख्यात विचारवंत सॉक्रेटीस म्हणत असे. अध्यात्माची, तत्त्वज्ञानाची आणि अजून उत्तराच्या शोधात निघालेल्या, पोरक्या झालेल्या प्रश्नांची प्रतिष्ठा राहावी म्हणून तर सॉक्रेटीसने हसत हसत देहांताची शिक्षा भोगली होती. प्रश्न विचारतोय म्हणून तर सॉक्रेटीसला देहांताची शिक्षा झाली. तो असाच प्रश्न विचारत राहिला तर लोकांचं जगणं संपन्न होईल, लोक हुशार होतील अन् असे झाले तर आपल्या सत्तेलाच सुरूंग लागेल. या भीतीपोटी सॉक्रेटीसला सत्तेने देहांताची शिक्षा दिली.

काय सांगत होता सॉक्रेटीस? कोणतीही गोष्ट परंपरेने चालत आली आहे म्हणून खरी मानता कामा नये. असे तो म्हणायचा. 'Six questions of socretes' या संबोधाला म्हणून तर अर्थ आहे. काय होते ते सहा प्रश्न? आपण ज्याला औचित्य सत्य समजतो, ते खरे औचित्य सत्य आहे काय? आपण ज्याला सौंदर्य समजतो, ते खरे सौंदर्य आहे का? आपण ज्याला चारित्र्य समजतो, ते खरे चारित्र्य आहे का? आपण ज्याला धैर्य समजतो, ते खरे धैर्य आहे का? आपण ज्याला न्याय समजतो, तो खरा न्याय आहे का? आणि आपण जिला श्रद्धा समजतो, ती खरी श्रद्धा आहे का?

खरं म्हणजे सॉक्रेटीसच्या या प्रश्न मालिकेनंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले असले तरीही अजूनही या प्रश्नांची उकल झालेली नाही. म्हणूनच या प्रश्नांना अजूनही मानवी जगण्यात विशेष असे स्थान आहे.

मानवी जीवनात नित्य पडणारे प्रश्न हे एखाद्या संप्रेरकासारखे कार्यरत राहतात. असे असले तरी प्रश्नांच्या संदर्भात बुद्धाची शिकवण फार महत्त्वाची आहे. बुद्ध म्हणत असत की ज्या प्रश्नांची उत्तरे शोधूनही सापडत नाहीत, अशा व्यर्थ प्रश्नांचा खल करीत आपला वेळ वाया घालवू नका. अशा प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत जा. ईश्वर आहे की नाही? सृष्टीची निर्मिती कशी व कधी झाली? सृष्टीचा शेवट कधी होणार आहे? शरीर व आत्मा एकरूप असतात की भिन्न? आत्मा अमर आहे की क्षणभंगूर? इत्यादी प्रश्नांवर बुद्धांनी वेळ खर्च केला नाही. ज्या प्रश्नांची उत्तरे बुद्धांनी दिली नाहीत, अशा प्रश्नांचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. त्यांना 'अव्याकृते 'असे म्हटले जाते.

ज्या प्रश्नांवर बुद्धांनी मौन धारण केले, ज्या प्रश्नाचे बुद्धांनी व्याकरण केले नाही, अशी ती अव्याकृते होत. माणसातील जगण्याला प्रश्नांचे विविध आयाम असतात. संपूर्ण मानवी जीवन हे कोणत्याही एका सिद्धांताने किंवा तत्त्वप्रणालीच्या साहाय्याने पूर्णतः समजू शकत नाही. असे विं.दा. करंदीकरांनी ज्ञानपीठ पारितोषिक स्वीकारताना म्हटले होते. हे अगदी खरे आहे. सर्वार्थाने जीवन जगत असताना माणसाला काही प्रश्न पडत असतात. हे प्रश्न प्रत्येक सिद्धांतातीत सत्यांश व मिथ्यांश उघड करीत, असतात. म्हणूनच या प्रश्नांमुळे मानवी जीवन हे सर्व सिद्धांताच्या पलीकडे झेपावत असते. हे करंदीकराचे म्हणणे आपणासही विचार करायला लावते.

माणसाच्या जगण्याच्या प्रक्रियेत, त्याच्या दैनंदिन जीवनात त्याच्या अंतर्मनात नेहमीच प्रश्नांची घुसळण चाललेली असते. प्रश्न फक्त विद्वानांनाच पडतात असे नाही, तर सर्वसामान्य माणसालाही गहन प्रश्न पडत असतात, म्हणूनच प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे स्वतंत्र असे जीवनविषयक एक तत्त्वज्ञान असते. त्या व्यक्तीलाही बऱ्याच वेळा याची जाणीव नसतेच. अल्डस हक्सले नावाचा एक विचारवंत म्हणतो, 'Men live according to their philosophy of life. This is to even of the most thoughtless.'

अर्थात सर्वसामान्य माणसाला सुद्धा त्याचे-त्याचे तत्त्वज्ञान असते. कारण याच्या मुळाशी त्याला नित्य पडणारे जगण्याचे प्रश्न असतात. ग्रीस तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल याच्या डोक्यात नेहमी प्रश्नांचे मोहोळ घोंगावत असे. अर्थात हे सर्व प्रश्न मानवी जगण्याच्या विभ्रमावरच आधारित होते. या नानाविध प्रश्नांची उत्तरे शोधता शोधता ॲरिस्टॉटल हा स्वतःच तत्त्वज्ञ कधी झाला, हे त्यालाही कळले नसावे.

विश्वातील प्रत्येक शास्त्राची बीजे ही ॲरिस्टॉटलच्या विचारसरणीत आढळतात असे बोलले जाते. आयुष्याच्या उत्तरार्धात ॲरिस्टॉटलने मानवी जगण्याचे आयाम समृद्ध करण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना चार महत्त्वाची सूत्रे सांगितली. अर्थात विद्यार्थ्यांनी खूप आग्रह केल्यावर तो म्हणाला, आपले नित्य जगणे समृद्ध करायचे असेल तर माणसाने दोन गोष्टी विसराव्यात अन् दोन गोष्टी कायम लक्षात ठेवाव्यात-

कोणी आपणाशी वाईट वागत असेल, आपली निर्भत्सना करीत असेल तर आपण ते मनात न ठेवता तत्काळ विसरून जावे आणि आपण जर कुणावर उपकार

केला असेल, कोणाचे भले केले असेल, तर तेही तत्काळ विसरून जावे. या दोन गोष्टी विसरून जाव्यात. तसेच एक दिवस आपल्याला मृत्यू येणार आहे, अन् आज जे काही मी सुख-दुःखं भोगतो आहे, त्याला मी स्वतःच जबाबदार आहे. या दोन गोष्टी कायम लक्षात ठेवाव्यात. ॲरिस्टॉटलचा हा उपदेश मानवी जगणे समृद्ध करणारा असला तरी हे सर्व ॲरिस्टॉटलला पडणाऱ्या नित्य प्रश्नप्रक्रियेचा परिपाक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

जपानी लोकांमध्ये 'झेन' या संबोधाला विशेष असे महत्त्व आहे. जे प्रश्न अतींद्रिय आहेत, कूट आहेत, अरूप आहेत, जटील आहेत किंवा ज्या प्रश्नांचे उत्तर असंभव आहे अशा अर्थाने 'झेन' हे संबोधन वापरले जाते. खरं म्हणजे प्रश्नांशी संबधित असलेली 'झेन' ही संकल्पना मुळात भारतीयच आहे. असे विधान केल्यास ते अनाठायी होणार नाही. भारतवर्षामध्ये बुद्धाने 'ध्यान' ही संकल्पना राबविली. जो प्रश्नच अनुत्तरीत आहे, एवढी खात्री झाल्यावर त्याच्यासाठी मग वेळ खर्च करू नये. त्यासाठी आगी संघर्ष करत बसू नये. त्यापेक्षा मनाची कवाडे उघडणारे 'ध्यान' करावे. ध्यान हेच त्यावरचे योग्य उत्तर होय. बुद्धाच्या विचारांनी प्रेरित झालेल्या, प्रभावित झालेल्या काही चिनी लोकांनी 'ध्यान'आत्मसात केले. पण त्यांच्या वेगळ्या उच्चार प्रक्रियेमुळे त्यांनी ध्यानाचे च्यॅन केले. पुढे जपानी लोकांना हे च्यॅन खूप प्रभावित करून गेले. त्यांनी याचा अभ्यास करून हे चॅन जपानमध्ये नेले. मग स्वाभाविकपणे जपानी लोकांच्या उच्चार प्रक्रियेचा परिणाम म्हणून च्यॅनचे 'झेन' झाले. असे हे 'झेन' तत्त्वज्ञान मुळात भारतीयच किंवा बुद्धविचारावरच आधारलेले आहे.

'झेन' तत्त्वप्रणालीमध्ये झेन मास्टर जटिल प्रश्नांचे उत्तर देतात; पण वेगळया पद्धतीने त्यांना अनुत्तरित प्रश्न विचारला की ते धुवाँधार कोसळणाऱ्या पावसाकडे, खळाळून हसणाऱ्या निरागस बालकाकडे, आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्याकडे, सागरात उसळणाऱ्या फेन-धवल लाटांकडे किंवा क्षितिजावरील सूर्योदय-सूर्यास्ताकडे अंगुलिनिर्देश करतात. यावरही एखाद्या मुमुक्षू साधकाने त्यांना प्रश्न विचारलाच की तुम्ही अंगुलिनिर्देश केला ते म्हणजेच 'झेन' का? तर त्याचं उत्तर असतं, 'नाही नाही. तसे पण नाही' असे सांगतात.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये *नेति नेति* ही संकल्पना याहून वेगळी आहे का? मानवी जगण्यातील प्रश्नांचे आयाम या पातळीवर जाऊन समजून घ्यावे लागतात. शेवटी अनुत्तरीत प्रश्नांना ध्यान हेच उत्तर आहे.

वैदिक काळातही आजच्यासारखे वाढदिवस उत्साहाने साजरे होत असत. पण या वाढदिवसाचा संबंध प्रश्नांशी होता हे अनेकांना माहीत नाही. वाढदिवसापूर्वी एका विशिष्ट कालखंडात मौन धारण करण्याची त्या काळी पद्धत होती. या मौनावस्थेत स्वतःच स्वतःला प्रश्न विचारून त्याची उत्तरेही स्वतःचं शोधायची.

*'तुका म्हणे आता, मनाशी संवाद'*
*आपुलाची वाद, आपणाशी...'*

या उक्तीप्रमाणे आत्मसंवाद साधायचा अन् वाढदिवसाच्या दिवशी आपले मौन सोडायचे. उपनिषद काळात आश्रमातील विद्यार्थ्यांचे वाढदिवसही प्रश्नोत्तरांनी साजरे होत असत. गुरूंच्या सान्निध्यात राहून विद्यार्थी वाढदिवस साजरा करीत असत. ज्यांचा वाढदिवस आहे, असे शिष्य आपल्या गुरूसह निसर्गाच्या सान्निध्यात जात असत. मग शिष्य गुरूंना प्रश्न विचारीत अन् गुरू त्या प्रश्नांची उत्तरे देत. अशाप्रकारे प्रश्नोत्तराच्या माध्यमातून वाढदिवस साजरा होत असे. केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या इतिहास ग्रंथाची पाने चाळली तर प्रश्नमहिमेचे महत्त्व कळते. फ्रेंच तत्त्वज्ञ व्हॉल्टेअर यांनी तर धर्मसत्तेला आणि राजसत्तेला प्रश्न विचारून भंडावून सोडले होते. या दोनही सत्तेत माजलेल्या ढोंगाविरूद्ध तो आयुष्यभर सतत प्रश्न विचारीत राहिला. माणसाच्या दररोजच्या जगण्याशी सिद्धांत मांडणारा आइन्स्टाइन अनेक वेळा प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकत असे. तो प्रश्न विचारतोय म्हणून त्याला दोन वेळा हद्दपार व्हावे लागले. दिनांक ३० मे १७७८ रोजी व्हॉल्टेअरचा पॅरिसमध्ये मृत्यू झाला. त्यावेळी १४वा लुई आणि तत्कालीन रोमन कॅथालिक पंथाच्या धर्मगुरूंनी व्हॉल्टेअरच्या शवाला आपल्या दफनभूमीत जागा देण्याचे नाकारले. त्यावेळी व्हॉल्टेअरचे काही मित्र खूप अस्वस्थ झाले. मग त्या मित्रांनी व्हाल्टेअर जीवंत आसल्याचे नाटक करीत एका वाहनाद्वारे त्याचे शव पॅरिसबाहेर नेले आणि त्याचे दफन करण्यात आले. त्यावेळी व्हॉल्टेअरच्या मित्रांना मदत करणाऱ्या एका अज्ञात सुधारणावादी धर्मगुरूने म्हटले होते, ''तत्त्वज्ञ व कलावंत यांना देश आणि धर्म यांचे कायदे लागू होत नाहीत.''

पुढे यथावकाश फ्रेंच राज्यक्रांती झाली अन् व्हॉल्टेअरचे शव पुन्हा सन्मानपूर्वक पॅरिसमध्ये आणून दफन करण्यात आले. असे म्हणतात की त्यावेळी पॅरिसमध्ये जी अंतयात्रा निघाली, त्याला जवळपास एक लाख स्त्री-

पुरुष अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. त्यावेळी व्हॉल्टे-अरच्या शवपेटीवर त्याचेच विधान लिहिले होते, 'मानवी मनाचे उन्नयन करण्यासाठी, माणसाला आदरणीय बनवण्यासाठी मी आयुष्यभर प्रश्न निर्माण करीत राहिलो अन् मी आपली हयात खर्च केली.'

आदिम काळापासून माणसाला प्रश्न पडत आहेत. काही प्रश्नांची उत्तरे मिळत असतात तर काही प्रश्न उत्तराविना पोरके राहतात. प्रश्नाभिव्यक्ती ही ज्ञानार्जनाची नांदी असते.

मोनालिसाचे चित्र विश्वप्रसिद्ध झाले आहे. मागील शेकडो वर्षांपासून अवघ्या विश्वाला प्रश्न पडला आहे की मोनालिसाच्या हास्याचे गूढ काय आहे? त्या मोनालिसाच्या चित्रातील स्मिताचा अर्थ लावण्यात अनेकांचे आयुष्य चालले आहे. त्या हास्यातून कोणता संदेश मिळतो? त्या हास्यातून मोनालिसाची जीवनशैली कळते का? मोना-लिसाचे चित्र काढले त्यावेळी ती गर्भवती होती का? या चित्राविषयी असे कितीतरी प्रश्न निर्माण झाले आहेत. काहींनी उत्तरेही सांगण्याचा प्रयत्न केला. मोनालिसा ही एका रेशमाच्या व्यापाऱ्याची पत्नी लिसाडेल गियाकोंडा असावी असा तज्ज्ञांचा निष्कर्ष आहे. अमेरिकेतील एका विद्यापीठातील शरीरशास्त्राच्या प्राध्यापकाने यासंदर्भात काही पुरावेही शोधून काढले आहेत, असे कळते. या प्रश्नोत्तरात, संशोधनातही एक काव्य दडलेले आहे. असे संवाद माणसाचे जगणे उन्नत करीत असतात. जगणे सार्थ करीत असतात.

विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ म्हणून अलबर्ट आइन्स्टाइनचा गौरव होतो. सन १९०५ मध्ये आइन्स्टाइनने सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडला. एखाद्या वस्तूची गती, वस्तूच्या गतीची दिशा, वस्तूचे आकारमान आणि वस्तूचे कालमान याबद्दल आपल्याला निरपेक्ष असे ज्ञान मिळविणे शक्य होणार नाही. आपण जे ज्ञान मिळवितो, ते अर्थातच सापेक्ष असते. असा सापेक्ष वादाचा सिद्धांत मांडणारा आइन्स्टाइन अनेक वेळा प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकत असे.

एखाद्या प्रश्नाची उकल प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही होत नसे तेव्हा आइन्स्टाइनच्या तनामनावर प्रचंड ताण येत असे. मग हा ताण घालवण्यासाठी तो पियानो वाजवत असे. प्रश्नांच्या संदर्भात म्हणूनच आइन्स्टाइन म्हणत असे, ''प्रश्नांचे मोहोळ डोक्यात घोंगावू लागते मग शोध प्रक्रिया सुरू होते. कधी शोध लागतो तर कधी लागतही नाही. पण तो एक आनंददायी प्रवास असतो. या शोध लागण्याच्या प्रक्रियेमध्ये मात्र बुद्धीचा भाग थोडा असतो, खरं म्हणजे तो एक जागृतीचा क्षण असतो. तो का? आणि कसा? आला हे मात्र सांगता येत नाही. प्रश्न आणि शोध या संदर्भातील आइन्स्टाइनचे हे चिंतन मात्र आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसालाही विचारप्रवण करतात.

ज्यांची बुद्धी अनन्यसाधारण असते, त्यांच्या प्रश्नांना तर महत्त्व आहेच; पण मानवी जगण्यातील प्रश्नांचे आयाम सर्वसामान्य माणसालाही प्रभावित करीत असतात. रवींद्रनाथ टागोरांच्या कवितेतील चिटुकल्या पणतीसारखे-

*मावळतीला जाताना सूर्याने प्रश्न केला,*

*माझ्यानंतर या जगाला प्रकाश देण्याचे काम कोण करेल?*

*मोठे मोठे ग्रहतारे शरमले, चंद्र अन् नक्षत्र सारे खाली माना घालून स्तब्ध उभे राहिले.*

*तेव्हा एक चिटुकली पणती चट्कन पुढे होऊन म्हणाली,*

*हे प्रभो! माझ्याकडून जितकं होईल, तितकं मी करीन...*

टागोरांच्या कवितेचा अन्वय लावताना ही छोटीशी पणती सर्वसामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करते.

विविध अवस्थांमधून मानवी जीवन मार्गस्थ होत असते. विचारशक्ती ही मानवी जीवनाला मिळालेली निसर्गदत्त देणगी आहे. जसेजसे वय वाढत जाते, तसतशी विचारशक्तीलाही चालना मिळते. यातूनच प्रश्नांची मालिका निर्माण होते. मानवी जगण्याला विविध कंगोरे असतात. परिणामी, प्रश्नांचे स्वरूपही वेगवेगळे असते. वैयक्तिक प्रश्न, सामाजिक प्रश्न, शारीरिक प्रश्न, मानसिक प्रश्न इत्यादी. अशा प्रश्नांनी मानवी जीवन व्यापून टाकले आहे. ही विचारप्रक्रिया आजन्म चाललेली असते. अगदी गाढ झोपेतही, ही विचारप्रक्रिया अर्थात प्रश्नप्रक्रिया कार्यरत राहते. गरज नसेल तेव्हा बटन बंद करून आपण दिवा बंद करतो, तसे विचारांचे बटन बंद करता येत नाही.आणि म्हणूनच असे विविध प्रश्न माणसाचं जगणं समृद्ध करीत असतात. म्हणूनच मानवी जगण्यातील प्रश्नांचे आयाम अधोरेखित करावे लागतात.

**– देवीदास फुलारी**

भ्रमणध्वनी : ९४२२१८९८९०

# बालकवितेतून बालमन फुलविणारे : डॉ. सुरेश सावंत

**एकनाथ आव्हाड**



डॉ. सुरेश सावंत

**नांदेड** येथील ज्येष्ठ साहित्यिक तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत यांना त्यांच्या बालसाहित्यासाठी साहित्य अकादमीचा २०२५चा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. त्यांच्या 'आभाळमाया' ह्या सर्वांगसुंदर बालकवितासंग्रहाची ह्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

काय आहे 'आभाळमाया'?

'आभाळमाया' म्हणजे आभाळाची माया, जी कधीच आटत नाही...

'आभाळमाया' म्हणजे निसर्गाची कृपा, जी कधीच खुंटत नाही...

'आभाळमाया' हा डॉ. सुरेश सावंत यांचा १२वा बालकवितासंग्रह आहे. हा संग्रह पुण्यातील चेतक बुक्स ह्या नामवंत प्रकाशन संस्थेने २०२२ साली प्रकाशित केला आहे. यात ३५ बालकविता आहेत. त्यांपैकी १४ कविता ह्या निसर्गविषयक आहेत.

मानवाने आपल्या हव्यासापायी निसर्गाचे अतोनात शोषण केले आहे. वृक्षांची बेसुमार तोड केली आहे. नद्यांची गटारे बनवून टाकली आहेत. जमीन, हवा आणि पाणी हे जगण्यासाठी आवश्यक असलेले घटक आम्ही प्रदूषित करून टाकले आहेत. आपणच केलेल्या अतिरेकी शोषणामुळे आणि प्रदूषणामुळे २०५० साली आपली पृथ्वी आपल्याला राहण्यासाठी योग्य राहणार नाही. पृथ्वीची सहन करण्याची क्षमता संपत आली आहे. यासाठी या कवितांमधून कवीने बालकुमार वाचकांना सावध करण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्गाविषयी कृतज्ञ राहण्याचा सल्ला दिला आहे. पर्यावरणसंरक्षणाची आणि संवर्धनाची जाणीव करून दिली आहे.

काही कवितांतून बालकुमार वाचकांशी छान संवाद साधला आहे. मित्रत्वाच्या पातळीवर जाऊन त्यांच्याशी हितगुज केले आहे.

आळस आणि कंटाळा झटकून टाकण्याचे आवाहन केले आहे. बालकुमारांच्या मनाला उभारी देण्याचा प्रयत्न केला आहे.


'आभाळमाया'तील बालगीते म्हणजे अक्षरशः प्रकाशगीते आहेत...

खरंतर, बालकविता लिहिणं ही वरवर सोपी वाटणारी गोष्ट मुळात खूप कठीण आहे. नुसतं यमक साधून आणि शब्दांची उतरंड एकाखाली एक

बाळबोधपणे लिहून इथे चालत नाही. मुलांचं मन त्या कवितेत रमलं पाहिजे. मुलांना ती कविता आपली वाटली पाहिजे. मुलांच्या भावविश्वाशी ती कविता सहजगत्या एकरूप झाली पाहिजे. मला वाटतं, बालकवितेची साधना करणाऱ्यांनाच ही कठीण गोष्ट लीलया जमू शकते. म्हणतात ना, इथे हवेत जातीचे. ज्यांनी आयुष्यभर बालकविता हृदयापासून जपली आणि मुलांच्या हृदयांपर्यंत पोहोचवली, बालसाहित्यातील '*अभ्यासोनी प्रकटावे*' असे व्यक्तिमत्त्व असलेले ज्येष्ठ बालसाहित्यकार आहेत डॉ. सुरेश सावंत. आजतागायत त्यांचे १४ बालकवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत; आणि महत्त्वाचे म्हणजे मुलांच्या पसंतीस ते उतरलेले आहेत.

डॉ. सुरेश सावंत यांची आजवर ५६ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३३ पुस्तके बालसाहित्याची आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या तीन पुरस्कारांसह अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. शिक्षण-क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कारही (जीवनगौरव) त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. आचार्य विनोबा भावे प्रणीत सर्वोदय आश्रम ह्या संस्थेतर्फे त्यांना 'आचार्य' उपाधीने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. सावंत यांचे साहित्य शालेय, तसेच विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झाले आहे. त्यांच्या एकूण बालकवितेवर संशोधन करून एका विद्यार्थ्याने एम. फिल. ही पदवी संपादन केली आहे. अनेक विद्यापीठांत त्यांच्या बालसाहित्यावर संशोधन होत आहे.

डॉ. सुरेश सावंत यांनी बालसाहित्याचे संशोधन करून १. वाचनसंस्कृती लेखनसंस्कृती, २. बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध, ३. आजची मराठी बालकविता, आणि ४. बालसाहित्यातील नवे काही ही पुस्तके लिहिली आहेत. ही पुस्तके संदर्भग्रंथ म्हणून अभ्यासकांसाठी अतिशय उपयुक्त ठरली आहेत. डॉ. सावंत यांनी कुंटूर, जळगाव आणि पैठण येथे संपन्न झालेल्या बालकुमार साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले आहे. डॉ. सावंत यांनी १२१ पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत किंवा पाठराखण केली आहे. त्यांनी अनेक साहित्यिक घडविले आहेत. शालेय विद्यार्थ्यांनी लिहिलेले आणि संतोष तळेगावे




यांनी संपादित केलेले 'रानफुलं फुलवणारे बालकवी डॉ. सुरेश सावंत' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात डॉ. सुरेश सावंत यांनी नांदेड येथे राजर्षी शाहू विद्यालय ही आदर्श शाळा उभी केली आहे. या शाळेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा-साठी नावीन्यपूर्ण असे ८१ उपक्रम कार्यान्वित केले होते. डॉ. सावंत यांनी राबविलेल्या शैक्षणिक उपक्रमांचे महाराष्ट्रातील अनेक शाळांमध्ये अनुसरण करण्यात आले आहे. त्यांनी आपल्या शाळेत वाचनसंस्कृतीचा नियोजन-बद्ध विकास तर केलाच, शिवाय विद्यार्थ्यांना लिहिते केले. विद्यार्थ्यांची ६ पुस्तके संपादित करून प्रकाशित केली. त्यांनी संपादित केलेले 'माझा शिक्षक : चरित्रनायक' हे पुस्तक म्हणजे ह्या विषयावरील भारतातील पहिलाच प्रयोग ठरला आहे.

सावंतसरांनी बालसाहित्य आणि बालशिक्षण या दोन्ही क्षेत्रांत भरीव योगदान दिलेले आहे. त्यांच्या बालकवितेबद्दल लिहिताना मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, की सावंत सरांच्या बालकवितेने बालसाहित्याचे दालन खऱ्या अर्थाने समृद्ध केले आहे. त्यांची बालकविता काळाच्या कसोटीवर टिकणारी आहे. मुलांची आनंदाची

बाग फुलविणारी आहे.

डॉ. सुरेश सावंत सरांबद्दल विचार करताना,

*'आत आपुल्या झरा झुळझुळे,*
*निळा निळा स्वच्छंद*
*जीवन म्हणजे उधळित जाणे,*
*हृदयातील आनंद '*

या ओळी सहज ओठांवर येतात. कागदावर झरझर उतरतात. मला वाटते, सावंत सरांचे व्यक्तिमत्त्वच मुळी या ओळींसारखे जीवनाला आनंदाने भिडणारे आणि आपल्या आत बालस्नेहाचा एक नितळ झरा सतत जिवंत ठेवणारे असेच आहे. मुलांवर हृदयातील आनंदाची पखरण करत, चमकदार बालकविता लिहून मुलांची आनंदाची बाग फुलवत, ते आपल्या आयुष्याची वाटचाल करीत आले आहेत. एखाद्या व्रतासारखा हा वसा त्यांनी आयुष्यभर मनोमन जोपासला. वाढवला. फुलवला. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. माझ्यासारखे अनेक जण या वटवृक्षाच्या सावलीत जेव्हा-जेव्हा येतात, तेव्हा नकळत त्यांचं आयुष्य माझ्यासारख्या अनेकांना प्रभावित करतं, अनुकरणीय वाटतं.

डॉ. सुरेश सावंत सरांची पहिली भेट कुठे झाली, कशी झाली, हे आठवताना मला सावंत सर पहिल्यांदा कुठे भेटले असतील तर ते त्यांच्या बालकवितांतून. त्यांच्या बालकवितांची जादू मी अनुभवलीय. त्यांच्या बालकविता वाचता वाचता त्या कधी आपल्या होऊन जातात, हे लक्षातच येत नाही. आपल्याला त्यांच्या बालकविता पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतात. आपले बोट धरून त्या कविता आपल्याला आपल्या बालपणात घेऊन जातात. कल्पनेचे पंख देतात. आनंदाची बाग फुलवतात. ज्ञानाचा विस्तार करतात आणि मनाला अधिक सुंदर करण्याचा विश्वास देतात.

उत्तम बालकवितेचे हेच तर लक्षण आहे. सावंत सर त्यांच्या बालकवितांतून अनेक वर्षे मला भेटत आले आहेत. नुसते भेटत नाही, तर त्यांच्या बालकविता मनाला निखळ, निर्मळ आनंद देत राहिल्या आहेत. रसदार आशयामुळे त्या कविता मनामनात जपल्या गेल्या. नाद, लय, तालामुळे त्या सहज ओठांवर आल्या. गुणगुणल्या. रुळल्या. म्हणूनच सरांची बालकवितांची पुस्तकं ही वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. मनामनात अमीट ठसा उमटवणारी. या पुस्तकांनी खऱ्या अर्थाने बालसाहित्यात मोलाची भर घातली.

अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेचा ग.ह. पाटील पुरस्कार लाभलेला 'हिरवे हिरवे झाड' हा बालकवितासंग्रह, महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बाल-साहित्याचा पुरस्कार लाभलेले 'जांभुळबेट', 'बालकनीती' व 'पळसपापडी' हे तीन बालकवितासंग्रह, तसेच 'भुताचा भाऊ', 'काठीचा घोडा', 'कॉमिक्सच्या जगात', 'रानफुले', 'युद्ध नको बुद्ध हवा', 'नदी रुसली नदी हसली', 'गुगलबाबा', 'एलियन आला स्वप्नात', 'आभाळमाया' आणि आता नुकतेच प्रसिद्ध झालेले 'रंग लागले नाचायला' ही बालकवितांची १४ पुस्तकं मुलांच्या राज्यात आजही हवीहवीशी वाटणारी अशीच आहेत.

आपण नेहमी म्हणतो, की बालसाहित्य हे नेहमीच काळानुसार बदलत गेले पाहिजे. बालसाहित्याचे विषय, आशय आजची मुलं डोळ्यांसमोर ठेवून निवडले गेले पाहिजेत, म्हणजे ते बालसाहित्य काळाच्या कसोटीवर खरे उतरण्यास मदत होईल. त्यात आणखी प्रयोगशीलतेची भरही पडली, म्हणजे ते बालसाहित्य त्याच्या वेगळेपणामुळे मुलांचे लक्ष वेधून घेईल. डॉ. सुरेश सावंत यांनी बालसाहित्य नुसते लिहिले नाही, तर ते साहित्य मुलांपर्यंत पोहचविण्या-साठी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमदेखील राबवले आणि ते यशस्वी करून दाखवले. सावंत सरांची बालकविता मुलांचे मनोरंजन करता करता नकळत एखादा चांगला विचारही देऊन जाते. हेच त्यांच्या बालकवितेचे वैशिष्ट्य विशेषत्वाने जाणवते.

डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकुमारासांठी असलेल्या 'युद्ध नको बुद्ध हवा' ह्या बालकुमार कवितासंग्रहात एकच दीर्घ कविता मुलांना वाचायला मिळते. फुलापानांवरच्या कवितेच्या पलीकडेही वास्तवतेचे एक जग आहे; जे सावंत सरांच्या कवितेतून डोकावून पाहते.

'हिरवे हिरवे झाड' हा कवितासंग्रह मुलांना झाडांचा लळा लावणारा आणि आनंदाचा मळा फुलवणारा आहे.

*'झाड होते पक्ष्यांचे बाबा आणि आई*
*रात्रीला झोपवते गाऊन अंगाई'*

किती सहज सुंदर कवितेच्या या ओळी!

'जांभुळबेट' हा कवितासंग्रह मुलांना कल्पनेची भरारी घ्यायला लावणारा.

*'जांभुळबेटावर उतरली परी*
*थेट निघाली पोपटाच्या घरी*
*पोपटाने दिली जांभळं पाच*
*पोपट म्हणाला नाच परी नाच'*

जांभुळबेटावरची मज्जा अनुभवायची असेल तर हा

कवितासंग्रह मुळातून वाचला पाहिजे.

'भुताचा भाऊ' हा गमतीशीर आणि आश्चर्यकारक अनुभूती देणारा बालकवितासंग्रह आहे.

'बालकनीती' हा बालकवितासंग्रह पालकांना बालकनीती समजावून सांगणारा आहे.

सरांचे सर्वच बालकवितासंग्रह मजेशीर, अद्भुत, आनंददायी आणि नकळत चांगला विचार देऊन जाणारे आहेत. सावंत सरांच्या १४ बालकवितासंग्रहांचा आस्वाद घेऊन त्यावर आपल्या परीने समीक्षा लिहिणाऱ्या 'रानफुलं फुलवणारे बालकवी : डॉ. सुरेश सावंत' या पुस्तकात सहभागी झालेल्या १४ विद्यार्थ्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. सरांच्या कवितेमुळे त्यांना व्यक्त व्हावेसे वाटले, लिहावेसे वाटले, हे विशेष!

या वैशिष्ट्यांमुळेच सावंत सरांच्या पुस्तकांशी मुलांचे मैत्र हे सहजगत्या जुळले आहे, हे आपल्या लक्षात येते.

'पुस्तक माझा मित्र' या बालकवितेत सरांनी लिहिलंय...

*'पुस्तकांनी बोट धरून*
*अद्भुत विश्वात नेले*
*पुस्तकांच्या मैत्रीनेच*
*मला श्रीमंत केले...'*

मला वाटतं, सरांची पुस्तकं वाचून लहानथोरांच्या मनात हा विचार आल्याशिवाय राहणार नाही.

कवितेतली सरांची भेट उत्साहवर्धक तर होतीच, शिवाय माझ्यासाठी त्यांच्याविषयीची उत्सुकता वाढवणारीही ठरली. '*कवी तो कसा दिसतो आननी?*' ह्या प्रश्नाचे उत्तर ती शोधत होती.

मध्ये बरीच वर्षे गेली आणि एकदा मग मी सावंत सरांचा फोन नंबर मिळवून सरांना जरा दबकतच फोन केला. सरांशी झालेला हा पहिला संवाद चांगलाच लक्षात आहे माझ्या. कारण सावंत सर स्वतःबद्दल, स्वतःच्या बालकवितांबद्दल फारच कमी बोलले आणि ते माझ्या बालकवितांबद्दलच जास्त बोलत राहिले. मुलांसाठी अधिक लिहिण्याकरिता मला ते उभारीच देत राहिले.

८९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पिंपरी चिंचवड येथे संपन्न झाले. आनंदाची गोष्ट अशी की, तेथे संमेलनाच्या पहिल्याच दिवशी पुस्तकांच्या दालनात अचानक मला सावंत सर भेटले. अगदी समोरासमोर. तशी मूर्ती छोटीच... पण कर्तृत्वाने अगदी उंचपुरी. मनःपूर्वक बोलणारी. सहज संवादांमुळे सरांशी छान गप्पा झाल्या. माझ्या बॅगेत माझा नवीन बालकथासंग्रह होता... 'आनंदाची बाग'. निघताना तो मी सरांना लगेच भेट म्हणून दिला. संमेलनाच्या दुसऱ्याच दिवशी सरांचा मला फोन आला. म्हणाले, 'रूमवर आल्यावर आपण दिलेले 'आनंदाची बाग' हे पुस्तक वाचले. खऱ्या अर्थाने मुलांची 'आनंदाची बाग' फुलवणारा हा बालकथासंग्रह आहे. मी या पुस्तकावर माझा सविस्तर अभिप्राय लिहिला आहे. पाठवतो आपल्याला.'

'आनंदाची बाग' ह्या पुस्तकाबद्दल सर भरभरून बोलले. मी सरांचे आभार मानले आणि फोन ठेवला. मी विचार केला, इतकी तत्परतेने प्रतिक्रिया देणारा साहित्यिक विरळाच. आजच्या घडीला कौतुकाचे दोन शब्दही बोलायला लोकांकडे वेळ नाही आणि तेवढा मनाचा मोठेपणाही नाही, पण सावंत सर याला नक्कीच अपवाद आहेत.

सरांनी लिहिलेले ते परीक्षण यथाकाळ म. टा.त प्रसिद्ध झाले. सरांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि बालसाहित्याच्या अंगाने ते लिहिले होते. त्यानंतर सावंत सर आणि मी अनेकदा बालसाहित्यावर भ्रमणध्वनीवर बोलत असू. बोलताना सरांकडून प्रत्येक वेळी नवीन काहीतरी मिळत असे, कळत असे. या संवादातून बालसाहित्यात नवीन काही करण्याची ऊर्जा मिळायची.

९०वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन डोंबिवली येथे संपन्न झाले होते. या संमेलनात मी आणि सावंत सर बालसाहित्यावरील एका परिसंवादात एकाच व्यासपीठावर असणार होतो. आता सरांची आणि आपली भेट होणार हा आनंद होताच, त्याचबरोबर सरांचे बाल-साहित्यावरील विचारही आपल्याला ऐकायला मिळणार, ही माझ्यासाठी सुवर्णसंधीच होती. दुग्धशर्करा योगच जणू! सरांचा व्यासपीठावरील वावर, इतरांशी आदरयुक्त संभाषण आणि गोळीबंद, नेमके आणि तितकेच अभ्यासपूर्ण असे सरांचे भाषण... या साऱ्याच गोष्टी माझ्यासाठी शिकण्या-सारख्या होत्या. सरांची ती भेट संस्मरणीय ठरली. आमची मैत्री तिथूनच अधिक घट्ट झाली. वयातलं अंतर गळून पडलं.

मग सर अनेकदा फोनवर, त्यांच्या लिखाणातून, त्यांच्या कार्यक्रमांतून भेटत गेले. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक उलगडत गेले. त्यांचे शाळेतील उपक्रम कळल्यावर तर त्यांची शाळा त्यांच्यासाठी खरी प्रयोग-शाळाच आहे, याची खातरीच पटली. आपल्या शाळेला

'आनंदशाळा', 'जीवनशाळा' बनविण्यासाठी आयुष्य समर्पित करणारे कल्पक, उपक्रमशील आणि प्रयोगशील मुख्याध्यापक, संवेदनशील लेखक म्हणून डॉ. सुरेश सावंत सरांची ओळख तशी महाराष्ट्राला नवीन नाही.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अंतःकरणपूर्वक धडपडणारी त्यांची शाळा (नांदेड येथील राजर्षी शाहू विद्यालय) ही सरांची खरी कर्मभूमीच. सावंत सरांनी आपल्या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन तिथे अनेक उपक्रम, प्रकल्प राबविले आहेत. ते यशस्वी करून दाखविले आहेत. त्यातील एक प्रकल्प फारच सुंदर आणि तितकाच अभिनव असा. तो प्रकल्प म्हणजे विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील शिक्षकांची चरित्रे आपल्याच शब्दांत रेखाटली. या प्रकल्पातून एकोणीस विद्यार्थ्यांनी एकोणीस शिक्षकांची चरित्रचित्रे जिव्हाळ्याने रेखाटली. त्याचे संपादन डॉ. सुरेश सावंत यांनी केले आणि त्यातूनच आकाराला आला एक अनोखा, देखणा आणि तितकाच भावस्पर्शी असा ग्रंथ, तो म्हणजे 'माझा शिक्षक : चरित्रनायक'. अशा प्रकारचा हा भारतातील पहिलाच प्रकल्प आहे.

हल्ली विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधील दरी वाढत चालली आहे, असे अनेकदा बोलले जाते. वर्तमानपत्रांतून अशा स्वरूपाच्या बातम्या आपल्यापर्यंत येऊन धडकतात. वाचून मन विषण्ण होते. अशा गढूळ वातावरणात विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षकांविषयी उत्कटतेने काही लिहावेसे वाटणे, ही खरोखरच आनंददायी आणि आशादायी अशीच गोष्ट. आपल्या शिक्षकांबद्दल, त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल जाणून घेणे, हा मुलांचा स्थायिभावच असतो. मुलांच्या अंगभूत जिज्ञासू स्वभावाचा उपयोग प्रकल्पासाठी करून घेणे, हीच सावंत सरांची खासियत आहे.

शिक्षकांच्या आयुष्याची जडणघडण आपल्या शब्दात मांडताना विद्यार्थी हे सारं निर्विकारपणे मुळीच करणार नाहीत... यात मुलांचं कुतूहल तर असेलच, पण त्यात तितकीच उत्कटताही असेल, हे सावंत सरांना पुरेपूर ठाऊक होते. विद्यार्थी हे सारं कागदावर मनःपूर्वक लिहीत असताना शिक्षकांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना त्यांच्या मनःपटलावरही कळत-नकळत कोरल्या जातील. त्यांना त्या प्रभावित करतील. शिक्षकांच्या आयुष्यातील संघर्ष विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या पुढील आयुष्याच्या टप्प्यांवर मार्गदर्शक ठरू शकेल. हा विचार सावंत सरांच्या या प्रकल्पाच्या मुळाशी होता. वाचणाऱ्या विद्यार्थ्यांना लिहितं करून त्यांच्याकडून अशा प्रकारचं लिखाण करून घेणं, ही तशी अवघड गोष्ट होती. पण डॉ. सावंत सर त्यांच्या अनुभवातून मुलांसाठीच्या अशा अवघड गोष्टी सोप्या करतात. सोप्या गोष्टी ते सहज करतात. सहज गोष्टी सुंदर करतात आणि सुंदर गोष्टी ते सतत करताना दिसतात.

एकदा काय झाले, सरांनी ते प्राचार्य असतानाच्या काळात माझी सर्व पुस्तकं मुलांना वाचण्यासाठी माझ्याकडून मागवून घेतली. मीही मुलांसाठी ती पुस्तके आनंदाने पाठवली. महिनाभरात सरांनी मला फोन केला आणि म्हणाले, 'आमच्या शाळेतील मुलांनी तुमच्या पुस्तकांचा त्यांच्या भाषेत, त्यांच्या आकलनानुसार छान परिचय करून दिलाय. आता त्या मुलांच्या लिखाणाचे मी पुस्तक संपादित करणार आहे. मुलांना त्यांचे लेखन पुस्तकात प्रसिद्ध झाले, तर त्याचा वेगळाच आनंद मिळेल.' हे ऐकून मी तर अवाक् झालो.

माझ्या प्रत्येक पुस्तकावर या मुलांनी लिहिलेले परीक्षण आता सर पुस्तकबद्ध करणार होते. मला वाटले, आपल्या लिखाणाची मुलांकडून मिळालेली केवढी मोठी ही पोचपावती! पण हे सारे सरांमुळेच शक्य झाले. आजच्या घडीला कोण कुणासाठी एवढे करतो? जो तो स्वतःच्या कोषात मिटून बसलेला. पण सावंत सर हाती घेतलेलं कोणतंही कार्य मनःपूर्वक करतात, याची प्रचिती पुन्हा एकदा आली. लवकरच इसाप प्रकाशनाने प्रकाशित केलेलं व सावंत सरांनी संपादित केलेलं 'एकनाथ आव्हाड यांचे बालसाहित्य : बालसमीक्षकांच्या नजरेतून' हे पुस्तक माझ्या हाती आलं. केवढा सुखद धक्का! मुलंही खूप आनंदित. सर आहेतच असे आनंद वाटत जाणारे. अनेकांना त्या आनंदात सामील करून घेणारे.

जळगाव येथील सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी २०१९मध्ये जळगाव येथे मराठी बालकुमार साहित्य संमेलन आयोजित केले होते. सावंत सर या संमेलनाचे अध्यक्ष होते. याच संमेलनात मला आणि साहित्यिक सुभाषचंद्र वैष्णव यांना एकूण बालसाहित्यसेवेबद्दल पुरस्कार दिला जाणार होता. या निमित्ताने पुन्हा सरांची भेट झाली. गप्पा झाल्या. पुस्तकांची देवाणघेवाण झाली. तिथले सरांचे अध्यक्षीय भाषण बालसाहित्यकारांना अंतर्मुख करणारे ठरले. आपल्या भाषणात त्यांनी बालसाहित्याची समग्र सृष्टी उभी करून श्रोत्यांना बालसाहित्याकडे जाणीवपूर्वक बघण्याची दृष्टी दिली, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सर म्हणाले होते, ''आज विज्ञानयुगात सबंध जग अतिशय गतिमानतेने ढवळून निघत आहे. कालचे पारंपरिक विचार आणि कल्पना आज कालबाह्य ठरत आहेत आणि त्यांची जागा नवे विचार, नव्या कल्पना घेत आहेत. आजची बालकांची पिढी ही फारच चिकित्सक आणि जिज्ञासू आहे. आजच्या बालकाला चंद्रासाठी हट्ट धरणाऱ्या प्रभूरामचंद्राची गोष्टही ऐकावीशी वाटते आणि खऱ्याखुऱ्या चंद्राची, म्हणजेच आपल्या पृथ्वीच्या उपग्रहाची खगोलशास्त्रीय माहितीही वाचावीशी वाटते. याचाच अर्थ आजच्या बालकाला स्वप्नंही हवी आहेत आणि सत्यही हवे आहे. त्यातून तो स्वतःचे स्वतंत्र मत बनवू पाहतो. तो इतरांची 'तयार' मते स्वीकारायला तयार नाही. अशा स्वयंप्रज्ञ बालवाचकांसाठी निखळ बालसाहित्य लिहिणे, हे आजच्या बालसाहित्यिकांपुढचे एक अवघड आव्हान होऊन बसले आहे.

बालसाहित्य हे काळाशी आणि बालमनाच्या विकासाच्या टप्प्यांशी सुसंवादी असले पाहिजे असे जे म्हटले जाते, ते या अर्थाने! बालकुमारांची बालसाहित्याशी गट्टी जमायची असेल तर बालसाहित्य त्यांच्या पसंतीला उतरणारे असले पाहिजे. मुलांसाठी लिहायचे तर ते एक तर उपदेशपर तरी असले पाहिजे किंवा बालकांच्या बोबड्या भाषेत तरी असले पाहिजे, असे दोन्ही भ्रमांचे भ्रमर बाजूला सारून लेखन केले तरच ते बालवाचकांच्या पसंतीला उतरू शकेल.''

आजच्या मुलांचा इतका बारकाईने विचार करणारे हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच बालसाहित्यकार आहेत, आणि त्यात सावंत सरांचे नाव अगदी अग्रगण्य आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा सरांचा ध्यास हा अंतःकरणापासून आहे. अनेक चिमुकल्या लिहित्या हातांना सरांनी पाठबळ दिलंय. आज सरांचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत आत्मविश्वासाने आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविताना दिसतात. शिक्षणक्षेत्रातील या अतुलनीय व समर्पित योगदानाबद्दल सरांना भारत सरकारचा राष्ट्रपती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सरांना त्यांच्या कार्यातही अनंत अडचणी आल्या असतील, पण सर अजिबात थांबले नाहीत. हाती घेतलेले प्रत्येक कार्य त्यांनी परिश्रमपूर्वक पूर्णत्वास नेले. ते कार्य आदर्शवत ठरले.

अशा वेळी, मला त्यांच्या 'जांभुळबेट' पुस्तकातील 'झरा' या बालकवितेतील खालील ओळी आवर्जून आठवतात :

*'कड्यावरून उड्या मारीत,*
*पळू लागला झरा*
*डोंगर आडवा आला तरी,*
*अडला नाही जरा...'*

धावत्याला रस्ता सापडतो असे म्हणतात, तेच खरे!

सरांची कामाची पद्धतही अनोखी आहे. हाती घेतलेलं कोणतंही कार्य... मग ते शिकवणं असेल, लेखन-वाचन असेल, संपादन करणं असेल, मुद्रितशोधन असेल... ते जीव ओतून आणि अभ्यासपूर्णच करणार. जोपर्यंत ते काम मनाजोगं होत नाही, तोपर्यंत त्यांच्या मनाला स्वस्थता नाही, असा त्यांचा शिरस्ता. म्हणूनच त्यांच्या हातून पूर्ण झालेली कोणतीही साहित्यकृती, शिक्षणकृती ही इंद्रधनुष्याप्रमाणे लक्ष वेधून घेते.

म्हणतात ना,

*'सुंदरतेचा वेध घ्यायला, मन नेहमी जागे हवे*
*प्रयोग नवे करायला, हात नेहमी सज्ज हवे.'*

सरही असेच आहेत! बालसाहित्यात आणि शिक्षणक्षेत्रात विविध प्रयोग करून बालमन फुलविणारे. मुलांबद्दल अपार लळा आणि जिव्हाळा असणारे. सरांचे हे व्यक्तिमत्त्व पाहून मला निदा फाजली यांच्या कवितेच्या ओळी आठवतात...

*'घर से मस्जिद है बहुत दूर*
*चलो यूँ कर लेते है*
*किसी रोते हुए बच्चे को हसाया जाये.'*

मला वाटतं, सरांनी आयुष्यभर मुलांची मनं जपली. त्यांच्या दुःखावर हळुवार फुंकर घालून त्यांना आनंदाच्या वाटेवर आणलं. बालसाहित्यातून बालकांची मनं आनंदाच्या बागेसारखी फुलवली.

*'मुलं म्हणजे देव, मुलं म्हणजे देव*
*मुलं म्हणजे राष्ट्राची, मोलाची ठेव'*

हाच विचार आयुष्यभर त्यांच्या कृतीतून आणि त्यांच्या बालसाहित्यातून झिरपत झिरपत आजही आपल्यापर्यंत तो पोहचत आहे, हे विशेष!

**– एकनाथ आव्हाड**
(साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त कवी)
भ्रमणध्वनी : ९८२१७७७९६८

# नारायण सुर्वे यांच्या कवितेतील स्त्री

किरण डोंगरदिवे

**मराठी** कवितेतला एक महत्त्वाचा दीपस्तंभ म्हणजे कविवर्य नारायण सुर्वे हे होय. गंगाराम सुर्वे नावाच्या हवालदाराला सापडलेला हा अनाथ मुलगा काव्यक्षेत्रातील सूर्य म्हणून पुढे नावारूपास येईल असे कुणालाही वाटले नसेल. नारायण सुर्वे यांचा काव्य गोतावळा आजही गरीब, कामगार, शोषित, पीडित, आणि वेदनांकित वस्तीमध्ये सापडतो. सुर्वे यांची कविता शोषितांची कविता म्हणूनच ओळखली जाते. त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारा स्त्री विषयक विचार फार चिंतनीय आणि तितकाच आश्वासक असा होता. या कवितेतून व्यक्त होणारी स्त्री, कामगार कष्टकरी वर्गातील असणार हे ओघाने आलेच. त्याचबरोबर ती कामगार पुरुषासाठी सहकारी जीवनातील आश्वासक शक्ती म्हणूनही पुढे येताना दिसते. कदाचित नारायण सुर्वे यांनी कामगार वस्तीमध्ये वावरताना त्यांना जाणवलेले आणि त्यांनी जवळून पाहिलेले अनुभव अधिक सजगपणे मांडताना सर्व कष्टकरी लोकांसोबत त्यांनी कवितेमधून मांडलेली कष्टकरी स्त्री वाचकाला नवीन अनुभूती देते.

आई जाण्याचे दुःख टिपताना एका कष्टकरी स्त्रीचा जीवन प्रवास संपल्यावर पाच भावंडांनी एकमेकांना बिलगून चादर ओढून घेताना आईची माया पांघरणे, या विलक्षण आणि आर्त प्रतिमांमधून आई नावाच्या स्त्रीमुळे जीवनाला काय गती होती, ती नाही म्हटल्यावर काय परिस्थिती असू शकते? हे शब्दात मांडताना नारायण सुर्वे एक शहारा आणणारा अनुभव वाचकास देतात. सुर्वे यांच्या कवितेतील स्त्री कष्टकरी आणि कामगार असली तरी तिचे स्वाभाविक रूप घेऊन ती आई, बहीण, पत्नी, मुलगी, प्रेयसी अशा वेगवेगळ्या रूपांतून समोर येत राहते. गलबलून जातो तेव्हा या कवितेतून तर कवीने संसार रथाच्या गाडा ओढताना होणारी दमछाक पत्नीच्या आश्वासक आणि दिलाशाच्या प्रेमामुळे कशी दूर होते, याचे अगदी सजीव चित्रण केलेले दिसते. गरीब कामगारांच्या घरातील कर्त्या पुरुषाचे भयाण पण वास्तव चित्र डोळ्यापुढे उभे राहते.

*गलबलून जातो तेव्हा*
*तुझ्याच पवित्र कुशीत शिरतो,*
*तुझ्या मखमली कवेत स्वतःस अश्रूसह झाकून घेतो.*
*दिवसभर थकलेली तू तरीही चैत्रपालवी होतेस,*
*कढ उतू जाणाऱ्या दुधावर स्नेहमय साय धरतेस.*

अशा शब्दातून पत्नीकडून मिळत जाणारा दिलासा, तिचे स्वतःचे कष्ट विसरून नवऱ्यासाठी पुन्हा समर्पण वृत्तीने पुढाकार घेणे आदी संकल्पना डोळ्यासमोर उभ्या राहत



असतानाच, 'किती वाळलात तुम्ही' या वाक्यातून पीळ पाडणारी व्यथा समोर येते. कदाचित हा अनुभव प्रत्येकाने वेगवेगळ्या पातळीवर ऐकलेला असल्यामुळे हा सह-जीवनाचा उत्कृष्ट संवाद वाटतो. आणि ही कविता प्रत्येकाला आपलीशी वाटते. आपले सामाजिक जीवन जगताना कवी म्हणतो,

*...आवडीने रांधलेला भात खावयास मी नसेन घरात*
*उद्याचे नवे रचाया बेत मी हजर असेल सभेत*
*उपाशीच वाट पाहू नको*

अगदी शेवटच्या ओळीतून एका विलक्षण उंची गाठणाऱ्या कवितेतून सुर्वे आपल्या सहचारिणीला जो मोलाचा सल्ला देतात, ती खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष-समानतेची नांदी आहे, असे प्रखरतेने म्हणावसे वाटते. आता ही समानता संसार गाडा ओढण्यासाठी, कामावर आणि रोजंदारीवर जातानाही असते. म्हणूनच कामावरून स्त्री परतल्यावर घरातील वातावरण कसे बदलते ते सांगताना कवी म्हणतात,

*खुराड्यातील जग माझे उठते ग कलकलून*
*तू येतेस जेव्हा दमून*

कवितेतून स्त्रीरूप रेखाटताना साहित्यातील कवींनी अनेक बाबींचा विचार केला असला तरी, रेड लाइट भागात काम करणाऱ्या स्त्रियांचे मनोविश्व व्यक्त करणारे धाडस फक्त नामदेव ढसाळ किंवा नारायण सुर्वे असेच लोक प्रचंड ताकदीने आणि अश्लीलते पासून संपूर्ण शब्दसृष्टी दूर ठेवत निर्मळपणे करू शकतात... नारायण सुर्वे यांनी नामदेव ढसाळ यांच्याप्रमाणे दाहक शब्द जरी वापरले नाहीत, तरीही आशय मात्र प्रचंड दाहकच होता. 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' या कवितेमध्ये पंडित नेहरूंना श्रद्धांजली म्हणून शरीरविक्रय करणारी स्त्री एक दिवसाची सुट्टी घेते, तिच्या दृष्टीने ती नेहरूंना भावपूर्ण श्रद्धांजली! सुर्वे यांच्या कवितेत शरीरविक्रय करून नवऱ्याला पैसे पाठवणारी स्त्री भेटते. त्यातही त्या पैशातून मुलाला शिक्षण द्या, असे ती आवर्जून नवऱ्याला सांगते ही सकारात्मक ऊर्जा नारायण सुर्वे यांच्या कवितेत सापडते. त्याचप्रमाणे एक गिऱ्हाईक आपल्याला लग्नाची मागणी घालत आहे, हे सुद्धा स्वतःच्या नवऱ्याला ती बिनदिक्कत सांगते,

*ह्ये कातडं लयी वंगाळ बगा*
*माणूस गोचिडीवानी चिकटतं आन् कायबी बोलून जातं*
*पुरुस जातीचं मला हसुबी येतं अन् रडुबी येतं बगा...*

या ओळीतूनच तमाम पुरुषी समाजाचे नागडे वास्तव नारायण सुर्वे यांनी दाखवले आहे. अशीच एक दाहक कविता म्हणजे, 'तुमचंच नाव लिवा!' या कवितेमधील वेश्यावृत्तीची एक स्त्री स्वतःच्या मुलाला शाळेत दाखल करण्यासाठी जाते आणि

*कंच्याबी देवाचं नाव नगा लिहू*
*माणसाचंच लिवा*
*देवानं काय केलं हो, वटी तेनचं भरली ना ही*

असं सांगून माणसाचं पाप देवाच्या माथी मारण्याचे असामान्य सत्य असे तत्त्वज्ञान नारायण सुर्वे यांची कविता सांगून जाते. कुटुंब या कवितेत गरिबीमुळे एकच वस्त्र असल्यामुळे पाहुण्यांसमोरही निर्वस्त्र झोपणाऱ्या सासू आणि सुना सोशिकपणाच्या मूर्तिमंत प्रतिमा आहेत? की हरवलेल्या अर्थव्यवस्थेची पराभूत मानसिकता? असा प्रश्न सुर्वेंची कविता वाचताना पडतो. 'माझ्या देशाच्या नोंद बुकात माझा एक अभिप्राय' या कवितेत सुर्वे नोंदवतात तो अभिप्राय असा

*'स्त्री केवळ एक मादक आणि उत्तेजक पदार्थ*
*हाच आजच्या कुलीन नजरेतील बघण्याचा अर्थ*
*ती : फुलवाल्याकडील एक पुडी, एक कुडी, एक गुडिया...*
*ओह... हे देशा; मी शरमेनं दबून चाललोय.'*

एकंदरच भारतीय समाजातील स्त्रियांचे दुर्लक्षित व शोषित असे जीवन सुर्वे यांनी आपल्या कवितांमधून मांडले आहे. मात्र प्रसंगी स्त्रियांचा करारी स्वाभिमान अधोरेखित करताना त्यांचे शब्द कमी पडत नाहीत. 'तेव्हा एक कर' या कवितेत

*'खूशाल दुसरा संसार थाट, हवे तर मला स्मरून किंवा विस्मरून'* असा स्पष्ट सल्ला देणारा कवी सूर्यकुळातील असून आपल्या सहचारिणीनेही देव-धर्म याचे अवडंबर नाकारले आहे, याची जाणीव ठेवणारा आहे.

*'ते रुद्राक्ष पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव,*
*कालच म्हणालीस कुणीही भले केलेले नाही'*

अगदी स्पष्ट शब्दांत स्वतःबरोबर चालण्यास सांगणारा नायक, स्त्रीचे महत्त्व घेऊन जगाचे परिवर्तन घडविणारा जननायक आहे. त्यामुळे समाजहित साधणारा आहे, याची जाणीव नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेला करून दिली आहे. गरीब कष्टकरी कामगार-प्रवर्गातील नारायण सुर्वे यांची कवितेतील स्त्री खरोखर प्रेरणादायी आश्वासक आणि आपल्या अवतीभोवती आढळणारी आहे, हेच नारायण सुर्वे यांच्या कवितेचे फलित आहे.

**- किरण शिवहर डोंगरदिवे**
भ्रमणध्वनी : ७५८८५६५५७६

# गुलबक्षी

## सुजाता राऊत

**त्यावेळी** मी पोस्ट ग्रॅज्युएशन करत होते. एक कोवळा गंध होता त्या दिवसांना. फारशी समज नव्हती आजूबाजूचं भानही नव्हतं. म्हणूनच की काय, आंब्यावर नुकत्या फुललेल्या मोहरासारखा गंध होता त्या दिवसांना. तेव्हाच ट्रेनमध्ये ती मला पहिल्यांदा भेटली. उलट्या दिशेने प्रवास असायचा. वेळही गर्दीची नसायची. गजरे फुलांची टोपली घेऊन ती चढायची. साधारण नऊ-दहा वर्षांची असावी. करवंदासारखे नितळ डोळे, गोल चेहरा, घनदाट केसांच्या गच्च वेण्या आणि चेहऱ्यावर विलक्षण गोडवा. अंगात साधाच फ्रॉक असायचा. माझ्यासमोर रिकाम्या सीटवर येऊन बसायची.


''लय स्टोरी वाचता की तुमी.'' एकदा माझ्या हातातल्या पुस्तकाकडे बघून म्हणाली. किती गोड नाजूक निरागस आवाज होता तो.

''गजरा घेणार का?''

''कोण? मी?'' असं म्हणून मी तेव्हाच्या माझ्या खूप आखूड केसांवरून हात फिरवला आणि आम्ही दोघीही हसलो. मग 'हे घ्या तुमाला' म्हणत तिने तिच्या टोपलीतल्या मधुमालतीच्या फुलांचा छोटा गुच्छ मला दिला.

''अगं, किती छान आहे हा गुच्छ.''

''विकायला नाही हां. ही फुलं आमच्या घरला आहेत. घ्या तुम्हाला फुकटच!''



''फुकट? पण मला का देतेस तू?''

''का?...'' ती स्वतःशीच विचार करू लागली.

''तुम्ही लयच वाचता बुकातून स्टोरी म्हणून!'' आणि मिश्कीलपणे हसू लागली.

''हो का?'' मला त्या बाहुलीसारख्या चुणचुणीत मुलीचं खूप कौतुक वाटलं. आवडलीच मला एकदम. किणकिणत हसत ती निघून गेली. मग ती मला खूप वेळा दिसायची. डोळ्यांच्या कोपऱ्यातून ओळखीचं हसायची.

''नाव काय तुझं?'' मी विचारलं एकदा.

''इंद्रा.''

''पण मी तुला गुलबक्षीच म्हणणार.''

''गुलबाशी काय म्हणून?''

''तुला पाहिल्यावर मला गडद गुलाबी रंगाची गुल–बक्षीची फुलं आठवतात आणि तीच तू मला पहिल्यावेळी दिली होतीस नाही का?''

यावर तिला काय कळलं, कोणास ठाऊक! पण ती पुढे बोलली, ''फुलं लयच आवडतात तुमाला. आमच्या गावाला आला तर तुम्ही येड्याच होत्याल, अशी समदी फुलं बघून.''

''कुठे गाव तुझं?''

''करनाटकात. कन्नडीगा आसतो आमी.''

''पण मराठी बोलतेस की तू बरं.''

''हां तर. आता हिथंच तर ऱ्हातो ना.''

''तुमची भाषा येते तुला?''

''हा ती पण येते. ल्हिता पण येते. मराठी नाही ल्हिता येत. चौथी झाली माझी. शाळा आता सोडली.''

''सोडलीस शाळा तू? का ग?'' मला प्रचंड वाईट वाटलं.

''अम्मा बोलती, नको मुलींना शाळा. बास झालं. आता कमवायला लागा.'' गुलबक्षी बोलत बोलत पुढे निघून गेली पण तिचं अस्तित्व माझ्या मनाभोवती रेंगाळत राहिलं होतं. बाहुली सारखी गोड मुलगी, प्रसन्नमुद्रेची. ती यायची तीच मुळी सुगंध घेऊन. एखादा माणूस येतो आणि उजेड पडल्यासारखं वाटतं, अगदी तशीच होती ती. त्यानंतर काही दिवसांतच मी क्लासमध्ये शिकवायला लागले. सकाळची लवकरची वेळ आणि उलट्या दिशेने प्रवास असायचा. गर्दी कमी असायची आणि गुलबक्षी भेटायचीच. माझे ते खूप गोंधळलेले, संभ्रमाचे, धडपडीचे दिवस होते. त्या वयात सगळ्यांचंच तसं असतं. पण तरी जोम होता. उत्साह होता. मनात नवनवीन आशा–आकांक्षा फुलत होत्या. प्राजक्ताच्या देठाशी केशरी मध साठलेला असावा तसा आयुष्यावर कुठेतरी अढळ विश्वास होता. मनाला नित्य नवे कोंब फुटत होते. आणि तेव्हाच मला वरचेवर भेटणारी गुलबक्षी कोवळ्या पोपटी पालवी सारखी. आमची तर दोस्तीच झाली. ती कधी फुलं द्यायची मला आणि कधी कधी मी माझ्याबरोबर तिलाही ट्रेनमध्ये येणारे कानातले डूल, केसांची पिन असं काहीतरी घेऊन द्यायचे. ती अलगद हसून नाही नाही म्हणायची. ''घे ग गुलबक्षी'' असा खूप आग्रह केल्यावर घ्यायची आणि मुग्धपणे ते डूल न्याहळत बसायची.

एकदा अशीच श्रावण महिन्यातली सकाळ होती. सकाळपासून पाऊस रिमझिमत होता. हवेत सुखद गारवा. सकाळचं लवकरचं लेक्चर घेऊन मी परत निघाले होते. समोर गुलबक्षी बसलेली; एकचित्ताने गजरे करत होती. ट्रेन मध्येच थांबली. पावसाची जोरकस झड आलेली. अर्धवट काळोख दाटलेला. खिडक्यांमधून पाण्याचे तुषार येत होते. पावसालाच एक लयबद्ध आवाज होता. मला एका सुंदर गाण्यांच्या ओळी अचानक आठवू लागल्या. माझ्या मनात आपोआप उमटूच लागलेल्या.

''गानं म्हणताय जनू!'' गुलबक्षी एकटक माझ्याकडे बघत बोलली.

''अगं पण मनातल्या मनात म्हणतेय. तुला कसं कळलं?'' मी आश्चर्याने म्हणाले.

''बरं म्हनातल्या मनातच म्हणा की'' ती गजरा करता करता हसू लागली.

''हसतेस होय? मग तू म्हण की एखादं गाणं. तुझा आवाज किती छान आहे!''

''हां म्हंते...'' ती काहीतरी आठवू लागली. मग गजरा बाजूला ठेवला. माझ्यासमोर बसलेली. तिने डोळे मिटले, तिची टिकली चमकत होती. हळूहळू ती गायला लागली...

*''चेल्लीदारू मलियेगा बाणासूर इरि मल्ये*
*अन्नधाचंदा मयकरा मडवेगे चेल्लीदारु मलियेगा*
*मधाप्पा बसवगा. चेल्लीदारू मलियेगा...''*

खूप लयबद्ध अगदी चालीत रंगून जाऊन ती गात होती. गाताना हळूहळू डुलत होती. तिच्या कानातले डूल हलत होते. आवाज मधुर,चढत जाणारा. मला अर्थ कळत नव्हता; पण गोड लडिवाळ शब्द. मनोवेधक चाल. जशी काही तिची तंद्री लागलेली!

‘‘किती छान गातेस ग गुलबक्षी.’’ मी म्हणाले तशी गुलबक्षी लाजली. खाली बघत ओठांच्या कोपऱ्यात हसू लागली.

‘‘मराठी गाणं येतं का तुला?’’

‘‘होय की!’’ ती लगेच उभी राहिली.

‘‘*नाच रे मोरा आंब्याच्या व्हनांत*
*नाच रे मोरा नाच*
*काळा काळा कापूस पिंझला रे*
*ढगांशी वारा झुंजला रे...*’’ तिला जसं आठवले, तसं गाऊ लागली.

‘‘*पावसाची रिमझिम थांबली रे*
*तुजी माजी जोडी जमली रे*
*आभाळात छान छान सातरंगी कमान*
*कमानी खाली त्या नाच...*’’

‘‘हे बघा-हे बघा ताई, बाहेर पाऊस आणि आपलं गाणं पण पाऊस!’’ ती एकदम आनंदात ओरडली आणि तिने गालांवरती हात ठेवले. तिचे डोळे विस्फारले होते. कसलातरी आनंद तिच्या हृदयात दाटलेला. बाहेर टपटपून आलेला प्राजक्तासारखा.

‘‘खरंच ग!’’ बाहेर झिमझिमता पाऊस थांबत आलेला आणि आमच्या दोघींच्याही मनात अकारण चिंब आनंद भरून गेलेला...

चमेलीच्या नाजूक पांढऱ्या पाकळ्यांना किंचित गुलाबी किनार असलेली फुलं गजऱ्यात कशी एकमेकांत हलकेच गुंतलेली असतात, तसं त्या-त्या वेळीपुरतं आमचं मन एकमेकींमध्ये गुंतून गेलेलं असायचं. दोन वर्षांनी माझी नोकरी सुरू झाली. वेळा थोड्या बदलल्या; पण प्रवास वाढला. गुलबक्षी भेटल्यावर एकदा सांगितलं तिला, ‘‘अगं, आता मला लांब जावं लागतंय बघ. कॉलेजमध्ये नोकरी मिळाली मला.’’

‘‘बेश्ट झालं की.’’ ती म्हणाली, ‘‘आता तरी ती केसं वाढवा मग!’’ आता नोकरी मिळवण्याचा आणि केस वाढवण्याचा काय संबंध? मला हसायला आलं. पण ती तशीच होती मिश्कील, हसरी निर्मळ फुलासारखी. चमेलीच्या नाजूक पांढऱ्या पाकळ्यांना कशी गुलाबी किनार असावी ना, तशी एक अबोधपणाची झालर तिच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला होती.

वाहत्या नदीसारखा काळ पुढे चालला होता. गुलबक्षी आता अधिक टवटवीत, तरुण बहरलेल्या रोपा सारखी दिसू लागली. तिचा अल्लडपणा थोडासा कमी झालेला जाणवत होता. डोळे अधिक टप्पोरे भावपूर्ण दिसायचे. त्याखाली सुरेख काजळाची रेघ असायची. एक दिवस नवीन साडी नेसून गळ्यात माळा घालून नटलेली अशी समोर आली ती. वेणीत भरगच्च गजरा, नाकात चमकी आणि ठळक बिंदी.

‘‘लगीन झालं की!’’ पुसटत्या हलक्या नाजूक आवाजात लाजत लाजत बोलली गुलबक्षी. ही तर जेमतेम सतराचीच असणार आता. मी अंदाज बांधला. तिचं साजिरं रुप काही क्षण बघत राहिले आणि म्हणाले, ‘‘वा,वा छान सुखात रहा!’’ तिचा नवरा एका कंपनीत सिक्युरिटी म्हणून काम करायचा. चांगलं झालं, नोकरी आहे त्याला, गुलबक्षी सुखात राहील मी मनाशी म्हटलं. पण तसं व्हायचं नव्हतं. आयुष्य इतकं साधंसरळ असतं तर आणखी काय हवं होतं!

वर्ष-सहा महिन्यांतच गुलबक्षी चिडचिडलेली दिसू लागली. तिच्या चेहऱ्यावरची चमक कमी झाली. नवरा नोकरी सोडतो-धरतो सारखा, कमावत नाही, काहीच करत नाही. फक्त पितो आणि मारतो. अनेकजणींची व्यथा तिच्याही वाट्याला आलेली. आणि अनेकजणी आयुष्य निभावतात तसंच चाललं होतं तिचं.

‘‘मीच सोडला त्याला. लई कट्टाळा आलाता. काय उपेग अशा सौंसाराचा.’’ एकदा ती अतिशय पोटतिडिकेने म्हणाली. बोलता बोलता तिला मनात प्रचंड राग आलाय कळत होतं. तिच्या नाकपुड्या रागाने थरथरत होत्या. आतून काहीतरी तुटल्यासारखं झालं होतं तिला. यावर बोलण्यासारखं काहीच नव्हतं. तिच्या टोपलीत सुगंधाने फुलून आलेले गजरे होते; पण तिचं मन मात्र कोमेजलं होतं.

नंतर गुलबक्षीच्या आणि माझ्या वेळा बऱ्याच बदलत गेल्या. आता आम्ही कधीतरीच भेटायचो. दिसली की ती मलूल हसायची. नाजूक बहरलेल्या वेलीच्या मुळाशी पाणी नसेल तर ती कशी आकसून जाईल, तशी दिसू लागली गुलबक्षी. चमेलीच्या पाकळ्यांची गुलाबी कडा जशी निस्तेज व्हावी तशी. पावसात नाचणारा मनातला मोर अदृश्य झाला होता. आनंदाची लकेर केव्हाच विरली होती.

त्या एका रात्रीची गोष्ट. एका कार्यक्रमाहून निघायला मला खूपच उशीर झालेला. सोबतची मैत्रीणही नव्हती. मी अगदी वेगाने स्टेशनकडे निघाले होते. वरती ब्रिजवर आले. हा जरा कमी रहदारीचा पूल. इतक्या उशिरा तर

फारच कमी वर्दळ होती. पिवळा उदास लाइट ब्रिजवर पसरलेला होता. खालून जाणा-येणाऱ्या गाड्यांची वाहती रांग. चमचमते दिवे. मी वर आले आणि टोकाशी उभ्या राहिलेल्या दोन-तीन स्त्रिया दिसल्या. अगदी सहज पाहिलं आणि एकीचा चेहरा मला ओळखीचा वाटला. दिव्याच्या खांबाखालीच ती उभी होती. भडक साडी नेसलेली. केसांची रचना करून वर बांधलेली. सेंटचा उग्र गंध. मी अगदी तिच्यासमोर जाऊन थांबले. गुलबक्षीच होती ती. चेहऱ्यावर भडक मेकअपचा थर, गालांवर पसरलेली स्वस्त रूज, डोळ्यांभोवती खूप गडद मेकअप. काजळाची ठळक रेघ आणि त्यावर चमकत असलेले सोनेरी बिंदू. आम्ही दोघी अवाक् होऊन एकमेकींकडे पाहत राहिलो. दोघींमध्ये स्तब्धता पसरली.

''गुलबक्षी तू इथे...'' ती एक क्षण काहीच बोलली नाही. मग ओरडलीच, ''तुमी काय करता इतक्या उशिरा? जा घरला. लय उशीर झालाय.'' ती जोरात बोलली, नजर टाळत होती. चेहऱ्यावर नाराजी होती. नापसंतीच्या खुणा होत्या. कपाळावर आठ्या पडल्या होत्या. हातांची अस्वस्थ हालचाल होत होती.

''गुलबक्षी...''

''कोन नाय इथं गुलबाशी, तुमी जा आता...''

ती काय करत होती तिथे, ते न विचारताही कळत होतं. मी जात नाहीशी बघून ती रागारागाने माझ्यासमोर निघून गेली. घाईघाईत ब्रिज उतरायला लागली. खालून ट्रेनचे आवाज येत होते, माणसे येत जात होती. मी फक्त ती गेले त्या दिशेला काही वेळ बघत राहिले. मन सुन्न झालं होतं. उतरून पुढे ट्रेनमध्ये बसले आणि गुलबक्षीची कितीतरी रूपं आठवत गेली. झिमझिमत्या पावसात मोकळ्या गळ्याने गाणारी गुलबक्षी, टपोऱ्या करवंदी डोळ्यांची निरागस गुलबक्षी. फुलं बघून तुम्ही अगदी येड्या होत्याल असं मला म्हणणारी, फुलांचा गुच्छ देणारी गुलबक्षी. आणि आता ब्रिजवर लाइटच्या खांबाखाली पिवळ्या उजेडात भडक मेकअप करून उद्दाम मुद्रेने उभी असणारी गुलबक्षी. तिला आता काय वाटत असेल? तिच्या मनाला आणि शरीरालाही काय यातना होत असतील? सहजासहजी स्वीकारलं असेल तिने की मजबुरी असेल किंवा दुसरं काही असेल? कोणी भाग पाडलं असेल तिला अशा कोवळ्या देहाचा व्यापार करायला की पोटाची भूक तिला घेऊन आली असेल अगतिकपणे या मार्गावर? पण हे मला कसं कळणार होतं? मन अस्वस्थ झालं होतं. तीळ-तीळ तुटत होतं तिच्यासाठी. पण मी काहीच करू शकत नव्हते. तिला तर माझ्याशी बोलायचं पण नव्हतं.

नंतर ट्रेनमध्ये ती तुरळकच दिसायची. गजरे विकताना दिसली तरी ती आता ओळख दाखवेना झाली. तोंड फिरवून निघून जायची. बांधलेल्या रेखीव सुंदर गजऱ्यातील फुलं विस्कळीत होऊन हाती फक्त दोरा उरावा, तसं झालेलं हे सगळं. शेवटी मीही गुलबक्षीला मनातून दूर करायचं ठरवलं. पण सोपं नव्हतं ते. माझ्या आयुष्यातल्या मोहरत्या काळातील साधी हळवी अनाघ्रात आणि सुवासिक आठवण होती ती. मनाला क्लेश देणाऱ्या अनेक गोष्टी असतात, त्या नाही टाळू शकत आपण आयुष्यात. तशीच ही देखील, अशी मनाची समजूत करून घेतली.

खूप काळ लोटला मध्ये. शेवटी काळाचं चक्र धावतच असतं. एकदा भर दुपारची वेळ होती. चर्चगेटला एक काम आटपून घरी परत येत होते. मधल्या स्टेशनवर एक गजरेवाली चढली खूप दमलेली दिसत होती. पॅसेज-मध्येच खाली बसली. फुलांची टोपली समोर ठेवलेली तिने. तिला थोडीशी धाप लागलेली असावी. ती मागे डोकं टेकवून श्रांतपणे बसली. मध्यमवयीन रापलेला असा तिचा चेहरा मला दिसला एकदम आणि मी बघतच राहिले. मनात ओळखीच्या खुणा उमटू लागल्या. गुलबक्षी... हो तीच तर होती. ओळखू न येण्याइतपत बदलली होती. रंग रापलेला, गालांची हाडं वर आलेली, गळ्याची त्वचा सुरकुतलेली, गळ्यावर अगदी घट्ट बसलेली. त्यातून हाडं दिसत होती. तिच्या वयापेक्षा खूप जास्त वयाची वाटत होती. चेहऱ्यावर पांढुरकी झाक, डोळे जडावलेले. अशक्त दुबळे निर्जीवसे वाटणारे हात. एकेकाळचे घनदाट काळेभोर केस; पण आता फक्त बारीकशी वेणी राहिलेली.

''गुलबक्षीऽ'' मी हाक मारली. तिने थकलेली नजर उचलून वर बघितलं. आधी काहीच न कळून बघत राहिली, मग डोळ्यात आश्चर्य आलं आणि नंतर रागाची छटा सुद्धा आली.

''कशी आहेस? बरी आहेस ना?''

''कायच बरं नाहीये.''

''तब्येत बरी नाहीये का तुझी?''

''बिमारी लागलीये मागे. लय बिमार हाय मी.''

''मग औषध-पाणी घेतेस ना?''

''आता कायच उपेग नाही. कशाला काही उपेग नाही. पैसा तर कसलाच नाही मिळत. ना दुपारी मिळतोय,

नाय रात्री मिळतोय. बस आता फक्त मी आणि बिमारी. आणि तुमी नका येत जाऊ अशा बोलायला. मला नाय आवडत.''

''अगं पण मी काय केलंय?''

''कोनीच कायपण नाय केलं. फक्त तुमी नका येऊ बोलायला.'' ती उंच आवाजात ओरडली आणि हडकुळ्या हातांनी गजरे गुंफू लागली. गाडीतल्या तुरळक बायका आता आमच्याकडे डोकावून डोकावून पाहायला लागल्या.

''हे घ्या.'' तिने एक भरगच्च गजरा माझ्यासमोर धरला.

''नको मला.'' मी थोडं तुटकपणे म्हणाले. मनात खूप खोलवर काहीतरी रुतत गेलेलं. तिच्या डोळ्यांत दुखावलेपण आलं.

''घ्या बोलतेय ना. आता हायेत तेवढ्या केसांवर तरी घाला गजरा.'' तिने दटावतच माझ्या हातात गजरा दिला. ''घ्या पट्कन. स्टेशन यील आता तुमचं.''

मी यंत्रवत तिने दिलेला गजरा घेतला. ट्रेनमधून खाली उतरले. ट्रेन धाड् धाड् आवाज करत निघून गेली. प्लॅटफॉर्मवरची तुरळक गर्दी पांगू लागली. मी तिथेच उभी राहिले होते पुतळ्यासारखी. माझ्या हातात गुलबक्षीने दिलेला गजरा होता. पण त्या गजऱ्याला आज अजिबातच वास नव्हता.

**– सुजाता राऊत**
भ्रमणध्वनी : ९८१९०९८२४१

## 'साहित्य'ची बदलती रूपे (१९५६ ते १९९४)

| वर्ष | अंक | विषय | संपादन |
|---|---|---|---|
| १९५६ | वार्षिकांक | ललित वाङ्मयाचे वार्षिक समालोचन | प्रा. वसंत दावतर |
| १९५७ | वार्षिकांक | ललित वाङ्मयाचे वार्षिक समालोचन | प्रा. वसंत दावतर |
| १९८२ | दिवाळी अंक | प्रा. न.र. पाटक स्मृती विशेषांक | उमाकांत ठोमरे |
| १९८३ | दिवाळी अंक | डॉ. अ.ना. भालेराव स्मृती विशेषांक | उमाकांत ठोमरे/रमेश मंत्री |
| १९८६ | दिवाळी अंक | हीरकमहोत्सव विशेषांक | डॉ. भीमराव कुळकर्णी/केशव मेश्राम |
| १९८७ | एप्रिल–मे–जून | कथाविमर्श – वि.वा. शिरवाडकर यांना अर्पण | डॉ. भीमराव कुळकर्णी |
| १९८७ | जुलै–ऑ.–सप्टें. | डॉ. भीमराव कुळकर्णी श्रद्धांजली अंक | रवींद्र पिंगे/दत्तात्रय पुंडे |
| १९८९ | वार्षिकांक | जागतिक मराठी परिषदेच्या निमित्ताने | वसुंधरा पेंडसे–नाईक/रवींद्र पिंगे |
| १९९० | एप्रिल–मे–जून | काव्य विशेषांक | पद्मा घारपुरे |
| १९९० | जुलै–ऑ.–सप्टें. | श्री ज्ञानेश्वरी विशेषांक | शि.मो. घैसास/पद्मा घारपुरे |
| १९९० | ऑ.–नो.–डि. | ६४व्या साहित्य संमेलनानिमित्त पारितोषिक प्राप्त कथा, कविता | वसुंधरा पेंडसे–नाईक |
| १९९१ | एप्रिल–मे–जून | विनोदी साहित्य संमेलन विशेषांक | उज्ज्वला मेहेंदळे/सावित्री हेगडे |
| १९९१ | जुलै–ऑ.–सप्टें. | कथा विशेषांक | रमेश मंत्री |
| १९९२ | जाने.–फेब्रु.–मार्च | ६५ अखिल भारतीय साहित्यसंमेलन विशेषांक | पद्मा घारपुरे |
| १९९३ | जाने.–फेब्रु.–मार्च | जन्मशताब्दी विशेषांक | उज्ज्वला मेहेंदळे |
| १९९४ | जाने.–फेब्रु.–मार्च | – | पद्मा घारपुरे |
| १९९४ | एप्रिल–मे–जून | – | पद्मा घारपुरे |
| १९९४ | जुलै–ऑ.–सप्टें. | – | पद्मा घारपुरे |

अंक प्रकाशन खंडित : १९५८–१९८१ / १९८४–८५ / १९८८ / १९९१ जाने.–फेब्रु.–मार्च / १९९१ ऑ.–नोव्हें.–डिसें., / १९९२ एप्रिल–मे–जून / १९९२ जुलै–ऑग.–सप्टें. / १९९२ ऑ.–नो.–डि. / १९९३ एप्रिल ते डिसेंबर / १९९४ ऑ.–नो.–डि./ १९९५ जाने.–फेब्रु.–मार्च (संकलक – वसंत ठुकरुळ)




# "...अभिजात दर्जा मिळाला, पुढे काय?"

## डॉ. आनंद काटीकर

**आ**पला महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा अभिमान आपल्या सर्वांनाच असतो. त्यातच दि. ३ ऑक्टोबर, २०२४च्या घटस्थापनेच्या मुहूर्तावर आपल्या भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर पुढे नेमके काय होणार, याची उत्सुकता सर्वत्र बळावली आहे. ती उत्सुकता शमवणारा आणि आता पुढे आपण नेमके काय करायचे आहे, याचा विचार करणारा हा लेख.

सर्वप्रथम आपण 'अभिजात भाषा' हा वैशिष्ट्यपूर्ण भाषेला भारत सरकारद्वारे दिला जाणारा एक दर्जा आहे, हे लक्षात घेऊ. यासाठी केंद्र सरकारने काही निकष ठरवलेले होते. २००४ मधील निकष २००५ मध्ये सुधारित करण्यात आले. त्यानुसार–

१. भाषा प्राचीन असावी आणि त्यात श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण झालेले असावे.
२. त्या भाषेचे वय दीड ते अडीच हजार वर्षांचे असावे.
३. त्या भाषेला भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण असावे.
४. प्राचीन भाषा आणि तिचे आधुनिक रूप यांचा गाभा कायम असावा.

हे ४ निकष जी भाषा पूर्ण करेल, त्या भाषेला हा अभिजाततेचा दर्जा मिळेल, असे घोषित करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत प्रारंभी म्हणजे २००४मध्ये तमिळ आणि २००५ मध्ये संस्कृत भाषेला असा दर्जा मिळाला.

त्यानंतर तेलुगु (२००८), कन्नड (२००८), मल्याळम

| क्र. | भाषा | अभिजात दर्जा वर्ष | आर्थिक वर्ष आणि त्या वर्षांमध्ये केंद्र सरकारकडून मिळालेली रक्कम | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १४-१५ | १५-१६ | १६-१७ | १७-१८ | १८-१९ | १९-२० | २०-२१ | २१-२२ | २२-२३ | २३-२४ |
| १ | तमिळ | २००४ | ८.८० कोटी | ११.८९ कोटी | ५.०२ कोटी | १०.२७ कोटी | ५.४६ कोटी | ९.८३ कोटी | १२ कोटी | १२ कोटी | १२ कोटी | १५.२५ कोटी |
| २ | तेलुगू | २००८ | १ कोटी | १ कोटी | १ कोटी | १ कोटी | १ कोटी | १.०७ कोटी | १.४७ कोटी | १.०३ कोटी | १.७२ कोटी | १.५४ कोटी |
| ३ | कन्नड | २००८ | १ कोटी | १ कोटी | १ कोटी | १ कोटी | ९९ लाख | १.०७ कोटी | १.०८ कोटी | १.०६ कोटी | १.७२ कोटी | १.५४ कोटी |
| ४ | मल्याळम | २०१३ | --- | --- | --- | --- | ५.४६ लाख | ९.८३ लाख | ८ लाख | ६३.९७ लाख | १.८६ कोटी | १.१२ कोटी |
| ५ | उडिया | २०१४ | --- | --- | --- | --- | --- | --- | ८ लाख | ५८.३८ लाख | १.७६ कोटी | १.३८ कोटी |

https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2024/oct/doc2024104408501.pdf

(२०१३) आणि उडिया (२०१४) याही भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आत्ता २०२४ मध्ये हे निकष सुधारित करण्यात आले आणि मग मराठीसोबत पाली, प्राकृत, बांगला आणि आसामी या भाषांनाही हा अभिजात दर्जा देण्यात आला. २०२४चे नवीन सुधारित निकष पुढीलप्रमाणे-

१. त्या भाषेचा १५०० ते २००० वर्षे प्राचीन नोंदीकृत इतिहास असावा आणि त्या काळात साहित्यनिर्मिती झालेली असावी.
२. प्राचीन साहित्य/ग्रंथांचा संग्रह, ज्याला त्या भाषकांच्या पिढ्या आपला वारसा मानतात.
३. ज्ञानग्रंथ, विशेषतः गद्यग्रंथ याव्यतिरिक्त कविता, पुरालेखीय आणि शिलालेखीय पुरावे.
४. ही अभिजात (शास्त्रीय) भाषा आणि त्यातील साहित्य त्या भाषेच्या सध्याच्या स्वरूपापासून वेगळे असू शकते किंवा त्याच्या शाखांच्या नंतरच्या प्रकारांशी विसंगत असू शकते.

हाल सातवाहन काळात, म्हणजे सामान्यतः इसवीसन चौथ्या-पाचव्या शतकात लिहिला गेलेला 'गाथासप्तशती' हा एकमेव ग्रंथ आज उपलब्ध आहे. या संकलित ग्रंथातील माहाराष्ट्री प्राकृत ही भाषा मराठीचे आद्यरूप आहे, असे आपण अभिजात भाषेच्या अहवालात नोंदवले आहे.

गाथा सप्तशती, विविध शिलालेख-ताम्रपट, महानुभाव, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथ, साधने यांतील मराठी बदलत गेलेली आहे, असे आपल्याला दिसते. म्हणजेच आपली अभिजात भाषा आजवर बदलत गेली आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

आता आपल्या मायबोलीला मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यावर नेमकी किती रक्कम मिळू शकते, ते आपण या तक्त्याच्या आधारे पाहू. (आधार - केंद्र सरकारचे ज्ञापन ४ ऑक्टोबर, २०२४)

वरील तक्ता पाहिला की आपल्या लक्षात येईल की आपल्या भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे सहज २००-३०० कोटी रुपये वगैरे मिळणार नाहीत. दूरदृष्टी ठेवून प्रकल्प आखावे लागतील, तेव्हाच काही कोटी रुपये मिळू शकतील. त्यासाठी अभ्यासकांनी गांभीर्याने विचार करायला हवा.

अभिजात भाषा म्हणून घोषित झालेल्या भाषांच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या निधीतून तिथे केंद्र सरकारने एक संस्था सुरू केली. या निधीतून प्रामुख्याने प्राचीन (तमिळ/कन्नड) भाषेच्या विकासाचे प्रकल्प सुरू केले गेले आहेत. नवीन पिढीला ही जुनी भाषा शिकवणे. त्या भाषेतील विविध साहित्यकृती आधुनिक रूपात रूपांतरित करणे इत्यादी कारणांसाठीच हा निधी खर्च करावा लागतो. संपूर्ण भारतात तमिळ भाषक तुलनेने अधिक सजग असल्याने त्यांच्या केंद्राने सर्वाधिक निधी आजवर मिळवलेला आहे. त्यांच्या निधीतून काय काय प्रकल्प हाती घेतले आहेत, याचा अंदाज घेतला तर आपण मराठी भाषेसाठी काय काय करू शकतो, हे लक्षात येईल.

आजवर त्यांनी ९ प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

१. प्राचीन ४१ तमिळ साहित्यकृतींच्या संपादित संशोधित आवृत्ती प्रकाशित करणे.
२. प्राचीन तमिळ साहित्यकृतींची भाषांतरे करवून घेणे.
क) प्राचीन तमिळ साहित्यकृतींचे आधुनिक तमिळमध्ये भाषांतर करणे (२१ साहित्यकृती)
ख) अन्य भाषांत भाषांतर करणे (११ साहित्यकृती)
ग) तिरुक्कुरल ग्रंथांचे जगातील सर्व भाषांत भाषांतर

करणे (३५ भाषांत).

३. तमिळ भाषेचे ऐतिहासिक व्याकरण तयार करणे

४. प्राचीन तमिळ भाषेचे आणि संस्कृतीचे संगोपन करणे
   क) शिलालेख प्रतिमांकित करणे, टिकवणे, संगोपन करणे.
   ख) विवेचनात्मक ग्रंथसूची तयार करणे.
   ग) अनेक पुरातत्त्वीय स्थानांचा जीर्णोद्धार करणे.
   घ) प्राचीन नाणी, दागदागिने, मूर्ती, ताम्रपट इत्यादी साधनांचे जतन करणे.
   ड) जुन्या चित्रांचे, प्रतिमांचे, भांड्यांचे संगणकीकरण करणे.

५. तमिळ भाषा आणि बोलींचे सर्वेक्षण, संशोधन करणे आणि अभ्यास करणे.

६. तमिळ आणि इतर भाषा यांच्या संबंधांचा अभ्यास करणे.

७. प्राचीन तमिळ साहित्यकृतींचे संगणकीकृत ग्रंथालय तयार करणे.

८. अभिजात तमिळ भाषा शिकवण्यासाठी ऑनलाइन वर्ग सुरू करणे.

९. अभिजात तमिळ भाषेच्या साहित्यकृतींचा संगणकीय निधी (corpus) तयार करणे.

आजवर घोषित झालेल्या अभिजात भाषांपैकी सर्वाधिक निधी तमिळ भाषेला मिळालेला आहे. त्याचा त्यांनी सदुपयोग केलेला आहे. कन्नड भाषेच्या अशा केंद्राला प्रस्तुत लेखकाने २०१८मध्ये प्रत्यक्ष भेट दिली असता ते म्हैसूर येथील भारतीय भाषा संस्थान या केंद्र सरकारच्या संस्थेच्या जागेतच सुरू होते. त्यांना त्या आर्थिक वर्षात सुमारे १ कोटी निधी प्राप्त झाला होता आणि त्यांचेदेखील जुन्या कन्नड भाषेचे प्रशिक्षण वगैरेंसारखे उपक्रमच सुरू होते.

भाषांचा अभिजात भाषा म्हणून समावेश केल्यास, विशेषतः शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात रोजगाराच्या महत्त्वपूर्ण संधी निर्माण होतील. या भाषांमधील प्राचीन ग्रंथांचे जतन, दस्तऐवजीकरण आणि संगणकीकरण यामुळे संग्रह, भाषांतर, प्रकाशन आणि डिजिटल मीडिया सारख्या क्षेत्रात रोजगार निर्माण होईल. अशी आशा हे धोरण ठरवताना केली गेलेली आहे. त्या दृष्टीने मराठी भाषेच्या अभिजात म्हणजे प्राचीन रूपासाठीच नेमके काम करता येऊ शकेल, हे आता आपल्या लक्षात आले असेल. आता नीट विचार करून मराठी भाषेच्या वृद्धीचे उपक्रम हाती घ्यायला हवे.

अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आपली भाषा सुदृढ करण्यासाठी काय-काय करावे लागेल, याची ही यादी-

१. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे भाषेच्या विकासासाठी जो काही निधी मिळेल, त्यातून प्राचीन मराठी भाषेचा अभ्यास करण्याचे उपक्रम सुरू होतील.

२. मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण करण्याचा एक वस्तुपाठ डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या भाषाविज्ञान विभागाने घालून दिला आहे. त्याप्रमाणे मराठीच्या सर्व रूपांचे उत्तम सर्वेक्षण करण्यासाठी निधी मागावा. डेक्कन कॉलेजच्या मार्गदर्शनाखाली असे सर्वेक्षण महाराष्ट्रात सर्वत्र व्हावे. त्यांचे अहवाल प्रसिद्ध व्हावे. त्याचा उपयोग करून विविध साधने निर्माण व्हावी.

३. मराठीचे शिलालेख, ताम्रपट यांचे उत्तम संकलन आणि संवर्धन व्हावे. त्यांच्या प्रतिमा निर्माण करून प्रत्यक्ष आणि आभासी संग्रहालय तयार करावे. गावोगावी मराठीचे ऐतिहासिक संदर्भ नोंदवणारे लोक असावेत. नाणेघाट, इनामगाव (शिरूर), तेर (धाराशिव) इत्यादींसारख्या पुरातत्त्व स्थानी उत्तम मार्गदर्शक प्रशिक्षित करावे. पर्यटनसंस्थांनी अशा सहली विकसित कराव्यात.

४. मराठीत झालेले ऐतिहासिक बदल स्वतंत्रपणे सोदाहरण नोंदवून त्या आधारे साहित्यकृती निर्माण व्हाव्या, असे उपक्रम हाती घ्यावे.

५. प्राचीन मराठीतील विविध ग्रंथांचे भारतीय आणि परदेशी भाषांत भाषांतर करावे.

६. सर्व अभिजात भाषांमधील, भाषिक आणि साहित्यिक कृतींची चर्चा करणे, त्या समजून घेणे, त्यांचे भाषांतर करणे असे उपक्रम वाढीस लावावे.

७. सर्व अभिजात भाषांनी आपला इतिहास, संस्कृती यांच्या आधारे, परस्पर संवाद वाढवून आपला समान सांस्कृतिक धागा बळकट करावा.

८. महाविद्यालये आणि विद्यापीठे यांतून अभिजात मराठीचे उत्तम अभ्यासक तयार होतील, यासाठी अध्यापनात आणि अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल घडवावे. आज विद्यार्थ्यांना मराठी शिकवताना केवळ साहित्य म्हणून शिकवू नये, तर त्यांच्याकडून भाषेचा अभ्यास आग्रहाने करवून घ्यावा. त्यासाठी अभ्यासक्रमात भाषेच्या अभ्यासाला ४०% स्थान द्यावे आणि उर्वरित ६०% भागात साहित्य शिकवावे.

९. मराठीचे व्याकरण कसे बदलत गेले, याचा अभ्यास करताना प्राचीन रूप आणि आजची मराठी यांचा तौलनिक अभ्यास करावा.

अभिजात दर्जामुळे काय-काय घडेल याविषयी बरेच गैरसमज पसरले आहेत. ते दूर करून आपण काही गोष्टी चांगल्याच लक्षात ठेवू या.

१. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे भाषेचे आजचे रूप, आजची अवस्था बदलणार नाही.
२. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे २००/५०० कोटी वगैरे निधी मिळणार नाही.
३. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी शाळा सक्षम करण्यासाठी अनुदान मिळणार नाही.
४. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे ग्रंथालये सक्षम करण्यासाठी अनुदान मिळणार नाही.
५. अभिजात दर्जा मिळाल्यामुळे ४५० विद्यापीठांत मराठी शिकवली जाणार नाही.

थोडक्यात सांगायचे तर २०२४ मध्ये, केंद्र सरकारने काही निकष बदलल्यामुळे आपली भाषा अभिजात पदवीस पोहोचली आहे. आता ती प्रगत आणि आधुनिक बनवणे हे उद्दिष्ट गाठतानाच त्या भाषेच्या अभिजात रूपाकडे दुर्लक्ष न करता, तिच्या इतिहासाच्या आधारे, आपल्या वर्तमानाचे निरीक्षण करून दमदार भविष्याकडे पावले टाकण्यासाठी सीमोल्लंघन करण्याची वेळ समीप आलेली आहे, हे ध्यानात ठेवावे.

संदर्भ :


१. www.cict.com
२. www.ciil.org
३. www.shastriyakannada.org
४. https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2024/oct/doc2024104408501.pdf



**– आनन्द काटीकर**
भ्रमणध्वनी : ९४२१६ १०७०४



# मुंबई मराठी साहित्य संघाची अलीकडील प्रकाशने

**एका पिढीचे आत्मकथन (दुसरी आवृत्ती),** संपादक ब पु.शि. रेगे, वा.ल. कुळकर्णी, रा.भि. जोशी, गं.ब. ग्रामोपाध्ये
**दुसऱ्या पिढीचे आत्मकथन,** संपादक : उज्ज्वला मेहेंदळे
**मराठी बोलु कौतुके,** संपादक : अशोक बेंडखळे / उषा तांबे
**एका मुंबईकराची कहाणी (दीर्घकथा),** लेखक : गंगाधर गाडगीळ
**काशिनाथ त्र्यंबक तेलंग (अल्पचरित्र),** लेखक : गंगाधर गाडगीळ
**मराठी साहित्य सूर्यमाला,** संपादक मंडळ : सुहासिनी कीर्तिकर, चंद्रशेखर गोखले, प्रतिभा बिस्वास, सावित्री हेगडे
**ज्ञानतपस्वी रुद्र – न.र. फाटक यांचे चरित्र,** लेखिका : अचला जोशी
**मराठी नाट्यसंमेलन अध्यक्षीय नाट्यसूर्यमाला : भाग २,** संकल्पना : शं.ना. अंधृटकर, संपादन : सुभाष भागवत
**महानगर मराठी साहित्य संमेलन : अध्यक्षीय विचार,** संकल्पना : ज.बा. कुलकर्णी,
संपादक मंडळ : उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, अशोक बेंडखळे, पद्माकर शिरवाडकर
**इये मराठीचिये नगरी,** संपादक : अशोक बेंडखळे / डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
**तिसऱ्या पिढीचे आत्मकथन, भाग १ आणि २,** संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे
**अमृत कण कोवळे,** लेखिका : रेखा नार्वेकर
**''बालसाहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती''**
संपादक : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, सहसंपादक : श्री. एकनाथ आव्हाड




# तैसी भाषांमध्ये मराठी सर्वोत्तम

**श्याम जोशी**

**या** वर्षीच्या सोमवारी बावीस सप्टेंबरला घट बसणार आहेत. गतवर्षी याच दिवशी म्हणजे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जाचा मुकुट चढविला. भाषेला अभिजाततेचा दर्जा देण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. या पूर्वी तमिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम् आणि उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला होता. नंतर मात्र अभिजाततेचे नियम बदलण्यात आले, नव्या निकषांनुसार भाषेच्या प्राचीनतेची, त्यातील मौलिकता आणि सलगतेची, भाषेतील वाङ्मयीन परंपरेचे स्वयंभूपण आणि दोन हजार वर्षांपूर्वीची प्राचीन भाषा आणि विद्यमान काळातील तिचे आधुनिक रूप या निकषांचा समावेश करण्यात आला. या नवीन निकषांनुसार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी, मराठीसोबत पाली, प्राकृत, बाङ्गला, आसामी या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला.

हे भाषेचे निकष काही एकदम ठरविले गेले नाहीत. या नियमांचा परिचय मराठी भाषेचे अभ्यासक प्रा. हरी नरके, प्रा. रंगनाथ पठारे यांच्या लक्षात आला. मराठी भाषेलाही हा दर्जा मिळावा म्हणून या विषयीचे सखोल संशोधन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने १० जानेवारी २०१२ रोजी अभिजात मराठी भाषा समिती स्थापन केली. मसुदा उपसमितीने जाहीर आवाहन करून या विषयासंदर्भात अभ्यासकांकडून सूचना, तपशील, पुरावे मागविण्यात आले. अखेर सर्वांनी अथक प्रयत्न करून मे २०१३ मध्ये अभिजात मराठी भाषेसंबंधीचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला. हा मराठीतला अहवाल जसाच्या तसा केंद्र सरकारला पाठविणे शक्य नव्हते, कारण अभिजाततेचा दर्जा देणाऱ्या समितीमध्ये अन्य भाषकही होते. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना दोन हजार वर्षांचा मराठीचा इतिहास ठळकपणे कळण्यासाठी या अहवालाचे इंग्रजी भाषांतर करावे लागले. हे इंग्रजी भाषांतराचे कठीण काम प्रा. अविनाश पंडित यांच्याकडे सोपविण्यात आले, या सगळ्या प्रक्रियेत १ वर्ष गेले.

भाषेची अभिजातता कधीच स्वयंपूर्ण नसते. अभिजातता म्हणजे शालीनता, सुसंस्कृतता आणि ऐतिहासिकता. ही गुणसंपदा व्यक्तिनिष्ठ, समाजनिष्ठ असल्याशिवाय भाषेला भरजरीपण आपोआप येत नाही. बारा कोटी लोकांची मराठी ही जगातल्या १०व्या क्रमांकाची भाषा आहे. भाषेची समृद्धता ही लोकसंस्कृतीतून येत असते. त्यासाठी साऱ्याच कला अभिजात असाव्या लागतात. अभिजात नाटके, अभिजात संगीत, अभिजात चित्रपट, अभिजात लेणी, अभिजात शिल्पे या साऱ्यांतून एक सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडत असतो. नाट्यप्रयोग पाहणे म्हणजे मानसिक संतुलनाचा लाभ परत मिळविणे असे अभिजात नाटकाच्या संदर्भात ॲरिस्टॉटलने म्हटले होते. बऱ्यावाईट जीवनानुभवांमुळे भावनांचे संतुलन बिघडते. ते पुनर्स्थापित करण्यासाठी अभिजात नाटक, अभिजात पुस्तके इ. कलाकृतींचा आस्वाद घ्यावा लागतो. भावनांचे बिघडलेले संतुलन पुनर्स्थापित होणे, याच क्रियेला ॲरिस्टॉटलने कॅथॉर्सिस म्हटले आहे. कॅथॉर्सिस म्हणजे विरेचन.

प्राचीन महारठ्ठी – मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठी भाषेचा प्रवास आहे. नाणेघाटातील ब्राह्मी लिपीतील २०२० वर्षांपूर्वीच्या शिलालेखात महारठ्ठीनो असा उल्लेख आहे. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला मराठी ग्रंथ म्हणजे सुमारे २००० वर्षांपूर्वीचा गाथा सप्तशती हा होय. भाषा काही एकाएकी प्रगल्भ होत नसते. अनेक शतके प्रत्यक्ष वापर होऊन ती समृद्ध व्हावी लागते. हाल सातवाहनाच्या काळात श्रेष्ठ दर्जाचे मराठी काव्य लिहिले गेले. रामायण, महाभारत, गुणाढ्याच्या बृहद्कथेत असंख्य मराठी शब्द पाहावयास मिळतात. वररुचीचे प्राकृतप्रकाश, हेमचंद्राची देशी नाममाला, कालिदासाचे शाकुंतल, मृच्छ-कटिक इ. साहित्यकृतीतील मराठीतील संवाद अभ्यासले असता मराठीची प्राचीनता निर्विवादपणे सिद्ध होते. तसेच भाषेच्या समृद्धीमुळे त्याकाळीही कोशवाङ्मय, महाकाव्ये लिहिली गेली होती. जयवल्लभाचा 'वज्जालग्ग' हा सुभाषितकोश, प्रवरसेन वाकाटकाचे 'रावणवहो', ही त्याची

उदाहरणे होत. आज २००० वर्षांपूर्वीचे शब्दार्थ परिचित नसतात, म्हणून श्रीधर व्यंकटेश केतकरांनी प्राकृत-मराठी-संस्कृत असा शब्दकोश तयार केला. त्यामुळे प्राचीन महाराष्ट्री आणि आजची मराठी यांच्यातले नाते उत्तमप्रकारे प्रकट होऊ शकले. प्राचीन व्यापारामुळे जगातील इतर भाषांमधील काही शब्द मराठीत उत्क्रांत झाले. उदाहरणार्थ - इ.स. पूर्वी इराणी लोकांच्या संपर्कामुळे नवीन शब्दांची भर पडत गेली. की, जमीन हे शब्द आता चांगलेच रुळले आहेत. इ.स. ७८०च्या सुमारास उद्योतनसुरी यांच्या कुवलयमाला या ग्रंथात अनेक देशी भाषांचा उल्लेख आहे. त्यांत मरहट्ट - मराठी या अर्थाने वाचावयास मिळतो. हर्मन याकोबी या जर्मन अभ्यासकाने प्रथमतः जैन महाराष्ट्री ही संज्ञा वापरली.

पुण्यातील प्राच्यविद्या संशोधन करणाऱ्या भांडारकर संस्थेमध्ये सुमारे ३०,००० प्राचीन पोथ्या उपलब्ध आहेत. दीड ते दोन हजार वर्षांपूर्वी लिहिले गेलेले मराठीतील ऐंशी ग्रंथ तिथे आहेत. अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी त्यांचा मोठा उपयोग झाला. गद्याबरोबरच प्राचीन गीते आणि काव्य यांचेही योगदान मोलाचे आहे. सोमेश्वरलिखित 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थ चिंतामणि' यात महाराष्ट्रातील स्त्रिया दळणकांडण करताना मराठी ओव्या गात असत, असा स्पष्ट उल्लेख मिळतो. इ.स. १२४० मध्ये लिहिलेल्या 'नृत्य-रत्नावली' या ग्रंथात गोंधळाचे प्राचीन रूप पाहावयास मिळते. श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मूर्तीखाली '*श्रीचामुंडराये करवियले*' हा मराठीतील शिलालेख आढळतो.

प्राचीन मराठी भाषेतील या समृद्धीचे अवलोकन करून अखेर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. पण त्यामुळे मराठीचे नक्की काय कोटकल्याण होणार, याची अनेकांना काहीच कल्पना नाही. काहीजणांचे असे गैरसमज आहेत की केंद्रसरकार तीनशे ते पाचशे कोटी रुपये महाराष्ट्राला देणार. पणे हे काही खरे नाही. अभिजात भाषांना केंद्र सरकारकडून खिरापतीसारखे पैसे मिळत नसतात. ठराविक निधी मिळण्यासाठी दूरदृष्टी ठेवून प्रकल्प आखावे लागतील. उत्तम अभ्यासक तयार करावे लागतील. पूर्ण भारतभरातच नव्हे तर जागतिक स्तरावरसुद्धा इतर पाश्चिमात्य भाषांबरोबर मराठीचाही चंचुप्रवेश होईल.

मराठीचा उद्गम आणि विकास यांवर बरेच मंथन झाले, पुढेही होत राहील. आजवर झालेल्या मंथनातून एक गोष्ट मात्र नक्की सांगता येऊ शकेल, मराठीचा जन्म संस्कृत भाषेपासून झालेला नाही. प्राचीन मराठी भाषा ही गावगाड्यात संस्कृतच्याही आधीपासून वापरात होती. मराठी भाषेच्या निर्मितीचा कोणीही एक असा पंडित, राजा किंवा राजवंश नव्हता. एखादा पांथस्थ जसा जगभर फिरून भाषेने, अनुभवाने समृद्ध होत जातो, तशीच भाषाही फिरस्त्यांनी समृद्ध केली आहे.

ज्या-ज्या काळात विविध राजवटी भाषिक व सांस्कृतिकदृष्ट्या स्थिर झाल्या, त्या-त्या वेळी तिची अर्थवाही समृद्धता ही वाढतच गेलेली दिसते. इ.स.च्या सहाव्या शतकात बौद्ध संस्कृतीमुळे पाली भाषा समृद्ध झाली. राजदरबारातही तिला स्थान मिळाल्यामुळे अनेक मराठी शब्द पालीमध्ये आढळून येतात. ११व्या शतकात आढळलेल्या शिलालेखात अनेक मराठी वाक्ये आढळतात. या भाषा संकराकडे अभ्यासकांचे फारसे लक्ष गेलेले नाही. पाली व मराठी भाषेतील वर्ण व जोडाक्षरे जवळजवळ एकसारखी आहेत. पाली व मराठी भाषेतील साम्य दाखविणारे असंख्य शब्द आजही वापरात आहेत. उदा. कज्जल - काजळ, खारीय - खारट, चातुरीय - चातुर्य, सिप्प - शिल्प, इ. काही शब्द तर तंतोतंत, तसेच वापरात आहेत. उदा. - नदी - नदी, हरित - हरित, वेदना - वेदना, नगर - नगर इ.

भाषेचा हा गंगौघ स्थिर राजवटी लाभल्यानंतर सांस्कृतिकदृष्ट्या, भाषिकदृष्ट्या खूपच आशयघन होत गेला. भाषा दरबारात स्थिरावल्यानंतर लिपींचाही विकास होत गेला. मराठी भाषेची ही प्रतिष्ठा देशभर पसरण्यासाठी देवनागरी उपयोगी पडली. राजाश्रयामुळे भाषेतून सांस्कृतिक प्रतिमा वृद्धिंगत झाल्या. उदाहरणार्थ, सरस्वती विद्येची देवता शाळेच्या पाटीवर आकड्यांतून प्रकट झाली. नऊवारी साड्या, त्यातही मराठी अस्मितेच्या पैठणीचा इतिहास मनोरंजक आहे. दुसऱ्या शतकातील सातवाहनांच्या काळापासून पैठणीचा उल्लेख इतिहासात आढळतो. पैठणी ही मूळची पैठण गावची. त्या काळात चांगल्या प्रतीच्या रेशमासाठी पैठण प्रसिद्ध होते. ब्रिटिशांनी पैठणी जगभर पोहोचवली. १९व्या शतकाच्या शेवटी येवल्याचे सरदार रघुजी नाईक यांनी पैठणहून काही कुशल विणकरांना येवल्याला नेले. आणि अल्पावधीत येवलेही पैठणीसाठी प्रसिद्ध झाले. मराठी सारस्वतांमध्ये शेला-पागोटे, पगडी, जाकीट, बुगडी, चिंचपेटी, साज अशासारखे वस्त्रालंकार मराठी अस्मितेचे विषय झाले.

मराठी भाषेचा हा प्रवाह आज कित्येक शतके अखंड

आहे. त्यात सातत्य आहे. अभिजात भाषेच्या दृष्टीने हाही एक महत्त्वाचा निकष आहे. राजदरबारी आधार मिळाल्याने भाषिक समृद्धी वाढत जाते, हे खरेच. पण देवगिरीच्या यादव साम्राज्याच्या अस्तानंतर हा आधार सर्वतः नष्ट झाल्यावरही मराठी भाषा जनमानसात होतीच. जनगंगेने तिचा प्रवाह अक्षुण्ण राखला. ज्ञानेश्वरांपाठोपाठ साऱ्या संतमालिकेने मराठी भाषेचे भांडार प्रगल्भ केले. विविध व्यवसाय-पेशातल्या संतांनी त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रांतल्या शब्दांनी, कल्पनांनी मराठी भाषा अनेकप्रकारे फुलवली. अनेक स्त्रीगीतांमधून, स्त्रियांच्या अभंग-ओव्यांमधून मराठीला वेगवेगळे आयाम प्राप्त झाले. महानुभावांचे गद्य आणि पद्य वाङ्मय हाही मराठीचा एक समृद्ध ठेवा बनले.

अनेकदा परकीय आक्रमक सत्तांमुळे मराठीच्या वापरामध्ये अन्य भाषांमधील शब्दांचा वारेमाप भरणाही झाला, परंतु राज्यव्यवहारकोशाच्या निर्मितीसारखे सुयोग्य प्रयत्न मराठीचे स्वत्व टिकविण्यात महत्त्वाचे ठरले.

मराठीपण टिकवूनही मराठीने राज्यकर्त्यांच्या भाषांमधून अनेक शब्द स्वीकारून आपले भांडार वाढविले, हे सत्यच आहे. त्याचबरोबर राज्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळेही मराठीला मोलाचे धन प्राप्त झाले, हेही लक्षात घेतले पाहिजे. ब्रिटिशांचे राज्य स्थापित झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मराठी ग्लोबल झाली. १८०५ मध्ये कलकत्त्यातील सेरामपूर येथे मराठीतला पहिला मुद्रित कोश विल्यम कॅरे याने नागपूर येथील वैजनाथ कानफाटे यांच्या सहकार्याने प्रकाशित केला. मोडी लिपीचे प्राबल्य असल्यामुळे विरामचिन्हांचा दागिना मराठीला ठाऊकच नव्हता. मेजर कँडी आणि मराठीच्या इतर युरोपीय अभ्यासकांनी मराठी अवगत करून तिला विरामचिन्हांच्या अलंकारांनी नटविले. तिची अर्थगर्भता वाढविली. या इतिहासावरून लक्षात येते की मराठी ही ज्ञानभाषा म्हणून ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीपासून घडत जाऊन, लोकहितवादी, महात्मा फुले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, सावरकर ते थेट महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदारांपर्यंत अनेकांनी समाजाची ज्ञानतृष्णा भागविण्यात योगदान दिले. राजकीय आक्रमणाबरोबर भाषिक आक्रमणे सातत्याने होत असतात. जागतिकीकरणाच्या रेट्यात सांस्कृतिक सपाटपण येणे अपरिहार्य असते. २१व्या शतकात नवनवीन माध्यमे निर्माण होत असताना भाषासंहाराबरोबर संस्कृतिसंहारही होत असतो.

भाषा म्हणजे शब्दांची समृद्धी. परिस्थितीच्या रेट्यात शब्द हद्दपार होतात, लोकसंवादातून येणारे शब्द कमी कमी होत जाऊन परभाषेतील शब्द त्या जागी येतात. अनेक शब्द भाषेतून हद्दपार झाले आहेत. उदा. विदर्भातील लोकभाषेत तोंडाचे बोळके असणाऱ्या माणसाला खेबडा असा शब्द होता. झांगो म्हणजे बावळट, हिकमती म्हणजे हुशार, असे शेकडो शब्द मृत्युपंथाला लागले आहेत. या आक्रमणापुढे १२व्या शतकापासून तयार झालेली मराठी भाषेची चिरेबंदी बांधणी उद्ध्वस्त होताना दिसत आहे. या आघातांमुळे मराठी भाषा सार्वभौम होऊ शकली नाही. एखादा प्रबंध मराठी भाषेत जरी लिहिला गेला, तरी त्यातील ज्ञानवापीचा उपसा होण्यासाठी तो इंग्रजी वा अन्य भाषेत अनुवादित करावा लागेल. याबरोबरच सक्षम मराठी शब्द तयार करावे लागतील. त्यांचा वापर असोशीने करावाच लागेल.

मराठीचे मराठीपण नेमके कशात असते? ते असते स्त्रियांनी दळत असताना म्हटल्या गेलेल्या ओव्यांमध्ये, वासुदेवाच्या जागर गीतांमध्ये, ज्येष्ठांनी संवादात वापरलेल्या वाक्प्रचार, म्हणी यांच्यामध्ये, सणवार, मंगलकार्ये यांसारख्या प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या स्त्रीगीतांमध्ये. संस्कृतीच्या आधारे भाषेच्या भिंती उभ्या असतात. संस्कृती जसजशी नष्ट होत जाते, तसतसा शब्दांचा, परिणामी भाषेचा क्षय होतो. परंपरागत व्यवसायांच्या ऱ्हासाबरोबर त्या-त्या व्यवसायांच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या शब्दांनाही आपण आंचवतो.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याच्या निमित्ताने हे विचारमंथन होत आहे. मराठीच्या अभिमान-गीताबरोबरच बाजारपेठेची भाषा होण्यासाठी क्रियापदे अधिकाधिक निर्माण व्हायला हवीत. म्हणजेच व्यापार, उद्यमशीलता यांमध्ये अधिकाधिक मराठी ठसे उमटावे लागतील. मराठी बोलणाऱ्यांची नुसती संख्या वाढून भाषेचे अभिजातपण टिकविता येणार नाही. त्यासाठी प्रयत्नपूर्वक आकृतिबंध निर्माण करावे लागतील. मराठीचे वापरक्षेत्र प्रयत्नपूर्वक वाढवावे लागेल. प्रमाणभाषेबरोबरच बोली आणि लोकभाषेचा आदर करावा लागेल. तेव्हाच,

*जैसी दीपांमाजी दिवटी ।*
*का तिथींमाजी पूर्णिया गोमटी ।*
*तैसी भाषांमध्ये मराठी ।*
*सर्वोत्तम ।।*
असे म्हणता येईल.

– **श्री. श्याम जोशी** (ग्रंथसंखा) बदलापूर
भ्रमणध्वनी : ९३२००३४१५६

# कविता



## घराघरात

ती कमवत राहते
उभं आयुष्य
नाती, गोती,
पै, पैसा

आणि स्वाधीन करते
अगदी आनंदाने
तिचं स्त्रीधनही

त्याच्यासाठी
त्यांच्या दोघांच्या घरासाठी
पण
बोटावर मोजण्याइतकीच घरं
तिला आदर देतात
समजावून घेतात
सन्मान देतात

नाहीतर
नाहीतर ती, तिचा आवाज
तिचा सन्मान सगळं ठेचलं जातं
तिने आपल्या मानलेल्या घराकडून
जातो हकनाक तिचा बळी

नंतर तिला
कितीही न्याय मिळाला तरीही
ती तर गेलेलीच असते जिवानिशी

निदान तुला श्रद्धांजली वाहताना
उगाच मेणबत्ती-मोर्चा काढण्यापेक्षा
आपण एवढं तरी करावं
आपल्या मुलीला आपण
तनामनाने कणखर करावं

चुकून आलीच अशी आपदा
तिच्यावर तर,
तिच्या लढ्यात
आपणही तिच्या सोबत
खंबीरपणे उभं राहावं

मला वाटतं, आता मुलीला
लक्ष्मी ऐवजी 'काली'
का संबोधू नये?

निदान तिला सामोरी जाणाऱ्या
दुष्टांचा, राक्षसांचा
तिला स्वतःला
नाश तरी करता येईल.

आता महिषासुर मर्दिनी
फक्त मंदिरातच नको

तर घराघरात जन्म घेऊ दे!
घराघरात पुजली जाऊ दे!

**- ज्योती कपिले**
भ्रमणध्वनी : ९७६९१४१०७४

## वेळप्रसंगी

त्यांनी
पावसाळी कवी संमेलन भरवलंय
अन् मला कविता वाचायला बोलवत आहे
आयोजकांना माहीत नाही
इथं माझ्या कवितेची हिरवी ओळ
अवकाळीच सडत पडलीय...

बागेवर जाऊनी, करपा
द्राक्षाचा येणारा हंगाम पाण्यात
वावराचं कुरण झालंय
पेरणीला वाफसा लय लांबची गोष्ट
इथं मशागतीलाच पाऊस सवड देईना...

मळ्यातल्याच शंकर आप्पाची
नवी खोदलेली विहीर वळवात
दरडीसारखी कोसळली...
त्यांचे काढणीला आलेले कांदे
वावरातच सडले...
वारकरी आप्पाच्या डोळ्यात
पहिल्यांदा पाणी पाहिलं...

स्वतःच्या... शेजारच्या... पाहुण्या-रावळ्यांच्या
कोणत्याही गावाला फोन करून खबर घेतली
तर उन्हाळ्यात सुरू झालेल्या पावसाळ्याने
सोलपटून काढल्याचाच विव्हळ येतो...

अन् ते मला कविता म्हणायला बोलावतायत

त्यांना वेळप्रसंगी
कवीने घातलेला कुर्ता, कोट
यासोबत
त्याच्या काळजावरच्या
जखमा सुद्धा दिसायला हव्यात...

**- संदीप जगताप**
भ्रमणध्वनी : ७२१८६२५९६०

## सृष्टी

पाना-फांदीचे फुलांचे
देह थरारून जाणे
थेंब धारेत सृष्टीचे
हिरव्या लयीत नाचणे
धुंद सर्जनाचे गाणे...

मिणमिण चांदण्याचा
किणकिणतो गारवा
धरी काठ क्षितिजाचा
सोनपाखरांचा थवा
उगवतो सूर्य नवा...

पिंपळाच्या झाडावर
येऊन घार बसली
अलगद कौलावर
तशी सांज उतरली
गाई-गुरे हंबरली

गंधाचे ऋतू फुलात
उमलताना पाहिले
भावनांचे अंतरात
किती कल्लोळ उठले
मन झाडास वाहिले

**- मुबारक शेख**
भ्रमणध्वनी
९६६५२५७१९१



# सारे आयुष्य

आयुष्याची काही
पाने अजूनही
कोरीच राहिलीत

एकेक पान उलटतो
किती सांडलोय पाना-पानांवर

किती कठीण असते जगणे
आणि त्याहूनही नोंदवणे

कितीदा उडालो
अनेकदा कोसळलो
आकाश अजूनही नाही
आलेय मिठीत

स्वप्नांची रोपे
कितीदा उगवलीत
कितीदा उखडलीत कुणीतरी
चुपचाप राहावेच लागेल

कुणा-कुणासाठी
इथे आयुष्य पणाला लावले

जगलोच नाही स्वतःसाठी

तरीही हसतच राहावे लागले
सारखे दुःखाचे चेहरे लपवून
इथे मला जगावेच लागले

माझे जगणे
अनेकदा
अनुत्तरित
अनेकदा
प्रश्नांकितही

मी नाही सोडवू शकलो
स्वतःला या चक्रव्यूहातून
उत्तरांच्या मैफिलीतूनही
मी बाद केले स्वतःला

वादळांच्या जीवघेण्या रात्री
आणि छलचक्रांचे दिवस
झेलून काढलेत मी
संयमाच्या मुसळधार बरसातीत

अजूनही थांबलेले नाहीत
वेदनेचे उन्हाळे
आणि पावसाळेही

हिवाळेही
जीवघेणेच होते
माझ्यासाठी

उलटतोच आहे
उर्वरित कोरी पानेही
नोंदवण्यासाठी
सारे आयुष्यच
माझे होरपळीचे

**- शशिकांत हिंगोणेकर**
भ्रमणध्वनी : ७२१८७९२१८६



## कुणब्यासारखा

असा कसा उभा
विटेवरी थेट
किती झाली वीट
पुण्यवान

बघ तुझ्या दारी
गर्दीमध्ये कोण
तुला हरक्षण
बघावया

भेगाळले पाय
तुडवून वाटा
काढला ना काटा
रुतलेला

ऊन-पावसात
अभंगात दंग
तुलाच अभंग
ऐकवाया

गोठ्यातली आप्त
पाठीवर हात
तेच देती साथ
तुझ्याविना

कुणब्यासारखा
दिसला का कुणी
देते दाणा-पाणी
मुंगीलाही

कुणबीच देतो
घासातला घास
कुणी नसे दास
तरी त्याचा

शोधुनिया बघ
तुझं तू ब्रह्मांड
कुणबी थोतांड
करतो का?

त्याच्यामुळे तुला
पंढरीत भाव
तरी का लिलाव
त्याचा होतो

त्यालाच देणं रे
थोडीशी हिंमत
घामाला किंमत
देऊनिया

काही नको मला
माझ्यासाठी बरं
डोळी नको सरं
कुणब्याच्या

**- गणेश भाकरे**
भ्रमणध्वनी : ९९२३८२९७१७

## वैतागांचा ढग

मी असा रस्त्याच्या मधोमध उभा
की रस्ताच माझ्यातून पसरत गेलेला

दोन्ही बाजूला वाहने तुंबलेली
अन् माझा आकार तर वाढतच चाललाय

कुणीतरी पोलिसांना फोन केलेला
पोलीस शिट्या वाजवून
वाहतूक सुरळीत करण्याच्या प्रयत्नात

काही जवळ येऊन
निरखून गेलेत मला चहूबाजूंनी
कुणीतरी क्रेन मागवा म्हणतोय
मला हटवायला

कुणालाच काही कळत नाहीये
माझा आकार का वाढत चाललाय?
गोंधळच गोंधळ सुरूये सर्वत्र

पण मी आहेच कुठे तिथे?
तो तर माझ्या
आतल्या वैतागांचा ढीग साचलाय भलामोठा...

**- अशोक कोतवाल**
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९



## वर्तमानाचा कणा

ती आली, थोडी बसली, वरती पाहून हसली
पेढे घेऊन आलेय सर, ओशाळं हसत म्हणाली

ओळखण्याचा प्रश्नच नव्हता, फोन करून आलेली
संस्कारांचंही ओझं होतं, एवढंच फक्त म्हणाली

सर तुम्ही मूल्यं शिकवलीत, आम्ही मनामध्ये जपली
बाजारात मूल्यांना किंमत नाही, परिस्थिती म्हणाली

बाबांचा फंड अन् आईची मिळकत तेवढी विकली
चाळीस लाखात बघा सर, किती मस्त नोकरी
मिळाली!

आता स्थळ चांगलं मिळेल, संसार सुखाचा होईल
गावातील जमीन विकून भावाचंही जमून जाईल

आता कणा ताठच राहील म्हणून सांगता नाही येणार
एकदा बाजार म्हटल्यावर कोणाची कोण ग्यारंटी
देणार?

माझं पैशावर भागलं, अब्रू सुरक्षित राहिली
माझी एक मैत्रीण आपलं सर्वस्व गमावून बसली

मूल्यं कुचकामी झाली तरी, ती शिकवत राहा सर
मूल्य जगण्याचा भाग होती, इतिहास नोंद घेईल
सर

**– डॉ. विनय बापट**
भ्रमणध्वनी : ९४२३८३४५८५

## माणूस धर्म

दोस्ती अशी पुराणी तोडून यार गेला
माझ्याच भावनांशी खेळून यार गेला ।

गावात वेचलेले ते दिवस सोनपंखी
गणगोतही बिचारे विसरून पार गेला ।

ते भामटे कधीही येतात वळचणीला
फसवून एकटीला दारात वार केला ।

सांगू नकाच आता तुमची बरे हुशारी
सन्मार्ग तुडविला अन् जगण्यास भार केला ।

वृत्ती मुळीच तुमची खंजीर खुपसणारी
माणूस धर्म अवघा जातीत ठार केला ।।

**– अशोक लोटणकर**
भ्रमणध्वनी : ९२२४३७०१२४



## स्कायलाइन

वेगवेगळ्या प्रहारातील
त्या विराट महानगरीचे रूप
निरखतोय कधीचा मी
हडसनच्या नितळ काठावर.
महासत्तेचा विशाल मेघ
डोईवरून जाताना
होते टॉवर्सची दमछाक.
वर्ल्ड ट्रेड सेंटरचा सुळका
न्याहाळताना ९/११ आठवणींची
भयाण लहर चमकून जाते सर्वांगात.
बुलस्ट्रीटचा वळू बेरक्या नजरेने
पारखत असतो मला, खिशाला!
बिल गेट्सच्या महासंगणकावर
दिसत असते वारंवार
उद्याच्या मायावी जगाचे रूप.
कृत्रिम बुद्धिमत्तेचा अलिबाबा
गल्लीबोळात उंडारतोय
गरजवंतांना खिंडीत गाठून
कथा, कविता ते सेक्स
असं सर्वकाही देतोय रेडीमेड
अगदी फ्रॅक्शनमध्ये!
वॉरेन बफेची गोंडस छबी
भुरळ पाडत असते
गुंतवणुकीदारांवर, दलालांवर.
ब्रूकलिनच्या राक्षसी पुलावरून
धापा टाकताना रोज दर्शन घेतो
निरागस स्वातंत्र्यदेवतेचे
तिच्यातील अचाट शक्तीचे.
म्युझियममधली अब्स्ट्रॅक्ट चित्रे
अचानक फेर धरून नाचू लागतात
पोर्ट्रेट्सच्या मुखावरचे भाव बदलतात
आणि गोंडस शिल्पांचे मादक हात
कवेत घेण्यासाठी पुढे सरसावतात.

मी थरारून पुन्हा हडसन काठी...
माझ्या पॅलेटमधले एकेक रंग
सफेद, काळा, तपकिरी
कॅनव्हासवर ओघळू लागतात
अनाकलनीय भाषेत बोलू लागतात!

मग... न्यूयॉर्कची स्कायलाइन
हळूहळू धुरकट होत जाते
कसलीशी महाघोषणा होण्यापूर्वी
हडसनमध्ये विलीन होते.

**– रामदास खरे**
भ्रमणध्वनी : ९८६९०१४३१९

## कोणी लिहिल्या चिमण्यांवर कविता?

हल्ली चिमण्यांची संख्या कमी झाली
कुठे गेल्या एवढ्या चिमण्या नि
त्यांचे चिवचिवणे?

प्रत्येक कवीने
चिमण्या वाटून घेतल्यामुळे
चिमण्यांची संख्या कमी झालीय
असं समीक्षकांचे मत झाले
नि
त्यात कवींचाच हात आहे
असेही शेवटी एकमताने मंजूर झाले
तेव्हापासून,
चिमण्या कवितेतूनही
गायब झाल्यात कायमच्याच
चिमण्यांवर कोणी कविता लिहिल्या
त्याचा शोध सुरू आहे सध्या

तुम्ही लिहिल्या
की तुम्ही लिहिल्या
चिमण्यांवर कविता?

**– मोहन काळे**
भ्रमणध्वनी : ९८६९२३६०८३




## मधुमेही जगण्याला

किती हाका दिल्या तरीही
कानकोंडे जगणे ठाम
स्वप्नांमागे पळता पळता
आत्म्यालाही फुटला घाम

आसक्तीच्या हिंदोळ्यावर
इंद्रियांचे ढोपर फुटे
रिल्समधल्या आभासाने
जगणे वाटू लागे थिटे

मनामधल्या जळमटांना
रोज फुटे नवी पालवी
संस्कारांचा बागुलबुवा
कठपुतळीचा खेळ खेळवी

देहाचीच झालीये जीभ
जिभेचे या चोचले फार
मधुमेही जगण्याला ह्या
आयुष्याचे कडवट सार

**– गीतेश गजानन शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६

# मुंबई मराठी साहित्य संघ


**विश्वस्त** : श्रीमती विजया दिवेकर, श्री. अभिजित गजेंद्रगडकर,
श्री. अभय भालेराव, श्री. उदय कुलकर्णी

**अध्यक्ष** : श्रीमती अचला जोशी

**उपाध्यक्ष** : श्री. अशोक कोठावळे, श्री. गंगाराम गवाणकर,
डॉ. मधुकर केशव वर्तक, श्री. विजय केंकरे,
डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्रीमती रेखा नार्वेकर

**नियामक मंडळ सदस्य** : प्रा. उषा तांबे, डॉ. अश्विनी भालेराव-गांधी, श्री. प्रकाश पागे,
डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, श्री. अशोक बेंडखळे, श्री. सुभाष भागवत,
श्री. प्रमोद पवार, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. चंद्रशेखर गोखले,
श्री. स्वामीकुमार बाणावलीकर, श्री. पद्माकर शिरवाडकर,
प्रा. प्रतिभा बिश्वास, श्री. एकनाथ आव्हाड, प्रा. डॉ. नरेंद्र पाठक,
प्रा. प्रतिभा सराफ, श्रीमती सावित्री हेगडे, श्री. दिलीप भाटवडेकर,
श्रीमती शकुंतला मुळ्ये, श्री. विलास म्हामणकर, श्री. सुधीर ठाकूर,
श्री. रोहिदास पांगे, श्रीमती रेखा नार्वेकर, श्रीमती शैलेजा म्हात्रे,
श्री. मनोहर सोमण, श्रीमती मोनिका गजेंद्रगडकर, श्री. यशवंत भिडे,
डॉ. अनुपमा उजगरे, डॉ. दीपक पवार, डॉ. सुरेखा सबनीस,
श्री. नारायण लाळे, श्री. अनंत दाभोळकर, श्री. सतीश सामंत,
श्री. अनिल गचके, श्री. सारंग दर्शने, श्री. सिद्धार्थ पारधे,
श्री. ज्ञानेश पेंढारकर, श्री. मिलिंद जोग


**स्वीकृत सदस्य** : श्रीमती मीनाक्षी जयकर, श्री. आमोद उसपकर

**सन्माननीय सल्लागार** : श्री. दिनकर गांगल, श्री. जयराज साळगावकर, श्री. प्रसाद कांबळी

**कार्यकारी मंडळ** : कार्याध्यक्ष - प्रा. उषा तांबे, कोषाध्यक्ष - श्री. प्रकाश पागे,
प्रमुख कार्यवाह - डॉ. अश्विनी भालेराव-गांधी, श्री. सुभाष भागवत,
कार्यवाह - श्री. अशोक बेंडखळे, साहित्य शाखा, श्री. प्रमोद पवार - नाट्य शाखा
श्री. सुभाष भागवत - संघमंदिर

**सदस्य** : डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. सुहासिनी कीर्तिकर, श्री. मनोहर सोमण,
श्री. सुधीर ठाकूर, श्री. रोहिदास पांगे, श्री. एकनाथ आव्हाड

**स्वीकृत** : श्री. ज्ञानेश पेंढारकर


सारस्वत
बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...
आमचे सर्व ग्राहक, सभासद व हितचिंतकांना
शुभ दीपावली
ही दीपावली आपणा सर्वांना सुखाची, समृद्धीची
आणि भरभराटीची जावो!
www.saraswatbank.com